उमाकान्त ठोमरे

उमर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९२०

REFBK-0023462

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 MAY 1982
5 MAY 1982
16 MAY 1982
2 JUN 1982
20 JUN 1982
30 JUN 1982
7 JUL 1982
14 JUL 1982
20 OCT 1982
7 AUG 1988
9 OCT 1988
20 APR 1988
4 MAY 1988
14 SEP 1988

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

संदर्भ निबंध
२९२०
२३४६२
१३।३।८२

ठुमरी

उमाकान्त ठोमरे

REFBK-0023462

कवडसे प्रकाशन / मुंबई

पहिली आवृत्ती : जानेवारी १९८२
© सौ. सुधा ठोमरे

प्रकाशक : **अशोक वसंत तारकर**
कवडसे प्रकाशन,
७/७ होमजी स्ट्रीट रहिमतुल्ला हाऊस,
३ रा मजला, फोर्ट, मुंबई ४०० ००१

मुद्रक : **ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे**
मंदार प्रिंटर्स, ४९५/९६ शनवार पेठ,
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ : **अशोक तारकर**
मांडणी : **जयंत ताडफळे**

प्रस्तावना : **वसंत शिरवाडकर**

मूल्य ३० रुपये

...तेव्हाची ती
कावेरी कुलकर्णी
आणि
आताची
सौ. सुधा
स्व-स्त्रीच्या
या दोन
अद्वितीय वत्सल रूपांस
कृतज्ञतापूर्वक...

थोडे नोम तोम....

'ठुमरी' हे काही माझं आत्मचरित्र नव्हे, तर निमित्ता-निमित्तानं लिहिलेल्या आत्मकथनपर, व्यक्तिचित्रणात्मक वा सुख-संवादस्वरूप ललित लेखांचं संकलन आहे. हे सारं जरी निमित्ता-निमित्तानं लिहून झालेलं असलं तरी एकूण लेखनाच्या संदर्भात आपण कुठे उणे वा उघडे पडू नये याचं भान ते लिहिताना माझ्या मनानं बाळगलं असणारच. हे झालं माझं वाटणं– त्याला तसा काही अर्थ नाही; पुन्हा आत्मविश्वासाचा प्रचंड अभाव असलेला मी माणूस– आणि म्हणूनच मग मी ते सारं माझ्या गेल्या अडीच-तीन तपांच्या वाटचालीचे साक्षी, माझे थोर मित्र आणि मर्मज्ञ साहित्य-समीक्षक श्री. वसंत शिरवाडकर यांच्या स्वाधीन केलं. हेतू असा की त्यांनी या लेखांची निवड, संपादन-संकलन आणि समीक्षा ही सारीच जबाबदारी पत्करावी. वसंतरावांनी आपली जबाबदारी चोख पार पाडलीय. आता प्रास्ताविकात त्यांनी माझ्या पदरात जरा झुकते माप घातले आहे खरे. ते निव्वळ स्नेहभावनेनं की तटस्थ समीक्षक या नात्यानं याचा निवाडा रसिक वाचकांनी करावयाचा आहे. शिरवाडकरांनी ज्या आत्मीयतेनं हे सारं केलं ते केवळ आभारातीत आहे.

चित्रकार अशोक तारकर, रवींद्र धोत्रे आणि सौ. रेखा नार्वेकर ही 'कवडसे प्रकाशन'ची साहित्य, संगीत, नाट्य आणि चित्र या कलाविश्वावर झडझडून प्रेम करणारी तरुण त्रयी. मला 'जनरेशन ग्यॅप' वगैरे जाणवू न देणाऱ्या या मुलांच्या आंतरिक उत्साहामुळेच 'ठुमरी'ला आज दिवसाचा प्रकाश दिसत आहे; यात शंकाच नाही. आज उणीपुरी चाळीस वर्षं लेखन, संपादन, प्रकाशन व्यवसायात राहूनही पुस्तकं का व कशी प्रसिद्ध होतात (आणि ती का व कशी खपतात ?) हे मला कोडेच राहिले आहे. सुंदर, सुबक मुद्रण कोण करून देईल आणि उत्तम प्रतीचा कागद कसा आणि कुठे मिळू शकेल इथपासूनच प्रकाशनाचे हे 'प्रश्नोपनिषद' सुरू होते. आपण जणू काही विशेष केलेलेच नाही अशा थाटात चित्रकार जयंत ताडफळे पुस्तकाची मांडणी कलात्मक व्हावी आणि सुंदर, सुबक व्हावी यासाठी त्यात स्वतःला झोकून देतात. मुद्रणव्यवसायातली मुद्रण विशेषज्ञ समजली जाणारी विश्राम शिरवाडकर आणि देवेन शिर्सेकर ही जोडी उत्तम प्रतीचा कागद तत्परतेनं उपलब्ध करून देतात. त्यांच्या या स्नेहभावाचे आणि अगत्याचे कोणीही झाला तरी कोणत्या शब्दात आभार मानू शकेल ?

'ठुमरी'च्या मुखपृष्ठासाठी देखणे, अर्थवाही आणि कल्पकतापूर्ण चित्र सिद्ध करण्याची किमया अशोक तारकरांच्या कुंचल्याची. ते स्वतः फार कमी बोलतात आणि मी त्यांच्याविषयी फार स्तुतीपर वगैरे बोललेलंही त्यांना रुचणार नाही. तर ते एक असो.

ज्या या सर्व मित्रांच्या साहाय्यामुळे 'ठुमरी' प्रसिद्ध होत आहे त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. त्यांच्यासाठी करण्याजोगी तेवढी एकच गोष्ट आज माझ्या हातात आहे.

–उमाकांत ठोमरे

अनुक्रमणिका

- बोलू की नको ? / १
- दुधाची सय / ८
- लग्न सराई / १९
- सुंदर माझा गाव : अहमदनगर / २७
- अशी होती माझी शाळा / ३४
- वर्ष अखेर / ४६
- श्रद्धेच्या संदर्भात थोडंसं .. / ५३
- बल्झाक : एक जिद्दी रंगदार व्यक्तिमत्त्व / ५८
- हिचकॉक विषयी सर्व काही / ६७
- असा एक गजेंद्र, अशी एक एक धुवाँधार वृष्टी / ८४
- अजून यौवनात मी... / ९१
- हवाहवासा पी. एल. / १११
- सन्मित्र सरवटे अर्थात खाजगीतले वसंतराव / १२१
- हसणारी रेषा / १३४
- एणें दृग्‌यज्ञे तोषावें / १४१

●●●

साथ

माझे मित्र श्री. उमाकांत ठोमरे यांची ही 'ठुमरी' इतकी रससिद्ध आहे की तिची रंगत उलगडून दाखवायला कोणाच्या मध्यस्थीची गरज नाही. पण काही मंगल प्रसंग असेल तर डोक्यावर टोपी घालावी असा संकेत जुनी माणसे पाळतात, त्याप्रमाणे पुस्तकाला प्रस्तावना असावी हा एक शिष्टसंमत साहित्यिक संकेत आहे; आणि ठोमऱ्यांनी माझा अधिकार वगैरे न पाहता आमच्या स्नेहावर ध्यान देऊन प्रास्ताविकाची ही जबाबदारी माझ्यावर सोपविली. मी पण ठोमऱ्यांनी जो विचार केला तोच विचार करून, आढेवेढे न घेता ती स्वीकारली. पण जेथे असे स्नेहाचे नाते असेल तेथे जे चवलीएवढे आहे ते चाकाएवढे दिसेल, असा यावर आक्षेप येण्याचा संभव आहे. पण जे चाकाएवढे आहे ते चवलीएवढे दिसण्यापेक्षा हे बरे, अशी त्या आक्षेपाची वासलात लावता येईलही. पण खरे तर स्नेहामुळे दृष्टीला आंधळेपणाचा दोष येतो असा काही विधिलिखित नियम नाही. उलट जेथे ममत्व व जवळिक असेल तेथे माणसाचे मन अधिक–चांगल्या प्रकारे समजू शकते, हा अनुभव काही असाधारण नाही. चरित्र लेखनाची साक्ष याच बाजूने काढता येईल. तेव्हा दोन तपांहून अधिक काळचा स्नेह लाभलेल्या उमाकांत ठोमऱ्यांच्या पुस्तकाला प्रास्ताविक जोडताना मला यत्किंचितही संकोचल्यासारखे वाटत नाही उलट मित्राच्या पंगतीला बसून जेवण्याचा आनंद मला येथे मिळतो आहे.

उमाकांत नीमराज ठोमरे अहमदनगराकडले. 'ठोमरे' आणि 'ठोंबरे' असे आडनावात दोन भेद आहेत. दोन्ही प्रकारांनी हे आडनाव लिहिले-उच्चारले जाते; यातला उमाकांत नीमराजांनी पहिला स्वीकारला. अहमदनगर जिल्ह्यात नगरखेरीज श्रीगोंदे, शेवगाव, आकोले, कोपरगाव, संवत्सर, पुणतांबे वगैरे ठिकाणी ठोमऱ्यांचे बालपण गेले. माध्यमिक शिक्षणासाठी ते पुण्यास होते. पुण्यास शाळा करीत असताना 'शालापत्रक' मासिकात कविता व गोष्टी लिहून ते लेखक होण्याच्या मार्गाला लागले. आता त्यांनी साहित्याची जवळिकच का केली, पुण्यास इतके आखाडे असताना एखाद्या आखाड्यात जाऊन ते पहेलवान का झाले नाहीत, या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. मला वाटते त्यांची आई एक शिक्षिका होती, तिने केलेले संस्कार यात कुठेतरी असावेत. पण हा मार्ग स्वीकारल्यानंतर ठोमरे मग अविचल तो चालत राहिले.

शिक्षण आटोपल्यावर ठोमरे पुण्याहून मुंबईस आले ते कामगार चळवळीत 'शरीक' होण्यासाठी. यावेळी दादरला कोणा मित्राच्या ब्लॉकमध्ये राहून

ते घरळ-लालबागच्या कामगार चळवळीचे काही भलेबुरे करीत होते. बेचाळीसच्या चळवळीची थोडी मातीही त्यांनी अंगाला लावून घेतली. नंतर परिस्थितीच्या दबावाखाली एक आपद्धर्म म्हणून त्यांनी प्रथमच मुंबईला आणि नंतर देवळालीला (नासिक) दोन-अडीच वर्षे मिलिटरी इंजिनीयरिंग-मध्ये नोकरी केली. ती सोडून ते जे पुन्हा मुंबईस आले ते आता पस्तीस वर्षे मुंबईत आहेत. अशा रीतीने नगराकडला हा असामी आता प्रातिनिधिक मुंबईकर बनला आहे. या तीन तपांच्या काळात ठोमऱ्यांनी मुंबईत स्वतःचे 'धरित्री प्रकाशन', 'वीणा' मासिकाचे संपादन-संचालन, 'सिंधू प्रकाशन' या संस्थेच्या संपादकीय विभागात नोकरी, 'नवनीत' या सारसंकलात्मक मासिकाचे संपादन असे साहित्याशी संबंधित असलेले अनेक उद्योग केले. या सर्व काळात त्यांचे लेखन चालू होतेच. संपादन व प्रकाशनाच्या उद्योगाच्या निमित्ताने ठोमऱ्यांचे संगीत, नाट्य, साहित्य, चित्रकलादी क्षेत्रातील अनेक व्यक्तींशी निकटचे संबंध आले; अनेकांचा स्नेह त्यांनी जोडला; मित्रमंडळींच्या तांडचात ते सतत वावरले आणि स्वभावदत्त वक्तृत्वपूर्ण संभाषणशैलीने अनेक मैफली त्यांनी गाजवल्या-गजबजत्या ठेवल्या.

हातात बॅग, तोंडात पाइप, पाठीला किंचित बाक व त्यामुळे थोडी पुढे झुकलेली मान, भूमीला वाकवीत आहोत अशा थाटातली चाल, जंगलात जाळ्यांमधून सावज शोधीत फिरणाऱ्या व्याघ्राची नजर, रस्त्याच्या कडेला कुणाशी तरी मोठ्या आवाजात संभाषण, मधूनच मग गडगडाटी हास्य असे हे ठोमरे प्रथम हिंदू कॉलनी व दादर टी. टी. चा भाग आणि नंतर गिरगाव नाक्याच्या परिसरात अनेकवेळा दिसत. वसंत सरवटे ठोमऱ्यांच्या प्रेमात पडले त्याचे आद्य कारण मला वाटते, ठोमऱ्यांच्या आकृतीने त्यांच्या बोटांना (अंतःकरण वगैरे नंतर) दिलेला आनंद हे असावे ! ठोमऱ्यांनी यथाकाल मुंबईची गर्दी व गजबज स्वतःमध्ये मुरवून घेतली. पश्चिम रेल्वेच्या लोकल गाडीचा बोरिवली ते चर्चगेट हा प्रवास एक विरंगुळा वाटावा इतपत ते मुंबईच्या जीवनाशी समरस झाले.

परंतु हे सर्व होत असता व करीत असता ठोमऱ्यांच्या मनात नगर, श्रीगोंदे, अकोला, पुणतांबे, प्रवरा, गोदा, सोना यांच्या स्मृती कधीच पुसल्या गेल्या नाहीत. 'परी स्मरती आणि व्याकुळ करती केव्हा' अशा या स्मृती ठोमऱ्यांच्या मुंबईकर मनाच्या पृष्ठभागाखाली नेहमीच ताज्यातवान्या राहिल्या आहेत. थोडा अवसर मिळाला की त्या वर उचंबळून येतात. आईवडलांच्या मायेच्या सावलीत जेथे बालपण गेले ती ही ठिकाणे आणि पस्तीस-चाळीस वर्षांखालचा तो काळ याविषयी अंतःकरणाला लागून राहिलेली ओढ ही ठोमऱ्यांच्या ललित लेखनामागची एक बलवत्तर प्रेरणा आहे.

प्रस्तुत संग्रहाच्या पहिल्या भागात आलेले, 'लग्नसराई', 'सुंदर माझा गाव', 'अशी होती माझी शाळा', 'श्रद्धेच्या संदर्भात थोडेसे' हे लेख आत्मकथनपर आहेत. या लेखात ठोमऱ्यांनी गतकाळाच्या आपल्या आठवणींना नॉस्टॅलजियाला मोकळी वाट करून दिली आहे. नॉस्टॅलजिया म्हणजे मनात जुन्या आठवणींची नुसती गर्दी होणे नव्हे, तर काही विशिष्ट स्थलकालाविषयी मनाला एक प्रकारची आर्त ओढ लागून राहणे होय. अशा प्रकारची आर्त ओढ लागणे हे श्रद्धाशील मनाचे लक्षण आहे. आणि ठोमऱ्यांचे मन असे श्रद्धाशील आहे. 'श्रद्धेच्या संदर्भात थोडेसे' या चिंतनपर लेखात मी नास्तिक आहे का या प्रश्नाचे उत्तर आपल्यापाशी नाही असे ते म्हणतात. पण त्यांच्या या म्हणण्यातच त्या प्रश्नाचे उत्तर आले आहे. ते नास्तिक नाहीत. कदाचित त्यांच्या आस्तिक बुद्धीला आज्ञेयवादाचे झिरझिरीत पटल असेलही. पण ते नास्तिक मात्र खचितच नाहीत. याच लेखात पुढे ते वणीच्या सप्तशृंग गडावरच्या देवीपुढे आपल्या आद्य पुरुषाच्या आठवणीने आपण विनम्र झाल्याचे जे सांगतात, ते त्यांच्या श्रद्धाशील मनाचेच द्योतक आहे. 'वर्ष-अखेर' या लेखात 'मनावर खोल ओरखडा उमटविणाऱ्या' वर्षअखेरच्या दोन आठवणी ते सांगतात. वर्षाचे अखेरचे क्षण सरताना त्यांचे श्रद्धाशील मन हळुवार होते. नव्या वर्षाचे स्वागत करताना आयुष्यातून एक वर्ष सुखदुःखाच्या आठवणी मागे ठेवून ओघळल्याची उदास जाणीव ते अनुभवतात.

'सुंदर माझं गाव', 'अशी होती माझी शाळा' व 'लग्नसराई' या लेखात ठोमरे एकदोन नव्हे तर चांगली पस्तीस-चाळीस वर्षे मागे वळून पाहत आहेत. नगरच्याच आठवणी त्यांच्या मनात येथे रुंजी घालत आहेत. 'त्याचं काय आहे की इतरांची नुसती गावं असतात, पण माझं मुदलातच नगर आहे', हे विधान विनोदी तर खरेच, पण त्यात ठोमऱ्यांचा आपल्या गावाविषयीचा निरागस अभिमानही व्यक्त झाला आहे. या काळाकडे ठोमरे मागे वळून पाहतात असे मी म्हटले, पण खरे तर ठोमरे आपल्या स्मृतिकोशात प्रविष्ट होऊन हा जुना काळ अक्षरशः पुन्हा जगतात; आणि म्हणूनच चाळीस वर्षांपूर्वीचं नगर काय, लग्नसोहळा काय किंवा त्यांची शाळा काय याचे जिवंत, बोलके चित्र ते आपल्यापुढे उभे करू शकतात. 'दुधाची सय' मध्ये सुद्धा पस्तीस वर्षांपूर्वी गावी रतिवाने दूध घालणाऱ्या पाटलीणबाई आणि मुंबईत दुधाच्या वाटलीने वाद केलेला दूधवाला भैय्या यांची ते कृतज्ञ सय करतात. दुधावरच्या सायीसारखी मऊ व जिभेवर रेंगाळणारी! जुने 'मरणालागुनी' जातेच आहे, त्याचे ते अटळ प्राक्तन आहे. पण व्यक्तीचे आयुष्य हे एका दुव्याने दुसरा दुवा जोडलेल्या साखळीसारखे असते; आणि व्यक्तीच्या आयुष्यातले हे जुने कधीतरी सांप्रत अथवा वर्तमानकालीन

होतेच. त्यातले जे विशेषत: तकलुपी नव्याच्या मानाने कसदार, पीळ भरणारे होते त्याची सय माणसाला अस्वस्थ करीत असल्यास त्यात अस्वाभाविक काहीच नाही.

'लग्नसराई' हा लेख ठोमऱ्यांच्या या भाववृत्तीचा आणि एकूण लेखनकलेचा उत्तम नमुना आहे. वॉशिंग्टन आर्यविगच्या 'स्केचबुक'मधल्या ख्रिसमसवरील लेखाची आठवण करून देणारा हा लेख आहे. पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वीच्या लग्नसोहळ्याचे ठोमऱ्यांनी या लेखात रेखाटलेले चित्र मोठे लोभस आहे. ज्यांनी हे लग्नसोहळे पाहिले असतील त्यांना येथे पुनःप्रत्ययाचा सुखद अनुभव येईल आणि ज्यांनी पाहिले नसतील त्यांना आपल्या आई-वडिलांचा व आजाआजींचा हेवा वाटेल !

आजचे लग्नसमारंभ कार्यालयात किंवा सार्वजनिक हॉलमध्ये बारा तासांच्या सक्त कालमर्यादेत उरकतात. दुपारी भोजन (भोजनकर्त्यांपैकी बहुतेक जण तासभर ऑफिसात उशिरा जाण्याची सवलत मिळवून जेवायला आलेले असतात.) आणि संध्याकाळी मित्र व आप्तेष्टांकडून अहेर उपटण्यासाठी ठेवलेला स्वागतसमारंभ आटोपला की नवरा-नवरी हनीमुनला जायला मोकळे होतात. आजच्या या कार्यालयीन लग्नसमारंभाच्या नीरस पार्श्वभूमीवर, पूर्वीच्या चार-चार, पाच-पाच दिवस चालणाऱ्या लग्नसमारंभाचे ठोमऱ्यांनी वर्णन केलेले चित्र कसे ठसठशीत वाटते. आजच्या लग्न समारंभात आटोपशीरपणा जरूर असतो, पण त्याचबरोबर त्याला एक रूक्ष, ओंगळ, वैतागवाणा औपचारिकपणा आला आहे. देखावा, डामडौल, मुलीच्या बापाला नागवण्याचा निर्दयपणा, हे सर्व आजही सर्रास चालू आहे. या गोष्टींनी नवा मुखवटा चढवला आहे इतकेच ! आजची पद्धत चांगली की पूर्वीची चांगली असा प्रश्न ठोमऱ्यांनी येथे उपस्थित केलेला नाही. पण ज्याची आतुरतेने वाट पाहवी आणि तो झाल्यावर ज्याची आयुष्यभर आठवण जपावी असे पूर्वीच्या काळातल्या लग्नसमारंभाचे स्वरूप असे हे मात्र निश्चित. याचे कारण जग अद्याप सर्वस्वी नाण्याभोवती फिरू लागले नव्हते आणि आपल्या आयुष्याचे नियंत्रण आपण घड्याळ्यातल्या काट्यांकडे सोपविलेले नव्हते ! ठोमऱ्यांच्या लग्नसराईचा हा अर्थ आहे.

या संग्रहाच्या पहिल्या भागातील लेख आत्मचरित्रपर आहेत तर दुसऱ्या भागातले लेख चरित्रपर आहेत. म्हणजे व्यक्तिचित्रे आहेत. बल्झाक आणि हिचकॉक यांच्यावरचे मिळविलेल्या माहितीवर आधारलेले दोन लेख सोडल्यास, बाकीचे लेख ठोमऱ्यांना ज्यांच्याविषयी विशेष प्रेम व जिव्हाळा वाटतो आणि ज्यांच्या कार्य-कर्तृत्वाविषयी त्यांना विशेष आदर आहे अशा व्यक्तींची स्वभावरेखाटणे आहेत. व्यक्तिचित्र हा चरित्रात मोडणारा

साहित्यप्रकार असला तरी लेखकाची तटस्थता जी चरित्रलेखनाला उपकारक ठरते तशा तटस्थतेची व्यक्तिचित्रांच्या बाबतीत, निदान तेवढ्या प्रमाणात तरी अपेक्षा नसते. कारण व्यक्तिचित्रात लेखकाला नायक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची आलेली प्रतीती सर्वाधिक महत्त्वाची असते. म्हणून ठोमऱ्यांची ही व्यक्तिचित्रे 'नानासाहेब फाटक आणि मी', 'वसंत सरवटे आणि मी', 'पु. ल. देशपांडे आणि मी' अशा स्वरूपाची आहेत, त्यात बावगे काहीच नाही. 'चांगल्याच्या दर्शनाने गहिवरणे व भारावून जाणे हा माझ्या स्वभावाचा दुर्बल भाग आहे' असे ठोमरे सांगतात. यातल्या 'दुर्बल' या विशेषणाकडे आपण दुर्लक्ष करू. गहिवरणे आणि भारावून जाणे हे भावना-प्रधान माणसाच्या मनाचे लक्षण आहे. ठोमरे असे भावनाप्रधान आहेत. ते आपल्या विषयापासून तटस्थ राहू शकत नाहीत, कारण व्यक्तिचित्रांचा विषय झालेल्या व्यक्तींच्या ठिकाणी ते भावनेने गुंतलेले आहेत. पण भावना आणि भावविवशता यातला फरक ते मनोमन जाणतात; आणि म्हणून त्यांची व्यक्तिचित्रे आत्मनिष्ठ असली तरी त्यात भावविव्हलता कोठेही नाही.

ठोमऱ्यांचे व्यक्तिचित्र क्वचितच निवळ वर्णनात्मक होते. नाट्य हा त्यांच्या व्यक्तिचित्रांचा सर्वाधिक आकर्षक विशेष होय. याचा अर्थ व्यक्तिचित्रासाठी ते नाट्यपूर्ण प्रसंगांचीच तेवढी निवड करतात असा नव्हे, तर ते जे प्रसंग अनुभवतात त्यातले नाट्य हेरण्याची अचूक दृष्टी त्यांना आहे. त्यांचे प्रत्येक व्यक्तिचित्र ही वेधक नाट्यप्रसंगाची एक मालिका असते. 'अजुनी यौवनात मी' हे नानासाहेब फाटकांचे व्यक्तिरेखाटन तर एक नाट्याविष्कारच म्हटला पाहिजे. नटाच्या व्यक्तिचित्राला नाट्याची डूब देण्यात ठोमऱ्यांनी खासच औचित्य साधले आहे. नटाला त्याच्या निवृत्तिकालात यौवनाच्या उमेदीतल्या आपल्या रंगस्मृती व नादस्मृती बेचैन करीत असाव्यात. नानासाहेब फाटकांच्या या व्यक्तिचित्रात हा बेचैनीचा सूर जाणवल्यावाचून राहात नाही. म्हणूनच मुद्दाम सांगावेसे वाटले असावे की 'अजुनी यौवनात मी!' मराठी रंगभूमीवरच्या या थोर नटाच्या भावनांची स्पंदने ठोमऱ्यांनी समरसून टिपली आहेत.

नानासाहेब फाटकांचे व्यक्तिचित्र अथइती गंभीर आहे तर वसंत सरवटे हे एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांच्या व्यक्तिचित्राचा बाज खेळीमेळीचा विनोदी ठेवण्यात ठोमऱ्यांनी स्वभाविक न्याय केला आहे. वसंत सरवटयांचे हे व्यक्तिचित्र या संग्रहातीलच नव्हे तर मराठीतले एक उत्कृष्ट व्यक्तिचित्र ठरावे. मिस्किल विनोदातून सरवटयांच्या संबंधातीलच आपली गाढ स्नेहभावना व्यक्त करण्याची ठोमऱ्यांनी येथे केलेली करामत लक्षणीय आहे.

'हवाहवासा पी. एल्.' हे एक प्रसंगोपात पत्र असले तरी पु. लं. च्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंचे दर्शन ठोमरे येथे घडवितात. त्यादृष्टीने हेही एक व्यक्तिचित्रच आहे. पु. लं. च्या साहित्याचे ठोमऱ्यांनी साक्षेपाने केलेले वाचन आणि त्यांची चिकित्सक समीक्षादृष्टी यांची उत्तम साक्ष या लेखात मिळते. 'पुन्हा हाती परत न गवसणाऱ्या, मनाला सुखद हुरहुर लावणाऱ्या गोष्टीविषयी (नॉस्टॅलजिया) पी. एल्. किती तन्मयतेने आणि तन्मयतेने लिहीत, बोलत असतो' असे ठोमरे एके ठिकाणी म्हणतात. ठोमऱ्यांचे हे निरीक्षण मार्मिक तर आहेच, शिवाय पु. ल. आणि ठोमरे यांच्या प्रवृत्तीतील हा एक समान धागा आहे. स्वभाव-साधर्म्यामुळेच ठोमरे पु. लं. चे साहित्य आणि एकूण व्यक्तिमत्त्वाविषयी इतक्या साक्षेपाने व आत्मीयतेने लिहितात. हा सर्वच लेख ठोमऱ्यांच्या तल्लख समीक्षादृष्टीची खात्री पटविणारा आहे. पु. लं. च्या भावविश्वाविषयी ते म्हणतात :

'पी. एल्. च्या साहित्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की तो मनापासून रमलाय-रंगलाय तो दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळातील– विशेषत: १९३७–३८ पर्यंतच्या कलाविश्वात. हे त्याचे विश्व आहे गायक-वादकांचे, नटांचे आणि नाटककारांचे. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी, नारायणराव राजहंस, तिरखवाँ, हिराबाई, केशरबाई, मास्तर कृष्णराव आणि गोविंदराव टेंबे या 'लास्ट ऑफ दि रोमन्स' ची ही अद्भुत दुनिया आहे. या भावविश्वात अडकून पडल्यामुळे (आणि त्यात वाईट असे काय आहे ? त्यांचे ते प्रेम आणि श्रद्धा डोळस कलासक्तीनेच जडावलेली आहेत.) नाट्यक्षेत्रातील तथाकथित नवीनता त्याला कधीच दिपवू वा रिझवू शकली नाही. (त्यातली कृत्रिमता, खुजेपणा, वेगडीपणाही त्याला कुठेतरी जाणवत असला पाहिजे. नव्यासाठी नव्याचा स्वीकार करणे त्याला रुचले नसणार आणि आपल्या भावविश्वाशी सर्वस्वी परकीय वा विसंगत असले काही स्वीकारण्याचा त्याच्या मनाची तयारी नसणार. जे बावनकशी, चांगले ते त्याने स्वीकारलेच आहे.)'

कलावंत पु. ल. च्या भावविश्वाचे ठोमऱ्यांनी केलेले हे निदान अचूक वाटते. कंसातला मजकूर कंसाबाहेरच्या मजकुराइतकाच महत्त्वाचा आहे. पु. लं. च्या अंतर्यामी एक भिडस्त असा लाजाळू मुलगा दडून बसलेला आहे हे ठोमऱ्यांचे निरीक्षण ज्यांनी पु. लं. ना काही अंतरावरून पाहिले आहे त्यांना आश्चर्यजनक वाटेल. असाधारण संभाषणचातुर्य व वक्तृत्वाची देणगी लाभलेल्या व्यक्तीच्या अंतर्यामात लाजराबुजरा मुलगाही लपून बसलेला असावा हा अंतर्विरोध विलक्षण म्हटला पाहिजे. पण माणसाच्या स्वभावात सकृद्दर्शनी विलक्षण वाटणारे असे विरोधाभास असतात आणि त्यांची तार्किक संगतीही लागते. मात्र हे लक्षात यायला पृष्ठभागाच्या पलीकडे

पाहणारी दृष्टी असायला हवी. वसंत सरवटचांचे एकूण व्यक्तिमत्त्व आणि स्वभावप्रकृती ब्रिटिश सद्‌गृहस्थावर बेतलेली आहे हे ठोमऱ्यांचे निरीक्षण असेच मार्मिक आहे.

आणखी एक गोष्ट. 'अचेतनाला सचेतन करणारी आणि वस्तूला व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देणारी' अशा शब्दात ठोमऱ्यांनी सरवटचांच्या रेषेचे यथार्थ वर्णन केले आहे. अनेक वर्षे मासिकांचे व पुस्तकांचे संपादन करीत राहिल्याने ठोमऱ्यांची कलादृष्टी पक्व–सीझन्ड झाली आहे. 'हसणारी रेषा' या लेखात व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांच्या चित्रकलेचे जे विविध बारकावे त्यांनी दाखविले आहेत त्यात त्यांची ही सीझन्ड, रसीली कलादृष्टी विशेषत्वाने प्रत्ययाला येते.

ठोमऱ्यांच्या लेखनशैलीसंबंधी काही न सांगता माझे हे प्रास्ताविक मी संपवले तर तो या पुस्तकाला व ठोमऱ्यांना अन्याय होईल. कारण ठोमऱ्यांची शैली ही त्यांच्या लिखाणाची एक खास बाब आहे. मराठीतल्या शैलीकार लेखकांच्या परंपरेत स्थान मिळावे इतकी त्यांची शैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. या बाबतीत सांगायची पहिली गोष्ट ही की ठोमऱ्यांना दांडग्या स्मरणशक्तीचे वरदान आहे. मराठी व पाश्चात्य साहित्याचा त्यांचा जो व्यासंग आहे त्याने त्या साहित्यातले दाखले संपन्न स्मरणशक्तीच्या जोरावर ते सहज जाता जाता देतात. 'वीणा' मासिकात ते 'वगैरे .. वगैरे' हे रोचक सदर लिहीत. त्यात याचा विशेष प्रत्यय येई. बासष्ट-त्रेसष्ट साली शि. द. फडणीसांच्या चित्रकलेवर लिहिताना चाळीस साली 'सत्यकथे' च्या अंकावर चित्रकार दलालांचे हास्यस्फोटक रंगीत विनोदी चित्र प्रसिद्ध झाल्याची आठवण ते देतात तेव्हा त्यांच्या स्मरणशक्तीचे खरोखर कौतुक करावेसे वाटते ! अशा अनेक गोष्टींची साठवण त्यांनी आपल्या स्मृतिकोशात करून ठेवलेली आहे. या गोष्टी मग त्यांच्या लेखनात झिरपत राहतात. त्याने त्यांच्या लेखनाला बहुश्रुतता व प्रगल्भता प्राप्त झाली आहे. पु. लं. वरील लेखात पु. लं. नी गेल्या तीस-चाळीस वर्षांत केलेल्या अनेकविध लेखनाची ठोमरे जेवढ्या आठवणीने याद करतात तेवढी ती खुद्द पु. लं. ना सुद्धा नसेल.

वक्तृत्व हा ठोमऱ्यांच्या लेखनशैलीचा खास गुण आहे. शब्दांची ओज व लयीमधून असे वक्तृत्व सिद्ध होते. श्री. म. माटचांप्रमाणे ठोमऱ्यांना बोली-भाषेतल्या व जुन्या मराठीतल्या बाळबोध शब्दांचे आकर्षण आहे. नवे शब्द घडविण्याचाही त्यांना सोस आहे. उदारविदारक (विनोद), सदागरोदर (ॲंग), बाळछत्री, तृप्तोद्‌गार असे कित्येक शब्द त्यांच्या टाकसाळीमधून बाहेर आले आहेत. ते लिहिण्याला बोथटपणा कधीच येऊ देत नाहीत. कवी कुसुमाग्रजांप्रमाणे त्यांची वाक्ये भरतीच्या लाटांप्रमाणे एकावर एक उभारून

येतात. परिणामतः त्यांच्या लिहिण्याला एक झळझळीतपणा व नजाकत येते. शब्द जसे काही घासून पुसून, धार लावून ठेवले आहेत ! त्यांच्या लेखनशैलीची ही वैशिष्टचे ' लग्नसराई ', ' अहमदनगर', ' वर्षअखेर ', नानासाहेब फाटक व वसंत सरवटे यांची व्यक्तिचित्रे या लेखांत विशेषत्वाने आढळतात.

या संग्रहाचे ' ठुमरी ' हे नाव मीच सुचविले. संग्रहाला नाव काय द्यावे याबद्दल बोलत असताना मला ते सुचले व ठोमऱ्यांनी ते पसंत केले. स्वर्गीय कवी श्रीकृष्ण पोवळे यांची आई ठोमऱ्यांच्या पत्नीस– सौ. सुधाबाईंना गमतीने ' ठुमरी ' असे म्हणत. (ठोमऱ्यांची पत्नी ती ' ठुमरी ' अशा अर्थानं–) नावाच्या चर्चेच्यावेळी माझ्या संज्ञाप्रवाहातून हे नाव वर आले असेलही; पण ठोमऱ्यांच्या लेखनशैलीची वर सांगितलेली वैशिष्टचे पाहता, संग्रहाचे हे नाव कसे सार्थ आहे हे नंतर लक्षात आले. ठुमरी (ठुंबरी असाही पाठचभेद) एक वैशिष्टचपूर्ण गायनप्रकार आहे. ख्याल गायकीतल्या तानबाजीला आणि निखळ स्वरालापांना ठुमरीत फाटा दिलेला असतो. अनुरूप अशा शब्दांमधून भावना व्यक्त करणे याला ठुमरीत महत्त्व असते. त्यादृष्टीने भावदर्शक सौंदर्य हा ठुमरीचा आत्मा म्हणता येईल. ठोमऱ्यांच्या लेखनातील नाटचगुण आणि त्यांच्या शब्दकळेचा उभारदारपणा व नजाकत ही त्यांच्या लेखनाची जी वैशिष्टचे म्हणून मी सांगितली ती ठुमरीच्या या विशेषांशी जुळणारी आहेत. ' ठुमरी ' या नावात केवळ ध्वनिसाम्यच नव्हे तर एक भावनिक समतानता साधली आहे. हा मुद्दा.

ठोमऱ्यांनी कथा, कादंबरी, नाटक, संपादकीय लेख, व्यक्तिचित्रे असे संमिश्र स्वरूपाचे लेखन केले असल्यामुळे ते एक यशसिद्ध विनोदी लेखक आहेत ही गोष्ट आवर्जून लक्षात येत नाही. ' वीणा ' मासिकातील ' वगैरे... वगैरे ' आणि ' नवनीत 'मधील ' सुहासिनी ' या सदरांत त्यांनी केलेले लेखन प्रायः विनोदी आहे. प्रस्तुत संग्रहातील ' दुधाची सय ', ' लग्नसराई ' व वसंत सरवटचांवरील लेख हे लेखही विनोदी अंगानेच लिहिले आहेत. Wit म्हणजे कोटीबाजपणा हा ठोमऱ्यांच्या विनोदाचा विशेष गुण आहे. त्यांचा विनोद साहित्यिक वळणाचाच आहे. पण त्यात मन उल्हसित करणाऱ्या बुद्धीची चमक असते. त्यांच्या उपरोध-उपहासाला विलक्षण अशी धार चढते. पण त्यात सहजता असते. ओढून-ताडून वा खाकरून-खोकरून विनोद ' जमविण्याचा ' प्रकार येथे नाही. एखाद्या प्रसंगातील विसंगती ठोमऱ्यांना फार चटकन भावते आणि वटन दाबताच उजेड झळझळावा त्याप्रमाणे फटकन त्यांची कोटी वा विनोदी शेरा बाहेर पडतो. त्यांच्या या विनोद-प्राचुर्यामुळेच ते खाजगी बैठकीत चैतन्य भरतात. त्यांच्या संभाषणातला हा विनोदगुण त्यांच्या लेखनातही प्रकर्षाने उमटतो.

ठोमऱ्यांचे आजवरचे लेखन वाचून मला जे जाणवले त्याची नोंद मी येथे केली आहे. त्यांच्या निकट सहवासामुळेही त्यांच्या लेखनप्रवृत्तीचे निदान करण्यास मला मदत झाली आहे. मी येथवर सांगितले ते सगळेच चांगले सांगितले, मग ठोमऱ्यांच्या लेखनात काहीच का उणीव नाही असे कोणी विचारील. हो. एक ठळक उणीव मला जाणवते, ती त्यांच्याच शब्दांत सांगतो. ठोमरे गतकाळच्या, अधिक काटेकोरपणे सांगायचे तर १९६० सालापर्यंतच्या आठवणींमध्ये अडकून पडल्यासारखे वाटतात. साहित्याच्या बाबतीत बोलायचे तर, मर्ढेकर व मर्ढेकर-उत्तरसाहित्य, दलितसाहित्य, नवी कविता, नवे नाटक वगैरे साहित्यातील नव्या प्रवाहांची त्यांनी फारशी कुठे दखल घेतलेली नाही. तसेच गेल्या पाव शतकात आपल्या एकूण सामाजिक जीवनात झालेल्या उलथापालथी व क्रांतिकारक बदलांचे पडसाद ठोमऱ्यांच्या लिखाणात फार क्षीणपणाने जाणवतात. नॉस्टॅलजिया ही माणसाची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे. पंडित नेहरूंसारखा थोर विचारवंतही नॉस्टॅलजियात गुंगून पडलेला आहे. साहित्याचीही ती एक प्रेरक शक्ती होऊ शकते. आत्मचरित्राच्या लेखनामागे मुख्य प्रेरणा तर तीच असते. पण आत्मचरित्र हे नेहमीच जरी नव्हे तरी बहुधा सगळे सांगून वा करून झाल्यावर पूर्णविराम ठेवल्यासारखे येते. स्मृतिगंधातून, काढलेला तो भूतकाळाचा आलेख असतो. वर्तमानकालाच्या अपूर्णतेविषयीची नाराजी, अवतीभोवतीच्या परिस्थितीविषयी वाटणारी असमाधानता आणि नित्य कामाच्या– 'रुटिन'च्या रटाळपणाने मनाला येणारी म्लानता यांतून नॉस्टॅलजियाची भावना प्रादुर्भूत होते. पण वर्तमानकालीन वास्तवाचे भान ठेवणारा आणि भविष्याचा वेध घेणारा लेखक केवळ नॉस्टॅलजियात गुरफटून पडणार नाही.

मला नेहमी एक असे वाटते की ठोमऱ्यांनी कोणत्या तरी एका वाङ्मय प्रकारावर अधिक काळ स्थिर व्हायला हवे होते. पंचेचाळीस-पन्नास सालाच्या आसपास त्यांनी 'जगन्नाथाचे पत्र', 'मेंढी, मेंढी', 'स्पर्श', 'पाऊस आला!', 'कानफाट्या', 'अन्न' यांसारख्या कसदार कथा लिहिल्या, त्यावेळी कथालेखक म्हणून त्यांनी आपले स्थान निश्चित केले असे वाटले. 'सिंहाचा मुखवटा' ही अगदी वेगळ्या विषयावरची चित्तक्षोभक कादंबरी लिहून त्यांनी या अपेक्षेला दुजोरा दिला. पण नंतर लवकरच त्यांनी कथालेखनाकडे पाठ फिरविली आणि ते स्फुट लेख लिहू लागले. या क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीचा परिपाक म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय. येथेही त्यांनी सातत्याने भरपूर लेखन केले असे म्हणता येणार नाही. यामुळे प्रतिभेचा परिस-स्पर्श झालेला असूनसुद्धा ठोमरे कोणत्या एका वाङ्मयप्रकारावर आपला असा ठसा उमटवू शकले नाहीत. असेही झाले असण्याचा संभव आहे की प्रदीर्घ

काळ संपादक म्हणून काम करीत असता इतरांच्या लेखनाची उस्तवारी करावी लागल्यामुळे ठोमऱ्यांना आपल्या लेखनाकडे द्यावे तेवढे लक्ष देता आले नाही. संपादक हा लेखक असेल तर त्याच्या पदरी हा सक्तीचा त्याग येतो !

पण चरितार्थासाठी कराव्या लागणाऱ्या यातायातीतून ठोमरे आता मोकळे झाले आहेत. त्यांच्या लेखनाला कोणताच अडसर आता राहिलेला नाही. बुद्धी व भावना यांचा सुरेख मेळ त्यांच्या मनःपिंडात झालेला आहे. वाणीचे तर त्यांना वरदान आहे. त्यांच्याकडून इतःपर भरघोस व आजवर केले तसे किंवा त्याहूनही अधिक भरदार लेखन होईल अशी आशा करण्यास काहीच हरकत नाही.

–वसंत शिरवाडकर

•••

बोलू की नको ?

मनसा चिंतितम् कार्यम्
वचसा न प्रकाशयेत ।
अन्य लक्षित कार्यस्य
अतः सिद्धिर्नजायते ।।

चाणक्य-नीतिनिपुण सांगतात की माणसानं मठ्ठ मुद्रेनं वावरावं. आपल्या मनात काय चाललंय ह्याचा जाम कोणाला कधी सुगावा लागू देऊ नये. पण मी मात्र मर्दाला साजेशा धिटाईनं प्रथमच स्पष्ट सांगून टाकतो की आपल्याला बुवा संस्कृतात फारसं गम्य नाही. म्हणजे इतर विषयांत आहे असा ह्याचा अर्थ नाही. पण तो मुद्दा अप्रस्तुत. मुद्दा आहे देववाणीचा, आकाशवाणीशी सलगी करताना तिचे बोट घट्ट पकडलेले बरे. श्रेयाच्या बाजूला तेवढंच एक प्राचुर्याचं कलम, आणि म्हणूनच आरंभीच्या संस्कृत सुभाषिताचा प्रपंच. चूकभूल देणे घेणे...

आता उच्चारातील चूक एकवेळ खपून जाईल, पण आचारात जर का चूक घडली तर तसा दुर्धर प्रसंग नाही. एका सुप्रसिद्ध दिवंगत साहित्यिकाचं मुळी वचनच आहे की 'नाटककारानं आपल्या नाटकाचे प्लॉट आणि वधुपित्यानं आपल्या यादीतल्या स्थळांचा तपशील कोणाला सांगू नये.' वधुपित्याचं एक सोडा, कारण आता सरकारात नोंदवलेल्या कोणाही आधुनिक भद्रेश्वर दीक्षिताकडे योग्य ती नाणी मोजताच अनुरूप वरांची हवी तेवढी लांबरुंद यादी मिळवता येते. आणि स्थळ मिळवण्याच्या मार्गातला किमान एक अडसर दूर होतो. पण नाटककारांची समस्या मात्र आजही तितकीच बिकट असावीशी वाटते. अलीकडचीच गोष्ट :

माझ्या माहितीतल्या एका साहित्यिकानं कोणा 'क्ष' पाश्चात्य नाटककाराचं कुठलंसं एक 'ज्ञ' नाटक वाचलं, आणि त्यानं तो इतका प्रभावित झाला की संध्याकाळी फिरायला गेला असता न राहवून आपल्या बरोबरच्या दुसऱ्या एका 'ढ' साहित्यिकास –क्षमा करा, 'ढ' हे इथं फक्त व्यक्तिनिर्देश चिन्ह म्हणून योजलं आहे, त्या साहित्यिकाची विद्वत्ता त्यात अभिप्रेत नाही– तर त्या 'ढ' साहित्यिकास त्यानं ते मूळ नाटक, त्याचं कथानक, मराठीत ते रूपांतरित करण्याबाबतची स्वतःची तपशीलवार योजना, हे सारं भाबडेपणानं भडाभडा सांगून टाकलं; तसं 'हे नाटक मराठीत यायलाच हवं. यच्चयावत् मराठी प्रेक्षकवर्ग थक्क होऊन जाईल.' असं तो 'ढ' साहित्यिक निरोप घेता घेता माझ्या माहितीतल्या साहित्यिकास म्हणाला. आणि त्यानंतर मोजून चौथ्या दिवशी त्या 'ढ' साहित्यिकाचं आमच्या माहितीतल्या साहित्यिकास चहाचं निमंत्रण आलं. झालं. तो तिथं पोहोचला तो काय, आणखीही पाच-पंधरा साहित्यिक, नाट्यदर्दी तिथं जमलेले होते. चहा चिवडयावर ताव मारत होते. आणि 'ढ' साहित्यिक वही हातात धरून आपल्या नव्या नाटकाचं वाचन करीत होता. यच्चयावत् मराठी प्रेक्षकांच्याऐवजी थक्क होण्याची पाळी आली होती आमच्या साहित्यिक स्नेह्यावर... चार दिवसांपूर्वी सहज म्हणून ज्या नाटकाच्या रूपांतराचा आराखडा त्यानं तपशीलवारपणं 'ढ' ला सुनावला होता, त्याच्या लेखनाला प्रारंभ करायच्या आतच 'ढ' चं नाटक लिहून देखील तयार ! बिचाऱ्यानं कपाळाला हात लावला आणि स्वतःची निराशा लपविण्यासाठी चहा चिवडयात मशगुल झालेल्यांच्या नजरा टाळीत तिथून पसार झाला. बोलण्याचे वा गप्प बसण्याचे कायदे व्यवस्थित माहीत नसले की अशा अफलातून समस्या निर्माण होतात. त्या सोडवाव्या लागतात. नाटकातच नव्हे तर नाटकाबाहेरही !

'मोनालिसा' ह्या विख्यात कलाकृतीचं वैशिष्टय असं की कुठल्याही कोनातनं पाहिलं तरी ती आपल्याचकडे पाहून मंदसं

स्मित करते आहे असा पाहणाऱ्याला भास होतो. व्यवहारात वागताना अशी किमया आपल्याला साधली तर काय बहार होईल... ! काही अंतर्ज्ञानी साधुसंतांना आणि मुरब्बी राजकारण्यांना म्हणे ही किमया अवगत झालेली असते. ह्यांचं मौन देखील पुरेसं बोलकं असतं. ओठावरचं स्मित, डोळ्यातली झाक, मुद्रेवरील आविर्भाव किंवा एखादा अस्फुट उद्‌गार... बस्स येवढं पुरेसं असतं... संबंधित मंडळी त्याचा आपल्याला हवा तसा अर्थ लावतात. शब्द हे भाववाही खरे पण ही धूर्त मंडळी त्याला अर्थाचा स्पर्श होणार नाही ह्याची कटाक्षानं दक्षता घेतात. जबाबदारी अखेर माथी येते ती ऐकणाराच्या, पाहणाऱ्याच्या वा बोलणाऱ्याच्या नव्हे. ज्यांचं मौन अधिक बोलकं असतं त्यात बुवा, मुरब्बी राजकारणी ह्यांच्या जोडीला स्त्रियांचाही समावेश करणं योग्य होईल. त्यांचं मौन म्हणे अर्धसंमतीच असते. असो बिचारी. कारण संमती लेखी असेल तर कोर्टात तरी न्याय मिळविता येतो. संमती केवळ शाब्दिक असेल तर बोलाचीच कढी अन् बोलाचाच भात म्हणून तृप्तीचा ढेकर देता येईल! पण जी संमती मुळातच मूक असते ती देणारी स्त्री विरुद्ध गेली तर मुकाट बसण्यावाचून गत्यंतरच नसतं.

'नरो वा कुंजरो वा!' हे काही व्यवहारी मंडळीचे जीवितसूत्र असते. कुठलीही गोष्ट ते स्वतःच्या अंगी लावून घेत नाहीत. म्हटलं तर चांगलं... म्हटलं तर वाईट... स्वतःला कुठे अडकवून घेणार नाहीत. हेही भले–तेही भले असे जपता जपता जगाच्या दृष्टीने आपणही भले ठरावे ह्यासाठी ह्यांची ही शब्द-सर्कस सदैव चालू असते. काही माणसं आपली शब्दसंपत्ती मौलिक मानतात आणि कृपणाप्रमाणं जपतात. मला अनेकवेळा प्रश्न पडतो की हर्ष, खेद, सुखदुःख ह्या भावना एखाद्या झंजावाताप्रमाणे ह्यांना कधी झपाटून टाकीतच नसतील काय? ही मंडळी खरोखरीच स्थितप्रज्ञ असतात काय? कितीही चांगली, आनंददायक घटना असो, ह्यांचे शब्द ओठावर उमलतच नाहीत... ह्यांच्या बाबतीत

'बऱ्या'चं 'उत्तम' वा 'झकास' कधी व्हायचं नाही; आणि ह्यांच्या ओठावर 'बरं ऽ आहे'... हा शब्द उमटलाच तर तो उमटेल मोठ्या कष्टानं आणि तोही कण्हल्यासारखा–कणसुरा...

काय बोलावं ह्यापेक्षा काय बोलू नये ह्याचं भान माणसाला असणं आवश्यक आहे हे तर खरंच पण काय बोलावं आणि काय बोलू नये ह्याचे काही दंडक आहेत. 'सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात्, मा ब्रूयात् सत्यमप्रियम्' असं शास्त्रकाराचं सुप्रसिद्ध संस्कृत वचनच आहे. सत्य बोला, रुचेल असे बोला पण कटू सत्य सांगायचं टाळा... खरं आहे. ह्यातलं काहीही जरी करायचं म्हटलं तरी माणसाला दक्ष राहावं लागतं... कौशल्य वापरावं लागतं. आत्मश्लाघेचा दोष पत्करून ह्या संदर्भात एक छोटीशी आठवण सांगण्याचा मोह अनावर होतो. उपजीविकेचं साधन लेखन हेच असल्यामुळं दैनंदिन जीवनात अडचणींना अडचण नव्हती. 'आता काय माझी हाडं घालू चुलीत...?' असं त्रागा कुटुंबिनीनं करावा इतकं जरी नसलं तरी अन्य अडचणी असायच्याच. असाच कात्रीत सापडलो असता एका संपादकांकडून आपल्या एका कथेचा मोबदला, बरेच दिवस यायचा राहिलाय ह्याचं स्मरण झालं. पण संपादकांना सरळ तगादा लावायला जीभ रेटत नव्हती. म्हटलं निदान कधी मिळू शकेल येवढं तरी चाचपून पाहता आलं तर जमवावं म्हणून मग त्यांना जाऊन भेटलो. आगत स्वागत झालं. विषयाला हात घालीत म्हटलं, 'तसं काही खास काम नव्हतं. सहज आलो होतो. मध्यंतरी जरा बाहेरगावी गेलो होतो. तो एक मनिऑर्डर येऊन परत गेल्याचं समजलं. म्हटलं सगळ्यांचे मोबदले आतापर्यंत येऊन गेलेत. राहिलाय तेवढा तुमचाच... तुम्ही पाठविली होती की काय मनिऑर्डर? माझा चेहरा निर्विकार होता, निरागस होता. पण माझ्या प्रस्तावानं गुगली बॉलचं कार्य केलं. संपादकांची पार दांडीच उडविली! संपादक क्षणभर जरा हडबडले. पण मग स्वतःला सावरीत म्हणाले, 'काय की बुवा, आमच्या क्लार्कना विचारायला हवं. ते आहेत आज रजेवर... पण काही हरकत

नाही. आलाच आहात तर रोकडच घेऊन चला तुमचा मोबदला. मनिऑर्डर गेलीच असेल तर येईल सावकाश आमचेकडे परत...

अब्रू संपादकांचीच नव्हे तर माझीही वाचली होती...

मध्यंतरी काही कामानिमित्त गोव्याला जाऊन आलो. मुक्काम माझ्या एका गोवेकर मित्राकडे होता. दोघाही नवरा-बायकोनं माझं फार प्रेमानं आदरातिथ्य केलं. कशात काही कमी पडू दिल नाही. पण काय असेल ते असो, तिथलं हवापाणी काही मला भावेना, तेव्हा सहज मी मित्राला म्हटलं, 'फटू, इथल्या हवापाण्यानं तर आपल्या नाकी दम आणला बुवा!' फटूनं ही गोष्ट वहिनीबायला म्हणजे आपल्या बायकोला सांगितली आणि वहिनीबायनं लगेच ती आपल्या मोलकरणीला सुनावली. झालं, दुसऱ्या दिशी मोलकरीण कामालाच आली नाही. तसं खुद्द फटूच चार मैल तंगडचा तोडीत ती राहत होती त्या वस्तीवर गेला आणि तिची कशीबशी समजूत घालून घरी घेऊन आला. तिचं येवढं काय बिनसलं म्हणून मी सहज फटूला– माझ्या मित्राला विचारलं, तर त्यानं ही हकीगत सांगितली, 'तुम्ही आमच्या गोंयच्या हवापाण्याला नावं ठेवलीत, ह्यांचा आमच्या मोलकरणीला अपमान वाटला. राग आला. गोव्याविषयी वाईटवशाट बोलणाऱ्या अशा पाहुण्याचं तोंडदेखील पाहणं नको म्हणाली...'

'भले!' मी म्हटलं, 'फटू, हवापाणी कसंही असो इथलं बापडं– पण मीच काय अगदी आमचे आचार्य अत्रे अन् पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या सिद्धहस्त विनोदी लेखकांचाही ह्या तुमच्या गोव्यात पाड लागणं एकंदरीत जरा कठीणच!' (मानकुराद, अल्फान्सो अन फर्नांदेझचा तरी इथं पाड कसा लागतो कोण जाणे! हे अगदी ओठावर आलेले शब्द मी तिथल्या तिथे तस्से चोखून घेतले...)

'म्हणजे?' फटूनं प्रतिप्रश्न केला– आणि माझ्या उत्तराची वाट न पाहता स्वतःच म्हणाला, 'म्हणजे तुम्हांला काय म्हणायचंय की आम्हांला विनोदाचं इंद्रीयच नाही? थट्टा टीकेला

आम्ही हळवे आहोत ? गमतीनं कोणी काही म्हटलं तर ते आम्हांला थट्टेवारी नेता येत नाही ? नाही. महाराज नाही. इतर चारचौघांप्रमाणेच आम्हीही ह्या गोष्टी समजुतीनं घेतो. इतकंच नव्हे तर कोणा विदूषकानं आमच्या पायात पाय घालून आम्हांला तोंडघशी पाडलं तर तेही आम्हांला आवडतं. समजलेत ?...' असं म्हणत आणि रागानं डोळे गरागरा फिरवीत फटूनं आपली मूठ दाणकन आम्ही बसलो होतो त्या जेवायच्या टेबलावर आदळली... अन् मिशीला पीळ भरत माझ्याकडं येवढंसुद्धा वळून न पाहता तो ताडकन शेजारच्या खोलीत निघून गेला. मनात म्हटलं, अशा लोकांच्या बाबतीत शब्दांचा वापर जरा जपूनच केलेला बरा...

शेक्सपिअरचा हॅम्लेट मानवी मनाची तुलना सप्तस्वर असलेल्या अलगुजाशी करतो. अलगुज जसं जाणकाराखेरीज अन्याला नीट वाजवता येत नाही, त्याचप्रमाणं तसंच कौशल्य असल्याखेरीज एकाला दुसऱ्याच्या मनातलं खरं ते वदवून घेताही येणं कठीणच. हे कौशल्य वा किमया साधलेली नसल्यामुळं तीस तीस, चाळीस चाळीस वर्षं नवरा-बायको म्हणून एकत्र नांदणाऱ्या व्यक्ती अखेरपर्यंत एकमेकांना सर्वस्वी परक्याच राहिलेल्या असतात. ह्याच्या अंतर्मनाचा ठावठिकाणा तिला नसतो आणि तिच्या मनाचा तळ ह्याला गवसलेला नसतो. सारं अंधारात चाचपडणं...!

'शरश्चंद्र' हा माझा आवडता कादंबरीकार. त्यांच्या पात्रांची मला नेहमीच मौज वाटत आलेली आहे. एक प्रचंड दुःख ती मूकपणानं आयुष्यभर सोसत असतात... पण मग असा एक क्षण येतो की, ज्वालामुखीचा स्फोट व्हावा तसं ती आपलं दुःख, आपला सल, सबंध सत्य सांगावं तसं सांगून मोकळी होतात. स्वतः मोकळी होतात आणि वाचकालाही जरा हलके हलके वाटायला लावतात.

'राधेकृष्ण बोल मुखसे तेरा क्या लगेगा मोल...' ह्या उपदेशपर हिन्दी भजनाची, गानहिरा हिराबाई बडोदेकरांची बांगडी तीस

पस्तीस वर्षांमागं फार पॉप्युलर झाली होती. त्यातला तो 'तेरी मनकी गुंडी खोल...' हा आदेश अशा कुढणाऱ्या मंडळींना वा ज्यांचं बोलणं शंभर रुपये तोळा असतं अशांना उद्देशून तर नव्हता ?

शब्द हे शस्त्र आहे. शल्य शालक्यशास्त्राच्या कौशल्यानंच ते हाताळायला हवं. हुप्प करून राहणं, कुढेपणानं वागणं, मन मोकळं करून अगदी आतलं असं काही-सांगायचं टाळणं हा काही त्यावर उपाय नाही खास. सांगताना स्वतःला अडचणीचं वाटणार नाही आणि ऐकणाऱ्याला अवघडल्यासारखं होणार नाही अशा पद्धतीनं बोलून एकमेकांना जाणून घेता यावं ह्यासाठी तर देवानं शब्दकळेचा हा बहुमोल ठेवा मानवाला बहाल केलाय– अन्यथा पशूत आणि मानवात फरक तो कोणता ?

(बोलू की नको : दिनांक २६ डिसेंबर १९६७ रोजी अ. भा. आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून 'जगायचे तर...' ह्या भाषणमालिकेत झालेलं 'मनातलं कधी सांगू नये' हे भाषण (थोड्याबहुत फेरफारासह) आकाशवाणीच्या सौजन्यानं.)

•••

दुधाची सय

काही शुद्ध निर्भेळ (आणि घरपोच) स्मृती

माणसाचे दुधाचे दात पडतात, वय वाढतच असतं आणि कालांतराने कृत्रिम कवळी किंवा प्राकृतात जिला चक्क 'वचळी' असं नामाभिधान प्राप्त झालं आहे ती बसवून घेण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवतो. प्रकरण हे असं अगदी ह्या अवस्थेला पोहोचलं असलं तरी 'आईचं दूध' आठवण्याचं झंजट काही त्याच्या मागचं कधी सुटत नाही; आणि अगदीच मेलेल्या आईचं दूध प्यालेला नसेल तर त्यातूनही तो स्वत:ला निभावून नेतो.

आईच्या दुधावरून सहज आठवलं म्हणून सांगतो. आमचा एक बालमित्र चांगला पाच वर्षांचा घोडा झाला तरी 'अंगावरचा' सुटला नव्हता. त्याची ती सवय तोडण्यासाठी त्या माऊलीला काय सायास पडले असतील हे एक तिच्या हातांना किंवा त्याच्या पाठीला ठाऊक! हं, गेल्या त्या वत्सल माता आणि ती मातृनिष्ठ मुलं. स्वत:च्या मुलानं घोटभर दूध गुण्यागोविंदानं नरड्याखाली उतरवावं म्हणून त्याच्या लाख मिनतवाऱ्या करीत स्वत:चं छटाक छटाक रक्त आटवीत बसण्याचा काळ आलाय आता...

'गेले ते दिवस!' असा गळा काढून छाती पिटण्याइतकं जरी आज माझं वय झालेलं नसलं तरी माझ्या आठवणींत जे आहे ते आजच्यापेक्षा कितीतरी वेगळं होतं. तमाशाला लोकनाट्य आणि करमणुकीच्या कार्यक्रमांना 'सांस्कृतिक कार्यक्रम' असे प्रतिष्ठित नि गोंडस शब्द त्या काळात जसे कोणाला माहीत नव्हते तसेच कोठल्याही धंद्यात एकमेकांची सोय पाहण्याची त्या काळात वृत्ती

होती. आजच्यासारखी 'सेवा' या शब्दाची अहंमन्य म्हणा, अहंभावी म्हणा 'सोय' त्यात मुळीच नव्हती. 'दुग्धमंदिर', 'डेअरी' वगैरे निर्भेळ मंडळींशी आणि दूधवाला ह्या संस्थेशी माझा प्रत्यक्ष संबंध आला तो फार उशीरा. माझ्या आठवणींतल्या काळात प्रत्येकाच्याच घरी घरच्या पुरतं दूधदुभतं होत असे. अडचण असायची नोकरपेशा मंडळींची. बदलीच्यावेळी स्वतःचं खिल्लार जरी नाही तरी एखाद् दुसरी गाय गावोगाव हिंडवणारी परंपरेची अभिमानी माणसही त्यात काही कमी नसायची. पण ताक अजून 'लस्सी' वा 'पियुष' ह्या संज्ञेप्रत पोहोचलेले नसल्याने ज्यांच्याकडे भरपूर दूधदुभतं होई त्यांच्याकडे ताकासाठी जाताना संकोच मानून भांडी लपवीत बसविण्याची वेळही कधी कोणावर येत नसे.

अशा त्या काळात मी लहानाचा मोठा होत होतो. वडील नोकरपेशातले. जमेल तितके दिवस त्यांनीही दाराशी चार जनावरं बांधून पाहिली आणि आमच्या धारोष्ण दुधाच्या न्याहरीत कधी खंड पडू दिला नाही. पुढे शेतीला जोड म्हणून दुभत्याचा धंदा करणारी कोणी पाटलीण सकाळी सूर्य चांगला कासरा दोन कासरे वर आला म्हणजे 'वहिनीसाहेब भांडं आणा हो दुधाला...' अशी टिपेत हळी देत वाड्यात प्रवेश करायची. तिच्या डोक्यावरच्या पाटीत नुसत्या दुधाची चरवी कधीच नसायची. जोडीला कधी करडई मेथी कधी गवार नाहीतर कधी बोरं-पेरू अशी काहीबाही मंडळींची जत्रा असायचीच. वजनं मापं वगैरे नावं जशी पाटलीण-बाईंच्या कानावरून गेलेली नव्हती, तशीच त्यासाठी अडून राहणारीही कोणी माणसं आमच्या घरात नव्हती. पाटलीणबाईंच्या लोटचा सव्वाशेराच्या ठरलेल्या, त्यावर पुन्हा चांगली पेलाभर सढळ हातानं घातलेली धार. दूध गंधासारखं जाड, जमिनीवर सांडलं तर पाऱ्यासारखं गोळीबंद थरथरत राहयचं.

पाटलीणबाईनं रतीब घातला की तास अर्धा तास आईबरोबर

तिच्या गप्पा होत. वर्तमानपत्रं तेव्हा फक्त फॅशनेबल मंडळी वाचायची. म्हणजे गावातल्या वकील मामलेदाराकडे ती 'नेटीव्ह जनरल लायब्ररीत' येत तेवढीच. पण आमची पाटलीणबाई होती ना त्यामुळे त्याची उणीव आम्हांला कधीच जाणवली नाही. आमची आई शहरातून आलेली. त्यामुळं चहाचं बंड तिच्याबरोबरच घरात आलेलं. चहा वेळेवर मिळाला नाही म्हणजे तिचं डोकं चढायचं. आम्हां मुलांना मात्र ते दिव्य कषाय निषिद्ध. फारच हट्ट केला तर वैद्य जसा एखाद्या मात्रेला सोन्याची, मोत्याची, हिऱ्याची व प्रवाळाची भावना देतो त्या पद्धतीनं आई उगीच एक चमचा चहा आमच्या दुधाच्या पेल्यात घालायची आणि आमची समजूत काढल्याची समजूत करून घ्यायची. आमच्या प्रमाणेच पाटलीणही आईकडे चहासाठी हटून बसायची. तिला कप पुरत नसे, ती वेळेला पितळीभर चहा गटागटा प्यायची आणि आईला भरल्या तोंडानं आशीर्वाद देत तृप्त मनानं वाड्याबाहेर पडायची.

साटंलोटं त्याकाळी फार. पाटलीण कधी या चहाच्या पाण्याचे उपकार ठेवायची नाही. कधी दुपारी बारा वाजताच पुन्हा यायची. अमक्या तमक्या ढवळ्या नाही तर बंड्या गायीला गोऱ्हा झाल्याचे शुभवर्तमान सांगत... बरोबर खरवसासाठी चीक आणलेला असे हे वेगळे सांगणे नकोच.

हे असं सुखानं आणि सुरळीत चाललं होतं. पुढच्या शिक्षणासाठी तालुक्याचं गाव सोडून जिल्ह्याच्या गावी एकटाच खोली घेऊन राहयची वेळ आली. वडिलांनी त्यांच्या कोणा बाळमित्राला म्हशी खरेदी करण्यासाठी काही रक्कम हातउसनी दिली होती. त्यानं व्याजाची भाषा काढली तेव्हा वडील त्याच्यावर गुरगुरले. म्हणाले, 'जा कोणी सावकार गाठ. माझा काही धंदा नाही व्याज बट्ट्याचा.' तसा तो वरमून गप्प बसला, आणि रक्कम घेऊन खालच्या मानेनं निघून गेला.

मी आता एकटाच राहयला आलोय असं कळल्यापासून त्यांच्या

त्या मित्रानं खोलीवर पावशेर दीड पावशेर दूध पोहोचतं करायला सुरुवात केली. दुधाचे पैसे द्यायला गेलो तर तांबड्या शिवराईला शिवेना ! पुढे मी नगर सोडलं आणि पुण्याला गेलो. वडिलांनी मित्राला दिलेल्या त्या हातउसन्या पैशांची फेड झाली की नाही काहीच पत्ता नव्हता. घरात तो विषय कधी निघाल्याचंही स्मरत नाही. मध्ये वडिलांच्या वर्षश्राद्धाला घरी गेलो तेव्हा त्यानं ती रक्कम स्वतः आणून पोहोचती केली. डोळ्यात टिपं आणीत खंतावलेल्या स्वरात वडिलांचे स्मरण करीत पुटपुटला, 'त्यांच्या हयातीत काही ऋण फेडणं साधलं नाही...!' माणुसकीच्या दुधाचा हा माझ्या आठवणीतला शेवटचा रतीव होता.

पुण्याचं सारंच प्रकरण वेगळं होतं. मी मामांच्याकडे राहत होतो. त्यांच्याकडे सकाळ–संध्याकाळ डेअरीतून दूध येई. परशुरामाची आणि भगवान श्रीकृष्णाचीच नव्हे तर पोंक्षे, साने, बर्वे, कर्वे अशा मंडळींची वा महाराष्ट्र, सातारा, पुणे अशा प्रदेशांची नावं धारण करणाऱ्या ह्या 'डेअरी माऊली'विषयी माझ्या मनात फार मोठा दबदबा असायचा. निळी हाफ पँट आणि पांढराशुभ्र हाफ शर्ट घातलेली गोरी भुरकी, घाऱ्या-निळ्या डोळ्यांची चुणचुणीत मुलं सायकलच्या हँडलला ॲल्युमिनियमच्या बरण्या अडकून थाड थाड आवाज करीत वाड्यात प्रवेश करीत, 'भागवत...!' अशी गद्य हाक मारीत. त्यांच्याबरोबर 'उद्या जरा अर्धा शेर दूध एक्स्ट्रा लागेल हं, परवाचा पावशेराचा खाडा मांडलात ना ?' अशी तितकीच रूक्ष भाषा होई तीस तारीख उलटते न उलटते तोच छापील बिल येई. 'पेमेंट किती तारखेला मिळणार म्हणून मॅनेजरला सांगू ?' अशी दरडावणी त्या पाठोपाठ ऐकायला मिळे. ही मुलं दुधाचा रतीब घालून मिळणाऱ्या पैशातून आपला शिक्षणखर्च भागवीत. आमच्या प्रगती-पुस्तकावर सह्या ठोकताना त्यांच्या आदर्श, स्वावलंबी जीवनाचा कित्ता गिरवण्याची शिफारस आमची पालकमंडळी आम्हांस न चुकता करीत. हाच तेवढा त्यातला दुःखाचा आणि विषादाचा भाग होता पण कालांतराने त्याचाही विसर पडला.

ह्या साऱ्या पार्श्वभूमीवर 'बाई दोध...' ही व्रज भाषेची झाक असलेली ललकारी कशी खुलून दिसते. झालंच तर मनात थोडा दरारादेखील निर्माण करते. धड रात्र नाही आणि धड पहाट नाही अशा चमत्कारिक वेळेला दार खडखडावलं जातं, बाहेर एकतर धो धो मुसळधार पाऊस तरी पडत असतो किंवा हाडं गोठवणारी कडाक्याची थंडी तरी पडलेली असते. झोप अनावर झालेली असते, हंतरूण सोडू नये असं वाटत असतं. अशा चमत्कारिक क्षणी 'बाई दोध, बाई दोध, बाई दोऽऽऽध !' अशा रासवट घोगऱ्या आवाजातल्या डरकाळ्या कानांवर पडतात, दुधाच्या बरण्या खाडखाड वाजतात. आपली झोप चाळवली जाते पण उठून दूध घ्यायला मन राजी नसतं आपण ढीम जागचे हलत नाही. मग अंधारातून आवाज येतो, 'अहो उठा, दूध आलंय.'

थोडा वेळ असाच विचित्र स्तब्धतेत जातो. बायको पुन्हा आपल्याला जागं करण्याचा निष्फळ प्रयत्न करते. आपण चिडतो, गुरगुरत म्हणतो, 'ओः ! बॉंदर ! जरा पडू दे की स्वस्थ, रात्रभर डोळ्याला डोळा नाही...' आपल्या अंगावरचं पांघरूण आता आपोआप डोक्यापर्यंत पोहोचलेलं असतं. आपल्या घोरण्याच्या आवाजानं रात्रभर जागी राहिलेली बायको चडफडत उठते, खाडकन दार उघडते, आता आपल्यावरचा सारा राग त्या दूधवाल्यावर निघतो, पहिली फैर झडते...

'कितना जोरसे दरवाजा खडखडावता भैय्या, एखादे वखद दरवाजा मोडून जायंगा, खालीपिली हमको भूर्दंड पडेंगा...'

भैय्या स्थितप्रज्ञ असतो. तो काहीच उत्तर देत नाही रोज रामप्रहरी दारोदार तो हेच ऐकत आलेला असतो. तो संथपणे म्हणतो, 'बाई भांडा...'

बाई पातेलं पुढे आदळत म्हणतात, 'आजकाल दूध अच्छा नही आता भैय्या...'

'अच्छा है माई, भगवानकी कसम, सबेरे सबेरे झूट कायको बोलू...?'

'काय का अच्छा, डोंबल का ? कितना पातळ है !! मेली सायसुद्धा धरत नाही. खळाखळा उकळता फुळुक पाणी जैसा समझा...!'

'हां, हो सकता है माई– चुनी जरा कम दी जाती है, भाव बहोत तेज है ना ! भैंस हरा घास खाती है इस वजहसे दूध जरूर पतला निकलता होगा.. '

'ते पतला बितला काही नाही भैय्या. सांगून ठेवते, अच्छा दूध नाही द्यायचं तर कलसे दूध नको हमको. '

भैय्या काही न बोलता रतीब घालून निमुटपणे निघून जातो. वर्षानुवर्षे हे असंच चालत आलंय. हे ऐकून ऐकून तर माझे कान पार किटून गेले आहेत. त्याच्या दुधाच्या आणि आमच्या हिच्या हिंदीच्या क्वालिटीत गुंजभरसुद्धा फरक पडायची काही चिन्हं नाहीत. आणि ही माऊली कोविद की काय ती परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालीय वरं का !

आज इतकी वर्षे दूध घेतो पण उद्या दूधवाल्या भैय्यांची कोणी ओळख परेड घेतली तर त्यातून आपला दूधवाला भैय्या ओळखून काढायचं काही आपल्या 'बा' ला जमायचं नाही ! सगळ्या बाटल्या, सोजीर आणि गुरखे सारखे दिसतात असं कोणी थोर विनोदी लेखक गंभीरपणे लिहून गेलाय. त्या मालिकेत दूधवाल्या भैय्यालाही अडकवायला हरकत नाही. एक दिवस आपलं सहज मी माझ्या तरुण आणि सुविद्य पत्नीला म्हटलं, 'आपला दूधवाला भैय्या मोठा कष्टाळू बरं का, दुपारी भायखळ्याला टेलिफोन तारांची दुरुस्ती करताना मी पाहिलं त्याला आज...!' तसं बायकोनं असं काही वेडावून दाखवलं की पुढे काही बोलायचा धीरच झाला नाही मला.

मुंबईत मी नवा होतो. उमेदवारीच्या त्या काळात एका सरकारी कचेरीत लोअर डिव्हिजन क्लार्क म्हणून चिकटलो होतो.

आमच्या कचेरीतल्या यल्ल. वेंकठेसन ह्या अकौंटंट विषयीही माझ्या मनात असाच घोटाळा होता. मला आपलं नेहमी वाटायचं की पठ्ठ्या सरकारी नोकरी सांभाळून पुन्हा वर 'मद्रास कॅफे' मध्ये पार्टटाईम वेटर म्हणून जॉब करतोय. माझे पुढचे दोन दात पडलेले दिसताहेत ना, ते केवळ ह्या घोटाळ्यामुळेच बरं का !

ही थट्टा बाजूला ठेवली तरी ह्या उत्तर भारतीय दूधवाल्यांविषयी माझ्या मनात नितांत आदरच आहे. त्यांच्या इतके कष्ट कोणी उपसत असेल असे मला वाटत नाही. ऊन्ह नाही, पाऊस नाही, थंडी नाही, वारा नाही, गाड्या चालू असोत वा बंद पडोत, त्यांची ठरलेली वेळ चुकल्याचं मला तरी कधी स्मरत नाही.

गाव तिथं गौळवाडा ही नवीन म्हण आता निदान मुंबईच्या उपनगरांपुरती प्रचारात आणायला हरकत नाही. मी अंधेरीला राहत होतो तेव्हा आणि बोरीवलीला राहयला आलोय तरीही हे म्हशींच्या तबेल्यांचं साहचर्य काही सुटलेलं नाही माझ्या मागचं. आणि म्हणूनच असेल कदाचित, त्यांचं जीवन ओझरतं का होईना, हे ह्या डोळ्यांसमोर रात्रंदिवस घडताना मी पाहतोय, असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये खास.

हा दूधवाला भैय्या रात्री उशिरा झोपतो की सकाळी लवकर उठतो हा कूटप्रश्न कोणी खुद्द त्यालासुद्धा विचारू नये. कारण त्याच्या बाबतीत निद्रा हे स्वप्न आणि जागृती हे सत्य असावे असे वाटते. रात्री अकरालाच धारा काढायला तबेल्या तबेल्यातून सुरुवात होते. अर्धजागृत, अर्धनिद्रिस्थ अशा अवस्थेत रात्री उशिरा घरी परतायचे माझ्यावर वेळोवेळी प्रसंग येतात, तेव्हा त्या निर्मनुष्य वाटेवर

भैय्या धीरे धीरे चाले
कावड डुंग डुंग हाले

दार ठोठावीत बोले
बाई दूध, बाई दूध, बाई दोऽऽधं !

अशा वर्णनाचा पु. ल. देशपांडे यांचा अर्धजागृत, अर्धनिद्रिस्थ अवस्थेत मुंबईकडे जाणारी शेवटची गाडी पकडायच्या धांदलीत असलेला भैय्या मला मोठा आधार वाटत आला आहे. रात्री उशिरा पर्यंत जागणारा भैय्या भल्या पहाटे सर्वांचे रतीब घालून मोकळा होताच म्हशींना पुढ्यात घालून जवळच्या नदीनाल्याच्या दिशेनं जाताना आढळतो. एक वेळ तो स्वतःच्या अंगाला पाणी लागू द्यायचा नाही, पण म्हशींच्या आंघोळी-पांघोळींची उगीच आबाळ होऊ द्यायचा नाही.

उत्तर भारतीय दूधवाला सहसा व्यसनांच्या नसत्या फंदात पडलेला आढळत नाही. मल्लविद्येचा तो विशेष षोकीन असतो. आदल्या रात्री भिजत टाकलेले चणे आणि गूळ ही त्याची न्याहरी. तबेल्यालगतच्या एखाद्या सोयीस्कर झाडाच्या छायेखाली पाच-दहा समवयस्क जवानांना जमवून खडबडीत रानमातीत कुस्त्यांची दंगल मचवून मस्ती जिरवण्यात आणि जिरवून घेण्यात तो स्वतःला धन्य मानतो. त्याची ती एकमेव करमणूक आहे असं मानण्याचं कारण नाही. डाळबट्टीचा आहार डोळ्यावर सुस्ती आणत असला तरी खाटल्यावर बसल्या बसल्या तुलसी रामायण वा कबीराचे दोहे मुक्तकंठाने गाण्याचीही त्याला भारी आवड असते. आता एखादा दूधवाला, तालासुराची फारशी पर्वा न करता चालू सिनेमातलं गाणं स्वतःशीच गुणगुणत खांद्यावरची कावड झुलवीत जाताना आढळतो, नाही; असं नाही पण तो अपवाद म्हटला पाहिजे.

स्वच्छता पाळायचं मनावर घेतलं तर तो पुढे सोगा सोडलेलं ढिल्या कासोट्याचं बिहारी पद्धतीचं धोतर आणि अंगात मलमलीची मुंडेछाट पैरण घालतो. अशावेळी त्याच्या पायात चकचकीत काळे पंपशू असतात. डोळ्यात सुरमा, कानात कनोजी अत्तराचा फाया,

तोंडात पीला पत्ती नाहीतर काली कांडी घातलेलं बनारसी पान, केसांना भरपूर तेल चोपडलेलं आणि शेंडीची गाठ नाजूक हातानं मारलेली असा त्याचा गहिरा थाट असतो.

एखाद्या रात्री त्याच्या तबेल्याच्या पुढच्या मोकळ्या जागेत गॅसबत्तीच्या प्रकाशात कोणा 'नाचनेवाल्या बाईजी'ची मैफल झडते. गझल, छक्कड, ठुमरी, दादराचा आदा आणि लहेरा नसा तापवीत असतो. अशावेळी 'जिल्ला जोनपूर' असं स्वतःचं वतन सांगणारा हा पठ्ठ्या लाहोर लखनौच्या वा प्रयाग वाराणशीच्या एखाद्या अरुंद गल्लीतल्या घरांच्या माडीवर असल्याच्या थाटात डोलत असतो. 'बाईजी'च्या सुरात सूर मिसळून मुक्त मनानं गाऊन घेतो.

माझ्या माहितीतला एक दूधवाला साईड बिझनेस म्हणून विमा एजंटी करतो. तर दुसरा अंधेरीच्या स्टुडिओत 'लिरिक्स' लिहितो याने शायरी करतो. दूधवाल्यानं वेश बदलला तरी त्याचा पेशा हातात दुधाच्या बरण्या किंवा खांद्यावर दुधाची कावड नसली तरीही कोणालाही सहज ओळखता येतो... कस्तुरीचा वास का कधी कोणाला शपथेवर पटवून द्यावा लागतो ?

त्याला तुम्ही 'पंडत' म्हटलं की तो भारी खूष होतो. कोल्हापूरकडे जशी सगळीच सरकारं, देशावर पाटील, पतियाळात सरदार, खाली दक्षिणेकडे शास्त्रीगारू तसाच हा 'पंडत' असतो. कलकत्ता मेल व्हाया अलाहाबाद की अलाहाबाद मेल व्हाया कलकत्ता बोरीबंदरहून सुटताना तुम्ही कधी पाहिलीत काय ? किमान आपली ती 'एटीन डाऊन' की 'सिक्स्टीन् अप' वाराणशी एक्स्प्रेस तरी ? त्यावेळी आमच्या पंडत हनुमानप्रसाद दुबेजींचा रुबाब तुम्ही पाहयला हवा. त्याच्या गळ्यात पडणारे हार, त्याला दिली जाणारी आलिंगनं, त्याच्यावर होणारी धनद्रव्याची खैरात, त्याला निरोप देण्यासाठी गोळा झालेला जातभाईंचा प्रचंड समुदाय. आपण बोरीबंदरवर आहोत की

पालम विमानतळावर आहोत असा क्षणभर संभ्रम पडेल हे सारं पाहताना आपल्याला.

मध्ये माझ्या धाकटचा भावानं मला एक चांगल्यापैकी मनगटी घडचाळ भेटी दाखल दिलं. माझी कल्पना त्यानं ते मला वेळ समजावी म्हणून दिलेलं असणार, पण तो माझा भ्रम आता साफ नाहीसा झालाय. मी मुंबईला जाण्यासाठी घरातून बाहेर पडल्यापासून थेट स्टेशनवर पोहोचेपर्यंत वाटेत पावलापावलावर भेटणारी ही दूधवाली भैय्ये मंडळी 'साव, क्या टाईम हुआ ?' असं विचारीत असतात. सुरुवातीच्या उत्साहात मी प्रामाणिकपणं त्यांना मिनिट सेकंदसुद्धा करेक्ट वेळ सांगत असे, पण आता मला एक नवा शोध लागलाय. तुम्ही त्यांना काहीही वेळ सांगितली तरी त्याचे त्यांना सोयरसुतक नसते. हातात घडचाळ बांधणाऱ्याला वेळ विचारण्याचा आपला नैतिक अधिकार आहे अशी त्यांची ठाम समजूत आहे; व ती ते इमाने इतबारे राबविताना दिसतात.

लहानपणची आठवणीत राहिलेली दूधवाली पाटलीण काय अन् हा दूधवाला काय, सारी माणसं इथून तिथे सारखीच. गावाहून परत आला म्हणजे तो माझ्या मुलीसाठी काशीकडची ती रंगीबेरंगी लाकडामातीची खेळणी भेटीदाखल घेऊन येतो. कधी कानोजी अत्तराची कुपी नाहीतर एखादा बनारसी खण आणून तो आम्हांला चकित करतो. त्याच्या दुधाची क्वालिटी कशीही असो तो त्याचा धंदा आहे. आपण त्याविषयी न बोललेलं बरं. पण स्वतःच्या माणुसकीची क्वालिटी बिघडवायला मात्र तो रेसभरही तयार नसतो. म्हैस व्याली की न सांगता तो आठवणीनं चीक आणून देईल. त्याचे पुन्हा पैसे घेणार नाही. फारच आग्रह धरला तर म्हणेल म्हशीला घालायला कोंडा असला तर द्या थोडा. अशा या दूधवाल्याचं दूध बंद करायचा प्रसंग अलीकडेच माझ्यावर गुदरला. त्याच्या दोषांसह त्याच्यावर माझं प्रेम आहे. त्याचा रतीब कसा बंद करावा ह्याचा चार दिवस मी स्वतःशीच विचार करीत होतो. माणसं तोडणं मला

साधत नाही. अखेर मनाचा धडा करीत एक दिवस त्याला म्हटलं, 'देखो पंडत, कलसे दूध नही लाना...'

दूधवाला गप्पच राहिला. मी आरेचे दूध सुरू केले असणार हे त्याने मनोमन ओळखले असावे. तो निमुटपणानं निघून गेला तेव्हा मला कोण हायसं वाटलं. म्हटलं, चला गोडीत मिटलं सारं. पण कसचं काय नि कसचं काय ! दुसऱ्या दिवशी पहाटे तीच निर्विकार हाक, 'बाई दोध...'

मी उठलो, दार उघडलं, आणि म्हटलं, 'पंडतजी, दूध नको आजपासून, आम्ही कार्ड काढलंय...' त्यावर तो थंडपणे म्हणाला, 'ठीक है, ना कौन कहता है, भांडा तो लाव पहेला...' मी भारावल्यासारखा पातेलं घेऊन आलो. आणि भैय्यानं त्यात मोजून पावशेराचं माप रिकामं केलं.

भैय्याचा आणि आमचा आता एवढाच ऋणानुबंध उरलाय. त्याचं दूध आलं की गरम गरम कॉफी होते, गात्रं चरुनवलन करू लागतात. आणि मग निमुटपणे मी बाटल्यांची पिशवी उचलून त्या पंच पंच उषःकाली दूध केंद्राची वाट चालू लागतो.

• • •

तो काळ वेगळा होता...

लग्न सराई

माझ्या आठवणीतलं अगदी पहिलं लग्न जर कोणतं असेल तर ते माझ्या आईचं. पण हे विधान संपूर्ण सत्य नव्हे, मला माझ्या वडिलांचंही लग्न चांगलंच स्मरतं. थांबा, काहीतरी घोटाळा होतोय; माझा नव्हे, तुमचा. तुमच्या मनात जे डोकावतंय ते साफ खोटं आहे. तसलं काही एक नाही. त्या दोघांचं ते पहिलंच, नाही नाही– माझ्या आईचं पहिलं आणि वडिलांचं दुसरं लग्न होतं; आणि त्या संबंधीच्या आई-आजीच्या तोंडून लहानपणापासून त्या लग्नाच्या ज्या आठवणी ऐकत आलो त्यामुळे लग्न हा प्रकार भलताच गमतीचा असला पाहिजे अशी माझी ठाम समजूत झाली. माझ्या आयुष्यात ही गंमत पुढे माझ्या जन्मानंतर दोन तपांनी उपटली आणि वाटतो तेवढा हा प्रकार गमतीचा नाही हे उणीपुरी गेली दोन तपं अस्मादिक अनुभवतातच आहेत... तर ते एक असो.

माझी आजी सांगायची की तुझे वडील बाईला 'पाहयला' आले– बाईला म्हणजे आईला! आम्ही मुलं तिला बाईच म्हणत असूं–तर गृहस्थ बिजवर असून देखील विचारतो कसा : 'का हो, चहाला फोडणी कशाची देतात ?' केवळ वडील पोलीस खात्यात होते म्हणून आईनं त्याना असा पाचकळ प्रश्न विचारल्याबद्दल बाकावर उभं केलं नसेल किंवा अंगठे धरायला लावलं नसेल अशी माझी नम्र समजूत आहे. त्या मानाने मग मी (अनेक प्रेमभंग आणि पाच-पन्नास कविता लिहून झाल्यावर...) मुलगी पाहायला गेलो तेव्हा तसा बराच गंभीर प्रश्न विचारला होता;

विचारलं होतं, की, 'काय हो, ऐन तारुण्यात वैधव्य प्राप्त झालं तर स्त्रीनं पुनर्विवाह करावा की नाही ?'

हे जसं मुलगी पाहण्याचं तसंच हुंड्याचं ! लग्न ठरवायला आलेल्या वडिलांकडच्या वडीलधाऱ्यांना माझ्या आजीनं त्यावेळी ठणकावून सांगितलं होतं– 'मुलगा प्रथमवर असो वा विजवर असो, हुंडा म्हणून एक छदाम देणार नाही मी जावयाला. माझी मुलगी चांगलं तोळाभर सोनं आणते दरमहा घरात...' आजीचं हे विधान मुळीच अतिशयोक्त नव्हतं. माझी आई प्राथमिक शाळेत शिक्षिका होती आणि सोनं वीस रुपये तोळा मिळण्याच्या काळात तिला चक्क सव्वीस रुपये बारा आणे पगार मिळायचा महिन्याला ! माझ्या बाबतीत मात्र माझ्या ध्येयवादी श्वशुरांनी माझ्यासारख्या ध्येयवादी तरुणांनी हुंड्यासारख्या रानटी प्रथेविरुद्ध कसे दंड थोपटून उभे राहिले पाहिजे हे मोठ्या प्रभावीपणाने पटवून दिले होते. यावर माझ्या बायकोची मल्लीनाथी अशी की, 'हुंडा मागायला माणसाकडे मुळात काही तरी असावं लागतं. ना गावात घर अन् रानात शेत ! देणाऱ्यांनी काय पाहून हुंडा द्यावा अशांना ?' माझी आई देखील माझ्या वडलांच्या लग्नपूर्व परिस्थितीचे असेच विदारक चित्र उभे करायची; म्हणायची, 'अरे, मी लग्न होऊन घरात आले तर या तुमच्या ठोंबऱ्यांच्या घरात फुटकी तपेली सुद्धा नव्हती. हा, हा सारा संसार मी उभा केला !'

या अशा गोष्टी निघाल्या की लग्नाच्या वेळी वडलांकडच्या वऱ्हाडाची कशी फटफजिती झाली ते सारं आई मोठं रंगवून सांगायची. त्या काळी पाच-पन्नास कोस प्रवासाचं हमखास साधन म्हणजे बैलगाडी ! लग्नाचे मुहूर्त असायचे चैत्र-वैशाखात. आणि त्यात पुन्हा तो नगरकडचा उन्हाळा ! उन्हं टाळण्यासाठी बैलगाड्या रात्री निघायच्या. वडलांच्या वऱ्हाडावर अंधाराच्या आडोशानं चोरट्यांनी आडरानात हल्ला चढवला. गाडीवानांनी बैलांच्या डोळ्यात चक्क तिखटाची भुकटी टाकीत टाकीत त्यांना

भन्नाट पिटाळलं, तरी चोरट्यांनी अखेर गाठलंच. सगळ्यांची अंगझडती घेतली, ट्रंका-पेट्या उस्कटल्या, पण गुंजभर सोनं काही हाती लागलं नाही... तसं बिचारे हंबरडा फोडीत आल्या पावली परत गेले. 'हे तर तुम्हां ठोंबरे मंडळींचं वैभव !' या वाक्यानं ती ह्या किश्श्याची नेहमी ठसक्यात सांगता करायची.

एरव्हीच पावसाच्या नावानं उजेड असलेल्या नगरकडचे चैत्र-वैशाखाचे दिवस म्हणजे आनंदच ! घरात लग्नकार्य असलं म्हणजे नदीच्या पात्रात जे काय झरेबिरे खोदून ठेवले असतील किंवा जिथं कुठं करंगळीभर धार वाहत असेल तिथून रात्री कावडी-कावडीने नाहीतर बैलगाडीत पाण्याची टिपाडं ठेवून पाण्याच्या साठवणीचा प्रश्न सोडवावा लागे. जानोसवाड्यात शिरता शिरताच वडलांच्या लग्नाच्या वऱ्हाडातल्या बायकांनी ही पाणी वाहतुक पाहिली, आणि 'पहाटे लौकर उठून गंगेवरच स्नानंबिनं उरकून कपडे-विपडे बुचकळून घेऊ या' असं आपआपसात ठरवलं. बैलगाडीच्या प्रवासानं साऱ्यांचीच हाडं पार खिळखिळी करून टाकली होती. धड एकीचा डोळ्याला डोळा लागत नव्हता. मग त्यातली एकजण अशीच केव्हा तरी तटकन अंथरुणावर उठून बसली, आजूबाजूला पसरलेल्या बायकांना हालवीत जागं करीत म्हणाली, 'उठा, उठा, बाहेर फटफटलंय. गंगेवर जायचंय ना ?' झालं, त्यासरशी सगळ्याजणी बोचकी घेऊन बाहेर पडल्या. गंगेवर आंघोळीपांघोळी उरकल्या, धुणी वडवली आणि जानोस घरी परत आल्या, तरी उजाडण्याचं नाव पत्ता नाही !

या साऱ्या प्रकारावर माझ्या आईची कॉस्टिक कॉमेंट : 'अरे, उजडणार कसं ? या ठोंबऱ्यांकडच्या बायका अशा वेंधळ्या, की रात्री दोन-अडीचलाच उठून लगा लगा या आपल्या गेल्या गंगेवर ! पौर्णिमा जवळ आलेली, दिवस उन्हाळ्याचे; बाहेर पिठुर चांदणं पसरलेलं... यांना वाटलं झाली पहाट ! अशा वेळी गंगेवर भुतावळ उठून हैदोस घालीत असणार, तर यांची कल्पना

पुरुष मंडळीच वाळवंटात आटयापाटया खेळताहेत ! नशीब त्यातल्या एखाद्यानं यांना झपाटलं नाही !'

त्या ऐतिहासिक विवाहानंतर (इतिहास– ठोंबरे कुलवृत्तांत) पुणतांब्याच्या पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं. अगदी 'शुक्लेन्दुवत्' म्हणतात तसं जरी नसलं तरी 'ठोमरे कुलोत्पन्न' मुलं जशी वाढतात तसा मी दिसमास वाढत होतो. व्ह. फा. होईपर्यंत– म्हणजे व्हा. फा. नापास होईपर्यंत, श्रीगोंदा– शेवगाव, अकोल– अंमळनेर (भांड्याचं), नगर- कोरगाव असं जियं कुठं आई-वडलांची बदली होई तिथं तिथं मी फासेपारध्याच्या कुत्र्यागत भटकत होतो. नात्यागोत्यात होणारी लग्नकार्यं हा वार्षिक परीक्षेनंतरच्या काळातला एक थोर विरंगुळा असायचा ! रसरूप-गंधांनी न्हालेल्या त्या आठवणी आजही मनात तितक्याच ताज्या आहेत. टवटवीत आहेत...

'आपल्याला मुलीकडचा सुतळीचा तोडा नको. मुलगी नक्षत्रासारखी आहे. वस्तुलाभ उत्तम आहे. घरचं वळणही बाळबोध आहे. जोडा कसा लक्ष्मीनारायणासारखा शोभून दिसेल ! काय हुंडा, मानपान, करणी वगैरे करायची असेल ती घराण्याच्या इतमामाला साजेशी करा म्हणावं, म्हणजे झालं...' अशा शब्दात एकदा का घरातनं 'ओ. के.' मिळाला की 'मुलगी पसंत असल्या' चा निरोप जायचा. मुलीकडची माणसं त्याची वाटच पाहत असायची– एकदा हा रुकार पदरी पडला की मग : 'आमचं काय, आम्ही गरीब माणसं ! हे दोन हस्तक आणि तिसरं मस्तक या परतं देऊन देऊन काय देणार आम्ही; मुलगी तुमच्या पदरात टाकलीय– संपादून घ्या...' अशी वधूपक्षाकडची सुरुवात होऊन अखेर देण्याघेण्याच्या याद्या पक्क्या करण्यात त्याचा सुरेख शेवट होई. संभाव्य अडीअडचणींचा (अमकीची 'पाळी' कधी येतेय ते पाह्यलं पाहिजे. तमकीचे दिवस भरत आलेत ती 'मोकळी' होऊ द्या एकदा वगैरे...) विचार होऊन 'तिथिनिश्चय' केला जाई.

एकदा का हे तिथी बिथीचं पक्कं झालं की मंडळी कार्यासाठी कंबर कसून उभी राहत. धान्यधुन्य, कापड-चोपड याची खरेदी आणि डागडुग घडवणं यासारखी एकूण सारी कामंच युद्धपातळीवर गती घेऊ लागत. गल्लीतल्या बायका घरचं कार्य समजून लग्नघरी राबता ठेवीत. पापड-कुरडया, गव्हले-शेवया, पिठं-भाजण्या या साऱ्यांची तयारी पायलीच्या हिशोबात चालू होई. मग घरातला कर्ता पुरुष डोक्याला टोपी घालून आणि मांडी मोडून निमंत्रणाची पत्रं लिहायला बसे. छापील पत्रिकांचं लोण अद्याप फारसं कुठं पसरलेलं नव्हतं. 'शरीरसंबंध' कोणाशी ठरला याचा पत्रात स्वच्छ उल्लेख असे. या निमंत्रण-पत्रांवर शुभसूचक केशरपाण्याचा शिडकावा आवर्जून केला जाई. पहिलं निमंत्रण अर्थातच मनोभावे कुलदैवतापुढे ठेवलं जाई–मग बाकीची पोस्टात पडत. माहेरवाशिणी, जवळचे आप्तेष्ट डेरेदाखल होऊ लागत... लग्न म्हणजे आधी महिना दोन महिना आणि नंतर महिना दोन महिना असा माहेरवाशिणींचा मुक्काम ठरलेला. वाडा मोठा असेल तर पुढच्याच चौकात बोहले बांधून घेतले जाई. वर मंडपवजा चांदणी दिली जायची. चौकाच्या तिन्ही बाजूच्या ओसऱ्या प्रशस्त असत– घर लहान असेल तर मग गावातल्याच एखाद्या रामच्या नाहीतर विष्णूच्या देवळाचा प्रशस्त प्राकार लग्नमंडपाचे रूप घेई– कोठीच्या खोलीचा चार्ज एखाद्या आजीबाईकडे असायचा. तिनं दागदागिन्यांच्या ट्रंका पेटयांवर नजर ठेवायची– आयत्यावेळी आलेल्या पाहुण्याला जवळ बसवून त्याच्या फराळाआराळाचं...

सीमांतपूजन आणि वाङ्निश्चय हे समारंभ गावशिवेवरच्या मारुतीच्या देवळात गॅसबत्त्यांच्या झगझगाटात आणि प्रतिष्ठितांच्या उपस्थितीत साजरे व्हायचे. हुंड्याचे रुपये 'वाजवून' घेणे आणि वराचा पोषाख त्याला देणे वगैरे कार्यक्रम इथेच होई. मग मुहूर्त असेल त्या मानाने देवप्रतिष्ठा, गौरीहर, वाजवा रे वाजवा, लाजा होम, सप्तपदी, मधुपर्क हे आकाराला येई. तडातडा वाजणारा ताशा, सूर-सनई, संबळ-चौघडा ही खरी कार्याला शोभा अणणारी वाद्यं ! पण आसामी मालदार असेल. तर त्याच्याच जोडीने

नगरहून आणलेला बॅन्डही असेच– जरा झालर लावल्यासारखा. बायका इरकली, टोपपदरी, महेश्वरी, फरसपेटी अशा लफ्फेदार काठ-पदराच्या नऊवारीत लगालगा आत बाहेर करीत–काय त्या कोऱ्या लुगड्यांचा वास म्हणून सांगू ! शालू-पैठण्या वगैरे सारं विहिणी वरमायांची मिरासदारी– पण प्रत्येकीच्या अंगावर गेला बाजार शेर अच्छेर पिवळे धम्मक सोन्याचे डागडागिने आणि नाकात हा टप्पोरा मोत्यांच्या नथीचा खेकडा ! पुरुष मंडळी सिल्क अल्पाकचे कोट, करवतीकाठी नाहीतर रुईफुली धोतरं, जरीकाठी रुमाल उपरण्यात वावरत. (पगड्यांचा प्रभावही काही कमी नव्हता–) वधुवरांवर उधळायच्या अक्षता असायच्या हळद माखल्या जोंधळ्याच्या... आमच्याकडे त्याचं पीक अमाप !

रासनहाणी, मुलगी लपवणं आणि ती वरानं शोधून उचलून आणणं, विड्या तोडणं आणि सुपारी सोडवणं या वधुवरांच्या खेळातील सार्वजनिक शृंगार-प्रदर्शनाची आणि उघड उघड घेतलेल्या स्पर्शसुखाची लज्जत फॅमिली रूममध्ये बसून आईस्क्रीम चाखणाऱ्या आणि बॉक्स (कै. वा. हाय !) मध्ये बसून सिनेमा पाहणाऱ्या (– खरं म्हणजे न पाहणाऱ्या) पोरांना कशी काय समजावून सांगणार !

त्या काळात जेवणावळीला ' प्रयोजन ' असं भारदस्त नाव असे. पक्वान्न बहुशः लाडू– तेही मोतीचूर वा बुंदीचे. चांदीच्या ताटवाटच्या आणि गडवे फुलपात्रं हे सारे वधुवरांसाठी. सोवळ्याच्या आणि ओवळ्याच्या अशा वेगवेगळ्या पंक्ती उठत. निमंत्रित आपआपले कद किंवा मुकटे पितांबर आणि चांदीची फुलपात्रं येताना बरोबर घेऊन येत. पानापुढे पैसा पैसा दक्षिणा ठेवली जाई ती ' पैसा फंड ' वाले कार्यकर्ते उत्साहानं झडप घालून लगेच उचलून नेत–) आणि गगनभेदी स्वरात श्लोक वगैरे म्हटले जात. रात्री वरात शृंगारलेल्या घोड्यावरून वाजत गाजत निघे– क्वचित उघड्या मोटारीतनंही ! दारूकाम म्हणजे आपलं शोभेचं, तेही वरातीपुढे थाटात केलं जाई. वरातीपुढे (म्हणे) कलावंतिणी

नाचत... माझ्यापुरती तरी ही सांगोवांगीची गोष्ट. (असो !)

अशा या लग्नकार्यासाठी एकत्र जमलेली समवयस्क मंडळी नव्या जोडप्याची व्यवहार्य आणि अव्यवहार्य अशी थट्टामस्करी करण्यात मश्गुल असतानाच स्वतःच्या मनोविनोदनार्थ– त्यांच्या दृष्टीने– काही धाडसी कार्यक्रम आखीत. म्हणजे चोरून भांगेचा घोटा करून पिणे व पाजणे– गांजा घातलेली भाजी फसवून इतरांना खिलवून त्यांची गंमत पाहणे– नदीकाठी वा गावाबाहेरच्या एखाद्या जुनाट देवालयाच्या मागील एकांत जागी कोंडाळे करून धूम्रपानाची दीक्षा एकमेकास देणे घेणे ! अशाच एका कार्यक्रमात मी सिगरेट फुंकली– अगदी कविवर्य केशवसुतांच्या त्या विख्यात 'तुतारी' प्रमाणे... आणि त्या स्वप्राणाने फुंकलेल्या सिगरेटनं मला असं काही हैराण करून सोडलं त्यावेळी म्हणता की डोळे चक्क पांढरे व्हायची वेळ आली. तेव्हापासून मी सिगरेट सोडली आणि पाइप हाती घेतला तो कायमचा...

मांडव परतणं झालं की इतरेजनांच्या लेखी कार्याची सांगता झाली वा सूप वाजले ! हे एका अर्थी खरं असलं तरी काही खास कुळधर्म कुळाचार असतातच. कुलदेवतेला ओव्हर पाया पडायला जायचं असतं नव्या जोडप्यानं– झालंच तर देवीच्या गोंधळातही एक रमणीय रात्र वाडचासमोरच्या अंगणात रंगते–

हल्ली 'आम्ही हनीमुनसाठी उटीला किंवा कश्मिरला जाणार...' अशी भाषा नवी जोडपी करतात– उटी, कश्मिरची जोडपी कुठं जात असतील असा मला नेहमी प्रश्न पडतो. जात असतील झालं जाकोबाबादला नाहीतर अहमदनगरला हे एकच त्यावर सुसंगत उत्तर मला सुचतं– तर ते एक असो.

त्या चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी आमच्या नगरकडे एक देशी अवृत्ती प्रचारात होती. तिचं नाव 'मारगमळा'. मारगमळा म्हणजे 'मार्ग मळा...!' लग्नानंतर योग्यसा दिवस पाहून नूतन परिणत जोडप्यासह घरातली मोजकीच मंडळी गावालगतच्या एखाद्या

रमणीय ठिकाणी– निवांत देवस्थान वा नदीकाठचा फळा-फुलांनी बहरलेला बाग वगैरे– अशा ठिकाणी वनभोजनास जात. या कार्यक्रमालाही 'फल शोभना' इतकेच धर्माचे सँक्शन असायचे. स्वयंपाक-पाणी, जेवणं-खाणं; फराळ-आराळ वगैरे तिथच होई. वधू-वर या निवांत उघड्या मोकळ्या वातावरणात प्रसन्न मनानं एकमेकांना उमजून घेण्याचा प्रयत्न करीत. सूर्यास्ताला सारी मंडळी घरी परतत.

लग्न झाले. मारगमळा झाला. आता काया, वाचा, मने एकरूप झालेली ही जोडपी प्रपंचाच्या खस्ता खाण्यासाठी बद्धपरिकर की काय म्हणतात ती झालेली असत !

(आकाशवाणी मुंबईच्या सौजन्याने)

•••

अहमदनगर

कोणा एका नाटककाराविषयी असा एक किस्सा प्रचलित आहे की, त्यानं आपल्या नव्या नाटकातल्या एकंदर प्रादेशिक वैशिष्ट्याची कल्पना यावी म्हणून त्या नाटकातल्या प्रमुख पात्रांना आणि दिग्दर्शकाला आपल्याबरोबर स्वतःच्या गावी नेलं आणि मंडळींची पावलं गावशिवेला कुठे लागतात न लागतात तोच, 'माझी माती ! माझी माती !!' असा आक्रोश करीत, भूमी कवटाळीत जमिनीवर लोळण घेतली. त्याच्या डोळ्यातून घळघळा अश्रूंचा पूर वाहू लागला... अहमदनगरच्या स्मरणासरशी असा हंबरडा फोडायची जरी मला कधी आवश्यकता वाटली नसली तरी एक गोष्ट खरीच की नगरच्या नामोल्लेखाने माझे अंतःकरण नाही म्हटले तरी उचंबळून येतेच येते. त्याचं काय आहे की इतरांची नुसती गावं असतात पण माझं अहमदनगर हे मुदलातच नगर आहे. 'सा रम्या नगरी' वगैरे... वगैरेच्या पठडीतलं !

नगर हे नुसतं नगर म्हणून कधीच माझ्या डोळ्यांसमोर येत नाही. एखादा वेलपत्तीदार गालीचा उलगडत जावा तसा उभा नगर जिल्हा पुढ्यात पसरत गेल्यागत मला भास होतो. नगर म्हटलं की ज्ञानेश्वरांचं नेवासं डोळ्यांपुढं येतं. शेवगावच्या शिवेला लागून असलेलं गोदातीरीचं एकनाथ महाराजांचं पैठण आठवतं, पुणतांब्याची चांगदेवाची समाधी डोळ्यांपुढं तरळू लागते... आणि 'मन चंगा तर काठवटमे गंगा' अशी अढळ श्रद्धा बाळगणाऱ्या गोंद्या चांभाराचं तेव्हाचं चांभारगोंद आणि आत्ताचं श्रीगोंदे आठवतं, तिथला सुफीपंथीय महमदबुवांचा मठ डोळ्यांपुढं

येतो. कारण अगदी स्वाभाविक आहे. तिथून हाकेच्या अंतरावर तर माझे जन्मघर आहे !

संस्कृती ही नद्यांच्या काठाने वाढते. आणि नदीच्या पाण्याचे गुणधर्म त्या त्या संस्कृतीला वेगळं वळण आणि वैशिष्टच प्राप्त करून देतात असा काहीसा एक सिद्धांत आहे नगरलाही एक नदी आहे. पॅरीसच्या 'सीन'च्या शेजारी एक काना ठेवून दिला की झालं काम. नगरची ही 'सीना' तशी वर्षाचे बाराही महिने कोरडी ठणठणीत असते दुष्काळी जिल्हा म्हणून आधीच बदनाम झालेल्या आणि वर्षाकाठी बारा इंच पावसाची सरासरी तब्बेतीनं गाठणाऱ्या नगरच्या सीनाला मधूनच असा काही प्रचंड पूर येतो की नगरवासीयांच्या दृष्टीने ती जागतिक महत्त्वाची बातमी ठरते. माळवदी घराच्या धाब्यावर उभं राहून हा पूर पाहणं यासारखं दुसरं थ्रिल्ल नाही... नेत्रसुख नाही !

पण सीनाचं एक सोडा. नगर जिल्ह्याचा बराचसा भाग गोदा आणि प्रवरा ह्या दोन मुख्य नद्यांच्या प्रवाहावर पोसला गेला आहे. दोन्हीही नद्यांचे पाणी मी चाखले आहे. आठवतं, वडील नेहमी म्हणायचे, 'गोदा स्नान आणि प्रवरा पान.' त्यांच्या ह्या म्हणण्यातच ह्या दोन नद्यांची वैशिष्टचे आणि प्रकृतिभिन्नता स्पष्ट होते. या दोन्ही नद्यांच्या काठी जन्मलेली, वाढलेली माणसं तेव्हाही नगरमध्ये होती आणि आजही आहेत.

माझ्या स्मृतीतलं माझं आवडतं नगर रस-रूप-गंध-स्पर्शाने पुनित होऊन आजही त्याच ताजेपणानं माझ्या मनात रेंगाळत आहे. नुसतं रस-रूप-गंध-स्पर्शच नव्हे तर ध्वनीसुद्धा ! सांगितलं तर हसाल कदाचित पण खरं सांगू ? दगडी कोळशाच्या धुराचा वास नाकाशी घोटाळू लागला की आजही मी 'होमसिक' होतो. नगरच्या आठवणीनं अस्वस्थ होतो. बालपणातल्या एका छोट्याशा घटनेत त्याचं रहस्य दडलं आहे. कोणीतरी पुण्याहून यायचं होतं म्हणून त्यांना घ्यायला वडलांच्या बरोबर मी स्टेशनवर गेलो

होतो. दौंड-मनमाड लाईनवरचं हे जंक्शन नसलं तरी मोठं महत्त्वाचं स्टेशन. पाचदहा मिनिटं गाडी थांबते इथं! पण तेवढ्या त्या काळासाठी उभा प्लॅटफॉर्म चैतन्यानं सळाळून उठतो. तो दिवसही त्याला अपवाद नव्हता. मुंडासेवाले शेतकरी पांढरपेशे, व्यापारी, भिंगारच्या कॅम्पातले सोजीर, लाल डगले आणि गुलाबी धोतरातले गोरे मुक्तिफौजेचे मिशनरी, निळ्या पांढऱ्या एकरंगी गोल पातळातल्या काळ्यासावळ्या चटपटीत ख्रिश्चन प्रौढा...

गाडीच्या वेळेवर गाडी आली. गार्डाच्या डब्यापासून इंजीनपर्यंत वडिलांचे बोट धरून मी धावत होतो. पाहुणे आलेच नाहीत. गाडी सुटायची वेळ झाली. गार्डाने फुर्रकन शिट्टी वाजवली. एक बाई टाचा उंचावून खिडकीलगत बसलेल्या लेकुरवाळीला सांगत होती, 'मार्था लेकराला जीव लाव बरं का, पालकानं बालकाचा नीट प्रतिपाळ केलाच पाहिजे. आन हा. इसरशील... रॉबर्टला माझी पाच चुंबनं सांग...' गाडी हालली. भप्प... भप्प... भप्प. दगडी कोळशाचा धूर हवेत तरंगू लागला. तेवढ्यात पावसाची एक सर आली. वडील मनातून कष्टी झाले असावेत. त्यांच्याबरोबर मी एका बाकावर स्वस्थ बसून राहिलो. सर आली तशी गेली. लख्ख उन्हानं प्लॅटफॉर्म पिवळा झाला. निर्मनुष्य.. निरव... उरला होता फक्त दगडी कोळशाच्या धुराचा वास. इतका वेळ स्तब्ध असलेले वडील माझ्याकडे पाहून मोकळेपणाने हसले आणि नगर स्टेशनचा तो सारा परिसर मला एकाचवेळी सुंदर व उदास वाटू लागला. तो ठसा आजही माझ्या मनावर तसाच कायम आहे. नगरच्या त्या उदास, सुंदर वातावरणाची ओढ लावण्याचं एक अनामिक सामर्थ्य त्या आठवात साठवलेलं आहे.

माझ्या लेखी नगरचा सगळ्यात सुंदर रस्ता कुठला असेल तर तो स्टेशन रोड. इथले तांगे पुण्यासारखेच आहेत. पण तांगेवाले नगरचेच असल्यामुळे ह्या तांग्यातून गावात जाताना नेहमीच सुखाचे वाटले आहे. शाळेत असताना संध्याकाळी खेळणं आटोपल्यानंतर मित्रांबरोबर गप्पा छाटीत फिरायला वगैरे जायचा

आमचा रस्ता हाच. थंडीच्या दिवसांत भल्या पहाटे रनिंगला वगैरे जायचा रस्ता मात्र हा नव्हे... तो दिल्ली दरवाजाबाहेर लाल टाकीकडे जाणारा रस्ता असायचा ! मुंबईला जसा ओव्हल तसा नगरला आमचा वाडिया पार्क. त्याला लागूनच अगदी राजाबाई टॉवर इतका उत्तुंग नसला तरी त्याची 'खिशातील आवृत्ती' शोभेल असा लोकल बोर्डाच्या इमारतीचा मनोरा आहे. माझ्या अभ्यासाच्या खोलीतून त्यावरच्या प्रकाशाने उजळून निघालेलं घड्याळ रात्री कसं लख्ख दिसायचं. ह्या वाडिया पार्कवर एम. सी. सी. च्या क्रिकेट मॅचेस व्हायच्या. एम. सी. सी. म्हणजे तुमची ती एम. सी. सी. नव्हे हं ! एम. सी. सी. म्हणजे आमचा आपला नगरचा मोहन क्रिकेट क्लब ! पंडितजींची नगरला भेट असली की त्यांच्या व्याख्यानासाठी ह्याच वाडिया पार्कमध्ये व्यासपीठ उभारले जायचे. ह्या वाडिया पार्कच्या स्टेशन रोडच्या बाजूचे जे गेट आहे त्याच्याजवळ तुम्ही आलात रे आलात की 'दम मारो दम'वाल्या मंडळींना एकदम ब्रह्मानंदाचा साक्षात्कार ! कारण गेटला लागूनच गांजा डेपो !! आत्ताचं मला माहीत नाही पण तेव्हा स्टेशनरोडनं तांगा ह्या स्टॉपपाशी आला की गांजाचा असा काही उग्र भपकारा नाकात शिरायचा की नगर गांजेकसांचे गाव आहे की काय असा एखाद्या त्रयस्थाचा सहज समज व्हावा. ह्याच रस्त्यानं आम्ही नवरात्रात स्टेशनपल्याडच्या देवीच्या दर्शनाला जायचो. सकाळच्या कोवळ्या उन्हात न्हाऊन निघालेली बाजूच्या शेतातली ज्वारीची हिरवीकंच ताटं आणि त्यांच्या कडेकडेनं फुललेली कारल्याची पिवळीधमक फुलं पाहताना मन कसं मोहरून जायचं !

शहर विभागणीचं प्रत्येक गावाचं एक खास वैशिष्ट्य असतं तसंच ते नगरचंही आहे. चितळे रोड हा नगरचा मध्यवर्ती मोठा रस्ता, भाजीबाजार इथंच भरतो. पण तिथपर्यंत पोहोचण्यापूर्वी पीरांना सोडलेले, मस्त माजलेले, भयानक दर्प असलेले बोकड चुकवावे लागतात. नगरला गुजर गल्ली, कोर्ट गल्ली, घुमरे गल्ली,

सांगळे गल्ली, धनगर गल्ली अशा गल्ल्या आणि डावरे आळीसारखी एखाददुसरी आळीही आहे. इथे तेली-खुंट आहे, सर्जेपुरा आहे, कापडगंज आहे, मैदानचा आड आहे, दिल्ली दरवाजा आहे, चौपाटी कारंजा आहे व आनंदी बाजारही आहे. आनंदी बाजारात मार्कंडेश्वराच्या मंदिराला लागून गांधी मैदान आहे. राष्ट्रीय चळवळीच्या काळात महत्त्वाच्या घटनाघडामोडींचे सारे अन्वय अर्थ याच मैदानावरील सभांतून रावसाहेब पटवर्धनांनी आम्हांला समजावून सांगितले. रावसाहेब म्हणजे नगरचे अनभिषिक्त लाडके बादशहा. गद्यातल्या ह्या गंधर्वाच्या वाणी-विचारावरच माझ्या पिढीतल्या पोरांचा पिंड पोसला गेला आहे रावसाहेबांचे बालमित्र आणि वर्गबंधू दत्तोपंत डावरे म्हणजे मूर्तिमंत साहित्यप्रेम ! साहित्यसंमेलनाचे ते खरेखुरे निष्ठावंत वारकरी. नगरला २३ वे साहित्यसंमेलन भरले ते त्यांच्याच वाङ्मय उपासक मंडळाच्या विद्यमाने. ख्यातनाम साहित्यिकांचे दर्शनसुख देणारे माझ्या आयुष्यातले हे पहिले साहित्यसंमेलन.

आमच्यासारखे वेडेपीर सोडले तरी नगरला वळणावळणावर पीर आणि मशिदी आढळतील. नगरला लागूनच बारा इमामचा प्रसिद्ध दर्गा आहे. त्याचा उरूस हा एक मोठाच वार्षिक सोहळा. मोहरम, संदलची रात्र आणि डोल्याच्या आईऱ्या मिरवणूक ह्या सर्व प्रसंगी नगरच्या भिन्न धर्मियांतील एकी, भ्रातृभाव आणि परस्पर प्रेम सदैव दृष्ट लागण्यासारखेच राहिले आहे. याचे बहुतांश श्रेय गांधीजींच्या राष्ट्रीय चळवळीच्या झेंड्याखाली एकत्र आलेल्या नागरिकांच्या उदारमनस्क समजूतदारपणालाच आहे.

नगरला आजमितीला पाच साप्ताहिकं, पाच दैनिकं, एक शैक्षणिक व एक स्त्रियांच्या प्रश्नाला वाहिलेलं इंग्रजी नियतकालिक प्रसिद्ध होते. शाळा-कॉलेजांचे आणि विविध सहकारी संस्थांचे भक्कम जाळे नगरभर पसरलेले आहे. साहित्य, समाजजीवन आणि सांस्कृतिक कार्य ह्यात सदैव आघाडीवर राहिलेल्या नगरच्या इतिहासाचा पोवाडाही तितकाच श्रवणीय आहे.

मराठी भाषेची मायमाऊली संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, अर्ध्या रात्रीत किल्ल्याची भिंत बांधून उभी करणारी पराक्रमी सुलताना चांदबिबी, देवगिरीच्या किल्ल्यावरील दिवा दृष्टीस पडावा म्हणून उंच डोंगरावर चिरेबंदी अष्टकोनी तिमजली महाल बांधणारी चांदबिबी, चारपाचशे वर्षांच्या घडामोडी पाहणारा आणि अनेक बुरूज असलेला अभेद्य असा नगरचा भुईकोट किल्ला, दख्खन काबीज होत नाही म्हणून हाय खाऊन नगर येथे प्राण सोडणारा महत्त्वाकांक्षी औरंगजेब, इतिहासकार फिरस्ता, जगप्रसिद्ध मुलुखमैदानतोफेचा जनक रुमीखान इत्यादी व्यक्ती आणि वास्तू ह्या पोवाडयाचे चौक आहेत. शिवाजी महाराजांचे आजे मालोजी, वडील शहाजी, पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकी विठ्ठल सुंदर आणि त्रिंबकजी डेंगळे यांचा नगरशी जवळचा संबंध होता

इसवी सन १४९४ साली नगर शहराची स्थापना झाली व स्थित्यंतरे होत होत १७९७ साली हे शहर शिंदयांच्या स्वाधीन झाले. चतुर नाना फडणीस ह्यांना नगरच्या किल्ल्यात बंदिवान म्हणून राहावे लागले. तात्या टोपे, त्रिंबकजी डेंगळे यांनी इंग्रजांशी युद्ध केले. १८१८ मध्ये दुसरा बाजीराव इंग्रजांस शरण गेला व किल्ल्यासकट अहमदनगर इंग्रजांच्या स्वाधीन झाले... हे जुन्या इतिहासाचे धागेदोरे. आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत पंडित जवाहरलाल नेहरू आणि अखिल भारतीय काँग्रेसच्या कार्यकारिणीचे अन्य नामवंत सदस्य यांना ब्रिटिशांनी नगरच्या ह्याच किल्ल्यात स्थानबद्ध करून ठेवले होते हा ताजा इतिहास.

ते सारे काहीही असले तरी मला नगर दिसते ते हिरवीगार खरपूस भाजलेली बाजरीची भाकरी आणि जिला माझे वडील विनोदाने 'चिराग–रोशनकी तरकारी' म्हणत, त्या लसणीची चरचरीत फोडणी दिलेल्या करडईच्या झणझणीत भाजीत, गढूळ पाण्याची क्षीण धार ढाळणाऱ्या नगरच्या नळात, गॅदरिंग रद्द

करून दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून दिल्या गेलेल्या गॅदरिंगच्या वर्गणीत, नगरच्या किल्ल्यात 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'च्या लेखनासाठी पंडितजींनी वापरलेल्या शाई-कागदाला येणाऱ्या वासात, स्थानबद्ध अवस्थेत गाडीने नगरला नेले जात असताना मौलाना अबुलकलम आझादांनी शब्दबद्ध केलेल्या 'चहा' विषयक चिंतनाला येणाऱ्या मंदमधुर गंधात आणि पावसाळी हवेत नगरच्या स्टेशनवर वातावरणात विलीन झालेल्या दगडी कोळशाच्या धुरात ! नगरविषयीची माझी अंतर्यामीची भावना : 'आहे मनोहर परी गमते उदास' हीच आहे. आणि म्हणूनच त्या उदास सौंदर्याचा उण्यापुऱ्या दोन तपांच्या विरहानंतर मागोवा घेण्याचा, शोध घेण्याचा हा एक प्रांजळ प्रयत्न.

(आकाशवाणी–मुंबई यांच्या सौजन्याने)

•••

अशी होती माझी शाळा

अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला एक तालुक्याचे गाव आहे. श्रीगोंदे हे त्याचे नाव. 'मन चंगा तो काथवट में गंगा!' असे संताला साजेशा आत्मविश्वासानं उद्‌गारणाऱ्या गोंदच्या चांभाराचे हे गाव म्हणून चांभार गोंदे या नावानेही ते ओळखले जात असे. हे गाव दोन कारणांसाठी विशेष प्रसिद्ध होते. एक म्हणजे दुष्काळी तालुक्याचे गाव म्हणून आणि दुसरे म्हणजे सुफी पंथीय महमदबुवाच्या इथल्या मठामुळे. ख्रिस्तजन्मानंतर पुढे सन १९२१ च्या पंधरा ऑगस्टला इथे माझा जन्म झाला, पण ही नोंद गावच्या प्रसिद्धीच्या दृष्टीने अद्याप तरी विशेष महत्त्वाची ठरलेली दिसत नाही.

अशा या गावात साधे 'आई–बाबा' असे बोलायला येण्यापूर्वीच माझ्या शालेय जीवनाला प्रारंभ झाला. याचे सरळ साधे कारण म्हणजे इथल्या मुलींच्या प्राथमिक शाळेत माझी आई शिक्षिका होती आणि ज्याच्या अंगावर मला एकटे टाकून जाता येईल असे कोणी माणूस नव्हते. वडील होते, पण ते सदैव फिरतीवर असत. पोलीस खात्यात असल्यामुळे माझ्यापेक्षा त्यांनी तालुक्यातल्या चोर, दरवडखोरांची चिंता अधिक बाळगावी हे त्यांच्या पेशाशी अधिक सुसंगत होते. तर ते एक असो.

आई मला आपल्या बरोबर शाळेत घेऊन जायची. तिचे पाऊल शाळेच्या दारात कुठे पडते न पडते तोच चहूबाजूंनी मुली धावत आणि 'बाई, आम्ही घेऊ उमाकांत... (उमाकांत नव्हे!)?'असे म्हणत आईच्या खांद्यावरून मला ओरबाडून

काढीत आणि माझ्या रडण्या-किंचाळण्याची पर्वा न करता त्या मला सरळ बारगणीत खेळायला घेऊन जात (खेळणे त्यांचे, रडणे माझे).

मला श्रीगोंद्याची ही मुलींची प्राथमिक शाळा नीट स्मरते. एक मोठा हॉल होता आणि माझी आई त्यात एकाच वेळी किमान तीन तरी वर्ग 'कंट्रोल' करीत असायची. एका वर्गाला शुद्धलेखन घालणे, दुसऱ्या वर्गाचे सामूहिक कविता पाठांतर आणि तिसऱ्या वर्गाला तोंडचे हिशोब, असे सारे एकसमयावच्छेदेकरून चालू असायचे. भोरडयांसारखी सदैव कल्कल्कल्कल् करणाऱ्या त्या पोरटयांच्या आवाजावर आईचा आवाज वर चढायचा. मी (बिचारा) एका कोपऱ्यात अंथरलेल्या दुपटयावर पडल्या पडल्या टुळूटुळू नजरेने हे सारे पाहात निपचित पडलेला असायचो...

मी मोठा होत होतो. आईचे बोट धरून नित्यनियमाने शाळेत जात होतो. कधी बाकावर चढून बसण्याच्या धडपडीत घसरून खाली पडायचो. अशा वेळी मुली 'उंदीर गेला रे गेला !' असे माझे रडे थोपविण्यासाठी ओरडत. मला (गणपतीसारखे) बाकावर नीट बसवीत, पुढच्यातल्या जमिनीवर खडूने महिरप, रांगोळी काढीत. उमाकांत या माझ्या (सोन्यासारख्या) नावाचे 'उमाकंत' असे अपभ्रष्ट रूप या पोरी करीत. कालांतराने तेही लुप्त झाले आणि त्यांच्या लेखी मी फक्त 'बाईचा मुलगा' उरलो.

एकलव्याप्रमाणे मी या काळात धडे गिरवीत होतो. मला फुटकी-तुटकी पाटी अपुरी वाटायची. शेणाने सुरेख सारवलेली जमीन रंगीबेरंगी खडूने मी रेघोटयांनी चिताडून ठेवायचो. शाळेतल्या माझ्या अस्तित्वाचा आईला व अन्य कोणाला कधी उपद्रव जाणवला नसावा असे मला वाटते. एकटेपणा माझ्या पाचवीलाच पुजला होता. माझ्या पाठीवर जवळजवळ नऊ वर्षांनी बहीण जन्माला आली. स्वत:च स्वत:शी खेळायचे, स्वत:त रंगून जायचे हे माझ्या अंगवळणी पडल्यागत झाले होते.

वर्गाच्या एका कोपऱ्यात, भिंतीकडे तोंड करून रंगीत गोट्यांच्या चौकटीशी चाळे करण्यात मी तासन्‌तास गढून जाई अथवा बायोस्कोप डोळ्याला लावून समोर दिसणाऱ्या छायाचित्रांतली मन स्तिमित करणारी दृश्ये अधाशीपणाने मनात साठवी...

मुलींचे पाहून पाहून आणि त्यांच्यात वावरून वावरून मी त्यांचेच खेळ उचलले : सागरगोटे, झिम्मा, फुगड्या, ठिकऱ्या, छप्पापाणी, पिंगा अन् दोरीवरच्या उड्याही! गल्लीतली मुले मला टाळीत. आपल्यात खेळायला घेत नसत... दसऱ्यापाडव्या-सारख्या सणासुदीला आईने हौसेने गळ्यात कंठी, कानात डूल आणि हातात सलकडी घालून मला सजवले की पोरे 'उमाबाई उमाबाई' करून मला चिडवीत... अशावेळी मला फार एकाकी वाटे, रडे अनावर होई आणि रागारागाने मी ते अलंकार अंगावरून ओरबाडून काढून आईच्या अंगावर फेकून देई...

शाळेत प्रवेश मिळण्याइतपत अद्याप माझे वय झालेले नव्हते. पण मुलींच्या शाळेतील 'सहशिक्षणाला' ही मी वैतागलो होतो. 'मला मुलांच्या शाळेत जायचं...' असा आईमागे मी नुसता धोशा लावला. 'त्याला नुसतं बिगरीत वसू द्या... अजून लहान आहे तो.' असे मराठी मुलांच्या शाळेच्या हेडमास्तरांना सांगून आईने तो प्रश्न कसाबसा सोडवला. पण शाळा घरापासून खूप लांब होती... इतके लांब मला रोज दोनदा ने-आण कोण करणार?

श्रीगोंद्यात त्याकाळी एक मण्यारीण होती. बाजार चौकात तिचे बांगड्यांचे दुकान होते. या चांगल्या उंचनिच, गोऱ्यापान देखण्या बाईचे आमच्या घरी खूप येणे-जाणे असायचे. नव्हे, ती जवळ जवळ आमच्या कुटुंबातलीच एक झाली होती. मी तिला 'बी' म्हणत असे. बी एकटी होती; पदरी मुलबाळ वगैरे काही नव्हते. माझ्यावर ती पोटच्या मुलागत माया करी. बीच मला पहिल्या दिवशी शाळेत घेऊन गेली. दुधी पेन्सिलीचा पुडा, डब्बल स्लेटपाटी, अंकल्पीचे कोरे करकरीत पुस्तक आणि गळ्यात अडकवायचे

दप्तर हे सारे तिने माझ्यासाठी खास नगरहून आणवून घेतले होते. शाळेत जायच्या दिवशी तिने पाटीवर १ पुढे १ काढीत एक रांगोळीसारखी आकृती रेखली– म्हणाली, 'ही सरस्वती तुझी विद्याई–तिला हळदीकुंकू वहा, पूजा कर, नमस्कार कर...' लोककलेशी माझी ती पहिली ओळख. मी शाळेत जायला लागलो म्हणून बीने आल्यागेल्यांना पेढे वाटले.

ही बैठी, एकमजली, दगड-चुन्यात बांधलेली मुलांची मराठी शाळा मुलींच्या शाळेच्या मानाने केवढी तरी प्रचंड होती... खेरीज तिच्यात एक प्रकारचा नवा कोरेपणा नेहमीच जाणवत राहयचा. या इमारतीत व्ह. फा. पर्यंतच्या प्रत्येक वर्गाला स्वतंत्र असा चांगला लांबरुंद हॉल होता. दर उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर वर्गाच्या गिलावा केलेल्या भिंती पांढऱ्याधोप चुन्याने रंगवलेल्या आढळायच्या. वर्गाची खोली लांबीरुंदीने जशी प्रशस्त तशीच तिची उंचीही भरपूर असायची. खोलीला नेहमीच्या खिडक्यांव्यतिरिक्त शुद्ध ताजी हवा खेळती राहण्यासाठी तळाशी आणि छप्परालगत व्हेंटिलेटर्स ठेवलेली असत. त्याकाळी त्या भागात चिलटांचा उपद्रव खूपच असायचा. तो कमी व्हावा यासाठी वर्गात मधोमध शेराची डहाळी टांगती बांधलेली असायची.

शाळा तशी जरा गावाबाहेरच होती. आजूबाजूला पसरलेली शेते, शाळेभोवतीचे शेराचे कुंपण, आवारातले उंच डेरेदार हिरवेकंच कडुनिंब, झुळझुळ वाहणारी कोरडी हवा आणि निळे नितळ आकाश हे सारे माझ्या मनात अगदी त्या काळीही एक अनामिक उदास हुरहुर निर्माण करीत असे.

लघवीच्या किंवा मधल्या सुटीत आम्ही मुले शाळेलगतच्या काळ्या वावरात नागरमोथा धुंडाळीत हिंडत असू. त्या नागरमोथ्याचा वास मला भारी आवडे. झालेच तर दगड उलथे-पालथे करून विंचू पकडणे, पैसा नावाचा, सदा वेटोळे करून बसणारा निरुपद्रवी किडा पकडून काडचाच्या पेटीत बंदिस्त

करणे हेही आमचे उद्योग चालूच असत. त्यावेळी आम्हां मुलांच्या मनात काही चमत्कारिक कल्पना वसत असत. उदाहरणार्थ सांगायचे तर उन्हाळ्यात ज्या आकाशाला भिडणाऱ्या वावटळी उठत त्या भिरभिरत आल्या अन् त्यांच्यात मीठ भिरकावले की म्हणे भूत दिसते. एखाद्याला असे भूत प्रसन्न झाले की त्याला आयुष्यात कधी काही कमी पडत नाही. भूत प्रसन्न व्हावे म्हणून मी खूप मीठ नासले. पण ते निमकहराम भूत मला कधीच बधले नाही !

शाळेत जाताना आम्ही आमची बस्करे–ती बहुधा गोणपाटाची असत, बरोबर नेत असू. नगरकडचा उन्हाळा भलताच जीवघेणा. उन्हामुळे घोळाणा (किंवा घुणा) फुटला नाही असे क्वचितच कधी घडले असेल. त्याच्या पारिपत्यासाठी आम्हां मुलांच्या टोपीत आणि खिशात शाळेत जायला निघण्यापूर्वी आमच्या आया आठवणीने एकएक कांदा ठेवीत. शाळेत तर उन्हाळ्यात थंडगार पाणी पिण्याची आम्हां मुलांना दांडगी हौस. पितळेची लोटी किंवा तांब्या पाण्याने भरून आणि पांढऱ्याशुभ्र ओल्या फडक्यात तो पालथा धरून मुले दुपारी शाळेत येत. खुंटीला हे उलटे तांबे लटकावून ठेवीत आणि तहान लागो न लागो, दर पाच दहा मिनिटांनी तांब्याच्या तोंडावर बोट टेकवून पाण्याची धार आ करून वरच्यावर गटागटा करून पोटात रिचवत असू.

'छडी लागे छम्छम् विद्या येई घम्घम्' हा तर शिक्षणतंत्राचा तत्कालीन मूलमंत्र असायचा. दंगा केल्याबद्दल, अभ्यास न केल्याबद्दल, शाळा निष्कारण चुकवल्याबद्दल, शिवीगाळी, मारामारी केली याबद्दल मुले सर्रास आणि खूप मार खात. छडी, रूळ, गुद्दे, हातांचे पंजे, बोटांनी घेतलेले चिमटे वगैरे आयुधे वापरली जात. उठाबशा काढायला लावणे, नुसते उभे करणे अथवा अंगठे धरून ओणवे उभे करणे, याही शिक्षा मुले गृहित कर्तव्य म्हणून (आणि काहीशा अभिमानानेही) सहन करीत... मला मात्र कोणी शिक्षकाने कधी हात लावला नाही. मी सदाचारी आणि सद्गुणांचा पुतळा होतो म्हणून नव्हे तर आई शिक्षिका

आणि वडील पोलीस अंमलदार अशी दुहेरी पुण्याई माझ्या पाठीशी उभी होती म्हणून !

माझे वडील अधून मधून शाळेत येत. ते आले की हेडमास्तर मला त्यांच्या ऑफिसमध्ये बोलावून घेत आणि वडिलांना पाहिले रे पाहिले की, मला एकाएकी जोरात रडू कोसळायचे... कारण मी समोर दिसताच वडील हेडमास्तरांना सांगायचे, 'हा भयंकर खोड्या करतो, हिचं अजिबात ऐकत नाही; अभ्यास करीत नाही. मास्तर, चांगलं ठोकीत जा याला... तुम्हांला फुल पर्मिशन आहे माझं...' वडिलांच्या या बोलण्यावर हेडमास्तर हा पोलीसखात्याचा विनोद आहे, असे मानून गालातल्या गालात कसनुसे हसत, पण वडील हेडमास्तरांना जे सांगत त्यात काडीचीही अतिशयोक्ती नव्हती. मी अगदी तसाच होतो आणि या दुर्गुणांबद्दल मी मार खाल्ला नसेल असा एक दिवस कधी गेला नाही. एकुलता एक मुलगा म्हणून अशा बाबतीत माझे कधी लाड झाले नाही, की कधी गय केली गेली नाही.

याच संदर्भात एक दिवस चांगलाच स्मरतो. सकाळी दहाच्या सुमाराला वडील शाळेत आले. बाहेर खिडकीजवळ व्हरांड्यात ते दिसताच शिक्षकांनी मला बाहेर जायला सांगितले. वडिलांनी मला हाताने धरून खाली बसवले. धोतराच्या सोग्यात लपवलेली चहाची लोटी, बशी खाली ठेवली. बशीत थोडा चहा ओतीत म्हणाले, 'चल, घेऊन टाक चटकन. निवून गेलाय केव्हाचा...' चहाचे मला अपरूप होते. पण माझ्या गळ्यात उमाळा दाटून आला. आदल्याच रात्री परवचा न घेता झोपल्याबद्दल वडिलांनी मला हंटरखाली बडवले होते. सकाळी मी दूध न घेता तसाच शाळेत आलो होतो. हाताशी जागल्या होता, ऑर्डली होता. पण वडील स्वत: चहा घेऊन आले होते आणि मग मला रडे अगदी अनावर झाले.

शनिवारी शाळेतून आल्या आल्या स्लेट पाटीला तेल चोपडून ठेवायच्या कार्यक्रमाला मी लागायचो...सकाळी मग कोळशाने

पाटी लख्ख घासून पुसून धुवायचो. नवी शाई करून दौती भरणे, बोरूच्या लेखण्या तासणे, वह्या-पुस्तकांची फाटकी कव्हर्स बदलणे यात आणि खेळण्यात रविवार कधी जायचा ते कळायचे नाही. मग अपरात्री कधी अडीचतीनलाच जाग यायची आणि पोटात गोळा उठायचा- घरी करून आणायला सांगितलेला अभ्यास पुरा झालेला नाही या भयाने! मग मी आईला हलवून जागे करी, तिला अभ्यास लिहायला बसवी आणि पुन्हा सुखाने डाराडूर झोपी जाई...

अभ्यासाविषयी वडिलांच्या काही ठाम कल्पना असत. पहाटे केलेला अभ्यास पक्का स्मरणात राहतो, असे त्यांना वाटे. पहाटे चारला ते ट्रेझरी चेक करायला जाण्यासाठी घरातून बाहेर पडत. पण जाण्यापूर्वी माझे बखोट धरून ते मला कंदिलासमोर आणून बसवत. 'डोळ्याला पाणी लाव. आत्ता उडेल झोप!' म्हणत. मग मांडी मोडून पुस्ती काढायला बसवत. थोडी पुस्ती काढून झाली की मी पुन्हा डोक्यावर पांघरूण घेऊन गुडुप झोपी जाई. नाहीतर शालापत्रक, आनंद, खेळगडी, बालबोध-मेवा यातले एखादे मासिक किंवा नवनाथ भक्तिकथासार, अद्‌भुतकथा भाग १-२, पावटच्याचा वेल आणि राक्षस अशातले एखादे पुस्तक वाचीत पडे. अभ्यासापेक्षा हे वाचनच मला आज अधिक स्मरते. ते कदाचित पहाटेच्या प्रहरी झाल्यामुळेच असावे.

या आमच्या शाळेतही अधून मधून आनंदाचे, उल्हासाचे क्षण उमलत. कधी एखाद्या काळोख्यारात्री कर्णिक दिपोटी शाळेच्या आवारात 'मॅजिक लॅन्टन'चा खेळ दाखवीत आणि आम्ही मुले तो पाहून कौतुकमिश्रित प्रगाढ कुतूहलाने भारावून जात असू.

कधी मलखांबावरील कसरत आणि शक्तीचे अचाट प्रयोग करून दाखवणारी गोपालमंडळी शाळेत येत. अशा प्रसंगी मास्तर आम्हांला पैसा पैसा वर्गणी घेण्यासाठी घरी पिटाळीत. शाळेला सुट्टी होई. महिनाभर तरी हे गोपाळ पहिलवान आमच्या गप्पांना पुरत. त्यांच्या शक्ती-सामर्थ्याने आम्ही भारावून गेलेले असायचो.

एकच प्रश्न अशावेळी आम्हांला सतत सतावीत असायचा, की समजा उद्या यापैकी एखाद्या पैलवानाची गामाशी किंवा गुंगाशी कुस्ती झाली तर कोण कोणाला पाडील ? क्षणभराने आमचे मन आम्हांला ग्वाही देई– यातला कोणीही एका फुंकरीसरशी त्या गामा-गुंगाला उडवून लावील. इथे कोणी लेकाने त्या गामा-गुंगाला पाहिले होते ? झालेच तर हे शक्तीचं खेळ पाहिल्यापासून काही दिवस तरी आम्ही मुले सूर्यनमस्कार अन् जोर-बैठकांचा व्यायाम नियमित करीत असू !

असेच शाळेने गोळा केलेल्या पैसापैसा वर्गणीतून मी ग्रामोफोनवर हा: हा: हा: करून हसणाऱ्या साहेबी आवाजाची आणि 'राधे कृष्ण बोल मुखसे तेरे क्या लगेगा मोल' या गाण्याची बांगडी ऐकली. टी. व्ही. कार्यक्रमासाठी पहिल्या दिवशी गर्दी करणाऱ्या आजच्या मुलांत आणि आमच्या तेव्हाच्या उत्साहमिश्रित कुतूहलात काडीचाही फरक नव्हता !

ग्रामोफोनप्रमाणेच हार्मोनियमचाही एक कार्यक्रम शाळेत झाल्याचे स्मरते. अफळे नावाच्या आमच्या एका शिक्षकाचे कोणी नातेवाईक ही 'बाजाची पेटी' वाजवीत होते. त्यांच्या वादनकौशल्याविषयी सुरुवातीला हेडमास्तरांनी सांगितले की, 'तुम्ही तोंडातून काढाल ते शब्द हे आपल्या बोटातून पेटीवर काढतील...' या घोषणेसरशी, मी 'वनी खेळती बाळ ते बल्लवांचे तुरे खोवती मस्तकी पल्लवांचे' ही ओळ ओठांतल्या ओठांत गुणगुणू लागलो. पण पाहातो तर पुढच्याच रांगेत कोणी तरी 'शंख...शंख...शंख' असे जोराने म्हणत होते आणि पेटीतूनही तेच शब्द उमटत होते (ते मला उद्देशून नक्कीच नव्हे !)

लोकल बोर्डाच्या प्राथमिक शाळांची वार्षिक संमेलने ही शिक्षक आणि मुले यांच्या उत्साहाला उधाण आणायला कारणीभूत होत. या संमेलनासाठी खेळ, प्रहसने आणि हस्तकलाकौशल्याचे प्रदर्शन इत्यादीसाठी दोन दोन महिने तयारी चालायची. असेच

एक संमेलन मला आठवते. त्यावेळी मी अकोल्याच्या शाळेत होतो. (संगमनेर जवळचे अकोला) विठ्ठलराव घाटे नगरचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर होते. तेच अध्यक्ष होते. (माझ्या वडिलांनी दत्त कवींच्या या मुलास लहानपणी नगरला अंगाखांद्यावर खेळवले होते. त्यामुळे वडिलांना त्यांच्याविषयी काही एका अधिकारपरत्वे खूप प्रेम वाटायचे.)

संमेलनाला सुरुवात स्वागतपर गीताने झाली. ते गाणाऱ्या (जरीच्या टोप्या घातलेल्या) तीन मुलांत मधला बटू मी होतो. देव नावाचे आमचे ए शिक्षक (आजच्या संगीताच्या परिभाषेत सांगायचे तर) आमचे संगीत दिग्दर्शक होते. राष्ट्रगीताची चालही त्यांनीच लावली होती. ते गाणाऱ्यांतही मी एक होतो. राष्ट्रगीत झाल्यावर विठ्ठलराव घाटे म्हणाले, 'थांबा. कोणी शिकवलं राष्ट्रगीत असं गायला तुम्हांला ? मी म्हणतो तसं माझ्या मागून म्हणा.' विठ्ठलराव घाटे गळ्यावर चाल सांगत होते आणि आम्ही मुले एकदिलाने राष्ट्रगीत आळवत होतो. तो प्रसंग मी कालत्रयी विसरणार नाही. (याच संमेलनाच्या उत्तररात्री अकोल्याच्या नगारखान्यात अपघाताने विठ्ठलराव घाटचांची कोरी करकरीत टुरिंगकार जळाली)

श्रीगोंदचाहून शेवगाव, शेवगावहून अकोला, अकोल्याहून पुन्हा शेवगाव हायस्कूलसाठी पुणे, पुण्याहून अहमदनगर, पुन्हा पुणे अशा आईवडिलांच्या जिथे बदल्या होत तशा मी शाळा बदलत होतो. प्रत्येक शाळेने मला कशाचे ना कशाचे प्रेम दिले, वेड लावले. साहित्य हे माझे पहिले प्रेम, पण त्या जोडीने मला एकाच वेळी संगीत, चित्रकला, फोटोग्राफी आणि नाटचाभिनय यांतही सारखाच रस वाटायला लागला.

शेवगावच्या शाळेत धुळवडीच्या दिवशी झालेल्या विविध कार्यक्रमांत मी अंगाभोवती कांबळे लपेटून अस्वलाची नक्कल केल्याचे स्मरते.

मला विनोदाचा पहिला साक्षात्कार कधी झाला ? 'शालापत्रकात' एक चुटका आला होता.

ताई : दादा, काडचाची पेटी कुठे आहे ?

दादा : हात् ग वेडे, दिवा लाव म्हणजे सापडेल.

तो मला फार गमतीचा वाटला व तेव्हापासून अशा चुटक्यांच्या शोधात मी राहू लागलो.

बालकवींचे आणि माझ्याही वडिलांचे स्नेही– आमच्या नगरच्या सोसायटी हायस्कूलचे चित्रकला-शिक्षक श्री. शंकरराव पारनाईक मला स्मरतात ते त्यांच्या आजही खुदकन हसू आणणाऱ्या एका विनोदामुळे. त्यावर्षी मी इंटरमीजिएट ड्रॉइंगच्या परीक्षेस बसलो होतो. पारनाईकसर परीक्षा चालू असताना हॉलमध्ये आले आणि म्हणाले, 'पोरांनो, सरळ कॉपी करा. खुशाल एकमेकांचं पाहून काढा. कॉपी केल्याबद्दल मी तुमच्यावर मुळीच रागावणार नाही.' याच सोसायटी हायस्कूलमध्ये 'प्रतिभा' नावाचे एक हस्तलिखित मासिक मी संपादन करीत असे. (अखिल महाराष्ट्रातील हस्तलिखित मासिकात त्याला पहिले पारितोषिक मिळाले होते.) त्यात 'अमृतमंथन' चित्रपटातल्या शांता आपटे यांच्या एका सिलहूटची मी कॉपीबरहुकूम कॉपी रेखाटली व खाली लिहिले, 'कॉपी राइट.' ते वाचले आणि पारनाईकसर म्हणाले, 'गाढवा, 'कॉपी राइट' चा अर्थ कळतो का ? त्याचा अर्थ हुबेहूब नक्कल नव्हे. सर्व हक्क स्वाधीन असा आहे, समजलास ?' 'सर्व हक्क स्वाधीन' म्हणजे नक्की काय हे त्यावेळी मला समजणे शक्यच नव्हते.

याच शाळेच्या श्री. एन. आर. देशपांडे या राष्ट्रीय वृत्तीच्या (साने गुरूजी त्यांच्याचकडे उतरत) साहित्यप्रेमी सुसंस्कृत शिक्षकांनी माझे साहित्यप्रेम आणि इंग्रजी-मराठी लेखनवक्तृत्व जोपासले, फुलवले.

बाहेरचा विद्यार्थी म्हणून शिकत असता पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलमधल्या (सुरुवातीच्या मेहुणपुऱ्यातल्या) मुक्तद्वार ग्रंथालयाने माझी वाचनाची भूक मनसोक्त भागवली आणि न्यू इंग्लिश स्कूलच्या नानावाड्याने माझे वक्तृत्व आणि अभिनयगुण जोपासले. ('आग्र्याहून सुटका'मधले माझे उमरखानचे काम पाहून स्व. आबासाहेब मुजुमदारांनी मला सुवर्णपदक बहाल केले होते!)

माझे एक मामा आणि बालवीर चळवळीला उभी हयात वाहिलेले श्री. धोंडो सीताराम भागवत हे त्या काळात प्रि. पी. के. अत्रे यांच्या कँप एज्युकेशन सोसायटीच्या 'राजा धनराज गिरजी हायस्कूल'मध्ये मोठे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते मी जरी मेहुणपुऱ्यातल्या मॉडर्न हायस्कूलमध्ये 'एक्स स्टूडंट' म्हणून दाखल झालो होतो तरी (कदाचित मला बरे वळण लागावे म्हणून) त्यांनी आपल्या शाळेच्या बालवीर पथकात (थर्टिथ माउंट एव्हरेस्ट) मला 'कोमलपद बालवीर' म्हणू चांगलेच अडकवून टाकले.

दर बुधवारी आणि शनिवारी सायंकाळी तो स्काउटचा गणवेश वगैरे चढवून मी दारूवाल्याच्या पुलावरच्या शाळेत जायचा. अशाच एका खेपेला शाळेच्या आवारात भव्य शामियाना उभारलेला पाहिला शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची सर्वत्र धामधूम चालू होती. मुख्य पाहुणे म्हणून तेव्हाच्या मुंबई इलाख्याचे गव्हर्नर नेकनामदार लॉर्ड ब्रेबर्न येणार होते. मंडपाच्या व्यासपीठावर प्रि. पी. के. अत्रे, बी. ए., बी टी., टी. डी. (लंडन) खाकी हाफ पँट, पांढरा हाफ शर्ट आणि उदी रंगाची फेल्ट हॅट अशा वेषात पुढचात बाजाची पेटी ओढून मुलांना स्वागतपर गीताची पहाडी आवाजात संथा देत होते. (त्याची चाल 'अयोध्येचा राजा' या बोलपटातल्या एका गीताशी जुळती मिळती होती हेही पक्के स्मरते.) त्यानंतर त्यांनी आणखी एक कविता म्हटली. त्यातल्या सुरुवातीच्या दोन ओळी आजही माझ्या अंतर्यामी कालपरवा ऐकल्यागत रेंगाळत आहेत. कधी कधी

बंदिस्त स्नानगृहात असलो की त्या हलकेच ओठांवर उतरतातही. स्वत:ला नकळत मी गुणगुणत असतो...

ही आवडते मज मनापासुनी शाळा,
लाविते लळा अन् जशी माऊली बाळा...

मूलत: कुठलातरी आदर्श प्रमाण मानून वडीलधारी मंडळी तुमच्या आमच्यासाठी जीवनाचा अंगरखा बेतत असतात. अखेर ज्याची जशी माती असेल तसा तो आकाराला येतो... नाहीतरी शाळा वगैरे त्यासाठीच असतात ना ? आता फक्त त्यांच्या आठवणी. काही कडू– काही गोड !

• • •

वर्ष अखेर

तुम्ही ते डमरूच्या आकाराचं काचेचं वेळादर्शक यंत्र कधी पाह्यलत ? ते हो, ते आपलं वाळूचं घडयाळ ? त्यातली ती बुक्क्यासारखी मऊशार रेती कशी झरत असते खालच्या पात्रात भुरूभुरू, कणाकणानं–अगदी तस्सं पळापळानं उरलेले हे क्षण आपल्या हाताच्या ओंजळीतून निसटून कालपात्रात गडप होतील. घडयाळात काट्यावर काटा चढेल. मध्यरात्रीचे बारा वाजतील. (तसा कदाचित काळजाचा एक ठोकाही चुकेल) आणि मग एकच ध्वनीकल्लोळ ! जहाजं, बोटी, आगगाडया, मोटरी जिथं असतील तिथं थवकतील. शिट्टया, भोंगे वाजू लागतील. जहाजांचे, बोटींचे मोटारींचे, गिरण्या-कारखान्यांचे हवेत फुगे उडविले जातील. चर्चच्या घंटा घणघणू लागतील. क्षण साधून दिवे पटकन् मालवले जातील. वाद्यवृंद थांबेल. बेभानपणे नाचणारी जोडपी पळभर अडखळून तिथल्या तिथंच थवकतील. सावध बेसावधपणे कवेतील किंवा मिसलटोच्या फांदीखाली उभ्या असलेल्या युवतीच्या ओठांवर त्या ईषत् अंधारात ईषतकाल ओठ टेकविले जातील. हा जुन्या वर्षाला निरोप आहे; हे नव्या वर्षाचे स्वागत आहे. साल अखेर झाली आहे. एक वर्ष कालोदरात घरगळत गेले आहे... नवे वर्ष क्षितिजावर उदित होत आहे. कडू विसरण्यासाठी नव्याचं उभारीनं स्वागत करण्यासाठी हे संजीवक अधरामृत हवेच. साहेब सुख काय आणि दुःख काय सारख्याच सोहळ्यानं साजरं करण्यात तरबेज... जग लहान झालं आहे आणि उणीपुरी दीडशे वर्षे त्यानं दिलेले हे रीतीभातीचे वळसे नुसत्या हिंदुत्वाच्या अभिमानापोटी झटकून टाकता येणंही जरा कठीणच. तसं आम्हीही चैत्री पाडव्याला शालू पैठणीनं

आणि-साखरेच्या गाठी पदकांनी सजविलेली गुढी घरावर उभारतोच. दाराला तोरण लावतो. कडूनिंबाची पानं खातो... पुरणपोळी... श्रीखंडानं सण साजरा करतो... पण त्यात जुन्याला निरोप देण्याचा आणि नव्याच्या स्वागताला कुठे रतीमात्र जल्लोप नाही. म्हणून साहेवाच्या रीतीभातीचं मनात रेंगाळत राहिलेलं एवढं हे अपरूप !

ते एक सोडा, पण वर्षा अखेरीचा हा संधिकाळ नाही म्हटलं तरी मन थोडं अंतर्मुख करून स्वतःच स्वतःला केल्या गेल्या गोष्टींचा झाडा देऊन ताळेबंद पुरा करायचा... 'श्री शिल्लक पेस्तर रोजा कारणे...' किती याचा मागोवा घ्यायचा तर खराच. पण हा मागोवा घेणार कसा ? साम्यवाद्यांना अभिप्रेत असलेली 'सेल्फ इंपिचमेंट' मला जमणार कशी ? पापाचा पाढा वाचण्यासाठी कुठल्या झरोक्यासमोर मी गुढघे टेकवायचे आणि कमावलेल्या यशाचे ढोल नगारे कोणाच्या पुढ्यात पिटायचे ?

मी सालोसाल अनेक वेळापत्रकं आखली असतील, अनेक निश्चय केले असतील. संकल्प सोडले असतील. अगदी भल्या पहाटे उठून फिरायला जायचा, सूर्योदयापूर्वी थंडगार पाण्यानं स्नान करण्याचा, योगासनं करण्याचा, पाइप ओढणं बंद करण्याचा, भारतभर भ्रमंती करण्याचा, किमान वर्षाकाठी महिनापंधरा दिवस कुठे निवांतपणे घालवण्याचा...रोज नियमानं चार पानं लेखन करण्याचा. पण अनेक जबरदस्त आचार्य आणि गुरुजींच्या सानिध्यात आयुष्याची संस्कारक्षम वयाची वर्ष घालवूनही कधी एकदाही दैनंदिनी वगैरे लिहिण्याचं माझ्या मनात चुकून सुद्धा आलं नाही. अगदी नव्या वर्षाचा एक संकल्प म्हणूनही आलं नाही. मराठी साहित्यावर माझ्या हातून जाणीवपूर्वक झालेल्या या उपकाराची खरं म्हणजे कोणी तरी नोंद घेण्याची वेळ आली आहे आता.

जीवन जगणं हे जीवनाविषयी लिहिण्याहून नेहमीच मोलाचं आणि महत्त्वाचं वाटत आलं आहे. दैनंदिनी लिहिणं म्हणजे

आखत्याप्रमाणं आपलं जगणं होतंय की नाही याचा शोध घेणं. दैनंदिनीत माणूस जीवनाला करकचून बांधून टाकतो...आणि त्यामुळे जीवन जगणं मात्र एका बाजूला पडल्यासारखं होतं–ही भावना मन पार संत्रस्त करून सोडणारी आहे. खरं सांगू का, रेशमाच्या किड्यानं स्वतःभोवती कोश निर्माण करीत करीत त्यात घुसमटून मरावं तसला हा सारा प्रकार मला वाटतो. दैनंदिनी लिहिणं हा अनेकांच्या लेखी एक महान संकल्प असतो. माझ्या खाती या वर्षाअखेर त्या बाबतीत जमा शून्य म्हणून त्या संबंधीच्या संभाव्य 'ऑडिट' ला माझं हे 'एक्स्प्लनेशन'!

तर ते एक असो. वर्ष–जुनं वर्ष आपल्या सुखदुःखाचं गाठोडं पाठंगुळीला घेऊन काळाच्या पडद्याआड जातं आणि क्षितिजाच्या मंचावर नवीन वर्ष उदित होतं ते अनेक आशाआकांक्षांची मन उल्हसित करणारी कोवळीक दशदिशांत उधळीतच. थोर व्यंगचित्रकार डेव्हिड लो आज आपल्यात नाहीत. पण त्यांनी म्हणा किंवा त्यांच्या परंपरेतल्या कोणी व्यंगचित्रकारानं रेखलेलं ते जुन्या नव्या वर्षांच्या संदर्भातलं अर्थपूर्ण चित्र आजही माझ्या मनात त्याच ताजेपणानं कसं स्वच्छ उभं आहे. खांद्यावर कुळव किंवा औतासारख अवजार घेतलेलं, पाठीला पोक आलेलं जरा-जर्जर जुनं वर्ष जड पावलानं काळाच्या मंचावरून निघून जात आहे आणि बाळसेदार बाळाच्या रूपानं हास्य उधळीत नवं वर्ष दुडूदुडू धावत येत आहे. या बाळाकडे बघतो आणि आयुष्यात आजवर व्यथावेदना देऊन गेलेल्या अनेक वर्षांची अखेर उमदेपणानं विसरण्याचा मी प्रयत्न करतो.

गॉर्की, टॉलस्टॉय, पिरॅन्देल्लो वगैरेंचं साहित्य मनाची माती मळत होतं. मनाची तडफड तगमग वाढत होती-तिन्हाइतासारखं वागून चालणार नाही. ह्या देशाच्या भल्यासाठी आपण सर्वस्वासह स्वतःला झोकून दिलं पाहिजे ही भावना शिगेला पोहोचली आणि बेचाळीसमध्ये मी मुंबईच्या कामगार चळवळीत शरीक झालो. अनेक उत्पात घडत होते. जीवनाचं उघडंनागडं स्वरूप मन संत्रस्त

करीत होतं. अनेक भ्रमनिरास पायातली शक्ती पांगळी करून टाकीत होते. माझा सर्व वेळ मुक्काम त्यावेळी कामगार मैदानालगतच्या कोपऱ्यावरच्या इमारतीत राहणाऱ्या एका पुढाऱ्याच्या घरात असायचा. रात्री वस्तीला खोदादाद सर्कलजवळच्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात आसरा घ्यायचो. आणि अशातच माझ्या परोक्ष पोलिसांनी कामगार मैदानाजवळच्या पुढाऱ्याच्या घरातल्या माझ्या बॅगा-ट्रंकांची उसकपासक केली. मी त्यांना हवा होतो. त्यांना हवा असलेला बंगाली युवक नेता तो मीच असा कोणी तरी त्यांचा ग्रह करून दिला होता. इट वॉज अ केस ऑफ मिस्टेकन आयडेंटिटी...सत्य सांगून कदाचित त्यातून मला मोकळे होताही आले असते. पण त्यातून नवी गुंतागुंत निर्माण होण्याचे नवे लचांड पाठीशी उभे राहण्याचे भय होते. मी ताबडतोब भूमिगत व्हायला हवे असा आग्रही सल्ला मिळाला. पण कसे ? कुठे ? काही उमगेनासे झाले. अंगावरच्या कपड्यांव्यतिरिक्त जवळ दुसरे कपडे नाहीत. खिशात चार-सहा आण्यांपलीकडे द्रव्य नाही... माझे एक वकील-मित्र आणि एक चित्रकार-मित्र अध्यात्माचा मार्ग त्याकाळात चाचपडू पाहत होते. वज्रेश्वरीच्या नित्यानंद स्वामींकडे त्यांचे नित्याचे जाणे-येणे होते.

'काही काळजी करू नकोस. हे वादळ शांत होईपर्यंत बाबांच्या आश्रमात आम्ही तुला सुरक्षित लपवतो' असा दिलासा त्यांनी मला दिला. माझे संपूर्ण क्षौर त्यांनी करविले. कफनीबिफनी सारखी वस्त्रं माझ्यावर चढवून त्यांनी माझे वेषांतर घडविले... आणि आम्ही तिघे अंधार पडताच विरार लोकलमध्ये घुसलो. वज्रेश्वरीला आलो आणि गणेशपुरीची वाटचाल करता करता प्रहर रात्र उलटली. दोन दिवसांच्या धावपळीत पोटात अन्नाचा कण गेला नव्हता. पोटात आगीचा डोंब उसळला होता आणि डिसेंबरातील उघड्या रानातली कडाक्याची थंडी अंगाला झोंबून हाडं फोडीत होती. आश्रमात पोहोचलो त्यावेळी सर्वत्र सामसूम होती. कुंडासमोरच्या धर्मशाळेत काळोख होता. चित्रकार-मित्र

म्हणाला, 'चिंता नको. आता रात्रीची इथंच हाडं टाकू, सकाळी बाबांचं दर्शन घेऊ... ते यातून मार्ग दाखवतील.' या प्रस्तावाला हुं म्हणण्यापलीकडे माझ्या हातात काय होतं ? आम्ही तिघेही तसेच आडवे झालो. अंगाखालची जमीन खडबडीत. ना अंथरूण ना पांघरूण. थंडी झोंबत होती आणि वसई वज्रेश्वरीकडचे ते कुप्रसिद्ध डास... ते नुसते गुणगुणत नव्हते तर अल्सेशियन कुत्र्यासारखे भुंकत अंगावर झुंडीझुंडीने धावत येत होते. निर्दयपणे उघड्या अंगाचे लचके तोडीत होते. मला पक्के आठवते. ती ३१ डिसेंबरची रात्र होती. आयुष्यातल्या एका वर्षाची अखेर अशी होत होती आणि नवे वर्ष कोणत्या अवतारात समोर उभे ठाकणार आहे याची पुसटशी सुद्धा चाहूल लागत नव्हती. पण आता वाटतं की माझ्या साहित्यिक मनाच्या वही-खात्यात जमेच्या बाजूला त्याक्षणी एक पृथ्वीमोलाचा अनुभव लिहिला जात होता. त्यासाठी सैबेरियात जायची गरज मला उरली नव्हती.

तीन दशकांमागे अशीच एक वर्षअखेर मनावर खोल ओरखडा उमटवून गेली आहे. माझे एक उत्तर भारतीय स्नेही गाण्याचे विशेष शौकीन होते. विशेषतः कोठीवरच्या गाण्या-बजावण्याचे. ठुमरी, गझल, दादरा गायकीचे. ते सदैव वासावरच असायचे कुठे काय चांगले ऐकायला मिळेल याच्या. तेवढ्यात त्यांना पत्ता लागला की फ्रेंच ब्रीजलगतच्या वाडीतल्या एका कोठीवर कोणी बाईजी आली आहे... ठुमरी फार बेहतरीन गाते म्हणे ! अशी संधी ते सोडताहेत होय. वर्षअखेर या गाण्यानं साजरी करायचा बूट काढला आणि माझं बखोटं धरून ते मला या गाण्याला घेऊन गेले. मलाही हे जग जवळून पाहयची, जाणून घ्यायची उत्सुकता होती. सारे सोपस्कार होऊन आम्ही मैफिलीत शरीक झालो. गाण्याबरोबर आम्ही असे काही रंगत गेलो की काळ-वेळेचं सारं भान जवळ जवळ हरवून बसल्यासारखे झालो. भानावर आलो ते बाईजींच्या 'अंधेरी हो या रात सजन रहियो की जईयो'नेच. आता घरी परतायचे वेध लागले होते. हलकेच सटकलो मैफिलीतनं

आणि खाली रस्त्यावर आलो. अर्धी रात्र केव्हाच उलटली होती. एक विचित्र स्तब्धता मन कासावीस करीत होती. मुंबईच्या हवेची बदनामी करीत थंडी निर्लज्जपणे आमच्या अंगाशी झटचा घेत होती. माझे स्नेही सांताक्रूझला राहत होते. मला वाटेत दादरला उतरायचं होतं. हमरस्त्यावर आलो. इथून तिथवर सर्वत्र शुकशुकाट. टॅक्सी नाही... व्हिक्टोरिया नाही... काही नाही. एक आशा होती, कदाचित लोकल मिळेल. मग तसेच झपाझप पावलं उचलत, नाना चौक ओलांडून ग्रँटरोड स्टेशनवर आलो. आणि पाहता पाहता बोट समुद्राच्या तळाशी जावी तशी चर्चगेटहून आलेली शेवटची गाडी आम्हांला वाकुल्या दाखवत सरपटत बॉम्बे सेंट्रलच्या दिशेने फुसांडत निघून गेली.

पहाटेपर्यंत दुसरी गाडी नव्हती. पोर्टर्सनी खाड खाड स्टेशनातले दिवे मालवायला सुरुवात केली. धाडधाड लोखंडी सरक दरवाजे लावून घ्यायला सुरुवात झाली. चुकार प्रवाशांना सक्तीनं बाहेर हुसकावणं सुरू झालं. अशा अपरात्री आम्ही काय करणार होतो ? कुठं जाणार होतो ? माझे स्नेही राजपत्रित अधिकारी होते. त्यांनी रात्रपाळीच्या स्टेशन मास्तरला आपलं ओळखपत्र दाखवलं, अडचण सांगितली आणि पहिली गाडी येईपर्यंत स्टेशनच्या बाकावरच बसून राहू द्यावं म्हणून गळ घातली. तो आमच्या भल्यासाठी पुन्हा पुन्हा आम्हांला सांगत होता, इथं राहू नका, इथं चोऱ्या होतात रात्रीच्या. हे बंद स्टेशन आहे. कोणाला राहू देणं माझ्या अधिकाराबाहेरचं आहे. पण अखेर त्याला आमची दया आली. त्यानं स्टेशनवर राहयला परवानगी दिली इतकेच नव्हे तर उशाला घ्यायला होतील म्हणून दोन लठ्ठ लॉग बुकं आतून आणून दिली. आम्ही दोघेही थकलो होतो. ढेकूण चावत होते. थंडी झोंबत होती. बाकावरचे आमचे पसरणेही अवघडल्यागतच झाले होते. आणि दशदिशांतून एक अनामिक भयाणता घोंगावत आमच्या अंगावर येत होती. जरा कुठे झुटका लागत चालला होता तोच रडण्या-गागण्याचा, शिव्या

दिल्याचा, मारपीट होत असल्याचा एक प्रचंड कालवा कानावर आदळला तसे आम्ही ताडकन बाकावर सावरून बसलो. प्लॅटफॉर्मच्या एका कडेला पाचपंचवीस जणांना एका रांगेत उभं केलं होतं. त्यांची हजेरी घेतली जात होती. त्यांच्यावर शिव्यांचा, लाथा-बुक्क्यांचा वर्षाव होत होता. ते सारे भिकारी, लफंगे, बेवारशी होते. फूटपाथवर, पुलाच्या वळचणीला, मुतारीच्या आडोशाला रात्रीचा आसरा घेऊन राहिलेले. पोलिसांनी त्यांना धरून पकडून तिथं आणलं होतं. कोणातरी संशयिताच्या शोधात ते होते. आणि पुढे मला कळलं की दररोज उत्तर रात्री हा जरब बसवण्याचा संशयित गुन्हेगार शोधण्याचा कार्यक्रम इथं होत असतो. बाईजीच्या गाण्याची आमच्या मनावरची धुंदी केव्हाच खाडकन उतरली होती. 'ला मिझराव्ल' मध्ये वर्णिलेल्या जगाचे दर्शन साक्षात् घडत होते. तोंडाची चव घालवणारी, मनावर ओरखडे ओढून ठेवणारी आणि जगाकडे डोळसपणे पाहण्याचे भान आणून देणारी माझ्या आयुष्यातली ही एक अविस्मरणीय वर्ष अखेर होती.

वाळू झरत आहे पात्र भरत आहे. कडूगोड आठवणींनी भरलेले हे वर्ष काही तासांतच कालोदरात गडप होणार आहे. नेमक्या त्याक्षणी भोंगे वाजतील, प्रार्थना मंदिराच्या घंटा घणघणू लागतील. नृत्याच्या दालनात ईषत्काल अंधार होईल. ईषत्काल ओठांवर ओठ टेकविले जातील. सोनपावलानं येणाऱ्या नव्या वर्षाचे उजळत्या प्रकाशात उभारीने स्वागत होईल.

(दिनांक ३१ डिसेंबर १९७४ रोजी आकाशवाणी मुंबई वरून ध्वनिक्षेपित झालेले भाषण. 'आकाशवाणी' च्या सौजन्याने)

•••

श्रद्धेच्या संदर्भात थोडंसं....

एक चिंतन

आमचं घराणं वेदशास्त्रसंपन्नांचं होतं की नाही, काही कल्पना नाही; परंतु ते हव्यकव्य आणि कर्मकांड जाणणाऱ्या व्युत्पन्न भिक्षुकांचं होतं हे मात्र खरं ! ही उपाध्याय परंपरा माझ्या वडिलांपाशीच खंडित झाली. मला त्याचं यत्किंचितही दुःख नाही. वडिलांनी मात्र ते अखेरच्या श्वासापर्यंत जोपासलं असलं पाहिजे असा मला दाट संशय आहे. त्याला कारण आहे. काळं-सावळं असलं, तरी डोळ्यात चटकन ठसावं, असं मजबूत हाडापेरांचं नीटस व्यक्तिमत्त्व वडिलांना लाभलं होतं. बुद्धी तर उत्तमच होती. यजमान मंडळी जाणत्या उपाध्यायांची कशी उठबस करतात, किती मानानं, प्रतिष्ठेनं वागवतात; आणि घरी धनधान्य संपत्तीचा ओघ कसा चालू होतो, हे ते लहानपणापासूनच चुलत्याच्या संगतीत पाहत आले होते. त्यांना हा भिक्षुकीचाच वसा पुढं चालवायचा होता. पण तान्हेपणातच पोरके झालेल्या वडिलांना चुलतीच्या मत्सरग्रस्त दुस्वासास वैतागून अवेळी घर सोडावं लागलं. स्कूल फायनलमध्ये उत्तम यश मिळविलेल्या या मुलानं रागारागानं सरळ पोलिसात नोकरी धरली. पुढे लग्नानंतर स्वतःच्या बायकोला ती शिकेल तेवढं शिकू देण्याचं औदार्य जरी त्यांनी दाखवलं तरी आपण पोलिसात नोकरी पत्करली हे काही तरी महापाप केलं याची खंत त्यांना कधी सोडून गेलीच नाही. त्या पापाच्या परिमार्जनार्थ त्यांचे उपास-तापास, कुळधर्म-कुळाचार आणि देवदेव गुणितश्रेणीनं वाढतच राहिले, मुंजीनंतर माझ्या बोकांडी बसले.

बरं झालं, मी देवापासून जरा दूर गेलो... श्रद्धेचा अन्वय अर्थ आतल्या आत शोधत राहिलो.

वडिलांना अधून मधून अचानक फिरतीवर जावं लागे; तसं झालं की देवपूजेचं कंत्राट माझ्या गळ्यात पडे. शाळा सकाळची असायची, भुकेजून घरी यावं, तर आई आधीच शाळेत निघून गेलेली. तिची शाळा अकरा ते पाच. जाण्यापूर्वी बहुदा माझ्यासाठी चिठ्ठी लिहून ठेवलेली असायची. स्वच्छ हातपाय धुवून व्यवस्थित देवाची पूजा कर. देवांना उगीच सुंठ फासू नकोस. गंध नीट उगाळ. वस्त्रगाळ करून मग देवांना लाव. सगळा स्वयंपाक करून ठेवलाय, पूजा झाली की हातानं वाढून घे. व्यवस्थित जेव.

देव्हाऱ्यातले ते तेहतीस कोटी देव, सहाणेवर ते घट्ट गंध उगाळणं. सारी पूजा यथासांग करणं. माझ्या पोटात भीतीचा गोळाच उठायचा. देवपूजेचा तिटकारा वाटायचा. देवांचा राग यायचा. सगळ्यात नको वाटे ते गंध उगाळणं. पण त्यावर मी एक शॉर्टकट शोधून काढला होता. एकदा असाच पूजा आटोपून मी जेवायला बसणार तोच वडील फिरतीवरून आलेले. आम्ही मग बरोबरीनंच चित्रावती घातल्या. जेवता जेवता मी वडिलांना म्हटलं, 'रोज रोज गंध कशाला उगाळायचा. त्यापेक्षा आदल्या दिवशीच्या गंधगोळ्या भिजवून पुन्हा देवाला लावायला काय हरकत आहे ?' वडिलांनी क्षणभर चमकून माझ्याकडं पाह्यलं. मी काय करीत असणार याची त्यांना अटकळ आली असणार. ते तसेच आपोष्णी घेऊन पानावरनं उठले आणि देवपूजेला बसले. त्यादिवशी सारं घरदार उपाशी राहिलं आणि माझा देवावरचा राग आणखीनच वाढला.

याउलट मला माझ्या मुसलमान मित्राकडची पूजा आवडायची. शाळा सुटल्यावर कधीमधी मी त्याच्याबरोबर त्याच्या घरी जायचा. 'पूजा करून घेतो अन् मग बसू गणितं सोडवायला' म्हणायचा. अंगणातच बाजूला चमेलीच्या वेलीखाली एक कबर

होती. हा माझा मित्र मकबूल, हातपाय धुवून कबरीपाशी जायचा, कबरीवरचा हिरवा गलफ काढून झटकून पुन्हा घालायचा, कबरीवर चमेलीचो फुलं वाहयचा, उदी जाळायचा, गुडघ्यांवर बसून, कमरेत मागेपुढे वाकवाकून हात पसरून, तळवे न्याहाळीत काहीतरी पुटपुटायचा. दोन मिनिटात खेळ खतम् ! संपली पठ्ठ्याची पूजा ! मला मकबूलचा खरोखरीच हेवा वाटायचा... माझ्या हातून देवाचं काही होणार नाही हे वडिलांनी वेळीच ओळखलं आणि पुन्हा मला त्याबाबतीत टोकणं त्यांनी केव्हाच सोडून दिलं होतं.

...पण एक दिवस अचानक डॉ. ए. जे क्रोनिनचं– तोच तो 'सिटॅडेल', 'स्टार्स लुक डाऊन', 'माय सन... माय सन' वाला डॉ. क्रोनिन : त्याचं 'Adventures In Two Worlds' हे आत्मचरित्र हाती लागलं आणि त्यातल्या त्याच्या एका अनुभवानं वडिलांची आणि त्यांच्या पूजापाठाच्या कर्मकांडाची तीव्रतेनं आठवण झाली.

दुसरं महायुद्ध नुकतंच संपलं होतं आणि डॉ. क्रोनिन युद्धानं उध्वस्त करून सोडलेला युरोप पायाखाली घालत भटकत होता. एक दिवस त्याचा पडाव इटलीतल्या समुद्रकाठच्या एका मच्छीमारी खेडचात पडला. सारं गाव युद्धानं उध्वस्त करून टाकलं होतं. त्यानं पाहिलं, दुपारच्या वेळी गावातली सारी लहान-मोठी माणसं आणि बाया-बापडया बादल्या, टोपल्या जे काही हाताला लागेल ते घेऊन लगालगा किनाऱ्याकडे जाताहेत आणि तिथून जवळच्या टेकडीची वाट धरताहेत. तो जरा बुचकळचात पडल्यासारखा झाला. हे काय चाललंय हे त्याला उमगेना. क्षणभर त्याच्या मनात आलं; गावकरी बहुतेक चोरटचा मालाच्या ने-आणीत गुंतलेले दिसताहेत ! म्हणून मग तो सहज कुतूहलानं एका म्हातारीच्या मागोमाग चालत राहिला... ती थांबली तिथं तो थांबला. आणि समोर जे काही घडत होतं ते पाहून क्षणमात्र थक्क होऊन गेला. डॉ. क्रोननं लिहिलंय :

'स्वतःच्या डोक्यावर छप्पर उभारायची तरतूद करण्यापूर्वी उभं गाव स्वतःच्या श्रद्धेला आधार, आसरा उभारण्यात गुंतलं होतं. सारे हात प्रार्थनामंदिराच्या उभारणीत गुंतले होते... उगाच एखादं थातुर मातुर चर्च नव्हे, तर पूर्वी होतं तसंच भव्य आणि उत्तुंग चर्च ही मंडळी बांधू पाहत होती !'

देवावरचं निर्माल्य दूर करून ते देव्हाऱ्यातून ताम्हणात ठेवताना, त्यांच्यासाठी सहाणेवर गंध उगाळताना, त्यांना दुधामधानं स्नान घालताना, ते कोरडे करून जागच्याजागी ठेवताना, त्यांना गंध-फुलं वाहताना, त्यांना धूपदीप दाखवताना, त्यांची स्तोत्रं आळवताना माझ्या वडिलांच्या मनात हाच श्रद्धाभाव दाटून येत होता का ? त्या कर्मकांडात चित्त एकाग्र होता होता मनावरचे ताण सैल पडून त्यांच्या चिंतांचा, काळज्या गरजांचा; विवंचनांचा आपोआप निचरा होत होता ? वडिलांना वाटणारी खंत, अपराधी भावना नष्ट होत होती का ? कशासाठी त्यांना ही श्रद्धेची खुंटी हवी ?

कुटुंबात एखादं जीवघेणं आजारीपण वा एखादं अकल्पित संकट ओढवे तेव्हा माझी आई हातातली पाटली बांगडी सारखा दागिना काढून देवघरात भाग बांधून ठेवी. देवाला साकडं घाली. संकट टळल्यावरच तो दागिना पुन्हा तिच्यावर चढे. या आधारासाठी का माझ्या आई-वडिलांना देव हवा होता... श्रद्धा जोपासावीशी वाटत होती ?

मी नास्तिक आहे का ? या प्रश्नाचं उत्तर माझ्याजवळ नाही. नासिकजवळच्या वणीची सप्तशृंग देवी ही आमची कुलदेवता, जेजुरीचा खंडोबा हेही आमचं कुलदैवत. ही दोन्हीही स्थानं उंच गडावर आहेत. तिथं जायला मला मनोमन आवडतं. जे मी नाकारीत आलो ते तिथे जाईजाईपर्यंत अंतर्यामी उचंबळून येत असतं. मी देवीपुढें उभा राहिलो की माझ्या मनात फक्त एकच भाव उरतो. ज्यांचं रक्त आज माझ्या नसानसातून खेळतं आहे

तो माझा आद्य कुलपुरुष या दैवतापुढे असाच विनम्र झाला असेल. त्याला आणि मला श्रद्धेनं जोडणारा हा एक दुवा आहे. त्यानं जे काही मागून घेतलं असेल त्यामुळे तर माझं जीवन आज फुलत नसेल ? त्या कल्पनेसरशी मी क्षणभर रोमांचित होतो. देवधर्म, पूजापाठ, कुळधर्म, कुळाचार या बाबतीत अलिप्त असलेला मी थोडा अंतर्मुख होतो. देवीकडे माझं मागणं फार, नसतं. मला तिनं थोडं धैर्य दिलं; मनःशांती दिली तरी ती पुरेशी असते. आणि तेवढंच मी मागून घेतो.

पण खरं सांगू ? व्यग्र मनःस्थितीत कपाटातली पुस्तकं सहज खालीवर करताना, चाळताना; मन लावून ओढायचे पाइप्स साफ करताना वा आधीच ध्वनिमुद्रित करून ठेवलेलं आवडतं संगीत पुन्हा ऐकतानाही माझ्या चिंतांचा निचरा होत राहतो. मनावरचे ताण सैल होतात, थोडं बळ येतं... शांत वाटतं...

आणि तरीही गडावर देवीच्या दर्शनाला जावंसं वाटतं कुळपुरुषानं घालून दिलेला धडा गिरविण्याच्या ओढीनं !

●●●

बल्झाक : एक जिद्दी रंगदार व्यक्तिमत्त्व

साहित्याच्या जगात बल्झाक हे एक फार थोर रंगदार व्यक्तिमत्त्व होऊन गेलं. जेत्याची मनोवृत्ती त्याला लाभली होती. त्याचा स्वभाव निग्रही होता... पण असं असेल की बाळपणी आई-वडिलांनी वेळोवेळी जे मोडते घातले त्यामुळेच उरी बाळगलेला आत्मविश्वास प्रत्यक्षात कृतीत कसा उतरावावा ह्या बाबतीत तो अनभिज्ञच राहिला. प्रेम आणि प्रतिष्ठा ह्यासाठी तो सदैव आसुसलेला असायचा.

बल्झाक घरी आई-वडिलांकडे राहयला आला. ह्या पोरानं काही चांगला उद्योगधंदा करून निदान स्वतःच्या पोटापुरतं तरी कमवावं अशी त्यांची त्याच्यापासून माफक अपेक्षा होती. बल्झाकच्या शेजारीच मादाम द. बर्नी नावाच्या एक धनाढ्य बाई राहत असत. ही बाई बल्झाकच्या आईच्याच वयाची पंचेचाळीस एक वर्षांची होती. तिला नऊ मुलं होती. नातवंडही तिनं पाहिलं होतं. ह्या बाईकडे बल्झाक दिवसभर पडलेला असायचा. एवढं त्या घरात ह्याचं काय आहे दिवसभर ? असा त्याच्या वडिलांना प्रश्न पडला. त्याच्या आईनं त्यावर म्हटलं, 'अहो, विचार करण्यासारखं ह्यात कठीण काय आहे ? बाईला तरुण देखणी मुलगी आहे. बल्झाक तरुण आहे. नादावला असेल झालं तिच्या सौंदर्यानं...'

वस्तुस्थिती मात्र वेगळीच होती. मादाम-द-बर्नीच्या प्रौढ प्रेमानंच बल्झाकला झपाटलं होतं.

सुरुवातीच्या काळात बल्झाकनं अनेक धंदे केले आणि ते सारे

पालथे ठरले. धंद्याला लागणारं भांडवल ह्याच बाईनं त्याला वेळोवेळी पुरवलं. त्यानं कल्पना केली की मोलिअर वा ला-फौंटेनचं सारं साहित्य विकत घेणं मध्यमवर्गीयाच्या आवाक्याबाहेरचं आहे. आपण ते समस्त साहित्य एक एका खंडात छापलं बारीक टाइप वापरून तर स्वस्तात देता येईल आणि घेणारालाही परवडेल. झालं. त्याप्रमाणे त्याने हे खंड छापून काढले. प्रतीची किंमत वीस फ्रँक ठेवली. पण पुस्तकाचे गठ्ठे बुकसेलर्सच्या दुकानातून हालता हालेनात. बहुजन समाजापर्यंत उत्तम साहित्याचा प्रसार आणि प्रचार व्हावा ह्या भावनेनं प्रसिद्ध केलेल्या ह्या ग्रंथाच्या उभ्या वर्षात फक्त वीस प्रती खपल्या. शेवटी कंटाळून ते गठ्ठे त्यानं जवळ जवळ रद्दीच्या भावानं एका ग्रंथविक्रेत्याला फुंकून टाकले. ग्रंथ प्रकाशनातल्या अपयशानं शहाणं व्हायच्या ऐवजी त्यानं असा विचार केला की स्वतःचा प्रेस हवा. सारा नफा प्रेसवाले खाऊन टाकतात. प्रकाशन महाग पडतं ते त्यांच्या अव्वाच्या सव्वा छपाईच्या दरामुळं. लगेच त्यानं कर्ज उभारून प्रेस काढला आणि त्यातही त्याला खोट बसली. एवढ्यानं तरी शहाणं व्हायचं त्यानं. पण कसचं काय न् कसचं काय ! प्रेसपेक्षा टाइपफाउंड्रीतच जास्त नफा आहे. तेच लोक प्रेसला नाडतात. तेव्हा आपण फाउंड्री काढलेली बरी... असा विचार करून त्यानं टाइपफाउंड्री काढली... आणि हाही धंदा पालथा ठरला.

त्याच्या व्यवहाराची गंमत अशी की खोट आल्यामुळं त्यानं जे जे धंदे दुसऱ्याला कवडीमोलानं विकले त्यात त्या लोकांनी पुढे गडगंज पैसा कमावला आणि बल्झाक मात्र आयुष्यभर कर्जबाजारी राहिला... पुढच्या दारानं टाच घेऊन बेलिफानं प्रवेश करावा आणि ह्यानं मागील दारानं गल्लीबोळात तोंड चुकवीत पसार व्हावं हा त्याच्या जीवनातला एक नित्यक्रम होऊन बसला.

१८३७ मध्ये इटलीत भ्रमंती करीत असताना गीयुसेपे पेझी नावाच्या व्यापाऱ्याशी त्याची काही एका योगायोगानं भेट झाली. त्यानं बल्झाकच्या मनात भरवलं की सार्डिनिआत ज्या चांदीच्या

खाणी आहेत त्या मिळविता आल्या आणि तिथं काम करता आलं तर कुबेराची संपत्ती हाती येईल. दारूच्या कोठारात ठिणगी पडावी तसं ह्या बातमीनं बल्झाकच्या मनाचं झालं. त्याची कल्पनाशक्ती वारेमाप उधळू लागली आणि पुन्हा कर्ज, पुन्हा धडपड हे चक्र सुरू झाले... त्याचा घायकुतेपणा जिथं तिथं त्याच्या अपयशाला कारण झाला आहे. ह्या खाणी फलद्रूप ठराव्यात म्हणून त्यानं वाटेल तसा पैसा ओतला... अहोरात्र कष्ट करून स्वतःची प्रकृती खराब करून घेतली आणि अखेर कंटाळून हा सदाचा दिवाळखोर पॅरिसला परत आला. दैवदुर्विलास असा की ह्या सार्डिनिअन सिल्व्हर माइन्स पुढे ज्यांच्या हाती पडल्या त्यांचं उखळ चांगलंच पांढरं झालं. १८५१ मध्ये ह्या खाणीत ६१६ माणसं कामाला होती आणि पुढे आणखी नऊ वर्षांनी हा आकडा २०३८ च्या घरात गेला. १८७० च्या सुमारास तर कामगारांची संख्या ९,१७१ झाली. 'माईन्स द अर्जेंटिरा' हे ह्या चांदीच्या कंपनीचं नाव. ज्या कोटचवधी फ्रँक्सची दिवास्वप्नं रंगविण्यात बल्झाक मशगुल झाला होता ते कोटचवधी फ्रँक्स ह्या कंपनीच्या तिजोऱ्यांतून बल्झाकला वाकुल्या दाखवत झळाळत राहिले.

बल्झाक 'क्वोटिडिएन' नावाचे एक नियतकालिक संपादित असे. त्याचा खपही चांगलाच होता. त्याच्या साहित्याचा चाहता वाचकवर्ग जिथे जिथे फ्रेंच बोलले, समजले जात असेल तिथे तिथे पसरला होता. एक दिवस बायकी वळणदार अक्षरांत लिहिलेलं एक जाडजूड पत्र त्याच्या टेबलावर पडलेलं त्याला आढळलं. खाली सही होती ती 'अनामिका' किंवा 'अपरिचित' असा अर्थ व्यक्त करणारी. ज्या स्त्रीनं हे पत्र त्याला लिहिलं होतं ती सुसंस्कृत होती, लावण्यमयी होती, श्रीमंत होती. मादाम द हन्स्का हे तिचं नाव. पोलिश खानदानी उमरावी कुटुंबात तिचा जन्म झालेला आणि युक्रेनमधल्या रशियन उमरावाशी तिचा विवाह झालेला. तिथलं वातावरण तिच्या सुसंस्कृत मनाला उबग आणणारं

होतं आणि म्हणूनच तिनं केवळ गमतीनं बल्झाकबरोबर हा 'अनामिक' पत्रव्यवहार सुरू केला. 'क्वोटिडिएन'मधून बल्झाकनं तिच्याच विनंतीवरून पत्राची पोच दिली. ही त्यांची पत्रमैत्री जवळ जवळ दहा वर्षं चालू होती. त्यांच्या उभयतांच्या मनात प्रेमाचा प्रादुर्भाव निर्माण झाला. त्याच्याच एखाद्या कादंबरीत घडावं तसं सारं काही प्रत्यक्षात घडत होतं. पतीच्या निधनानंतर ह्या रशियन कौंटेसनं बल्झाकशी लग्न केलंही... पण अनेक वर्षांच्या पत्रमैत्रीनंतर त्यांची जेव्हा प्रत्यक्ष भेट व्हायची वेळ आली, तेव्हाची गंमत सांगण्यासारखी आहे.

बायकोच्या आग्रहावरून पश्चिम युरोपच्या प्रवासास निघायचं कौंट हन्स्कीनं मुक्रर केलं. मोठचा लव्याजम्यानिशी हा काफिला प्रवासास निघाला. पहिला मुक्काम व्हिएन्नात पडला. उमरावसाहेबांचे बरेच दोस्त तिथे होते... पण वसंतऋतूत न्यू चॅटलला राहयला जायची सूचना मात्र त्याच्या बायकोची. फ्रान्सच्या सीमेवर हे स्थळ होतं आणि खोटं नाव धारण करून बल्झाक तिला तिथं भेटणार होता.

सर्वसामान्य माणसांप्रमाणे त्या काळात उपलब्ध असलेल्या प्रवासी धमण्यांतून प्रवास करण्याऐवजी त्यानं स्वत:साठी स्पेशल बग्गी बांधून घेतली. दिमतीला गणवेषधारी नोकरवर्ग गोळा केला. हचा घोडागाडीलाच पाचहजार फ्रँक खर्च आला... आणि त्याची त्याबाबत कुरकुर इतकीच की एवढा खर्च करून गाडीतनं प्रवास केला पण एकजण गाडीविषयी कौतुकाचा उद्‌गार काढील तर शपथ ! चार दिवसांच्या प्रवासात त्याची हाडं खिळखिळी होऊन निघाली. तो पार थकून गेला. तिथल्या मुक्कामानं जवळचा सारा पैसा संपलेला. परिस्थिती इतकी डबघाईला आलेली की उतरला होता त्या हॉटेलात त्याच्या दिमतीला दिलेल्या हरकाम्या नोकराला बक्षिशी देण्यासाठी अखेर त्या कौंटेसकडून त्याला पैसे उसने घ्यावे लागले.

तो आल्याची वर्दी वाडचात पोचताच ती त्याला बाहेर दिवाणखान्यात भेटायला आली तसा तो घायकुतीला येऊन म्हणाला, 'तुझं घरातलं लाडकं नाव काय... सांग लवकर नाहीतर फजिती उडेल माझी...'

'ईव्हा...' ती उत्तरली.

इव्हलिन हे तिचं नाव. त्या क्षणापर्यंत ती काळी की गोरी हयाची त्याला सुतराम् कल्पना नव्हती. तिथल्या मुक्कामात त्या उभयतांचं प्रेम चांगलंच वाढीला लागलं आणि मोठ्या खुशीत तो पॅरिसला परतला.

अकल्पित यश हे कलावंताच्या घातासच कारणीभूत होते. १८२८ मध्ये बल्झाक साहित्याच्या जगात कोणीच नव्हता. यशोमार्गावरील त्याची रखडपट्टी अद्याप चालूच होती. गळ्यापर्यंत कर्जात बुडालेला, सदा दिवाळखोरीत असलेला बल्झाक म्हणायचा– उगाच कपडचालत्याचा खर्च नको म्हणून मी कुठं घराबाहेर तोंड काढीत नाही. पुढे दोनतीन वर्षांच्या अवधीतच तो उभ्या युरोप खंडात लेखक म्हणून ख्यातनाम झाला. त्यानं आपल्यासाठी लेख लिहावेत म्हणून नियतकालिकांत अहमहमिका सुरू झाली. ग्रंथ प्रकाशकांनी त्याचे लांगूलचालन आरंभले आणि चाहत्या वाचकांकडून येणाऱ्या स्तुतीपर पत्रांच्या वृष्टीत तो अक्षरशः बुडून गेला. ह्या यशामुळं बल्झाकहून स्थितप्रज्ञ वृत्तीच्या माणसाचं डोकं ताळ्यावर राहणं जिथं कठीण तिथं मुळातच स्थितप्रज्ञ नसलेल्या बल्झाकची काय कथा ! जगाच्या रंगमंचावर पदार्पण करण्याची हीच वेळ आहे असं त्याच्या मनानं घेतलं आणि तो उच्चभ्रू सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तुळात प्रवेश मिळविण्यासाठी धडपडू लागला. त्याने भारीतले भारी कपडे परिधान करावेत, पण मुळातच त्याचे रूप खानदानीपणाला पारखे झालेले... खेडवळ, त्याला कोण काय करणार ! त्याचं वागणं धसमुसळेपणाचं असायचं आणि त्याचं बोलणं तर काय नारोशंकराची घाटच वाजते आहे असा भास व्हावा. त्याचं ह्या

समाजात हसू झालं. तो थट्टेचा विषय झाला. बल्झाकच्या छायाचित्रांपेक्षा त्याची व्यंगचित्रेच आज अधिक उपलब्ध आहेत त्याचे हेही एक प्रमुख कारण आहे.

खरा बल्झाक ह्या गुलहौशी मंडळींना एका तासात कसा प्रत्ययाला येणार! तो त्यांना अज्ञातच राहिला; कारण त्यांच्यापासून फटकून दिवसाचे जे उरलेले तेवीस तास तो सृजनशील स्तब्धतेत व्यतीत करीत असे केवळ तिथेच त्याचे साकल्याने दर्शन घडणे शक्य होते. खरा बल्झाक दिसतो तो ह्या वीस वर्षांच्या काळात त्यानं ज्या असंख्य कथा लिहिल्या, नाटकं लिहिली, निबंध लिहिले त्यात; आणि त्यांच्या जोडीलाच ज्या पहिल्या प्रतीच्या एका सरस एक अशा उण्यापुऱ्या चौऱ्याहत्तर कादंबऱ्या लिहिल्या त्यात दिसतो. बल्झाकचे मूल्यमापन फक्त ह्या एकाच मानदंडाने होऊ शकेल.

त्याचे समकालीन त्याला एक मूर्ख... एक विक्षिप्त वल्ली समजत पण ह्या वल्लीच्या ठायी कलावंताला अभिप्रेत असलेली शिस्त आणि बुद्धिमत्ता होती ह्याची त्यांना काय कल्पना! त्याच्या डामडौली उधळ्या वृत्तीची ते कुचेष्टा करीत पण त्याच्या उद्योगक्षमतेची आणि निग्रही मनोवृत्तीची त्यांना लवमात्रही कल्पना नव्हती. त्यांचा दिवस म्हणजे ह्याची रात्र आणि ह्याची रात्र म्हणजे त्यांचा दिवस. सारे वेळापत्रकच मुळी उलटे होते. स्वतःच्या विश्वात बल्झाक रंगला. त्याच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना फक्त त्या चार भिंतींना... ज्यांच्या आडोशानं त्यानं तन्मयतेनं साहित्य निर्मिती केली त्या भिंतींना...

रात्रीचे नऊ वाजले आहेत. नाटकगृहात रंगमंचासमोरचे पडदे कधीच वर गुंडाळले गेले आहेत. नृत्यगृहात तरुण-तरुणी एकमेकांच्या आधाराने बेहोष धुंदीत नृत्यमग्न झाली आहेत. द्यूतागारात सोन्याची नाणी किणकिणताहेत-बाजूच्या गल्ली बोळात... काळोखाच्या आडोशाला भावविवश प्रेमी युगुलं एकमेकांच्या घनदाट कवेत विरघळत आहेत... पण बल्झाक स्वस्थ निद्रिस्त आहे.

आता मध्यरात्र टळली आहे. सबंध पॅरिस अनिर्वचनीय स्तब्धतेच्या प्रगाढ मिठीत विसावले आहे. कोटच्यावधी डोळे निद्राकूल झाले आहेत. बहुतेक दिवे मालवले गेले आहेत. शयनागाराच्या दारावर नोकर हलकेच टक टक करतो आणि बल्झाकला तत्काळ जाग येते. अंगाभोवती वस्त्र लपेटीत तो टेबलाजवळ येऊन बसतो. नोकरानं चांदीच्या शामदानातल्या सहाही मेणबत्त्या आधीच पेटविलेल्या आहेत. खिडक्यांचे पडदे घट्ट लावून घेतले आहेत. बाह्य जगाशी त्याला आता जणू एवढासुद्धा संपर्क नकोय. स्वनिर्मित विश्वातच काही काळ तो रंगून जाणार आहे.

खोलीत सारे काही स्तब्ध आहे. आवाज ऐकू येतोय तो फक्त कागदावर कुरू कुरू करीत लिहीत जाणाऱ्या साळूच्या काटचाचा अथवा लिहून झालेला कागद लिहिलेल्या कागदांच्या चळतीत सरकवल्याचा. बाहेर उषा फाकली आहे, पण त्याची त्याला क्षिती नाही, मेणबत्त्यांचा प्रकाश फक्त त्याला उमगतो आहे. स्थळकाळाची त्याची सारी शुद्ध कधीच हरपली आहे. स्वनिर्मित जगात तो आता मश्गुल आहे.

माणूस मनानं कितीही निग्रही असला तरी अखेर शारीरिक दुर्बलतेपुढे त्याला नांगी टाकावीच लागते. माणसाच्या शारीरिक सामर्थ्याला स्वाभाविक मर्यादा असतात. पाच-सहा तास असं अविरत लेखन झाल्यावर 'थोडं थांबावं आता' असं बल्झाकच्या मनात येऊन जातं. त्याची बोटं लिहून लिहून बधीर होऊन गेलीत. डोळे चुरचुरताहेत . पाण्याची धार लागलीय जशी. पाठीला जाम रग लागलीय आणि कानशिलं सणसणताहेत असा भास होतोय.. जरा थांबावं... एखादा माणूस म्हणेल, 'झालं एवढं खूप झालं आता लोळावं जरा...' पण बल्झाकचं तसं नव्हतं. तो खुर्चीवरून उठेल. बाजूच्या टेबलावर कॉफीचं भांडं ठेवलेलं आहेच... कॉफी... काळी कॉफी... त्याच्या क्रियाशक्तीला ते एक उत्तेजक वंगणच होतं. अन्न किंवा झोप मिळाली नाही तरी एक वेळ चालेल, पण कॉफी मात्र हवीच. (उभ्या हयातीत त्यानं

५०,००० पेले कडक कॉफी रिचविली असणार असं एका आकडे शास्त्रज्ञानं म्हटलं आहे.) ह्या कॉफीनंच त्याचं मरण जवळ आणलं... मुळात घंटेसारखं खणखणीत असलेलं त्याचं हृदय तिन्नं पार कमकुवत करून टाकलं.

कॉफीनंतर पुन्हा लिहिण्यासाठी बैठक... आठचे टोले घडचाळात पडताहेत. त्याचा नोकर ऑगस्ते दारावर टक टक करून त्याचं लक्ष वेधतो. छोटी हजेरीचं तवक तो मेजावर ठेवतो. मध्यरात्री-पासून जिथं मांड ठोकून बसला तिथून बल्झाक उठतो आणि खिडकीवरचे पडदे बाजूला सारतो. प्रकाशात न्हाऊन निघालेलं पॅरिस... जे जिंकण्याची जिद्द त्यानं मनाशी बाळगलेली असते ते पॅरिस त्याच्यासमोर पसरलेलं असतं.

आता हलके हलके नियतकालिकांच्या कचेरीतले, प्रकाशकांच्या कचेरीतले, प्रकाशकांच्या छापखान्याचे निरोप्ये दोन दिवसांपूर्वी लिहिलेल्या मजकुराच्या प्रुफांची भेंडोळी घेऊन यायला सुरुवात होते. मुद्रितशोधनाचे सारे रूढ संकेत झुगारून देऊन बल्झाक प्रुफं तपासायला प्रारंभ करतो. जुना मजकूर त्याच्या मनाला उतरत नाही. तो तो खोडून टाकतो. नव्या मजकुरानं समास आणि पाठच्या बाजू चिताडल्या आहेत पण त्याला त्याचे काय ! स्वतःचं समाधान होईपर्यंत तो पुन्हा पुन्हा लिहीत राहणार आहे. प्रकाशकांची आर्जवं, कायदेशीर धाकदपटशे ह्याची पत्रास बाळगणाऱ्यातला तो नाही. मजकूर पुन्हा कंपोज करायला खर्च येतो ना ? ठीक आहे... पुन्हा कंपोज करा. माझ्या मोबदल्यातून खर्च कापून घ्या. कमी पडले तर मी पैसे भरीन... पण माझं समाधान झाल्याखेरीज एक शब्द मी तुम्हांला छापू देणार नाही... असा त्याचा हट्ट असतो. कलावंताचा हट्ट आहे हा. वाजवी हट्ट आहे हा.

कलावंत म्हणून त्यानं तो हट्ट केला. कलेला कमीपणा आणणारी कसलीही तडजोड नाकारली... ह्या साऱ्या संघर्षात

जे असामान्य धैर्य दाखविले त्या मागे एक सुजाण दृष्टी होतीच होती. बिथोव्हनच्या टिपण वहीचा एक अपवाद वजा करता कलावंतानं आत्मप्रकटीकरणासाठी जी झुंज दिली... जी धडपड केली तिचा वल्झाकच्या ह्या प्रुफाव्यतिरिक्त दुसरा स्पष्ट विश्वासार्ह पुरावा नाही. त्याचे खरे दर्शन कुठे घडत असेल तर त्याच्या छायाचित्रांत नव्हे, त्याच्याविषयीच्या व्यंगचित्रांत नव्हे... तर ह्या मुद्रितशोधनाच्या गिचमिडीत.

• • •

हिचकॉकविषयी सर्व काही

डॉ. फ्रेड्रीक वेरथॅम हे एक विख्यात मानसशास्त्रज्ञ आणि मानसोपचार तज्ज्ञ आहेत. अमेरिकन मुलांमध्ये विलक्षण लोकप्रिय असलेल्या चित्रमय साहसकथांची पुस्तकं (' कॉमिक बुक्स '), प्रत्यही प्रसिद्ध होणारे बोलपट आणि दूरचित्रवाणीवरून प्रसिद्ध होणारे नाट्याचे कार्यक्रम ह्यांच्यामध्ये अंगावर शहारे आणणाऱ्या भीषण आणि भयानक दृश्यांचा हल्ली जो बेसुमार वापर केला जात आहे त्याचे ते एक कट्टर विरोधक आहेत. आणि असे असूनही हिचकॉकच्या चित्रपटांचे ते एक चाहते आहेत. आपल्याला हिचकॉकचे चित्रपट का आवडतात ह्याचे स्पष्टीकरण करताना ते म्हणतात की, ' हिचकॉक हा एकच गृहस्थ असा आहे की ज्याला भयानक घटना प्रत्यक्ष पडद्यावर न दाखवताही रहस्यप्रधान चित्रपट यशस्वी करून दाखविता येणं शक्य झालं आहे. साधलं आहे...'

डॉ. वेरथॅम ह्याचं हे म्हणणं एका मर्यादित अर्थानं खरंही आहे. हिचकॉकनं अमेरिकेत तयार केलेला पहिला बोलपट ' रिबेक्का '. त्याच्या ह्या चित्रपटाला ॲकॅडमी अवार्डही मिळालं आहे. आपला नवरा खुनी असल्याचा बायकोला संशय येतो हा ह्या रहस्यपटाचा प्राणबिंदू आहे. त्याचा कलापूर्ण आविष्कार चित्रपटाच्या माध्यमातून करण्यात हिचकॉकनं न भूतो न भविष्यती असं यश संपादन केलं होतं. स्तिमित करणारी कल्पनाशक्ती आणि सहजसुंदर कलात्मकता ह्याचे मनोहारी दर्शन रसिकाला या चित्रपटात घडले होते. असं यश त्यानं ' रिअर विंडो ' आणि ' सस्पिशन ' सारख्या आपल्या आणखी

काही चित्रपटांत हस्तगत केलं होतं, नाही असं नाही; परंतु हल्ली दूरचित्रवाणीवर तो सादर करीत असलेल्या नाटचांतल्या आणि अलीकडच्या त्याच्या काही चित्रपटांतल्या भीषण दृश्यांच्या मालिका लक्षात घेतल्या की डॉक्टर साहेबांनी हिचकॉकला दिलेलं हे प्रशस्तीपत्र रद्दबातल करून घेण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे असा एक विचार मनात तरळून जातो.

कल्पनाही होणार नाही अशा जगावेगळ्या पद्धतीनं लोकांना 'खतम्' करण्याचे एकएक अजब मार्ग शोधून काढण्याचा त्याला जणू नादच जडला आहे असं त्याच्या गेल्या काही वर्षांतल्या चित्रनिर्मितीवरून वाटायला लागतं. कधी आपल्या मानस-पुत्रांची (आणि कन्यकांचीही) मुंडकी तो सरळ उकळत्या कढईत बुचकळून काढतो तर कधी शीतगृहातल्या गारठणक बर्फाच्या राशीत तो त्यांना तिथल्या तिथं गोठवून टाकतो. कधी तो त्यांना कपडेलत्ते ठेवायच्या अंगच्या कपाटात गुदमरवून टाकतो तर कधी भितीतच जीवे चिणून ठार मारतो. सरकत्या रेतीवर पाऊल टाकताच कधी त्याची पात्रं उभीच्या उभी पृथ्वीच्या पोटात गडप होतात तर कधी चक्क त्यांचा गळा दाबून, गळचाला फास लावून, विजेचे धक्के देऊन अथवा धान्य दळावं तसं हाडं पिसण्याच्या गिरणीत भरडून तो त्यांची वाट लावतो. पिस्तूल आणि सुरा ही झाली जीव घेण्याची सर्व परिचित हत्यारं– कधीकधी जीव घेण्याची त्याची हत्यारंही अशीच लोकविलक्षण असतात. बकऱ्याची गोठवलेली तंगडी सटकन् टाळक्यात हाणून मेंदूचा पार चेंदामेंदा झालेलाही त्यानं एकदा दूरचित्रवाणीवरच्या कार्यक्रमात दाखवला होता.

स्नानगृहात निवांतपणे तुषार-स्नान करणाऱ्या युवतीची खांडोळी खांडोळी करून गटार-पाण्यावरोवर त्यांची वासलात लावण्याचा जो अघोर विक्रम त्यानं पडद्यावर दाखवला आहे ('सायको') त्याला चित्रपटांतील भयप्रदभीषण दृश्यांच्या

इतिहासात तोड नाही. आणि असं असूनही अल्फ्रेड हिचकॉक हे आज एक चित्रपट व्यवसायात 'नाव' आहे, फार मोठं नाव आहे.

'दि वर्डस्' हा त्याचा अगदी अलीकडचा चित्रपटही असाच. पक्ष्यांच्या क्रौर्याची ही कथा. सूडबुद्धीनं प्रेरित झालेला कावळ्यांचा थवा एका स्त्रीवर हल्ला चढवतो. तिचा चेहरा ओरबडून रक्तबंबाळ करतो. आणि टोची मार मारून तिचे डोळे फोडतो, हे भीषण दृश्य पडद्यावर पाहाणं हा एक उबग आणणारा, शहारे आणणारा भयानक अनुभव आहे. वास्तविक 'डोळा' हे मानवाचे सर्वांत अधिक संवेदनाक्षम आणि नाजूक इंद्रीय. मानवी शरीरातील अशा नाजूक भागावर होणाऱ्या अत्याचारांचे अगदी जवळून केलेले चित्रीकरण पाहण्याची प्रेक्षकांना एकदा का सवय पडली की त्यांची संवेदनाक्षमता कालांतराने बोथट झालीच म्हणून समजा. उद्या एखाद्या माणसानं दुसऱ्याचा दिवसा ढवळ्या खून केला अथवा पाचपन्नासाऱ्या जमावानं एकमेकांचे गळे कापले तर त्या अत्याचारांनी त्यांची मनं मुळीच विचलित होणार नाहीत वा त्यांना त्यामुळे कसली अस्वस्थता वाटणार नाही. आईकमाननं ज्यू लोकांवर जे अनन्वित अत्याचार केले त्याचं जर्मनांना काहीही वाटलं नाही ह्याचं कारण हीच मानसिक संज्ञाहीनता ह्यात संशय नाही. हिचकॉक हा असा अगदी रक्ताला चटावल्याप्रमाणे अशा तऱ्हेचे रहस्यपट एकामागून एक धडाक्यानं निर्माण करतो आहे त्यामागची प्रेरणा तरी काय असावी? पण मग त्यासाठी हिचकॉक ही व्यक्ती काय आहे हे समजावून घेणं आवश्यक आहे.

हिचकॉक आपल्याला जसा पडद्यावर दिसतो जवळ जवळ तसाच तो प्रत्यक्षात आहे असं म्हणतात. लालबुंद अंडाकृती चेहरा आणि एखाद्या खोडकर मुलासारखे खटचाळ डोळे, तंबोऱ्यासारखं नाक आणि ओघळलेला खालचा ओठ. एखाद्या पोसलेल्या कबूतरासारखी एकंदर त्याची देहयष्टी आहे. त्याच्या शरीराच्या मानानं त्याचे पाय इतके लहानखुरे आहेत की ते फार म्हणजे फारच

फिरकोळ वाटतात. तो कधीही सूर्यस्नानाच्या फंदात पडत नाही. स्वाभाविकच त्याचे गाल नुसते लालबुंद दिसतात. 'गाल असे लालबुंद का?' असं कोणी विचारलं तर 'वंशपरंपरेनं गरम रक्त अंगात खेळत आलंय. गाल लालबुंद दिसतील नाही तर काय!' असं मोठ्या गंभीरपणानं तो सांगतो. नेव्ही ब्लू रंगाचा सूट, पांढरा शर्ट, गर्द निळा टाय, काळे पायमोजे आणि तसलेच बूट हा हिचकॉकचा नित्याचा पोषाख. त्यात कालत्रयीही तो कधी बदल करीत नाही. हिवाळा, पावसाळा, उन्हाळा हे ऋतू आणि लंडन, न्यूयॉर्क, पॅरिस वा काहिरो ही शहरं. ह्यापैकी कोठलाही ऋतू आणि कोठलेही स्थान असो, हिचकॉकचा पोषाख ठरलेला. त्यात बदल नाही. असे त्याच्याकडे एकूण सहा सूट आहेत आणि ते हॉलिवूडमधल्या शिंप्याकडून शिवून घेतलेले आहेत. एकेका सुटाची किंमत २७५ डॉलर्स (म्हणजे बारा-तेराशे रुपयांच्या घरातलं काम!) बुटाचे जोडही डिट्टो तसेच अर्धा डझन, एकासारखे एक असे दहा नेकटायज्, पंधरा शर्टस् आणि बीस मोज्यांचे जोड अशा सरळसोट वैचित्र्यहीनतेनं त्याचा कपडेपट भरलेला आहे. त्याबाबत त्याचे स्पष्टीकरणही ठरलेले आहे: 'आपण बुवा सवयी आणि व्यवस्थितपणा यांचे बंदे गुलाम आहोत.' जन्मानं ब्रिटिश असलेला हिचकॉक ब्रिटिशांप्रमाणेच नाकात बोलतो.

तुम्ही कधी त्याला भेटायला गेलात तर बसल्या खुर्चीवरून उठून काही तो तुमचं स्वागत करणार नाही. उभं राहण्यापेक्षा बसणं आणि चालण्यापेक्षा वाहनानं प्रवास करणं ह्यासारखी उत्तम गोष्ट नाही असं तो आल्यागेल्याला सांगत असतो. आपण जन्मात कधी काडीचा व्यायाम केला नाही की आपली उत्साहशक्ती उगाच कधी वाया दवडली नाही अशी बढाई मारायचीही त्याला हौस आहे. 'आळसटलेलं रक्त सळसळून वाहयला लावणारं औषध तयार करणारी एखादी फार्मसी मला आता शोधली पाहिजे...!' असंही कधी तो चावटपणानं डोळे मिचकावीत बोलून जातो.

हिचकॉक हा एक अत्यंत व्यवहारकुशल गृहस्थ आहे. परंतु

आपला कोठलाही व्यवहार तो जातीनं पाहत नाही. कारण देण्या-घेण्याचा व्यवहार म्हटला की अप्रिय घासाघीस आली, मानसिक ताण आला आणि हे तर त्याला मुळीच नको असतं. तो पडद्याआड राहून व्यवहाराची सारी सूत्रं आपल्या विश्वासातल्या माणसांकरवी मोठ्या खुबीनं हलवीत असतो. स्टुडिओकडून आपली विदागी पगाराच्या स्वरूपात घ्यायचं थांबवणारा हिचकॉक हा पहिला दिग्दर्शक. असं करणं इन्कमटॅक्सच्या दृष्टीनं त्याला फार फायद्याचं होतं हे त्यानं चटकन ओळखलं. पगार रूपानं मिळणाऱ्या रकमेवर टॅक्स ज्या दरानं आकारला जात असे त्यापेक्षा वैयक्तिक धंद्यातून मिळणाऱ्या प्राप्तीला बसणारा टॅक्स कमी दरानं आकारला जाई व म्हणून त्या पद्धतीनंच तो आपले करार स्टुडिओ बरोबर करीत असे.

कोटयावधी रुपयांचा आज धनी असलेला हिचकॉक आपली मिळकत सुरक्षित कशी राहील, तिच्यातून आणखी जास्तीत जास्त उत्पन्न कसं काढता येईल आणि हे सारं करीत असताना काय केलं म्हणजे इन्कमटॅक्स कमी दरानं आकारला जाईल ह्याचा फार बारकाईनं विचार करीत असतो. माणूस कलावंत असला म्हणजे त्यानं व्यवहारशून्य असलंच पाहिजे असा काही नियम नाही तर आपले व्यवहारही कलात्मक पातळीवर सांभाळता येतात हे हिचकॉकनं आपल्या कृतीनं दर्शवून दिलं आहे. जमीनजुमला, तेलाच्या विहिरी, निरनिराळ्या कंपन्यांचे शेअर्स, गुरांचे कळप ह्या सर्वांत त्यानं आपला पैसा गुंतवला आहे. 'पैसा तृप्ती आणतो' हे तर मुळी त्याच्या धनप्राप्तीमागचं सूत्रवाक्य आहे.

असा हा धनाढ्य हिचकॉक खाजगी जीवनात राहतो कसा, वागतो कसा ह्याचंही अनेकांना फार मोठं कुतूहल असतं. जास्तीत जास्त पैसा मिळविण्यामागच्या त्याच्या व्यवहारकौशल्याची तुलना कमीतकमी खर्चात कोणतंही काम भागविण्यामागच्या त्याच्या व्यवहारचातुर्याशीच होऊ शकेल. 'बेल एअर' ही खाशांची राखीव वसाहत. तिथंच एका चित्रसादृश उमाठ्यावर

हिचकॉकची आठ खोल्यांची चिमुकली बंगली आहे. ह्या वसाहतीतल्या लक्ष्मीपुत्रांच्या प्रासादतुल्य हवेल्यांच्या मानानं ही बंगली फारच किरकोळ वाटते आणि हॉलीवुडच्या मोजमापानं पाहयचं तर तो एक शुद्ध भ्रष्टाकारच मानावा लागेल. अहो, ह्या बंगल्यात साधा पोहायचा तलाव नाही! ('मला पोहता येत नाही. पोहणाऱ्या माणसांना मी घरी बोलावीत नसतो. मग हवाय कशाला पोहायचा तलाव?' असं हिचकॉकचं ह्या आक्षेपाला ठाम उत्तर आहे.) त्याच्या घरात कामाला कायमचा माणूस नाही. फक्त एक नोकर आहे. दिवसातलं ठराविक काम करून तो निघून जातो. आता हे घर त्यानं केवढ्याला घेतलं असेल म्हणता? फक्त ४३,००० डॉलर्सना. त्यानं घर घेतलं तेव्हा आताच्या मानानं एकतर किमती खूपच कमी होत्या... आणि ज्याच्याकडनं घर घेतलं त्याला रोकड रकमेची गरज होती म्हणून सौदा फारच स्वस्तात पटला. त्याच्या जीवनात आलेल्या प्रत्येक गोष्टीचं मोल जसं आज शतपटीनं वाढलं आहे तसंच ह्याही घराचं झालं आहे.

ह्या बंगलीविषयी बोलताना एका पत्रकाराला त्यानं एकदा सहज सांगितलं, 'सभोवार विस्तीर्ण हिरवळ असलेलं घर मला हवं होतं. पण ह्या हिरवळीसाठी दमडी खर्चायची मात्र आपली बिलकुल इच्छा नव्हती.' एवढं सांगून बोलत बोलत त्यानं त्या पत्रकाराला बंगल्याबाहेर आणलं आणि बंगल्याला प्रदक्षिणा घालता घालता म्हटलं, 'ही पाहिलीत समोरची हिरवळ!' हिचकॉक ज्या हिरवळीचा उल्लेख करीत होता ते होतं बेल एअरचं गोल्फचं मैदान! त्या पत्रकाराचा काही मानसिक गोंधळ उडालेला आहे हे पाहून हिचकॉकनं घसा खाकरल्यासारखं करीत घाईघाईनं म्हटलं, 'आपल्या घराभोवतीच्या खाजगी हिरवळीच्या ठिकाणी दुसऱ्या कोणाचा तरी गोल्फकोर्स असण्यात एक महत्त्वाची अडचण अशी असते की लेकाचे अधूनमधून थेट तुमच्या घराच्या कंपाउंडमध्ये चेंडू टोलवतात आणि तुम्ही कमरेत वाकून तो उचलून त्यांच्याकडे परत फेकावा अशी त्यांची अपेक्षा असते. मला

व्यायामाची आवड नाही आणि अर्थातच त्याची ही अपेक्षा पुरी करायच्या फंदात मी पडत नाही हे उघडच आहे...'

त्याच्या मालकीची आणखी एक जागा आहे. हॉलीवुडमधल्या वल्ली आणि फोनकॉल्सचा त्रास चुकविण्यासाठी अधून मधून तो तिथे जाऊन राहत असतो. हिचकॉकच्या चित्रपटातल्या एखाद्या दृश्यासारखंच हे ठिकाण आहे. सांताक्रूझ पर्वतराजीच्या पायथ्याशी असलेल्या टेकडचांत ही जागा आहे दक्षिणेकडे माँटेरी उपसागर गर्जतो आहे आणि सभोवार दोनशे एकर जमीन हिरव्याकंच वनराजीनं व्यापली आहे. जिथं वनराजी नाही तिथं द्राक्षमळे आहेत, लागवडीखाली आणलेली शेतीभाती आहे. ही सर्वच जागा त्यानं ३२,००० डॉलर्सना खरेदी केली होती. आज तिची किंमत १००,००० डॉलर्सच्या घरात सहज होईल.

बेल एअरच्या बंगलीची सारी सजावट मुख्यत्वेकरून इंग्लिश धाटणीचीच आहे. साधी, स्वस्त आणि नीटनेटकी. आता भितीवर 'पिकॅसो'ची चित्रं लावलेली दिसतात पण तोसुद्धा हिचकॉकचा पैसा व्यवस्थित गुंतविण्याचाच एक भाग दिसतो. ही चित्रं मूळ सांताक्रूझच्या घरातली. 'पिकॅसो'च्या कलाकृतीचा हा संग्रह त्यानं १९४१ मध्ये ३५,००० डॉलर्सना घेतला होता. आज त्याची किंमत २००,००० डॉलर्स तरी होईल.

हिचकॉकच्या कपडचांच्या कपाटात ओव्हर कोट कुठं दिसला नाही म्हणून एकदा एका पत्रकारानं त्याला म्हटलं की, 'या सहा सुटांच्या जोडीला तुम्ही ओव्हर कोट शिवून घेतलेला दिसत नाही हे कसं ? वास्तविक ऐन थंडीच्या दिवसांत तुमचा न्यूयॉर्क, लंडन आणि पॅरिससारख्या शहरांतून मुक्काम असतो. तिथल्या थंडीत लोक म्हणे अगदी गारठून जातात...'

'थंडीच्या कडाक्यानं गारठून जाणारे अनेक असतीलही पण थंडीच्या कडाक्यानं गोठून जाणारे मात्र फार थोडे असतात...'

निर्विकारपणे तो उत्तरला. म्हणाला, 'न्यूयॉर्कमध्ये बर्फ पडत असलं तरी मी खुशाल हॅट आणि कोट न वापरता वावरत असतो. अरे, कसं झालं तरी आज वंशपरंपरेनं गरम रक्त सळसळत आलंय माझ्यात. सारं श्रेय ह्या गरम रक्ताच्या वंशपरंपरेलाच आहे...'

हिचकॉकची मुलगी पॅट ही एक प्रसिद्धीपराङ्मुख तरुणी आहे. 'अल्फ्रेड हिचकॉक्स मिस्टरी मॅगेझीन'चा सारा व्यवहार ती पाहते. तिचा नवरा मोटारवाहतुकीच्या व्यवसायात आहे. पण तोही तिला या कामात मदत करीत असतो. हिचकॉकची बायकोही त्याला त्याच्या तिजोऱ्या भरायच्या कामात बहुमोल मदत करीत असते. तिचे कपडे साधेसुधे, दागिने स्वस्तातले आणि नकली. ती दिसायला नाजूक आणि 'सुबक ठेंगणी' अशी आहे. चित्रपटांसाठी कथा निवडण्यात आणि क्वचित छायाचित्रणाचे, कॅमेऱ्याचे कोन निश्चित करण्यास ती त्याला मदत करते. एका ब्रिटिश चित्रपट कंपनीत ती चित्रपट संकलक आणि तो श्रेयनामावलीचा कलादिग्दर्शक असताना त्यांची गाठ पडली. त्यावेळी ती त्याच्याहून वरच्या हुद्यावर होती त्यामुळे आपल्या अहंमन्य स्वभावधर्मानुसार त्यानं तिच्याकडे लक्ष देणं हेतूतःच टाळलं; पण नंतर दोनच वर्षांनी तो कलादिग्दर्शक झाला आणि त्याचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन लगेच बदलला. त्यानं मग तिच्याशी बोलायला मिळावं, तिचा परिचय वाढावा यासाठी धडपड सुरू केली. त्याच्या प्रेमाराधनेला यश आलं आणि तिनं रुकार देताच त्यानं तिच्याशी लग्न केलं.

करमणुकीसाठी हिचकॉक पतिपत्नी कधीही नाइटक्लब्ज्मध्ये जात नाहीत की चित्रपट पाहत नाहीत. नट, दिग्दर्शक आणि निर्माते ह्या वर्गात त्यांना कोणीही जिवाभावाचे स्नेही, सोबती नाही त्यामुळे टोलेजंग पार्टयांवर पैसे खर्च करण्याचे प्रसंग त्यांच्यावर कधीच ओढवत नाहीत. जगातल्या अनेक प्रख्यात अशा प्रेक्षणीय स्थळांना त्यांनी भेटी दिल्या आहेत पण त्या मजेखातर नव्हे तर वाह्यचित्रीकरणाची एक गरज म्हणून, आपल्या

व्यवसायाचा एक भाग म्हणून. सुट्टी म्हणून ते कधी घेत नाहीत. त्यांना खर्चिकच काय पण स्वस्तातलेसुद्धा कसले छंद वा पौक नाहीत. आगगाडीच्या वेळापत्रकाप्रमाणे आयुष्याची जवळ जवळ सदतीस वर्षं त्यांनी एकत्र व्यतीत केली आहेत. सकाळी सातच्या सुमारास उठणं, नंतर अमेरिकन आणि ब्रिटिश वृत्तपत्रं वाचणं... तो स्टुडिओत जातो आणि काम आटोपलं की घरी येतो. व्यवसायाचा एक भाग म्हणून संध्याकाळी ते 'रहस्यकथा' वाचत बसतात. धंद्याचा संबंध नसेल तेव्हा ऐतिहासिक चरित्र आणि मौलिक साहित्य वाचण्यात ते वेळ घालवतात. दूरचित्रवाणीवरील एखाद दुसरा कार्यक्रम ते पाहतात. परंतु 'दि अल्फ्रेड हिचकॉक अवर'सारखा एखादा कार्यक्रम असेल तर तो पाहण्याच्या भानगडीत ते सहसा पडत नाहीत. रात्री दहाला ते झोपी जातात. रविवारचा दिवस आपल्या तीन नातींबरोबर खेळण्या-बागडण्यात ते घालवतात.

हिचकॉकच्या दैनंदिन कार्यक्रमाची ही एक झलक. परंतु ती देताना मी त्याच्या खाण्यापिण्याविषयी काही लिहायचं मुद्दाम टाळलं होतं. त्याचं 'खाणं' आणि 'पिणं' हा एक स्वतंत्र विषय होऊ शकेल. हिचकॉक हा एक थोर खवय्या आहे. आपले जिव्हालौल्य पुरवताना त्याच्या अंगी कर्णाचे औदार्य संचरते. त्याचं स्वयंपाकघर हा एक रम्य 'ताजमहाल'च मानावा लागेल. हिचकॉक जेवायला भोजनगृहात कधी बसत नाही तर स्वयंपाक-घरातच त्यानं जेवायसाठी आसन ठोकलेलं असतं. अन्नपदार्थांपासून शक्य तितक्या जवळ आपण असावं असा एक पवित्र हेतू त्याच्या ह्या पवित्र्यामागे असावा! त्याचे तळघर नाना जातीच्या आणि नाना प्रकारच्या उंची मद्यानं ठेच भरलेलं आहे. त्याच्याकडे ठेवणीत असलेल्या मद्याची किंमत ६५,००० डॉलर्स आहे... म्हणजे उभ्या घराला पडलेल्या मूळ किमतीपेक्षाही घरात साठवून ठेवलेल्या मद्याची किंमतच अधिक आहे असं म्हटलं पाहिजे.

मद्याविषयी बोलताना हिचकॉक-रसवंतीला जसा काही बहार येत असतो. 'ही बाटली मी 'दि लेडी व्हॅनिशेस' ह्या चित्रपटाचं शूटिंग संपविलं तेव्हा विकत घेतली होती. ह्या बाटलीत मद्य नाही... तर मद्यातलं शुद्ध प्लॅटिनम आहे हे मद्य ज्या द्राक्षमळ्यातल्या द्राक्षांपासून बनविलं आहे... तो द्राक्षमळाही खास आणि ती द्राक्षंही खास होती. सबंध जगात शेलक्या शेलक्या लोकांना विकण्यासाठी फक्त दोनशे बाटल्या त्यावेळी काढल्या. बस्स.' असं म्हणत निखळशंख मद्यानं लखलखणारी बाटली तो तुमच्या पुढ्यात धरील आणि मोठ्या अभिमानानं म्हणेल, 'बाचा. हे लेबल बाचा; मार्क्विस-द-लाग्वीशे...'

एक काळ असा होता की हा बहाद्दर खवय्या तिन्ही त्रिकाळ आकंठ खान-पान करायला मोकळा होता. पण स्वतःच्या वपू श्रीमंतीपुढे त्याला अखेर मान तुकवावी लागली. त्याचं वजन तीनशे पौंडांच्या घरात जाताच डॉक्टरमंडळी त्याच्यावर गुरगुरायला लागली. डायटचं लचांड मागं लागलं. स्वतःच्या मनावर त्याचा विलक्षण ताबा आहे. आणि तो कमालीचा शिस्तप्रिय आहे. सकाळी एक कप कॉफी आणि दुपारी पावाची एक स्लाईस अन् नावाला जगदी थोडं मटण एवढाच आहार त्यानं ठेवला आणि हळके हलके वजनाचा काटा घसरत घसरत दोनशे पौंडांवर येऊन स्थिरावला. नियंत्रित आहारानं वजन आटोक्यात आलं खरं पण त्यामुळं हिचकॉकचं केवढं आर्थिक नुकसान झालं ह्याची काही कल्पना ! त्याच्या युद्धनौकेसारख्या प्रचंड देहाला भूषविणारे ते अर्धाडझन सूट आता 'अंगापेक्षा बोंगा जास्त' ह्या म्हणीची प्रचीती आणून द्यायला लागले. नवे सूट शिवून घेण्याखेरीज त्याच्यापुढे गत्यंतरच उरले नाही.

हिचकॉककडे पाहिलं की वाटतं हा माणूस काय वाटेल ते खाईल. कशालाही नाही म्हणणार नाही. पण हा समज चुकीचा आहे. अंडी त्याला अगदी डोळ्यांसमोर नको असतात. लंडन कोंबड्यांची पैदास आणि अंड्यांचा व्यापार करणाऱ्या माणसाच्या ह्या

मुलाला अंड्यांचा विलक्षण तिटकारा आहे. वृत्तीनं कमालीचा शांतताप्रिय, सौम्य आणि सोशिक असलेल्या ह्या इंग्रजाचा कल खून, अत्याचार आणि रहस्य ह्या भानगडींकडे कसा झुकला, 'रहस्यप्रधान भीषण बोलपटांचा बादशहा' हा नावलौकिक जीवनात त्यानं स्वतःला कसा प्राप्त करून घेतला ह्याची बीजे आपल्याला त्याच्या बालजीवनातच स्पष्टपणे आढळून येतात.

हिचकॉकचे वडील हेही एक करडे शिस्तप्रिय गृहस्थ होते. माणसानं आपलं आयुष्य कसं सरळ नाकासमोरचा मार्ग चोखाळून व्यतीत केलं पाहिजे ह्या तत्त्वावर त्यांची श्रद्धा होती. आपल्या मुलानं चांगलं शिकावं, त्याच्यावर चांगले संस्कार व्हावेत ह्यासाठी त्यांनी त्याला जेसूईट सेमिनरीत दाखल केलं होतं. लहानग्या अल्फ्रेडनं एकदा काही आगळीक केली तसं त्याच्या बापानं त्याला चिठ्ठी देऊन गावच्या पोलिसाकडे धाडलं. शिपाईबुवानं चिठ्ठी वाचली आणि अल्फ्रेडला सरळ तुरुंगाच्या कोठडीत डांबलं. थोड्यावेळानं त्यानं कोठडीचं दार उघडून अल्फ्रेडला बाहेर आणलं तर पोर भयानं पार भेदरून गेलेलं, झाल्या प्रकाराच्या धसक्यानं थरथरत असलेलं त्याला दिसलं. शिपाईबुवानं अल्फ्रेडच्या पाठीवरून ममतेनं हात फिरवला आणि 'वाईट वागणाऱ्या, खोड्या करणाऱ्या मुलांची पुढं काय स्थिती होते ह्याची तुला कल्पना यावी म्हणून तुझ्या वडिलांनी मला तुला कोठडीची जरा हवा दाखवायला सांगितलं होतं. समजलं ? जा. पुन्हा असं वाईट वागू नकोस...'

त्या घटनेचा ओरखडा हिचकॉकच्या मनावर आजही तितकाच ताजा आहे. तुरुंगाचा आणि पोलिसांचा त्यानं तेव्हापासून असा काही धसका घेतलाय की बेकायदा काहीही करायला त्याला भय वाटतं इतकंच नव्हे तर पोलिसाला पाहून अजूनही त्याला घाम फुटतो. त्याच्या मालकीच्या दोन गाड्या आहेत... पण तो स्वतः कधी गाडी चालवायला बसत नाही. ते काम त्याची पत्नी करते. समजा, रहदारीच्या नियमांचा आपल्या हातून भंग झाला आणि

पोलिसांच्या तावडीत आपण सापडलो तर काय घ्या, अशा पोक्त विचारानं गाडी हाकण्याचा परवाना घ्यायच्या भानगडीतदेखील तो कधी आजवर पडला नाही.

डॉक्टर हॅरॉल्ड ग्रीनवाल्ड म्हणून एक प्रख्यात मानसशास्त्रज्ञ आहे. त्याचं म्हणणं असं की अनेक सृजनशील कलावंतांना पोलीस-अधिकाऱ्याविषयी, कायदेकानूंविषयी आपल्या अंतर्मनात खोल कुठेतरी एकप्रकारचे सूप्त भय असते... हे त्याचे भय त्यांच्या कथा-कादंबऱ्यादी कलाकृतीतून डोकावणाऱ्या पोलीस-अधिकाऱ्यांच्या व्यक्तिचित्रणाद्वारे ते धिटाईने व्यक्त करू पाहत असतात. हिचकॉकच्या बोलपटांतील पाठलागाची दृश्यं डोळ्यासमोर आणली तर डॉक्टर मजकुरांच्या हचा विधानाची सत्यता आपल्याला सहज पडताळून पाहता येते. त्याच्या चित्रपटांतल्या पोलिसांच्या ससेमिऱ्यातून सुटका करून घेणाऱ्या व्यक्ती पोलिसांच्या तावडीतूनच नव्हे तर अन्य कुठल्यातरी अनामिक भयापासून मुक्त होण्यासाठी धडपडत असलेल्या दिसतात... आणि हचा पाठलागांची अखेर पोलिसांची चांगलीच फजिती झाली आहे असं दाखविण्यात होत असते. पाठलाग करणाऱ्या पोलिसांना बावळट ठरविण्यात हिचकॉक आपल्या मनात दडलेल्या भयाची धीट प्रतिक्रियाच तर व्यक्त करीत नसेल ?

जेसूईट्स शिक्षणसंस्थेत व्यतीत झालेलं हिचकॉकचं जीवन कदाचित काही लहानसहान दुःखानं भरलेलं असेलही परंतु हचा शिक्षणाचा त्याला भावी जीवनाचा पाया घालण्याच्या दृष्टीनेही अत्यंत उपयोग झाला आहे. शिस्त, व्यवस्थितपणा, दूरदृष्टी हे सारे गुण इथंच त्याच्या अंगी बाणले असले पाहिजेत. चित्रपटाच्या प्रत्यक्ष निर्मितीला प्रारंभ करायच्या आधी महिनेन् महिने तो आपल्या कथालेखकांबरोबर अनेक बारीकसारीक तपशीलाची साधकबाधक चर्चा करीत असतो. प्रत्येक दृश्याचा अगदी बारीकसारीक तपशील आणि चित्रीकरणाचे कोन अशा हचा

चर्चांतून नक्की केले जातात. कोणत्या दृश्याच्या वेळी कॅमेरा कसा लावायचा ह्याची किमान सातएकशे तरी टिपणं त्यानं चित्रीकरणाच्या प्रारंभी करून ठेवलेली असतात. आणि म्हणूनच एकदा का चित्रीकरणाला प्रारंभ झाला की कॅमेऱ्यात न पाहताही भराभरा दिग्दर्शन करीत चित्रपट पुरा करणं त्याला शक्य होतं. जिम्मी स्टुअर्टसारखा नट हिचकॉकविषयी बोलताना अभिमानानं म्हणतो की, 'आम्ही पहिल्या दृश्याच्या चित्रीकरणासाठी सेटवर पाऊल टाकायच्या आधीच हिचकॉकचा चित्रपट संपूर्ण तयार झालेला असतो...!'

अनेक लेखकांचं असं म्हणणं आहे की 'हिचकॉक गुप्तहेरी कथांचं आणि रहस्यकथांचं चित्रण करतो...' ह्या विधानाला स्वतः हिचकॉकचा सक्त आक्षेप आहे. हिचकॉकचं त्याबाबत म्हणणं असं की, 'खून कोणी केला ?' अशा पद्धतीच्या कथांना मी कधी स्पर्शदेखील करणार नाही. भावनारहित बौद्धिक कसरतीशिवाय अशा कथांत असतं तरी काय ? मला आकर्षण वाटतं ते अनाकलनीय रहस्याचं, गूढाचं... दुसरं असं की माझ्या चित्रपटात दरोडेखोरांसारखे ठराविक ठशाचे खलनायक रंगवलेले तुम्हांला कधीच आढळणार नाहीत. माझ्या चित्रपटांतील व्यक्तिरेखा ह्या वास्तव जीवनात प्रत्यही आढळणाऱ्या जिवंत हाडामांसाच्या... खऱ्याखुऱ्या मानवी भावभावनांनी युक्त अशाच असलेल्या आपल्याला आढळतील. अरे, ही माणसं आपल्यातलीच आहेत, नियतीच्या फटकाऱ्यानं ती दुःस्वप्नांत गुरफटल्यासारखी वागताहेत हे प्रेक्षकांना पटलं पाहिजे. कर्रर्र असा आवाज करीत हलकेच मिटणाऱ्या उघडणाऱ्या दारांनी निर्माण केलेल्या तथाकथित भयप्रद वा औत्सुक्यपूर्ण रहस्यमयतेचा मला अगदी वीट आहे. अतर्क्य वाटणाऱ्या गोष्टी मी पडद्यावर दाखवतो. माझे खलनायक देखील देखणे असतात. मनाला भुरळ घालणारे असतात. नाहीतरी आपलेच काही चांगले जिवश्च कंठश्च मित्र आयुष्यात अनेकदा एखाद्या खलनायकासारखे वागत असतात आणि दानधर्मच नव्हे

तर खुनांचाही प्रारंभ अगदी व्यवस्थितपणे आपल्याच घरातून होत असतो ! अंधाराच्या आडोशाला दबा धरून बसलेलं वा निर्मनुष्य अशा एकाकी गल्लीकुच्चीच्या सांदी-कोपऱ्याला दडलेलं भय चित्रित करण्यात काय स्वारस्य आहे ? कसली मोठी बहादुरी आहे ? छेः छेः, तो आपला प्रांतच नव्हे !

लोकांना भयचकित होणं मनापासून आवडतं म्हणूनच ना ते रहाटपाळण्यात जीव मुठीत धरून बसतात, ' हाउस ऑफ हॉरर्स ' ना भेटी देतात, पुरानं फुफांडत चाललेल्या नदीत वा उफाळलेल्या अथांग सागरात अंग झोकून देतात, अनुल्लंघनीय गिरी-शिखरे चढून जाण्याचा अट्टाहास करतात, सर्कशीतील मृत्युगोल, ट्रॅपीझ, व्याघ्रसिंह हिंस्र पशूंची चित्तथरारक कामं धडधडत्या छातीनं मोठ्या मजेत पाहतात ?

सुरक्षित अंतरावरून भयाशी सामना करण्याचं हे सुख मी त्यांना आकंठ उपभोगू देतो. मी त्यांना भयाचं दर्शन घडवितो. कसं ? तर मनोहारी वातावरणाच्या महिरपीत वावरणारं. सौंदर्याच्या मखरात पहुडलेलं ! '

डुकराच्या पिलाच्या आवाजाची नक्कल करणाऱ्या आणि खरेखुरे डुकराचे पिल्लू बगलेत दाबून धरून त्याला ओरडायला लावणाऱ्या माणसाची वध्यांनी कशी संभावना केली ती लोककथा प्रसिद्धच आहे. हिचकॉक म्हणतो– ' लोकांना सत्य नको असते तर सत्याभास हवा असतो ! ' ' दि रॉंग मॅन ' ह्या चित्रपटाच्या निर्मितीनं त्याला ह्या सत्याची दारुण प्रचीती आली. हेन्री फोन्डा आणि वेरा माईल्ससारख्या अभिनेत्यांनी त्याच्या ह्या चित्रपटात काम केलं आहे. ' स्टोर्क क्लब ' मधल्या एका वादकावर चुकून खुनाचा आरोप येतो आणि खरा खुनी सापडेपर्यंत हा माणूस कसा होरपळून निघतो त्याची काळीज पिळवटून टाकणारी सत्य घटना कथावस्तू म्हणून हिचकॉकनं ह्या चित्रपटासाठी वापरली होती. केवळ कथाच नव्हे तर कथाविषय झालेली व्यक्ती ज्या घरात

प्रत्यक्षात राहत होती ते घर, तो रस्ता, कोर्टाची ती इमारत, त्याची पत्नी हाय खाऊन ज्या सॅनिटोरिअममध्ये दाखल झाली ते सॅनिटोरिअम, ज्या भुयारी रेल्वेनं तो घरी गेला ती रेल्वे ह्या साऱ्यांचं मूळ कथावस्तूशी इमान राखून शक्य तितक्या प्रामाणिकपणानं थेट डॉक्युमेंटरी पद्धतीनं त्यानं चित्रण केलं. लक्ष्यात ठेवा, ह्या चित्रणात नाटच्य होतं परंतु प्रेक्षकांना थक्क करून सोडणाऱ्या कसल्याही क्लृप्त्या नव्हत्या... आणि परिणामतः चित्रपट जेवढा गाजावा अशी अपेक्षा होती तेवढा काही गाजला नाही. 'दि राँग मॅन' चित्रपट ज्या पद्धतीत चित्रित केला गेला ती चित्रणपद्धतीच यशाच्या दृष्टीनं सदोष आहे हे त्याला कळून चुकले.

त्याच्या हल्लीच्या चित्रपटांविषयी जे आक्षेप सामान्यतः घेतले जातात ते ह्या लेखाच्या प्रारंभीच मी विस्तारानं दिले आहेत. हिचकॉकचं ह्या बाबतीतलं म्हणणं असं की, 'मी प्रेक्षकांना रक्तामांसाचा जरा जादा डोस देतो हे तुमचं म्हणणं एकदम कबूल. पण लोकांनाही तेच हवं असतं. आज परिस्थिती अशी आहे की लोकांना काहीही मिळमिळीत नको असतं. प्रेमिकांनी एकमेकांना प्रेमभरानं नुसतं कुरवाळलं वा आंजारलं गोंजारलं असं पडद्यावर दाखविलं तर प्रेक्षकांची तीव्र निराशा होते. त्यांना हवा असतो भावनांचा खराखुरा प्रमाथी उद्रेक; तरच ते संतुष्ट होतात. रोजची वर्तमानपत्रं नुसती चाळली तरी दिडकीला डझन ह्या भावानं झालेल्या खुनांच्या बातम्या छापून आलेल्या आपण पाहतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिटलरच्या सभोवतीच्या माणसांनी आपला नाश कसा करून घेतला ह्याच्या बातम्या तर अजून शिळ्या झालेल्या नाहीत ना? गोबेल्सच्या बायकोनं म्हणे आपल्या हातानं मुलांना विषाची इंजेक्शन्स दिली होती! ह्या सत्य घटनेपेक्षा अधिक थक्क करणारं अथवा अधिक भयप्रद कल्पितात काही असू शकेल काय? रोजच्या वृत्तपत्रांत ज्या सत्य घटना माझे प्रेक्षक प्रत्यही वाचत असतात त्यावर मात करणारं असं मी काही

कल्पनेनं निर्माण करावं अशी त्यांची अपेक्षा असणं अगदी स्वाभाविक आहे. मी तसं काही केलं नाही तर त्यांची घोर फसवणूक केल्याचं पातक माझ्या माथी आल्याखेरीज कसं राहील? 'सायको' चित्रपटाच्या निर्मितीपासून मी एक नवाच प्रेक्षकवर्ग तयार केला आहे. धक्का देणारं, स्तिमित करणारं, सणसणीत भयावह असं ह्या वर्गाला हवं आहे आणि तेच त्यांना 'वर्डस' सारख्या माझ्या चित्रपटांतून देण्याचा मी यथामती प्रयत्न केला आहे.

हिचकॉकच्या स्वभावविशेषाच्या काही बाजू त्याच्याविषयी एप्रिल १९६५ च्या 'वीणा'त जे प्रास्ताविक स्वरूपाचे मी लिहिले आहे त्यात आल्याच आहेत. खुनांच्या चित्रीकरणाद्वारे आजमिती-अखेर त्यानं किती पैसा मिळवला याची तुम्हांला कल्पना आहे? त्याच्या आजवरच्या बोलपटांचे त्याच्या खाती जमा झालेले उत्पन्न २००,०००,००० डॉलर्स आहे. ह्यासाठी आपल्या चारशे सत्याऐंशी मानसपुत्रांना त्याला वळी द्यावं लागलं आहे. ह्याचाच अर्थ हिचकॉकनं पाडलेला एकेक मुडदा ४००,००० डॉलर्स मोलाचा आहे.

हिचकॉकनं सर्व प्रकारच्या धंद्यातनं पैसा गुंतवला आहे. नाही गुंतवला तो फक्त एक अंत्यविधीच्या व्यवसायात! एका व्यापाऱ्यानं म्हणे तोही धंदा सुचविला. अंत्यविधीला लागणाऱ्या सामानाचे आणि संस्काराचे सारे मंत्रतंत्र सांभाळणारी एक राष्ट्रव्यापी संघटना स्थापन करावी व तिला 'हिचकॉक' चे नाव द्यावे की झाले. पैशाला मग तोटा नाही. ह्या संघटनेसाठी काही आकर्षक घोषवाक्यंही त्यानं सुचविली होती. उदाहरणार्थ: 'ले अवे विथ हिचकॉक', 'हिचकॉक्स लास्ट राउंडअप्' 'जॉईन हिचकॉक्स् एक्झिट सीन' इत्यादी इत्यादी.

कोणीतरी हिचकॉकला ह्या घटनेच्या सत्यतेविषयी विचारलं तसं तो म्हणाला, 'खरं आहे. अशी सूचना एकानं केली होती. मी अगदी कोंडीत सापडल्यासारखा झालो. कारण तसं हे काय माझ्या नित्याच्याच व्यवसायातलं होतं. नाहीही म्हणवेना आणि होही

म्हणवेना. अगदी हातचं काम असूनही का कोण जाणे रुकार देणं जिवावर येत होतं. ही सूचना नाकारल्यामुळे आजवर आपलं किती नुकसान झालं ह्याचा वेळोवेळी मनाशी मी हिशोब करीत असतो. पण पुढे ते जेसिका मिटफोर्डचं पुस्तक प्रसिद्ध झालं. चित्रपट धंद्यातील एकेकाचं उघडंनागडं स्वरूप तिनं जगाला दाखवून दिलं. मी बचावलो त्यातनं... माझे कटीवस्त्र स्वच्छ होते. जर का ह्या धंद्यात मी पैशाच्या लोभाला बळी पडून त्यावेळी शिरलो असतो तर... तर... खरं सांगू, जेसिका मिटफोर्डच्या त्या पुस्तकानं मी असा काही हादरून गेलो असतो, असा काही त्याचा धसका घेतला असता की कदाचित माझ्या धंद्याचे मीच गिऱ्हाईक ठरलो असतो अन् काय...!'

•••

असा एक गजेंद्र, अशी एक धुवाँधार वृष्टी

माझ्या भावविश्वात आचार्य अत्रे यांची प्रतिष्ठापना होत गेली ती छोट्या-मोठ्या प्रसंगांनी. त्यांची भाषणं मी ऐकत होतो. त्यांची नाटकं आणि चित्रपट पाहत होतो. त्यांच्या लेखणीतून उतरलेला शब्द न् शब्द मी एखाद्या अधाशासारखा पण चवीनं वाचून काढीत होतो. माझ्यासारख्या अनेक साहित्य-प्रेमिकांच्या अंतर्मनात आयुष्यात आपण अत्रे व्हावं असा छुपा आदर्श असावा असं मला आजही नक्कीच वाटतं. युद्धोत्तर काळात 'सत्यकथा' आणि 'अभिरुची'च्या बाबतीत नवोदित साहित्यिकांच्या मनीमानसी जी ओढ आणि दबदबा निर्माण झाला तीच ओढ लोकप्रियतेच्या शिखरावर आरुढ झालेल्या प्रारंभकाळातील 'नवयुग'विषयीही होती. 'नवयुग'मध्ये आपलं काही प्रसिद्ध होणं हे भाग्याचं वाटे. ते माझ्या वाटचाला आलं. अत्र्यांनी कौतुकानं माझ्या लेखनास तेव्हा प्रसिद्धी दिली इतकंच नव्हे तर ह्या पहिल्यावहिल्या लेखनाचं मानधनही त्यांच्याच हातून मला मिळालं. ही बांधीलकी कोणी झाला तरी कशी विसरणार !

मी अनेकवेळा अत्र्यांकडे ह्या ना त्या निमित्ताने गेलो असेन. अनेक ज्येष्ठ साहित्यिकांना तिथे जवळून पाहण्याचा, त्यांच्याशी मोकळेपणाने बोलण्याचा, गप्पागोष्टी करण्याचा अनुभव मी घेतला आहे. पण काही अपवाद वगळता अत्रे स्नेही परिचितांना स्वतःपासून नेहमीच एका आदरणीय अंतरावर ठेवीत असत, अशी माझी रास्त भावना झाली आहे. प्रा. फडके आणि त्यांचे एवढे युद्ध झाले पण प्रा. फडक्यांविषयी त्यांच्याकडे कोणी अनुदारपणे

बोललेलं त्यांना मुळीच खपत नसे हे मी प्रत्यक्ष पाहिलं आहे... तसेच आपल्यापेक्षा वयानं लहान असलेल्यानं मर्यादा सोडून वागलेलंही त्यांना खपत नसे. ह्या संदर्भात एक आठवण सांगण्यासारखी आहे. माझे स्नेही डॉ. अ. वा. वर्टी यांचा 'मुमताज' हा कथासंग्रह मी माझ्या 'धरित्री प्रकाशन' तर्फे प्रसिद्ध करायला घेतला होता. त्याला आचार्यांनी प्रस्तावना लिहावी म्हणून गळ घालण्यासाठी डॉ. वर्टी, मी आणि माझे एक कविमित्र असे आम्ही 'आपट हाउस'मध्ये त्यांच्या भेटीस गेलो. आमच्या आधीच प्रा. वसंत कानेटकर तिथे गप्पा मारीत बसलेले होते. अत्रे बोलत होते, आम्ही ऐकत होतो. तेवढ्यात आमच्या कविमित्रानं झब्ब्याच्या खिशातून एकुलती एक सिगारेट काढून सरळ ओढायला सुरुवात केली. थोड्या वेळानं काही काम निघालं म्हणून तो तिथून निघून गेला. त्याची पाठ वळताच अत्रे कडाडून म्हणाले, 'हा माझ्याकडे प्रूफ करेक्टर म्हणून नोकरीला होता. आणि आता खुशाल माझ्या मांडीला मांडी लावून धूर सोडतोय. माझ्या हाताखाली विद्यार्थी म्हणून असता तर छडीने चांगला फोडून काढला असता!' अत्र्यांची तेव्हाची नाराजी आणि संताप अजूनही डोळ्यासमोर स्पष्ट दिसतोय.

ह्याच बैठकीत मी कुसुमाग्रजांच्या वैष्णव कादंबरीचा विषय काढला. तिची प्रत त्यांना मी आधीच धाडली होती. अत्र्यांनी आपल्या पुस्तकाच्या चळतीतनं ती प्रत शोधून काढली आणि म्हणाले, 'पहा'. कादंबरीच्या आसपासच्या पानावर त्यांच्या ढगळ हस्ताक्षरात त्यांनी विस्तृत टिपणं केलेली होती. मग पहिलं पान काढीत त्यांनी एक वाक्य वाचलं आणि मिस्किलपणे म्हणाले, 'अरे, तुमचे शिरवाडकर संस्कृतमध्ये का नाही लिहीत? हे काय दहा शब्दाच्या एका वाक्यात आठ संस्कृत शब्द! आणि विनायक हे काय मास्तरचे नाव असते? मास्तर म्हणजे पांडू मास्तर, मास्तरांचं नाव पांडू असलं, की मास्तर कसा लख्ख डोळ्यासमोर उभा राहतो...' भाषेविषयी, व्यक्ती आणि पात्रांच्या नावाविषयी त्यांचे असे काही घट्ट पूर्वग्रह असायचे. काही ठाम कल्पना असत.

आचार्य अत्रे कटाक्षानं ज्यांच्या दिवाळी अंकासाठी आवर्जून लेखन साहाय्य करीत त्यात आमचं 'वीणा'ही समाविष्ट होतं. त्यासाठी त्यांच्याकडून लेख पदरात पाडून घेणे हा एक रोमहर्षक अनुभव असे आणि तो दरवर्षी माझ्या वाटचाला येई सकाळी बोरिवलीहून निघून दादरला उतरणे आणि टॅक्सी करून 'आपट हाउस'वर पोहोचणे. कितीही लौकर जा तिथे दरबार गच्च भरलेला असायचा. नाना प्रकारची मंडळी त्यात असायची. जॉर्ज फर्नांडीस, मधू लिमये, रिपब्लिकन पक्षाचे एखादे कार्यकर्ते, जवळपास राहणारे कोणी बॅरिस्टर, संयुक्त महाराष्ट्र चळवळीशी संबंधित कोणी कार्यकर्त्या बाई. आचार्य एकटे बोलत असायचे. विषयाला बंधन नसायचे पण जे कानावर पडे ते रोचक असायचे. आपण लेख न्यायला आलोय, की गप्पा ऐकायला याचा माझा मलाच भ्रम पडे. अकरा वाजून जात. नानी-शिरीष पै ऑफिसच्या वाटेवर इथं थोडं थांबून अत्र्यांना अग्रलेखाची आठवण करून देत. मग मात्र मंडळी काढता पाय घेत. शेवटी मी एकटा उरे. उठता उठता अत्रे म्हणत, 'तुमचा लेख ना? अहो, दिवाळीला अजून कितीतरी अवकाश आहे उगाच तुमची आपली घाई. देतो. काही तरी देतो...' आणि मग पुन्हा काहीसं स्वतःशीच, काहीसं मला उद्देशून म्हणत, 'गेली सत्तावीस वर्षे लिहितोय. आता आणखी नवीन ते काय लिहिणार? बरं, या संध्याकाळी. 'शिवशक्ती'वर चक्कर टाका, देतो काहीतरी...'

संध्याकाळी शिवशक्तीवर फोन करावा तर व्यंकटेश पैंचे उत्तर येई, 'पपांना आम्ही तुमचाच लेख लिहायला खोलीत कोंडून ठेवलंय. रात्री घरी भेटा त्यांना नऊ साडेनऊला...' मोठ्या उत्साहानं पुन्हा ग्रॅन्ट रोड ते दादर टॅक्सीनं. 'आपट हाउस' हॉलमध्ये प्रविष्ट होऊन कुठे बसतो न बसतो तोच सुधाबाई येत. मग एकीकडे त्यांच्याशी गप्पा मारीत 'साहेबां'ची येण्याची वाट पाहणे. सुधाबाई धीर देत म्हणत, 'काही काळजी करू नका. हे तुम्हांला लेख नक्की देतील. त्यांच्या डोक्यात सगळं काही तयार

असतं. जरा वसून नीटपणे लिहायला त्यांना स्वस्थता मिळायला मात्र हवी...'

रात्री साडेदहा अकराच्या दरम्यान अत्रे घरी येत आणि मी उठून उभा राहताच चारसहा कॉप्या माझ्या हातात कोंबत घाई-घाईनं म्हणत, 'सकाळी या, पुढच्या कॉप्या देतो तुम्हांला...' रात्री बोरिवलीला घरी पोहोचेपर्यंत मला बारा साडेबारा होत. 'आज नाही बाळा सकाळी ये...' हे प्रकरण असंच आणखी चार सहा दिवस चालू राही आणि मग पुरा लेख पदरात पडे. वैयक्तिक सोय गैरसोय हा भाग ह्यात गौण आहे. ह्या लेखापेक्षा त्या काळात त्यांच्या बैठकीत जे ऐकायला मिळे त्याचा आनंद शब्दातीत आहे.

आचार्य अत्रे हाडाचे शिक्षक होते हेच खरं. मालाडला भरलेल्या मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे मी आणि शशिशेखर वेदक संयुक्त कार्यवाह होतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतला तो ऐन धामधुमीचा काळ होता. अत्र्यांनी ह्या संमेलनास उपस्थित राहयला हवे यासाठी आम्ही धडपडत होतो. आणि त्यांच्या झंजावाती दौऱ्यामुळे ते हाती लागणे कठीण होऊन बसले होते. अखेर एक दिवस रात्री आम्ही त्यांना घरी गाठले. स्वागताध्यक्ष बॅ. पिंपुटकरांच्या भाषणाची एक प्रत त्यांना दिली. त्यांनी भराभर त्या पुस्तिकेची पाने उलटली. त्यांच्या भाषेत म्हणजे ते पुस्तिकेचा 'वास घेणं' होतं. आणि लगेच ते गरजले, 'ह्यात एक मोठ्ठा प्रमाद झालाय!' आम्ही क्षणमात्र त्यांच्याकडे भयभीत नजरेनं पाहातच राहिलो. मग ते हसत म्हणाले, 'ह्यात मालाड ते बोरिवलीतल्या अनेक साहित्यिकांची जंत्री दिलीत अन् माझ्या-सारखा मोठा साहित्यिक मात्र त्यातून कटाप केलात! अहो लॉंच्या टर्म्स भरताना ह्या तुमच्या मालाडमध्ये मी राहिलो आहे. तसा मी मालाडचाच!' त्यांच्या ह्या स्पष्टीकरणानं माझा जीव एकदम भांड्यात पडला. मग म्हणाले, 'येईन मी मालाडला, जोडा प्रभातच्या कोठाऱ्यांना ट्रंककॉल. एक मीटिंग आहे ती कॅन्सल करून टाकू...' मी माझ्या पद्धतीनं ऑपरेटरला सूचना दिली तसं

अत्रे आवाज चढवत म्हणाले, 'तुमचं हे इष्टुर फाकड्यासारखं इंग्रजी बोलणं त्या बिचाऱ्या ऑपरेटरच्या डोक्यात कसं शिरणार? जरा सावकाश सांगा त्याला सारं काही...' आणि असं म्हणत ते स्वतः उठले आणि ट्रंककॉल कसा बुक करायचा त्याचा यांनी एक आदर्श वास्तुपाठच मला घालून दिला. आता जेव्हा जेव्हा मी ट्रंककॉल लावण्यासाठी रिसीव्हर हातात घेतो तेव्हा अंतर्मनात कुठेतरी अत्रे उभे असतात.

आचार्य अत्रे यांना नवीन लेखकांविषयी प्रेम, कुतूहल आणि कौतुक होते ह्या बाबतीत दुमत व्हायचं कारण नाही. इथे एक प्रसंग आठवतो. स्व. इंदू साक्रीकरांच्या 'निळाई' ह्या कथासंग्रहाचा ग्रीन्स हॉटेलमध्ये प्रकाशन समारंभ होता. आचार्य अत्रे यांच्या हस्ते हा संग्रह प्रकाशित होणार होता व मी एक वक्ता होतो. अत्र्यांच्या शेजारीच माझी खुर्ची होती आणि मला एकदम नर्व्हस वाटायला लागलं. अत्र्यांनी माझी कावरीबावरी मनःस्थिती आणि चुळबुळ ओळखली आणि माझ्याकडे वळून म्हणाले, 'काय हो, काय होतंय?'

'तुमच्या साक्षीनं काही बोलायचं म्हणजे फार भय वाटतं... मी अगदी नर्व्हस आहे...'

'ह्यॅः! नर्व्हस आम्ही व्हायचं–भीती आम्हांला की याचं एकदा सुरू झालं की संपणार कसं आणि कधी! बोला ठणकावून–मी काय खातोय तुम्हांला?'

मी काहीच बोललो नाही. माझी वेळ येताच मला काय बोलायचं ते बोललो. कार्यक्रम संपल्यावर डायसवरून खाली उतरता उतरता ते माझ्याजवळ आले. थांबले, आणि माझ्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले, 'छान झालं तुमचं... मला आवडलं...' मी गोंधळून काहीशा साशंक मुद्रेनं त्यांच्याकडे पाहिले तसं ते म्हणाले, 'तुम्हांला एक आठवण सांगतो माझी. पुण्याच्या शिवाजी मंदिरात बॅ. जयकरांचं भाषण होतं. भाषण अप्रतिम

रंगलं. भाषण आवडल्याचं मी बॅ. जयकरांना सांगितलं तसं तिथे उभे असलेले शि. ल. करंदीकर म्हणाले, 'तुमच्या सर्टिफिकेटाची जरुरी नाही बॅ. जयकरांना.' त्यावर बॅ. जयकर ताडकन् म्हणाले, 'का नाही ? माझं भाषण चांगलं झालं, आवडलं असं कोणी सांगितलं तर मला अजूनही फार आनंद होतो...' आणि इतकं बोलून आचार्य झटकन पुढे निघून गेले. त्यांना माझं भाषण खरोखरीच आवडलं होतं. कारण दुसऱ्याच दिवशी शिरीषनं फोन करून सांगितलं की, 'पपांना तुमचं भाषण फार आवडलं, रात्री घरी येताच त्यांनी मला फोन करून समग्र वृत्तांत दिला...'

आचार्य अत्रे यांच्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाविषयी अनेकांनी आपापल्या मगदुराप्रमाणे आजवर लिहिलं आहे. मीही थोडं-बहुत लिहिलं आहे. आणखीही खूप लिहिलं जाईल– पण तो वेगळा विषय आहे. माझ्या भावजीवनात आचार्यांचे जे स्थान आहे, कळत नकळत मी त्यांच्यापासून जे मिळविले आहे त्याचा मागोवा घेण्याचा मी इथं एक नम्र प्रयत्न करीत आहे. अगदी अलेरची एक आठवण स्मरते. सौ. शिरीष पै यांनी निमंत्रितांसाठी आयोजित केलेल्या आचार्य रजनीश यांच्या एका प्रवचनास उपस्थित राहण्यासाठी मी शिवशक्तीवर गेलो होतो. प्रवचन आटोपल्यावर काही शेलक्या मंडळींना आचार्य अत्रे यांनी मुद्दाम थांबवून घेतलं–त्यात कविवर्य मंगेश पाडगावकर होते, वा. रा. कांत होते, सौ. पद्मा लोकूर होत्या... कॉफी आली, गप्पा रंगत होत्या आणि अशावेळी आचार्य मैफलीचे बादशहा असत. अनेक जुन्या नव्या आठवणी, किस्से, नकला ! आचार्यांनी बोलत असावे आणि आपण ऐकत राहावे अशी आम्हां सर्वांचीच भावना त्यावेळी झाली होती.

मग मध्येच कशावरूनसा काही विशिष्ट व्यक्तींतल्या भांडखोर प्रवृत्तीचा विषय मी उपस्थित केला. त्यावर आचार्यांनी आपले दोन अनुभव रंगवून, खुलवून सांगितले आणि एखादे सबंध सत्य सांगून टाकावे अशा थाटात म्हणाले, 'लोक उगाच भांडतात...

अत्रे आवाज चढवत म्हणाले, 'तुमचं हे इष्टुर फाकड्यासारखं इंग्रजी बोलणं त्या बिचाऱ्या ऑपरेटरच्या डोक्यात कसं शिरणार? जरा सावकाश सांगा त्याला सारं काही...' आणि असं म्हणत ते स्वतः उठले आणि ट्रंककॉल कसा बुक करायचा त्याचा यांनी एक आदर्श वास्तुपाठच मला घालून दिला. आता जेव्हा जेव्हा मी ट्रंककॉल लावण्यासाठी रिसीव्हर हातात घेतो तेव्हा अंतर्मनात कुठेतरी अत्रे उभे असतात.

आचार्य अत्रे यांना नवीन लेखकांविषयी प्रेम, कुतूहल आणि कौतुक होते ह्या बाबतीत दुमत व्हायचं कारण नाही. इथे एक प्रसंग आठवतो. स्व. इंदू साक्रीकरांच्या 'निळाई' ह्या कथासंग्रहाचा ग्रीन्स हॉटेलमध्ये प्रकाशन समारंभ होता. आचार्य अत्रे यांच्या हस्ते हा संग्रह प्रकाशित होणार होता व मी एक वक्ता होतो. अत्र्यांच्या शेजारीच माझी खुर्ची होती आणि मला एकदम नर्व्हस वाटायला लागलं. अत्र्यांनी माझी कावरीबावरी मनःस्थिती आणि चुळबुळ ओळखली आणि माझ्याकडे वळून म्हणाले, 'काय हो, काय होतंय?'

'तुमच्या साक्षीनं काही बोलायचं म्हणजे फार भय वाटतं... मी अगदी नर्व्हस आहे...'

'ह्यॅ:! नर्व्हस आम्ही व्हायचं–भीती आम्हांला की याचं एकदा सुरू झालं को संपणार कसं आणि कधी! बोला ठणकावून–मी काय खातोय तुम्हांला?'

मी काहीच बोललो नाही. माझी वेळ येताच मला काय बोलायचं ते बोललो. कार्यक्रम संपल्यावर डायसवरून खाली उतरता उतरता ते माझ्याजवळ आले. थांबले, आणि माझ्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले, 'छान झालं तुमचं... मला आवडलं...' मी गोंधळून काहीशा साशंक मुद्रेनं त्यांच्याकडे पाहिले तसं ते म्हणाले, 'तुम्हांला एक आठवण सांगतो माझी. पुण्याच्या शिवाजी मंदिरात बॅ. जयकरांचं भाषण होतं. भाषण अप्रतिम

रंगलं. भाषण आवडल्याचं मी बॅ. जयकरांना सांगितलं तसं तिथे उभे असलेले शि. ल. करंदीकर म्हणाले, 'तुमच्या सर्टिफिकेटाची जरुरी नाही बॅ. जयकरांना.' त्यावर बॅ. जयकर ताडकन् म्हणाले, 'का नाही ? माझं भाषण चांगलं झालं, आवडलं असं कोणी सांगितलं तर मला अजूनही फार आनंद होतो...' आणि इतकं बोलून आचार्य झटकन पुढे निघून गेले. त्यांना माझं भाषण खरोखरीच आवडलं होतं. कारण दुसऱ्याच दिवशी शिरीषनं फोन करून सांगितलं की, 'पपांना तुमचं भाषण फार आवडलं, रात्री घरी येताच त्यांनी मला फोन करून समग्र वृत्तांत दिला...'

आचार्य अत्रे यांच्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाविषयी अनेकांनी आपापल्या मगदुराप्रमाणे आजवर लिहिलं आहे. मीही थोडं-बहुत लिहिलं आहे. आणखीही खूप लिहिलं जाईल– पण तो वेगळा विषय आहे. माझ्या भावजीवनात आचार्यांचे जे स्थान आहे, कळत नकळत मी त्यांच्यापासून जे मिळविले आहे त्याचा मागोवा घेण्याचा मी इथं एक नम्र प्रयत्न करीत आहे. अगदी अलेरची एक आठवण स्मरते. सौ. शिरीष पै यांनी निमंत्रितांसाठी आयोजित केलेल्या आचार्य रजनीश यांच्या एका प्रवचनास उपस्थित राहण्यासाठी मी शिवशक्तीवर गेलो होतो. प्रवचन आटोपल्यावर काही शेलक्या मंडळींना आचार्य अत्रे यांनी मुद्दाम थांबवून घेतलं–त्यात कविवर्य मंगेश पाडगावकर होते, वा. रा. कांत होते, सौ. पद्मा लोकूर होत्या... कॉफी आली, गप्पा रंगत होत्या आणि अशावेळी आचार्य मैफलीचे बादशहा असत. अनेक जुन्या नव्या आठवणी, किस्से, नकला ! आचार्यांनी बोलत असावे आणि आपण ऐकत राहावे अशी आम्हां सर्वांचीच भावना त्यावेळी झाली होती.

मग मध्येच कशावरूनसा काही विशिष्ट व्यक्तींतल्या भांडखोर प्रवृत्तीचा विषय मी उपस्थित केला. त्यावर आचार्यांनी आपले दोन अनुभव रंगवून, खुलवून सांगितले आणि एखादे सबंध सत्य सांगून टाकावे अशा थाटात म्हणाले, 'लोक उगाच भांडतात...

निष्कारण...' तसं पाडगावकर मिस्किलपण डोळे मिचकावीत आचार्यांना म्हणाले, 'म्हणजे हे तुमचं अलीकडचं मत दिसतंय ?' त्यावर अत्रे एकदम गंभीर होत म्हणाले, 'छेः छेः, हे माझं अगदी पहिल्यापासूनचं मत आहे. दाखवून द्या मी कोणाची आपण होऊन कुरापत काढलीय अन् भांडायला गेलोय ते...!'

वयाच्या सत्तरीला त्यांच्या वाचनाचा, लेखनाचा आणि हसत-मुखाने जीवनाला सामोरे जाण्याचा त्यांचा हा झपाटा पाहिला आणि दिपून गेलो. अंतर्मुख झालो. त्यांच्या ठायी प्रतिभा होती, अपरंपार कष्ट करण्याची जिद्दही होती. परिश्रमाविना प्रतिभा व्यर्थ आहे ह्याची डोळस जाणीव याही वयात कायम होती. मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती यांची ज्याला ओळख करून घ्यावयाची आहे त्याला आचार्य अत्रे यांचे वाङ्मय डावलता येणे अशक्य आहे. चारदोन शतकांतून असं युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व उमलतं, आकारास येतं आणि म्हणूनच त्याच्या चिरंजीवित्वाविषयी मन निःशंक असतं.

आचार्य अत्रे नेहमी सांगत की, 'हत्ती कसा पाहावा तर मदावर आला असताना ? पाऊस कसा पाहावा, तर शतसहस्र धारांनी धो धो कोसळत असताना !' असा एक गजेंद्र आणि अशी एक ध्रुवांधार, वृष्टी आचार्यांच्या रूपानं मी पाहात आलो आहे. आचार्यांचे ऐनपणातले आणि बहराला आलेले वाणी-लेखणीचे कर्तृत्व एका आदरणीय अंतरावरून पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभलेले आहे. ह्याचा आजही मला रास्त अभिमान वाटतो.

•••

अजून यौवनात मी....

ऑफिसमध्ये मी एकटाच आहे. बाहेर मिट्ट काळोख उसळतोय. नुकतीच एक जोरदार सर पडून गेलीय. हवा ओली आहे. वातावरण कुंद बनत चाललंय. नानासाहेबांचा फोन होता. ते येणार आहेत. आता येतील, मग येतील म्हणून केव्हाची वाट पाहतोय. धारवाड-हुबळीकडच्या दौऱ्यावरून ते नुकतेच परत आले आहेत. आता सांगण्यासारखं त्यांच्याजवळ खूप काही असणार म्हणून उत्सुकतेनं मी त्यांच्या येण्याची वाट पाहतोय.

नानासाहेब येतात आणि खुर्ची पुढे ओढून बसतात. त्यांच्या मुद्रेकडे माझी नजर जाते आणि त्यांना काही विचारायचा, बोलायचा धीरच होत नाही मला. फार थकल्यासारखे दिसतात ते मुद्रा संत्रस्त दिसतेय. डोळ्यात विषण्ण भाव आहे. ओठाजवळच्या कोपऱ्यात उमटलेलं सुरकुत्यांचं वर्तुळ मनात काही तरी कडवट खळाळतंय ह्याची जाणीव देत आहे. थोडावेळ ते तसेच स्तब्ध बसून राहतात आणि मग अचानक आपल्या झुडुपी भुवया उंचावून माझ्याकडे रोखून पाहत एकाएकी प्रश्न करतात, 'आटोपलं तुमचं इथलं? बाहेर जाऊ या कुठेतरी. निवांत रेस्तोराँमध्ये बसू या...'

आम्ही दोघं ऑफिसमधून बाहेर पडतो आणि मूकपणे समोरच्या रेस्तोराँच्या दिशेनं चालू लागतो. नानासाहेब मध्येच थबकतात, उद्विग्नतेनं एकदम म्हणतात, 'आत्ता झगडा करून आलोय. खूप भांडलो. साफ सांगितलं त्यांना, माझ्याच्यानं हे होणार नाही. जमणार नाही मला ते. मला गळ घालू नका...' नानांच्या आवाजात संताप होता आणि डोळ्यात संत्रस्त खिन्नता

होती. बोलायचे ते मध्येच थांबले आणि माझ्या प्रतिक्रियेवरच जणू सारं काही अवलंबून आहे अशा स्वरात त्यांनी म्हटलं, 'नाटचप्रयोग बसवा म्हणत होते मला. कसा बसवणार ते तुम्हीच सांगा आता. ज्यांच्या साथीमुळे प्रयोग पूर्वी गाजला त्या बाई काम करायला तयार नाहीत, काम करायला मोकळचा नाहीत. नवीन नटी शोधायची. तिला तयार करायची. आता वेळ किती उरलाय ? आणि साऱ्या शक्ती ह्या कार्यावर केंद्रित करायच्या तर महिना कडेला लावायचा कसा ? त्याचा कोणी काही उच्चारच करायला तयार नाही ! स्पष्ट बोलल म्हणजे नाना फटकळ ठरतो !!'

नानासाहेब हे आणि असंच बरचसं काही खूप वेळ बोलत राहिले. घरी पत्नीचं आजारीपण, हुबळी-धारवाडकडच्या दौऱ्यात झालेली दगदग आणि मतभेद माजविणाऱ्या घटना ह्यांनी त्यांचे मन पार कडू झाल्यासारखे होऊन गेले होते.

नाना संयमी आहेतही आणि नाहीतही काही काही गोष्टींनी त्यांच्या मनात कायमचे घर केले आहे आणि त्या त्यांच्या मनातून निघून जातील अशी शक्यताही नाही. आपली स्वतःची नाटकमंडळी नव्हती, आपण नाटक मंडळीचे कधी मालक नव्हतो, आपल्या भूमिका आपण निवडाव्यात असं कधी घडलं नाही. ज्या भूमिका वाटचाला आल्या त्या आपण प्रामाणिकपणे उभ्या केल्या. त्यातल्या काही लोकांना कमालीच्या आवडल्या. त्या लोकांना का आवडल्या ह्याचे त्यांचे त्यांनाच मोठे नवल वाटते. कारण लोकांच्या पसतीस उतरलेल्या कित्येक भूमिका त्यांच्या त्यांनाच मनापासून कधी आवडलेल्या नव्हत्या. आपण जीवनासाठी कला राखवली, आपल्या अधिकारात स्वतंत्रपणे काही करून दाखवावे अशी संधीच कधी चालून आली नाही. आपण एकांडे शिलेदार, गटबाजीचा तिटकारा करणारे आणि परिणामतः आपल्या नाटचगुणांची कर्तृत्वाच्या मानानं थोडी उपेक्षाच झाली. नानांच्या अंतर्मनातल्या प्रवाहाचा मला अंदाज येतो तो अशा.

आताही नानांचे अभिनंदन करण्यासाठी फोनचा रिसीव्हर उचलताना माझ्या मनात नेमकं हेच सारं काही क्षणभर तरळून गेलं. त्या पावसाळी संध्याकाळी माझ्या ऑफिसमध्ये विमनस्क मनःस्थितीत विषण्ण मुद्रेने बसलेल्या नानांचा चेहरा डोळ्यासमोर आला आणि प्रयत्न करूनही तो तिथून हलता हलेना.

हैदराबादला भरणाऱ्या ४१ व्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी नानांची बिनविरोध निवड झाल्याचे वृत्तपत्रांत वाचले आणि त्यांचे अभिनंदन करावे म्हणून लगोलग मी फोन उचलला. नाना फोनवर यायची वाट पाहत स्तब्ध राहिलो. अनेक कडू-गोड स्मृती मनात चाळवू लागलो. पलीकडच्या बाजूला थोडीशी हालचाल झाल्याचे रिसीव्हरने टिपले आणि त्यापाठोपाठ झोपेने जडावलेला नानांचा संथ, दमदार, परिचित स्वर कानी आला 'कोण ?' नेहमीप्रमाणे नानांनी विचारलं आणि नाव सांगताच पलीकडे ते किंचित अस्फुट हसल्याचा मला भास झाला. नानांच्या आवाजातली झोप कुठल्याकुठं पळाली होती आता. एखाद्या निर्व्याज बालकाच्या उत्तेजित स्वरात ते कितीतरी वेळ बोलत होते. आपले अनेक मनसुबे दिलखुलासपणे बोलून दाखवीत होते. 'ह्याचे सारे श्रेय तुम्हांलाच आहे.' असं कर्णाच्या औदार्यानं सुचवून मला अकारण लाजवत होते. या बहुमानाने त्यांचा जीव सुखावला होता हयात मला तरी कसलीच शंका वाटत नव्हती. इतक्यात नानांचा आवाज किंचित तीव्र झाला. आवाजाला दुःखाचा सल होता आणि स्वरात भावविवश कंप होता. नाना म्हणत होते, 'ऐन उमेदीच्या काळात खूप देखणा दिसत होतो मी. किती देखणा हयाची कशी कल्पना देऊ मी तुम्हांला ? तारुण्याचा जोम होता. मी भूमिका केलेली नाटकं गाजत होती. माझ्या भूमिका एकासरस एक वठत होत्या. संगीत-नाटकाची मोहिनी प्रेक्षकांवर गाढ पसरलेली असताना माझ्यासारख्या नटानं गद्य भूमिका कधी कुठे उणी पडू देऊ नये हे श्रेय काही कमी नव्हते; पण तेव्हा कुठं कोणाला काही करायचं सुचलं नाही. आणि आता साठीच्या उंबरठ्यावर उभा असताना, माझ्या गाजलेल्या भूमिका

पाहयला लोकांनी गर्दी करावी याला काय म्हणावं ? हा आंबट-शोकच नव्हे काय ? आणि आता हे नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद !'

'तुमच्या चाळीस वर्षांच्या नाट्यतपस्येचा हा गौरव आहे नानासाहेब. रंगभूमीचा जो काळ तुम्ही गाजवलात, अजूनही गाजवता आहात त्याचाही हा अप्रत्यक्ष गौरवच आहे...' मझ्या या बोलण्यावर नाना थोडावेळ गप्प बसले आणि मग एकदम काहीतरी आठवल्यासारखं करून म्हणाले, 'कधी भेटता ? घरी या म्हणजे स्वस्थपणे बोलता येईल. फोनवर कितीही बोललं तरी ते अपुरंच राहतं...' मी भेटीची वेळ ठरवली आणि फोन खाली ठेवला.

●

नानासाहेबांशी भेटीची वेळ ठरवून मी फोन खाली ठेवला खरा पण जो हेतू मनात धरून आता मी त्यांना भेटणार होतो त्या हेतूच्या सफलतेविषयी माझा मीच साशंक झालो आणि माझा सारा उत्साह एकाएकी गळाठल्यासारखा झाला. अध्यक्षीय भाषण लिहून काढण्यासाठी त्यांना आता स्वास्थ्य आणि वेळ हवा होता. 'वीणा'च्या जानेवारी ५९ च्या अंकासाठी लिहायला घेतलेला 'मॅकबेथ'वरील त्यांचा लेख ह्या संमेलनाच्या गडबडीत पुरा होणं जवळजवळ अशक्य होतं आणि पर्याय म्हणून त्यांच्याविषयीच एखादा छोटासा लेख आपण ह्या निमित्तानं लिहून प्रसिद्ध करावा ह्या विचारानं मनात मूळ धरलं. पण हे काम कसं आणि किती अवघड आहे ह्याची जाणीव व्हायला फारसा वेळ लागला नाही. स्वतःला टाळून नानांसंबंधी काही लिहावयाचं म्हणजे ती एक तारेवरची कसरतच होणार होती हे एक, आणि दुसरं म्हणजे आज उण्या पुऱ्या चौदा-पंधरा वर्षांच्या अगदी निकटच्या स्नेहसंबंधानंतरही नानांचं पूर्वायुष्य आणि व्यक्तिगत जीवन मला बहुतांश अपरिचितच राहिलं होतं. काळाची भर पडूनही तत्संबंधीच्या ज्ञानात काडीचीही भर पडलेली नव्हती. मी होतो तिथं होतो. नानांच्या इतक्या जवळ येऊनही इतका दूर राहिलो होतो.

●

नानांना वाचनाचे दांडगे व्यसन आहे हे मी जाणून होतो परंतु ते कधी काळी काही लिहितील ही कल्पना स्वप्नातदेखील कधी मला शिवली नव्हती आणि म्हणूनच– 'मी काही लिहिलं आहे. तुम्हांला दाखवावयाचं आहे. तुम्ही एकदा डोळ्याखालून घाला...' असे त्यांचे लागोपाठ दोन निरोप आले तसा मी जसा विस्मयाने तसाच आनंदानेही थक्क झालो. वास्तविक नानांनी काही लिहिले आहे ह्याचे मला आश्चर्य वाटावयास नको होते. मराठी नटश्रेष्ठांची ती परंपराच आहे मुळी! मराठी नट नुसते नट नाहीत तर ज्या सफाईनं, सहजतेनं नाट्याचार्यांनी लिहिलेल्या शब्दात ते भावानुकूल स्पष्ट आणि स्वच्छ वाणीनं प्राण ओततात त्याच सहजतेनं आणि सफाईनं ते शैलीदार मराठीही लिहू शकतात– हे कै. गोविंदराव टेंबे, नटवर्य गणपतराव बोडस आणि नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर ह्यांच्या ग्रंथांवरून माझ्या ध्यानी यावयास हवे होते.

१ जानेवारी १९५८ रोजी ललितकलादर्श नाटकमंडळीचा सुवर्णमहोत्सव साजरा व्हावयाचा होता. त्यानिमित्तानं नानासाहेबांनी स्मृती-स्वरूपात काही लिहावं अशी श्री. भालचंद्र पेंढारकरांनी त्यांना विनंती केली होती. नानांनी लिहिलेलं मी बसल्या बैठकीला वाचून काढलं. त्यातील कै. केशवराव भोसले ह्यांच्या 'ललितकलादर्श' संबंधीचा भाग मला विशेष हृद्य वाटला– वाटलं नानांनी परंपरा सांभाळली आहे. मनात आणलं तर ते लिहू शकतील. चांगलं लिहितील. त्यांनी लिहायला मात्र हवे.

मी आत्मचरित्राचा विषय काढला तेव्हा नाना थोडावेळ गप्प बसले आणि मग निर्धारानं एक एक शब्द उच्चारीत म्हणाले, 'नको. आत्मचरित्र लिहावयाच्या मी विरुद्ध आहे. नटाची व्यसनं, नाटकमंडळीच्या तथाकथित वैभवाची चविष्ट वर्णनं, मालक-वर्गातल्या लाथाळ्या, त्यांची कारस्थानं, क्षुद्र हेवे-दावे, सवंग मौज-मजाह आणि चावून चिकट झालेल्या त्याच त्या उल्लू

आख्यायिका, थिल्लर कोटचा, म्हणजेच आत्मचरित्र हे जे नवेच समीकरण अलीकडे तयार होऊ पाहते आहे त्या पंक्तीत जाऊन बसायचा मला आग्रह का करता ?'

नानांचा मुद्दा बिनतोड होता. पटण्यासारखा होता. आपलं म्हणणं माझ्या नीट ध्यानी यावं म्हणून नाना पुढं म्हणाले, 'आज सिनेनटांविषयी सर्वसामान्यांत जे कुतूहल आहे ते त्या काळातल्या प्रसिद्ध नटांविषयी प्रेक्षकांना होतं. आपल्या लाडक्या नटाशी स्नेह जोडण्यासाठी ते अनेक युक्त्या-प्रयुक्त्या योजीत, त्याला भेटी पाठवत, मेजवान्या देत, त्याच्यासाठी पैसा उधळत, त्याच्याशी पत्रव्यवहार जोडीत. स्त्रियाही क्वचित नादावत, घरप्रपंच सोडून त्याच्यासाठी सर्वस्वाची आहुती द्यायला सिद्ध होत. पण तसं पाहिलं तर समाजातल्या इतर अनेक क्षेत्रांतून ह्या गोष्टी अगदी ह्याच पद्धतीनं आज वर्षानुवर्षं घडत आहेत. नटांपुरतं स्तोम माजविण्यात विशेष काय आहे ? मी आजवरच्या आयुष्यात जीवनाचे सारे रंग पाहिले आहेत. काही करायचे म्हणून शिल्लक ठेवलेले नाही. जीवनात मी तृप्त आहे. परंतु त्याचबरोबर हेही खरे की नटाच्या जीवनात जी सदाची आर्थिक अनिश्चितता असते तिचा तोंडवळा मी सुरुवातीलाच नीट ओळखला आणि जे केलं ते फार विचारपूर्वक आणि संयमानं केलं. स्वतःला बंधनं घालून घेतली, अगदी जाणीवपूर्वक आणि कधी तोल सुटू दिला नाही...'

नानासाहेब बोलायचे थांबले. त्यांनी सिगार शिलगावला आणि सांगावे की न सांगावे अशा मनाच्या अनिश्चित स्थितीत डोळे किंचित बारीक करीत, विचारात गढल्यासारखे होत अर्धवट स्वतःशीच अर्धवट मला उद्देशून म्हणाले, 'माझा एक श्रीमंत मित्र होता. माझा फार मोठा चाहता. मुंबईत आमची कंपनी असली की, त्याची गाडी दिवसरात्र माझ्या दिमतीला असायची. एकदा अशीच रात्रीची आम्ही कुलाब्याकडच्या उंची हॉटेलमध्ये उत्तररात्रीपर्यंत मौज केली. दुसऱ्या दिवशी तो माझ्याकडे आला आणि म्हणाला, 'नाना, रात्री पैसे तर खूप खर्च केले. मला सारंच

काही नीट आठवत नाही. पंधराशे रुपयांचा पत्ता लागत नाही. पैसे खर्च होते तर त्याचं विशेष काही नव्हतं. पण हे चोरापोरी कुठंतरी गेले ह्याची उगाच चुटपुट लागून राहिली आहे केव्हाची. मी हसलो आणि उठून कोटाच्या खिशातलं पंधराशे रुपयांच्या नोटांचं बंडल काढलं. त्याच्या हाती देत म्हटलं, 'रात्री गाडीत माझ्या मांडीवर पडलं हे. त्यावेळी तुझ्या हाती देण्यात काहीच अर्थ नव्हता.' मला वाटतं, त्यावेळी मी माणसासारखा वागलो. एखादा सर्वसामान्य माणूस अशा प्रसंगी जसा वागला असता तसाच वागलो. चैन करतानाही ही गोष्ट आपल्याला परवडणारी नाही आणि सदा झेपणारी नाही ही भावना मनात कुठंतरी सदैव जागृत असायची माझ्या.

नासिकच्या मुक्कामातली एक गोष्ट सांगतो. एक श्रीमंत कुटुंबातली सुस्वरूप स्त्री माझ्यासाठी नादावली. माझ्याशी लग्न करायची तिची इच्छा होती. उभ्या नासिकला ही गोष्ट माहीत आहे. तिच्याशी मी लग्न केलं असतं तर चाळीस हजारांची माया घरात आली असती. लग्न केलं नसतं तरी नीतिबाह्य सुख उपभोगणं कठीण नव्हतं मला तिच्या बाबतीत, पण आम्ही दोघंही संयमानं वागलो. तिची समजूत मी पटवली. माझं लग्न आधीच झालेलं होतं आणि गृहस्वास्थ्य ही गोष्ट मी सदैव पवित्र मानत आलो होतो. अखेरपर्यंत आमच्यातला जिव्हाळा कायम होता. परवाच ती वारली तेव्हा एखाद्या मुलासारखा कळवळून रडलो.' नानासाहेबांचा सिगार विझत आला होता. त्यांनी राख झाडली आणि तो पुन्हा पेटवला. माझ्याकडे रोखून पाहत म्हणाले, 'मी कधी कोणाला आजवर न सांगितलेल्या दोन अगदी नाजूक गोष्टी आज तुमच्याजवळ बोललो. सांगा मला, हे सारं छापण्यात काय अर्थ आहे? वाचकाची फाजील जिज्ञासा चेतवण्यापलीकडे ह्यात अधिक काय साधणार आहे? आत्मचरित्राची गळ तुम्ही मला घालू नये, असं मला वाटतं ते केवळ ह्या प्रामाणिक कारणांमुळेच...'

आणि मग एकदम एक कल्पना माझ्या मनात चमकून गेली. विषयाला वेगळं वळण लावीत मी म्हटलं, 'ते राहू द्या. नका लिहू आत्मचरित्र. पण तुम्हां जुन्या नटांवर नवी मंडळी नेहमी आरोप करतात की संगीतात जशी एक शिष्यपरंपरा निर्माण झाली आहे तशी नटांनी केलेली नाही. जुन्या नटांनी शिष्य तयार केले नाहीत...' माझ्या ह्या म्हणण्यासरशी नाना एकदम उसळून उठले. म्हणाले, 'शिकवून येईल अशी ही विद्या नाही. मोनालिसा सारखं चित्र काढायला शिकविता येईल पण तिच्या हास्यातली जादू चितारायला चित्रकारात स्वयंभू गुणच असायला हवेत. नाट्यशिक्षण ही एकलव्याची ज्ञानसाधना आहे. काही दैवी, उपजत असतं, काही अनुकरणानं, अवलोकनानं साधायचं असतं, बरंचसं स्वतःच्या अंगभूत कौशल्यानं व्यक्त करावयाचं असतं. कोणी विचारलं तर मी मोठ्या अगत्यानं समजावून सांगत आलो आहे आजवर, पण शिकवणार कसं? दाजी भाटवडेकरानं मला विचारलं एकदा, 'नाना, तुमच्यासारखा आवाज व्हायला काय करावं लागतं ते सांगा.' मी हसलो आणि आडवळणानं म्हटलं, 'उद्या ए. सी. सी. नं असा फतवा काढला की, भाटवडेकरांनी नाटकात ह्यापुढे काम करता नये; नाहीतर त्यांना नोकरीवरून कमी करण्यात येईल. त्यावेळी तुम्ही काय निर्णय घ्याल त्यावर माझं उत्तर अवलंबून राहील...' मला त्यांना वास्तविक असं सुचवायचं होतं की, नाट्यकलेचा ध्यास तुम्ही किती प्रमाणात घेतला आहे ह्यावर तुमचा सारा विकास अवलंबून आहे. ह्या एका ध्यासापुढे जीवनातल्या इतर साऱ्या गोष्टी दुय्यम-गौण मानण्याची सिद्धता तुमच्या मनात निर्माण होणं ही विकासाच्या मार्गाची पहिली पायरी आहे...'

नानांनी काय लिहावं हा प्रश्न आता माझ्यापुरता तरी चुटकीसरशी सुटल्यासारखा झाला होता. त्यांच्या शब्दात मी त्यांना पकडलं आणि त्यांच्या विचाराचं सूत्र पकडीत मी म्हटलं, 'ते आत्मचरित्राचं राहू दे घटकाभर बाजूला– मला स्वतःलाही

फारसा उत्साह नाही त्या तशा प्रकारच्या आत्मचरित्राविषयी. पण तुम्ही निदान एक करा– तुमच्या गाजलेल्या भूमिकांविषयी तुम्ही लिहा– नाटकांसंबंधी, भूमिकांसंबंधी तुमचा दृष्टिकोन, an actor's viewpoint मांडा. होतकरू नटांना झाला तर तो मार्गदर्शकच होईल. आजवर ह्या पद्धतीनं मराठीत कोणी काही लिहिल्याचं मला तरी स्मरत नाही. तुमच्या ह्या लेखनामुळे गाजलेल्या नाटकांच्या आणि भूमिकांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म छटा रंगभूमीच्या चिकित्सक अभ्यासकाच्या दृष्टीला पडतील आणि त्याच्या आनंदाला पारावार उरणार नाही...'

'मुखवटचाचे जग' ही सध्या 'वीणा'त प्रसिद्ध होत असलेली नानासाहेबांची लेखमाला जन्म पावली ती अशी. नानांनी माझ्या ह्या सूचनेचं कल्पनातीत उत्साहानं स्वागत केलं इतकंच नव्हे तर थोडयाच अवधीत 'एकच प्याला' नाटकातील आपल्या सुधाकराच्या भूमिकेविषयीचा विचारप्रवर्तक लेख त्यांनी लिहून तयार ठेवला.

•

आत्मचरित्रासंबंधीची नानासाहेबांची भूमिका वर विस्तारानं सांगितल्यानंतर त्यांच्याविषयी व्यक्तिचित्रणात्मक काही लिहिण्याच्या कल्पनेनं मी का गांगरलो असेन ह्याचा उलगडा व्हावयास अडचण पडू नये. माझे सारे रस्ते बंद झाले होते आणि ह्या विषयासंबंधी त्यांच्याकडे पुन्हा शब्द काढायला त्यांनी मला मुळी जागाच ठेवली नव्हती. ह्या अनिश्चिततेच्या काळात नानांविषयीचा लेख लिहिणं साहजिकपणं एक एक दिवस लांबणीवर पडत चाललं होतं. जबाबदारीचं ओझं घेऊन मी नुसताच भटकत होतो. नानांविषयीचं मला माहीत असलेलं सारं काही प्रयत्नपूर्वक आठवून पाहत होतो आणि 'हे बरं नाही' 'असं काही कुठं एखाद्याविषयी लिहून छापायचं असतं...?' 'छेः छेः, असं लिहून कसं चालेल. शोभून दिसायचं नाही ते!' असं मनातल्या मनात तांबडचा शाईच्या फराटचांनी सुचलेलं सारं तिथल्या तिथं कटाप

करून टाकत होतो. मनाला येणारी भोवळ सावरण्याचे त्राणदेखील आता माझ्यात उरलेले नव्हते. मग अचानक एकाएकी १९४४–४५ मधली एक संध्याकाळ डोळ्यासमोर आली. नानासाहेब बसच्या 'क्यू'मध्ये उभे होते. 'ऑपेरा हाउस'ला 'संन्याशाच्या लग्नाच्या तालमी'ला निघाले होते. मला जवळ बोलावीत ते म्हणाले, 'थंडी छान पडली आहे नाही. आता नाही तालमीला जात, कंटाळा आलाय अगदी.' माझ्या शेजारी उभ्या असलेल्या कविमित्राकडे अंगुलीनिर्देश करीत पुढे हसत म्हणाले, 'ते 'त्याच्या'विषयी लिहितात पण त्यातले आहेत का?' मग मनाचा काही एक निश्चय करीत ते 'क्यू'मधून बाहेर आले आणि म्हणाले, 'चला जाऊ या कुठंतरी घटकाभर.'

नानांच्या चित्तवृत्ती चांगल्या उमलल्या होत्या. त्यांची स्वगत भाषणं ते तन्मयतेनं आम्हांला म्हणून दाखवत होते. आमच्या कॅबीनमध्ये समोरच्या बाजूला कोणी श्रीमंत बोहरी एकटाच पीत बसला होता. त्याचं पिणं थांबलं. बारमधली इतर मंडळी कॅबीन-जवळ गोळा झाली. नानासाहेबांची स्वगतं एकाग्रतेनं ऐकू लागली. आम्ही जायला उठलो– बिल देण्यासाठी नानांनी खिशात हात घातला तसा तो बोहरी उठला आणि मोडक्या तोडक्या मराठीत म्हणाला, 'नाही नाही. असं कुठं झालंय. मी बिल देऊ देणार नाही तुम्हांला. तुमची नाटकं मी पाहिली आहेत आणि येवढा मोठा नट इतक्या जवळून प्रथमच पाहतो आहे मी– आज तुम्ही माझे मेहमान .. बिल मी देणार... तुम्ही नाही...'

पु. भा. भावे यांच्या पोटभरे बिल्डिगमधल्या मकाणावर मध्यरात्रीपर्यंत झालेली मैफल आठवली. जुन्या हळुवार स्मृती जागृत झाल्यामुळे पोराहून पोर होऊन नानांनी डोळ्यांतून कशी टिपं काढली ते आठवलं आणि, आणि खाली रस्त्यावर येत अचानक काही आठवावं तसं आठवीत म्हणाले, 'एखाद्या मांत्रिकानं भुताला वाटलीत बंद करून ठेवावं तशी शिस्त माझ्या पत्नीनं माझ्या जीवनाला लावली आहे. घरी तिची लाडकी मांजर

उपाशी असेल. मांजरीसाठी मटन घ्यायला हवं घरी जाण्यापूर्वी...' रात्र बरीच झाली होती. बहुतेक हॉटेल्स केव्हाच बंद झाली होती आणि आम्ही मटनाच्या शोधात हॉटेल्सची दारं ठोठावीत होतो.

मग एकदम कानावर शब्द आले, 'काय, त्या नावापुढे 'बाई' लावून 'अहो जाहो' म्हणू ? छेः छेः छेः ! असा प्रमाद माझ्या हातून झाला तर मला सुळी देण्याची शिक्षा पाहिजे. 'बाई' 'अहो जाहो' असे कोणाला म्हणायचे ? दहा पोरे झालेल्या, पोक्त दिसणाऱ्या, केस पिकलेल्या, चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेल्या अशा थेरडीच्या नावापुढे 'बाई' हा शब्द लावलेला शोभेल. तुझ्यासारख्या, जिची तारुण्याची कळी नुकतीच उमलली आहे अशा कन्येच्या नावापुढे 'बाई' हा शब्द लावणाराला मारे कोरड्याखाली झोडपून काढावा. आनंदी, काय सांगू तुला ? इतरांना तू कशीही अस, मला तू आनंदीच ! मला दुसरे-तिसरे नाव माहीत नाही. तुझा चेहरा आनंदी, तुझे बोलणे आनंदी, तुझे मुरडणे आनंदी, तुझे ठुमकणे आनंदी, तुझे मुसमुसणे आनंदी, तुझा नोकझोक आनंदी ! सारांश, तुझ्या या आनंदी शरीरात नखशिखांत आनंदी आनंदच भरला आहे ! आपण तर तुला आनंदीच म्हणणार...'

नानासाहेबांचाच तो आवाज. 'त्राटिका' नाटकातल्या दुसऱ्या अंकातील पहिला प्रवेश चालला होता. नानासाहेब–'प्रतापराव' आणि वनमालादेवी–'त्राटिका' अशी जोडी जमली होती. मरीनलाइन्सवरील मुंबई मराठी साहित्य संघाचं उघडं नाट्यमंदिर रसिक प्रेक्षकांनी ठेच भरलं होतं. लाह्या फुटाव्यात, ढगाच्या पाठीवर विजांचे आसूड वाजावेत अशी लय संवादानं घेतली होती. रात्र काळोखी, वर नक्षत्रं चमचमत होती आणि खाली हे दोन तारे आपल्या अभिनयगुणानं तळपत होते.

नानासाहेबांचा उभे राहण्याचा तो डौल, ती किंचित उंचावलेली झुडुपी भुवई, ते ओठाच्या कडेला रेंगाळणारे मिस्किल

स्मित, डोळ्यांतला तो दर्दी भाव आणि शब्दाची ती वजनदार फेक. सारं काल घडावं तसं डोळ्यासमोर तरळतं आहे –वाटतं, नटश्रेष्ठांच्या मालिकेतला हा अखेरचा चिरस्मरणीय दुवा... लास्ट ऑफ द रोमन्स...!

मग एकदम वेगळेच नाना आठवतात. माझं लग्न ठरल्याचं त्यांना कळलं आहे वाटतं. खाजगी आवाजात नाना म्हणतात, 'तुम्हांला घरी जेवायला बोलवीन म्हणतोय. तुम्ही नगरचे ना? पहा कसा झकास बेत करतो ते. जन्मभर आठवण काढाल आमच्याकडच्या जेवणाची. बाजरीची खरपूस भाकरी, ताजं लोणी, लसणीची फोडणी दिलेली करडईची झणझणीत भाजी. आणखी काय हवंय तुम्हांला?' नाना अधूनमधून असं काही हळुवार बोलून जातात. मुलाचं जावळ गालाला गुदगुल्या करीत घासावं तसं मनाचं होतं. खोल कुठेतरी मनात ही आठवण रेंगाळत राहते. कष्टी मनाला दिलासा देते.

परवा 'हॅम्लेट' पाहिलं नानांचं. कोण म्हणतो नाना साठीला आलेत म्हणून? अजूनही वाणी स्वच्छ आहे. तेज राजस आहे. 'हॅम्लेट' म्हणजे एक खांबी तंबू. सारी मदार नानांवर. चित्त्यासारखी चपळ हालचाल होत असते त्यांची रंगमंचावर. आपल्या भमिकेनं इतरांना खाऊन टाकणं म्हणजे काय याचा प्रत्यय येतो अशावेळी. आवाजाचं तेच वजन आणि तीच धार कायम आहे. 'बाबा पुन्हा का दर्शन देता?' ह्या त्यांच्या प्रश्नासरशी त्यामागची आर्तता कशी काळजाला जाऊन भिडते; तर 'हचा कवटीत एक जीभ होती आणि ती गात असे...' हचा स्वगताला सुरुवात होताच पाठीच्या कण्याला मुंग्या येतात. आणि मन एका विलक्षण व्यथेनं कष्टी होतं. त्या प्रयोगाच्यावेळी चौथ्या अंकानंतर श्री. दाजी भाटवडेकर एका अमेरिकन जोडप्याला घेऊन रंगमंचाच्या पाठच्या बाजूला आले. नानांचा त्यांनी त्यांच्याशी परिचय करून दिला. माझ्या मागेच बसलं होतं हे जोडपं. तन्मयतेनं नानांचं काम पाहत होतं. दाजीनं नानांची एका प्रख्यात युरोपियन नटाशी

तुलना केली. तेव्हा नाना उपजत विनम्रतेनं प्रांजळ स्वरात म्हणाले, 'नाही नाही. ही तुलना होऊ शकणार नाही.' 'नाही कशी?' ती अमेरिकन तरुणी पुटपुटली, 'आम्हांला मराठी भाषा अवगत नाही, पण तुमच्या संवादातला शब्दन् शब्द आणि छटान् छटा विनासायास समजली. तुमच्या अभिनयाचं हे सामर्थ्य फार मोठं आहे. स्तुतीच्या शब्दांनी नाना मूक होतात. त्यांच्या अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. मला वाटलं ते खूप थकले असतील. आम्ही निवांतपणे बोलावं म्हणून एका बाजूला गेलो. नाना म्हणत होते– 'हॅम्लेटची भूमिका काय किंवा इतर कुठली काय, भूमिका करताना माझा मीच असतो. स्वत्वाचा विसर पडतो ह्याचा मला तरी कधी प्रत्यय आला नाही. शेक्सपिअरची सारीच नाटकं मला आवडतात पण 'हॅम्लेट' माझं फार लाडकं आहे.'

नानांनी 'वीणा'साठी परवा दिवाळी अंकात 'हॅम्लेट'वर लिहिलेला प्रदीर्घ लेख मला वाचायला लावला आणि मग म्हणाले, 'छे: छे:, अजून नीट समाधान नाही होत मनाचं. हॅम्लेटवर अजून कितीतरी लिहिण्यासारखं आहे. एक ग्रंथ होईल.'

त्यांची ही रुखरुख कमी व्हावी, थोडा दिलासा द्यावा, म्हणून मी म्हटलं, 'तुम्ही लिहाल. तुमचे हॅम्लेटवर प्रेम आहेच मुळी.' पण नानांनी उद्या 'हॅम्लेट'वर पुस्तक लिहिलं तर त्यात मला मुळीच आश्चर्य वाटणार नाही.

•

नानांचा जन्म २४ जून १८९९ रोजी कोल्हापूर मुक्कामी झाला. शाहू महाराज गादीवर येण्यापूर्वी आबासाहेब कागलकर कोल्हापूर संस्थानचे रीजंट होते आणि त्यांच्याच काळात नाना-साहेबांचे पणजोबा गोपाळ गोविंद फाटक हेही तिथे न्यायाधीश होते. नानासाहेबांचे आजोबा कला आणि कलावंतांचे चाहते होते. आजोबाचे गुण नातवात उतरतात असे मानले तर नाट्य गुणांचा हा वारसा नानांना आपल्या आजोबांपासून मिळाला आहे असं

शिवरामपंत परांजपे (महाराष्ट्राचे प्रसिद्ध गोकुळ) आणि वामनराव पोतनीस (प्रसिद्ध स्त्री नट) हे दोघे महाराष्ट्र नाटक मंडळीतून बाहेर पडले होते. 'गणेश नाटक मंडळी' नावाची नाटक कंपनी त्यांनी स्थापन केली होती. शिवरामपंत परांजप्यांच्या आग्रहावरूनच नानासाहेब ह्या कंपनीत नोकरीस राहिले. त्यावेळी त्यांना वीस रुपये पगार मिळायचा. नाना त्यावेळी सारे एकोणीस वर्षांचे असतील नसतील; दिसायचेही विलक्षण देखणे. ह्या देखण्या आणि पोरसवदा नानांना आयुष्यात पहिली भूमिका मिळाली ती 'मत्स्यगंधा' नाटकातल्या म्हाताऱ्या शंतनूची ! जवळ जवळ अडीच वर्षे नाना गणेश नाटक मंडळीत होते आणि त्या काळात त्यांनी फार हाल भोगले. कष्ट काढले. अखेर स्वतः मालकच महिनाभर कंपनी सोडून परागंदा झाले तेव्हा नानांना इतरत्र काही शोधाशोध करणं भागच होतं. वरं, नाटक मंडळीत जाऊन राहिलेल्यांना त्या काळात उजळ माथ्यानं पुन्हा घरी जाऊन राहता येणंही शक्य नसे. गणेश नाटक मंडळीत असताना माधवराव टिपणीस नानांच्या बरोबर होते. ह्या कंपनीच्या रंगभूमीवर नाना 'तोतयाच्या बंडा'त हैवतीची, मामा वरेरकरांच्या 'नर केसरी'त दक्ष प्रजापतीची, शटचांच्या 'लोकशासन' मध्ये अमात्याची, 'चंद्रग्रहण' मध्ये शिवाजीची आणि 'राधा माधव' मध्ये अनयची भूमिका करीत. नानांनी गणेश नाटक मंडळी सोडली ती वैफल्याच्या भावनेनंच

नटश्रेष्ठ गणपतराव जोशांचं नानांच्या वडिलांकडे येणं-जाणं असे. त्यांचा आणि फाटक कुटुंबाचा घरोबा होता. नाना त्यांना जाऊन भेटले. गणपतरावांनी आपल्या भूमिकांचं आणि स्वरोच्चाराचं मर्म नानांना समजावून सांगितलं खरं, पण आपल्या कलागुणांचा विकास नानांना अखेर स्वतःच्या हिमतीवर, अनुकरणानं, भूमिका शक्य तितक्या निर्दोष कशा होतील इकडे बारकाईनं लक्ष पुरवून करावा लागला. 'चूक आणि बरोबर आपलं आपल्याला कळतं' हा गणपतराव जोशांचा सिद्धान्त

होता. ही जाण आली की विकासाचा मार्ग सुलभ होतो हे नानांना त्यांनी पटवून दिलं. गणपतरावांनी केलेल्या भूमिका आपल्याला मिळाव्यात, त्यांच्या दर्जाला आपला अभिनय पोहोचावा ही नानांची महत्त्वाकांक्षा होती. गणपतराव जोशांना ते गुरुस्थानी मानतात आणि त्यांची परंपरा आपण पाळतो आहोत ह्याचा त्यांना अभिमान वाटतो.

मोठ्या झाडाखाली लहान झाड वाढत नाही... आणि म्हणूनच शब्दोच्चार, आवाज वापरण्याची पद्धत ह्या बाबतीत गणपतरावांचं अनुकरण करीत स्वतंत्रपणे आपल्याच्यानं जसा पल्ला गाठता येईल तसा गाठायचं हे नानांनी ठरवून टाकलं.

पुढे नाना, शंकर नीळकंठ ऊर्फ नाना चाफेकरांच्या प्रेरणेनं ललितकलादर्शमध्ये येऊन राहिले. चाफेकर आणि पेंढारकर हे दोघे ललितकलेचे मालकच होते. कै. बापूराव पेंढारकरांच्या शुद्ध चारित्र्याचा नानासाहेबांच्या जीवनावर फार दूरगामी परिणाम झाला. त्यांच्या जीवनाला शिस्त लावण्यास पेंढारकरांच्या वैयक्तिक जीवनाचा आदर्श कारणीभूत झाला असं म्हटलं तर चूक ठरू नये. ललितकलेत नानांना हवं होतं ते स्वास्थ्य मिळालं. पेंढारकरांना नावीन्याची हौस होती. ते नानांना वाचण्यासाठी वेळोवेळी पुस्तकं आणून देत. काही कुठे चांगले नाट्यप्रयोग असतील तर पाहण्यासाठी बरोबर घेऊन जात. नानांवर त्यांचा भारी विश्वास होता. १९२० ते १९३० ह्या बारा-तेरा वर्षांच्या काळात कंपनी दोन-तीन वेळा फुटली पण नाना निष्ठेने अखेरपर्यंत पेंढारकरांना साथ देत राहिले. चालून आलेली अनेक आमिषं त्यांनी ठुकरावून लावली.

महाराष्ट्र मंडळीप्रमाणेच ललितकलादर्शमध्ये बौद्धिक साहचर्य नानांना खूप लाभलं. मामा वरेरकर, वसंत शांताराम देसाई, न. ग. कमतनूरकर, प्रो. नगरकर ह्या मंडळींचं कंपनीत उठणं बसणं होतं– त्यांच्या संगतीचा, त्यांच्या काव्यशास्त्रविनोदाचा

बहुश्रुतपणाचा नानांना नाही म्हटला तरी बराच फायदा झाला. बाबा शिगवण, वृंदावन, कुसुमाकर, विक्रांत आणि केरोपंत ह्या ललितकलादर्श मंडळींच्या रंगभूमीवर गाजलेल्या आणि लोकमान्यतेस ठरलेल्या नानांच्या काही प्रमुख भूमिका !

पुढे सिनेमाची लाट आली. रंगभूमीवर मंदीचे सावट पसरले. कोल्हापूरच्या राजाराम महाराजांनी कोल्हापूर सिनेटोनची हयाच सुमारास स्थापना केली होती. नानांना मुद्दाम बोलावून आपल्या 'आकाशवाणी' ह्या पहिल्याच बोलपटात कंसाची भूमिका दिली. नानांनी त्यानंतर इतर पाच-सहा चित्रपटांतून कामेही केली. पण चित्रपटक्षेत्रातील कोल्हापुरी नटांच्या गटबाजीमुळे त्यांना त्या व्यवसायाचा अखेर वीट आला.

१९३७ साली नाना पुण्याला आले आणि त्यांनी वैशंपायन, माधवराव टिपणीस, इंदूरकर, सीताराम जोशी आदींच्या साहाय्यानं 'हॅम्लेट' बसवलं. हिरा धारवाडकर ही गुणी नटी त्यावेळी नानांच्या 'हॅम्लेट'मध्ये मल्लिकेची भूमिका करावयाची. दिसायला फार सुरेख होती ती. हॅम्लेटचे नानांनी पंचवीस प्रयोग केले. पण त्यांतून त्यांना धड 'नाही साधता आला आत्मविकास की सावरता आली आर्थिक परिस्थिती.'

पुढे १९४१ मध्ये आचार्य अत्र्यांनी 'पन्नारत्न' नावाचा चित्रपट काढायचा बेत आखला आणि त्यातल्या बनबीरसिंगाच्या भूमिकेसाठी नानांना मुंबईला बोलावून घेतलं. तो चित्रपट निघाला नाही आणि त्या ऐवजी अत्र्यांनी त्यांना 'वसंतसेना'तल्या शकाराची भूमिका देऊ केली. विनोदी भूमिका आपल्या प्रवृत्तीला मानवणाऱ्या नाहीत असं प्रांजळपणे नानांनी अत्र्यांना सांगितलं आणि शकाराची भूमिका करण्याचं टाळलं...

१९४४ साली जो नाटच शतसांवत्सरिक उत्सव मुंबईत झाला तेव्हा कै. डॉ. भालेरावांच्या खास प्रेरणेनं नानांनी राघोबादादाची

भूमिका केली आणि ती गाजली. प्रतिवर्षी होणाऱ्या साहित्य संघाच्या नाट्योत्सवातील प्रमुख भूमिकांची जबाबदारीही डॉक्टरांनी नानांच्या अंगावर टाकली. 'माझ्यातल्या सुप्त नाट्य गुणांना संधी देण्याचं सारं श्रेय प्रामुख्यानं डॉक्टर भालेरावांकडे जातं.' असं नाना वेळोवेळी कृतज्ञतेनं बोलून दाखवतात.

महाराष्ट्र मंडळीचं 'स्कूल' खरं तर अत्यंत कृत्रिम आणि अति नाटकी बोलण्याचं. त्याचा संपर्क नानांनी आपल्या वाणीला चुकूनसुद्धा कधी होऊ दिला नाही. 'ललितकलादर्शच्या रंगभूमीवर कै. पेंढारकरांनी जे विविध प्रयोग केले त्या १९२१ च्या रंगभूमीच्या पलीकडे आजच्या रंगभूमीने फार प्रगती केली आहे असे आपल्याला वाटत नाही, अगदी 'नाट्य मन्वंतर' जमेला धरूनही...' असं नानांचं स्पष्ट मत आहे. 'आजची नाटकं 'Plays' वाटतात 'Dramas' वाटत नाहीत.' असंही त्यांचं मत आहे. 'शेक्सपिअरच्या नाटकांनी, जुन्या प्रथितयश नाटककारांच्या नाटकांनी प्रेक्षकाला जी तृप्ती लाभते ती देण्याचं सामर्थ्य आजच्या नाटकात खरोखरीच आहे काय?' अशा उलट त्यांचा सवाल असतो.

नानांचे जीवन आणि त्यांची रंगभूमीविषयक मतं ह्यांचा अगदी ओझरता, त्रुटित म्हटलेत तरी वावगे वाटू नये असा हा परिचय.

●

नानांना मी अगदी प्रथम पाहिलं ते १९४५ च्या सुमारास. खोदादाद सर्कलच्या कोपऱ्यावर एका रविवारी दुपारी टॅक्सीची वाट पाहत उभे असताना. त्यांच्या बरोबर त्यावेळी दोस्त धुमाळ आणि नट वायदेशी मला वाटतं होते. नाना त्यावेळी आताच्या तुलनेनं कितीतरी तरुण दिसत. दोस्त धुमाळ हा नानांच्या आणि माझ्या स्नेहातला दुवा. त्यावेळी मी व्हिन्सेंट रोडवरच्या पुरंदरे पार्कमध्ये राहत असे आणि रोज सकाळी माझे मित्र श्रीकृष्ण पोवळे ह्यांच्याकडे माझी एकतरी फेरी व्हायचीच. पोवळ्यांच्या बाल्कनीत उभं राहिलं की नानांची वसाउठायची खोली स्पष्ट दिसे. तिथे कधी उघडाबंब धुमाळ आपला लाल लंगोट झटकून

तारेवर वाळत घालताना दिसे, तर कधी स्वतः नानासाहेब हातात नाटकाचं पुस्तक धरून पाठांतर करीत खोलीतल्या खोलीत येरझारा घालताना दिसत. उभ्याउभ्याच आणि तारस्वरात आमची बातचीत होई.

माझं पहिलं पुस्तक मी नानांना भेटीदाखल दिलं तेव्हापासून त्यांच्या-माझ्यात मला वाटतं विशेष आत्मीयता निर्माण झाली असावी. शिवाय पाइप आणि त्याचा तंबाखू हा आम्हां उभयतांतला एक अवीट जिव्हाळ्याचा विषय ! नानांचं वाचन अखंड चाललेलं असायचं– (अजूनही ते चालूच आहे म्हणा...) कधी वाचलेल्या पुस्तकांविषयी, कधी त्यांच्या जुन्या जमान्यातल्या आठवणींविषयी– कधी असंच नाना बोलत. त्यांच्या लोभस व्यक्तिमत्त्वानं मला भारून टाकलं होतं आणि आज इतक्या वर्षांनंतरही ती ओढ कायम आहे.

नानांची न् माझी 'अल्मामेतर' एक आहे हा आणखी एक जिव्हाळ्याचा दुवा– निदान माझ्यापुरता तरी. नानांच्या मागून त्याच शिक्षणसंस्थेतून राजा परांजपे, प्रा. भालबा केळकर, प्रा. वसंत कानेटकर ही मंडळी नाटचगुणांचा वारसा घेऊन प्रसिद्धीला आली– कोणी अभिनयाच्या तर कोणी नाटचलेखनाच्या क्षेत्रात. ही कमी अभिमानाची गोष्ट नाही.

नाटचव्यवसायातला सर्वोच्च मान रसिक जनतेने आज नानांना दिला आहे. त्यांना नाटचसंमेलनाचे अध्यक्षपद वहाल केले आहे. नानांवर रसिक प्रेक्षकांचे असीम प्रेम आहे, प्रत्यही होणारे त्यांचे सत्कारसमारंभ पुराव्याला पुरेसे आहेत. आचार्य अत्रे आणि प्रा. अनंत काणेकर हचांचा अपवाद वाद करता असं प्रेम अलीकडच्या काळात हचा क्षेत्रात कोणा एका व्यक्तीच्या वाटचाला आलं आहे, असं मला वाटत नाही. नाना आज एकसष्टीच्या उंबरठचावर उभे आहेत. अजूनही पहिल्याच तेजाने रंगभूमीवर ते तळपताहेत. रंगभूमी गाजवताहेत. क्लिओपात्रेचं

चिरतारुण्य नानांच्या वाटचाला आलेलं आहे. नाना चिरतरुण आहेत.

ह्या देशात आज जनतेचं सरकार आहे. नाना हा मराठी नाट्यपरंपरेचा श्रेष्ठतम नाट्यगुणांचा बहुमोल ठेवा आहे. जुन्या-नव्यांतला मोठा दुवा आहे. राष्ट्राची महत्ता त्याच्या सांस्कृतिक महत्तेवर अवलंबून असते. नानांच्या कलागुणांचा यथोचित गौरव विनाविलंब करणं हे मुळी सरकारचं आणि साहित्य-नाटक-संगीत अकादमीचं कर्तव्यच आहे. ते ती कसं पार पाडताहे हे फक्त आता पाहावयाचे आहे.

नाना दीर्घायुषी होवोत, उत्तम आरोग्य त्यांना लाभो, त्यांचा स्नेह चिरंतन लाभो आणि नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द यशस्वी होवो हे ह्या निमित्तानं नटराजाजवळ माझं नम्र मागणं आहे.

(प्रथम प्रसिद्धी 'वीणा' / जानेवारी १९५९)

• • •

हवाहवासा पी. एल्.

८ नोव्हेंबर १९७९ या दिवशी पु. ल देशपांडे यांनी एकसष्टीत प्रवेश केला. ते निमित्त साधून पु. लं. च्या निवडक सर्वोत्तम साहित्याचा एक संग्रह– 'पु. ल. : एक साठवण'– प्रसिद्ध झाला. हा संग्रह जयवंत दळवी यांनी संपादित केला आहे. संपादनाच्या कामात साहाय्य व्हावे म्हणून त्यांनी आपल्या अनेक साहित्यिक आणि संपादक मित्रांना वैयक्तिक पत्रे लिहून पु. लं. चे कुठले साहित्य प्रस्तुत संग्रहात समाविष्ट करावे यासंबंधीच्या शिफारसी मागविल्या होत्या. त्या पत्रांना जी उत्तरे आली त्यातले उमाकांत ठोमरे यांचे हे पत्र.

नक्की साल स्मरत नाही, पण असेल १९४४ वा ४५. 'अभिरुची'च्या एका अंकात माझे चारसहा ओळींचे पत्र आहे (जे शांताबाई शेळक्यांच्या आजही चांगले स्मरण त आहे व ज्याच्यावरून त्या माझी नेहमीच थट्टा करतात!) तर हे पत्र आहे पी. एल्. विषयीच्या प्रच्छन्न स्तुतीने भरलेले. त्याआधीच्याच 'अभिरुची'च्या अंकात त्याचे 'भय्या नागपूरकर' या शीर्षकाचे एक अप्रतिम सुरेख असे शैलीदार व्यक्तिचित्र प्रसिद्ध झाले होते आणि त्या व्यक्तिचित्राने मी असा काही झपाटल्यासारखा होऊन गेलो होतो की उद्याच्या एका थोर प्रतिभासंपन्न साहित्यकाराच्या पहिल्यावहिल्या पावलांची चाहूल मला त्या छोटेखानी व्यक्तिचित्रात लागली होती. न राहवून मी 'अभिरुची'कडे पी. एल्. च्या स्तुतीने भरलेले एक पत्र धाडून दिले आणि यथाकाल ते प्रसिद्धही झाले. लक्षात घ्या– पी. एल्. चा माझा त्यावेळी ओझरतादेखील परिचय नव्हता आणि पी. एल्. नेही तोपर्यंत लक्षणीय असे कुठे काही लिहिल्याचे मला स्मरत नाही. पी. एल्. ने त्यानंतर अंतू

बर्वा, नारायण यांसारखी अनेक समर्थ व्यक्तिचित्रे रेखली. पी. एल्. ने कथा अशा फारशा लिहिल्या नाहीत– व्यक्तिचित्रे हाच फॉर्म त्याला जवळचा वाटत असला पाहिजे. पी. एल्. च्या साहित्याचे अभ्यासू आणि भक्त अंतू बर्वा वा नारायण यांसारख्या व्यक्तिचित्रांची फर्माईश तुमच्याकडे करतील व त्यात नवल वाटण्यासारखेही काही नाही. परंतु पी. एल्. च्या वाङ्मयीन विकासाचा आलेख जर तुम्हांला वाचकांच्या पुढे उभा करायचा असेल तर त्याचा मूलस्रोत असलेली 'भय्या नागपूरकर' ही व्यक्तिरेखा टाळून तुम्हांला पुढे जाताच येणार नाही. पी. एल्. नं ज्या नानाविध व्यक्तिरेखा आपल्या प्रतिभास्पर्शानं जिवंत करून सोडल्यात त्यातील बहुतांश सर्वसामान्य वाचकाच्या मनाला भिडतात त्या नायकाच्या पांगळेपणाचे (जे अनेक प्रकारचे असू शकते.) उदात्तीकरण घडल्याने (किंवा नेहमीच्या साचेबंद पद्धतीने व्यक्त करायचे तर कारुण्याची किनार वगैरे लाभल्यामुळे). मला स्वतःला पी. एल्. च्या दोन व्यक्तिरेखा त्यांच्या खास वैशिष्ट्यांसाठी आवडतात. एक म्हणजे त्यानं त्यांच्या लहानग्या भाच्यावर– 'दिनेश'वर लिहिलेय ते आणि दुसरे 'रावसाहेब'. (प्रथम प्रसिद्धी : 'वीणा', जुलै १९६५). 'दिनेश'मध्ये वात्सल्यमिश्रित मिस्किलतेचे काही एक न्यारेच लोभस दर्शन घडते तर 'रावसाहेब'-मध्ये कारुण्यावर भाबडेपणाने म्हणा, निर्व्याजपणे म्हणा, कौतुकाची धुवाँधार वृष्टी करणाऱ्या रसिकाचे दर्शन आपणास घडते. 'गाण्यात राहणारा माणूस' (मल्लिकार्जुन मन्सूर) सारख्या किंवा 'दया छाया' वगैरेमध्ये पी. एल् ने मल्लिकार्जुन मन्सूर, बालगंधर्व, कुमारगंधर्व वगैरे संगीतातल्या दिग्गजांचे उत्तम पोर्ट्रेट्स रंगवलीत– त्यांचेही स्थान अनन्यसाधारण असेच आहे– पण दस्तुरखुद्द पु. ल. देशपांडे यांच्यासारखा कलावंत त्याच्या भावडचा भक्तांचा जेव्हा कौतुकाचा विषय होतो तेव्हा 'रावसाहेब' या व्यक्तिरेखेची खरी खुमारी ध्यानी येते. (कारुण्याचो किनार वगैरे कसली काही भानगड नसतानाही ही व्यक्तिरेखा मोठ्या प्रसन्नपणे मनात घर करून राहते.)

पी. एल्. ने चित्रपटांसाठी गाणीबिणी बांधली असतीलही (मला त्या बाबतीत नीटशी कल्पना नाही.) पण त्याने कविता लिहिल्यात, आणि चांगल्या कविता लिहिल्यात, हे तुम्हांला माहीत आहे का ? मी १९५७ च्या मे महिन्यापासून 'वीणा' च्या नव्या स्वरूपातील अंकाचे संपादन सांभाळू लागलो. (डायजेस्ट स्वरूपातील 'वीणा' चा अखेरचा अंक एप्रिल १९५७. तो 'मद्य निषेध विशेषांक' होता व तोही मीच संपादन केला होता.) माझ्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झालेल्या या पहिल्याच अंकासाठी अनंत काणेकरांवर– ते त्या वेळी औरंगाबाद येथे भरलेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले या निमित्ताने– त्यांनी एक सुरेख व्यक्तिचित्रणात्मक लेख लिहिला होता. (मोबदला रुपये २५ आणि तोही दोन महिन्यानंतर आणि सुनीताबाईंच्या एका स्मरणपत्रानंतर) पोहोचता केला गेला. पण पी. एल्. नं मोबदला उशिरा वा कमी मिळाला म्हणून माझा राग तर धरला नाहीच, पण उलट 'वीणा' हे आपलेच आहे आणि ठोमरे हा आपलाच आहे या भावनेने दर दिवाळी अंकासाठी वा कधी कधी जुलैत निघणाऱ्या वर्षारंभ विशेषांकासाठीही अगत्याने लिहीत राहिला. हे सारे थोडे विषयांतर यासाठी की पी. एल्. चे 'वीणा' शी वा माझ्याशी काय नाते होते हे थोडे अधिक स्पष्ट व्हावे.

एका दिवाळीला पी. एल्. ने कोणासाठीच काही लिहिले नाही. मलाही त्याने पत्राने असमर्थता कळवली. पण मग एक दिवस अचानक त्याचे दोन ओळींचे पत्र : 'तुझ्यासाठी चार कविता लिहून ठेवल्यात. घरी येऊन घेऊन जा.' पत्र आले आणि पाठोपाठ वागळे अँड सन्समध्ये फोन. (कारण त्याच रात्री तो रेल्वेनं औरंगाबादला व्याख्यानाला जाणार होता.) संध्याकाळी मी 'आशीर्वाद' मध्ये पोहोचलो तेव्हा तो निघायच्याच तयारीत होता. माझे बखोट पकडीत त्याने मला टॅक्सीत घेतले आणि म्हणाला, 'चल माझ्या बरोबर व्ही. टी. ला.' गाडी सुटायला

तसा बराच अवकाश होता. पहिल्या वर्गाच्या डब्यात आरामात स्थानापन्न होत पी. एल्. ने कवितांचे हस्तलिखित काढले. त्या त्याच्या पद्धतीने मला वाचून दाखवल्या (जोडीला आणखी एक श्रोता : टेल्कोचे एक्झिक्युटिव्ह मंगेशराव भांडारकर). आणि म्हणाला, 'आवडल्या तर छाप...' चांगल्याच्या दर्शनाने गहिवरणे वा भारावून जाणे हा माझ्या स्वभावाचा एक दुर्बल भाग आहे. कविता मला आवडल्या होत्या. पी. एल्. ने त्या 'काही (च्या काही) कविता' या शीर्षकाखाली प्रसिद्ध करावयास सांगितले होते. पी. एल्. च्या या ६ कविता 'वीणा' च्या १९६२ च्या दिवाळी अंकात मी याच शीर्षकाखाली प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांनी 'वीणा' ची ५ पानं व्यापली आहेत आणि या कवितांसाठी वसंत सरवटे यांनी जी अर्थपूर्ण हास्यचित्रे रेखाटली'त त्यांना तर तोडच नाही. दिवाळी अंकाचा प्रारंभ या कवितांनी मी केल य आणि आनंदाचा न् अभिमानाचा भाग असा की 'हसवण्याचा माझा धंदा' या आपल्या एकपात्री कार्यक्रमात पुढे पी. एल्. ने यातल्या कवितांचाच समावेश केला आहे. पी. एल्. च्या ललित लेखांना किती मानधन द्यायचे याचे कोष्टक माझ्या मनाशी ठरलेले असायचे; पण या वर्षीच्या दिवाळी अंकात कोणासाठीही न लिहिता पी. एल्. नं आपल्यासाठी आणि त्याही वैशिष्ट्यपूर्ण कविता लिहाव्यात या कृतज्ञतेपोटी मी त्याला मानधनादाखल रुपये १०० धाडले. दुर्दैवाने त्याची पोच देणारे पी. एल्. चे पत्र आज माझ्या हाताशी नाही. पण कवितांना मिळालेल्या या रुपये १०० मानधनाचा त्याने त्यात काही एका अभिमानाच्या आणि गौरवाच्या भावनेने उल्लेख केला असल्याचे पक्के स्मरते. दळवी, मला वाटतं तुम्ही या कविता तुमच्या संकल्पित ग्रंथात समाविष्ट करणे न्यायाचे होईल, योग्य होईल असे कुठल्याही भावडचा भावविवशतेच्या आहारी न जाता आपणास आवर्जून सुचवावेसे वाटते.

पी. एल्. ने त्याच्या खाद्यजीवनावर एक प्रदीर्घ आणि खुमासदार लेख 'दीपावली' च्या दिवाळी अंकात लिहिला होता.

पुन्हा हाती परत न गवसणाऱ्या, मनाला सुखद हुरहुर लावणाऱ्या गोष्टींविषयी (नॉस्टॉल्जिया) पी. एल्. किती तन्मयतेनं आणि तन्मयतेनं लिहीत-बोलत असतो हे तुमच्यासारख्या त्याच्या खास बैठकीतल्या मित्राला मी सांगणे म्हणजे वसईला जाऊन वेलची केळी विकणे होईल १९५९ च्या 'वीणा' च्या दिवाळी अंकात पी. एल्. चा असा एक लेख प्रसिद्ध झालाय. शीर्षक : 'ती खानावळ कुठे दिसते का हो ? (काही दिवंगत गंधांचा मागोवा)' तुम्ही या लेखाचाही विचार करावा. (या लेखासाठी वसंत सरवटे यांनी 'वासांची दुनिया आणि घासांची दुनिया' या शीर्षकाची हास्यचित्रे रेखाटली आहेत.) 'साता वारांची कहाणी' ही 'वीणा' च्या १९६० च्या दिवाळी अंकात पी. एल्. ने जी वेगवेगळ्या वारांची विडंबनात्मक व्यक्तिचित्रे रेखली आहेत ती त्याच्या कल्पनाशक्तीचा काही और विलासच म्हटला पाहिजे

पी. एल. च्या सर्वच साहित्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की तो मनापासून रमलाय-रंगलाय तो दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळातील – विशेषतः १९३७–३८ पर्यंतच्या– कलाविश्वात. हे त्याचे विश्व आहे गायक-वादकांचे, नटांचे आणि नाटककारांचे. किर्लोस्कर, देवल, खाडीलकर, गडकरी, नारायणराव राजहंस, तिरखवाँ खांसाहेब, हिराबाई, केसरबाई, मास्तर कृष्णराव आणि गोविंदराव टेंबे या भावविश्वात अडकून पडल्याने (आणि त्यात वाईट असे काय आहे ? त्याचे ते प्रेम आणि श्रद्धा डोळस कलासक्तीनेच जडावलेली आहेत.) नाट्यक्षेत्रातील तथाकथित नवीनता त्याला कधीच दिपवू वा रिझवू शकली नाही. (त्यातली कृत्रिमता, खुजेपणा, बेगडीपणाही त्याला कुठे तरी जाणवत असला पाहिजे. नव्यासाठी नव्याचा स्वीकार करणे त्याला रुचले नसणार आणि आपल्या भावविश्वाशी सर्वस्वी परकीय वा विसंगत असले काही स्वीकारण्यासही त्याच्या मनाची तयारी नसणार. जे बावनकशी, चांगले ते त्याने स्वीकारले आहेच.) परिणामतः त्याच्या उपहासाला अशी काही विलक्षण धार चढत गेली की 'सदू आणि दादू' सारखी

त्याची प्रहसने (' छोटे मासे... मोठे मासे ' या संग्रहात हे आहे.) त्यासाठी मुद्दाम पुन्हा एकदा अभ्यासावीत. परंतु त्याच्या उपहासगर्भ शैलीचा त्रिवार गाळीव अर्क जर तुम्हांला तुमच्या या संग्रहात घेणे असेल तर ' खुर्च्या (भाडयाने आणलेल्या) : एक न-नाटच ' हे त्याचं ' वीणा 'च्या १९६३ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेलं (विजया मेहतांनी ' रंगायन ' च्या रंगभूमीवर आणलेलं, ' खुर्च्या ' या आयनेस्कोच्या ' The chairs ' चं भाषांतर असलेल्या पहिल्यावहिल्या न-नटचाची फिरकी घेणारं) प्रहसन तुम्हांला टाळू म्हणता टाळता येणार नाही.

हेमिंग्वेच्या ' An old man and the sea ' चे पी. एल्. कृत ' एका कोळीयाने... ' सदोष भाषांतर म्हणून कितीही टीकाविषय झालेलं असलं तरी एक जबरदस्त प्रतिभेचा रूपांतरकार म्हणून त्याचं स्थान निर्विवाद थोरांच्या पंक्तीत आहे. ' संशयकल्लोळ ' हे नाटक काय किंवा ' वाईकर भटजी ' सारखी कादंबरी काय, ही मी मराठीतील उत्कृष्ट रूपांतरे मानतो आणि त्या रूपांतरकारांच्याच मालिकेत, गोगोलच्या Inspector General चं ' अंमलदार ' आणि कॅरल चॅकपेच्या ' How a play is produced ' चं ' नाटक असं बसतं– ' (प्रथम प्रसिद्धी ' अभिरुची ' दिवाळी अंक. सन लक्षात नाही.) यासारख्या सरस रूपांतरांमुळे, पी. एल्. चा समावेश करावाच लागेल. तुम्ही ' नाटक असं बसतं– ' याचा या संग्रहात जरूर समावेश करा. ते चांगलं रूपांतर तर आहेच, खेरीज मला ते नाटचविश्वाच्या संदर्भात सदैव टवटवीत वाटत राहील असं एक दुर्मिळ कालचित्रही वाटत आलं आहे.

पी. एल्. त्याच्या ऐन उत्कर्षकालात आणि मी माझ्या उमेदीच्या म्हणा, उमेदवारीच्या म्हणा (जी परिस्थिती आम्हां दोघांच्याही बाबतीत अजून तशीच कायम आहे.) काळात मुंबईतच वावरत असल्याने परस्पर-विचार संक्रमणाचे साधन फोन आणि गाठीभेटी हेच मुख्यत्वे. त्याची पत्रं आणि तीही लांबरुंद माझ्या कधी वाटचाला आली नाहीत. पी. एल्. पुण्यात स्थायिक झाल्यावर

प्रसंगपरत्वे त्याची छोटीछोटी दोनचार ओळींची पत्रं यायला लागली. काही वाङ्मयाच्या इतिहासात नमुद व्हावा असा ठोस विचार–काही थोर कल्पनाविलास वगैरे त्यातून हाती लागण्यासारखा नसला तरी त्या दोनदोन ओळींतनं पी. एल्. च्या स्वभाव वैशिष्ट्याचं झळझळीत दर्शन घडून जातं.

माझ्या आयुष्यात पी. एल्. हा पी. एल्. राहिला– 'भाई' म्हणून तो कधी हाती लागला नाही. पण एकमेकांना आपुलकीन एकेरी संबोधण्याइतपत हे संबंध आजही स्नेहाचे आहेत– जिव्हाळ्याचे आहेत. पी. एल्. चा माझा पहिला परिचय १९४५ मधला–हिंदू कॉलनीच्या कोपऱ्यावर उभ्या उभ्या झालेला. तेव्हा तो मला वाटतं चिंतामणराव कोल्हटकरांकडे भेटायला आला होता. माझी 'जगन्नाथचे पत्र' ही कथा 'सत्यकथे'त प्रसिद्ध झाल्यावर (फेब्रुवारी १९४६)– त्यावेळी मी नासिकला होतो– त्यानं आचार्य अत्रे यांचा भाचा मधू जोशी याचेबरोबर निरोप पाठवला : 'कथा चांगलीच आहे रे तुझी–पण गड्या, एका कादंबरीचा विषय वाया घालवलास!' त्यापाठोपाठ तो स्वतः नासिकला 'वहिनी'च्या प्रयोगासाठी आला असता मुद्दाम माझ्या बिऱ्हाडी येऊन भेटून गेला. वाघ हा जसा Gentleman Animal मानला जातो तसाच पी. एल्. हा माझ्या लेखी एक स्वच्छ सद्गृहस्थच आहे. जे त्याच्या प्रखर टीकेचे वा उपहासाचे विषय झाले असतील त्यांचे त्याच्याविषयी कदाचित वेगळे मत असूही शकेल. पण मला नेहमीच वाटत आलेय की त्याच्या अंतर्यामी कुठेतरी एक भिडस्त असा लाजाळू मुलगा दडून बसलाय. याची मी माझ्या प्रत्ययास आलेली कितीतरी उदाहरणे देऊ शकेन. आणि त्याचे हे दर्शन लोभस आहे. आपुलकी आणि स्नेहभाव निर्माण करणारे आहे. वानगीदाखल मी एकदोन नमुने इथे सांगतो.

१९४७ मध्ये मी खडकीच्या कमांडर-रॉयल इंजिनीअर्स न्यू वर्क्सच्या कचेरीत नोकरीस होतो. (डिसेंबरमध्ये तिथेच राजीनामा दिला व बागळचांकडे आलो.) रोज सकाळी मुंबईला जाणाऱ्या

गाडीने मी खडकी गाठायचो. एक दिवस पी. एल्. त्याच्या मातोश्रींना त्याच गाडीवर निरोप द्यायला आला होता. त्याच्या आई बसल्या होत्या त्या समोरच्याच सीटवर एक जण सिगारेट ओढत बसलेला होता. याचा आईला त्रास होतोय याची कल्पना येताच पी. एल्. नं ज्या कासाविशीनं, आदबीनं आणि आर्जवानं त्या उतारूला 'सिगरेट ओढू नका' अशी विनंती केली ती पाहून त्याची मातृभक्ती आणि त्याचे अभिनयकौशल्य या दोहोंचाही मला सुरेख प्रत्यय आला.

'अंमलदार'च्या प्रयोगात पी. एल्. सर्जेरावची भूमिका करी आणि त्याचा धाकटा भाऊ उमाकांत रावबहाद्दूर होई. रावबहाद्दूरच्या भूमिकेत उमाकांत पी. एल्. ला अनेकवेळा आपल्या अभिनयगुणानं झाकळून टाकायचा. योगायोगानं पी. एल्. गाडीत भेटला असता मी तो विषय जरा भीतभीतच काढला. (कारण त्याच्या आधीच त्याचा पार्लेकर बालमित्र शरू रेडकर मला म्हणाला होता – 'बाबा, भाईशी आपल्याला बोलताना-बिलताना हल्ली भीती वाटते. He has developed such a caustic tongue!') पण पी. एल्. लाजून फक्त हसला. म्हणाला; 'काय करणार, भाऊ पडतो ना माझा... बोलता येत नाही त्याला 'हा काय आगाऊपणा' म्हणून!'

मी 'वगैरे वगैरे' सदर 'वीणा'त सुरू केले ते पी. एल्. ला आवडत असले पाहिजे. कारण पुढे पुढे कधी समक्ष भेटीत, कधी फोनवर 'उमाकांत, चल घे तुझ्या सदरासाठी या पी. एल्. टिट्बिट्स' असं म्हणून आपल्या नव्या कोटच्या वगैरे ऐकवायचा. त्या बहुतेक मी 'वगैरे वगैरे'त वापरल्या आहेत व तशा स्वरूपाचे तुम्ही काही त्या तुमच्या संकलित ग्रंथात समाविष्ट करणार असाल तर ती कात्रणं मी तुमच्या हवाली कधीही करू शकेन. पुष्कळ लोक दुसऱ्याच्या उच्चाराच्या, शुद्धाशुद्ध बोलण्याच्या चुका धसमुसळेपणानं दाखवून देतात. पी. एल्. चे तसे नाही. तो तुमची चूक नजरेला आणून देईल तीही मोठ्या संकोची मनाने. जणू

आपण यात काही अपराध करीत आहोत अशाच भावनेने. पी. एल् ने नुकतीच गाडी घेतली होती व आम्ही सचिवालयात वसंत सबनीसच्या ऑफिसमध्ये गप्पा मारीत बसलो होतो. ('वाऱ्यावरची वरात'चे स्क्रिप्ट सेन्सॉरकडे गेले होते. ते कुठे पट्कर्णी न होता लगेच परत मिळावे यासाठी तो आला होता.) त्या आधीच त्याने मला गाडीच्या संदर्भातला त्याचा नवा विनोद ऐकवला होता आणि तो मी त्याच्या साक्षीने सबनीसला सांगताना म्हटले 'अरे, पी. एल्. नं गाडी घेतली. मी विचारलं गाडी तू चालवितोस का? तर तो गंभीरपणे मला म्हणाला, आपण बुवा **नॉन गॅझेटेड** लोक...' माझा उच्चार पी. एल्. ला खटकला पण तो फक्त चुळबुळत अपराधी भावनेनं मला हलकेच सुचवत राहिला : 'नॉन गॅजेटेड... नॉन गॅजेटेड.' असा त्याचा लाजरा स्वभाव. 'गॅझेटेड' आणि 'गॅजेटेड' ही शाब्दिक कोटी, पण जरा 'ज'चा कठोर उच्चार होताच ती फुसकी ठरण्याची भीती असलेली.

पी. एल्. ची दोनच पत्रं मला इथं या क्षणी स्मरताहेत. लेखक म्हणून आपल्या हक्कांची पायमल्ली होतेय या रागाने पी. एल्. ने रीतसर परवानगी न घेता 'तुझं आहे तुझपाशी'च्या प्रयोगात भाग घेणाऱ्या झाडून सर्व संबंधितांना धडा शिकविण्यासाठी ठणकावून वकिलाच्या नोटिशी पाठवल्या (त्यातून नटवर्य नानासाहेब फाटकही सुटले नाहीत) ते तुम्हांला माहीत आहेच. (त्याने नंतर सर्वांचे पैसे परतही केले–आपण होऊन) त्यामागची पी. एल्.च्या मनाची बैठक ही 'जोडावे धन उत्तम व्यवहारे– उदास विचारे वेचावे सारे' या तुकोबाप्रणित तत्त्वज्ञानाची. त्याच्या उक्ती आणि कृतीतला मेळ आजही आपणास दिपवतो आहेच. त्याचा मल्लिकार्जुन मन्सूरवरचा 'गाण्यात राहणारा माणूस' हा लेख जेव्हा प्रसिद्ध झाला तेव्हा त्यातला एक सुंदर परिच्छेद 'नवनीत'च्या आरंभपृष्ठावर घ्यावा असे मला तीव्रतेने वाटायला लागले. मी अनुमती मागणारे पत्र लिहिताना यासाठी किती मानधन अभिप्रेत आहे वगैरे तर विचारले होतेच पण 'तुझी बुवा आपल्याला भीती वाटते.' असे एक खुळे वाक्यही मी त्यात

लिहून गेलो. पी. एल्. ने अनुमती देणारे पत्र लगेच धाडले–त्यात तो लिहितो, 'मला यासाठी तुझ्याकडून काही मोबदला वगैरे नको आहे–पण तू पाठवलास तर मात्र मी तो नाकारणार नाही. तुला माझी भीती का वाटावी? मला वाटलं तू माझ्यावर प्रेम करतोस.' या त्याच्या परखडपणामुळे मला मात्र माझ्या आगाऊपणानं लिहिण्याची शरम वाटली.

लहानसहान गोष्टीचे पी. एल्. ला अगदी एखाद्या निरागस मुलासारखे कौतुक असते. अमेरिकेच्या द्विशताब्दीच्या निमित्ताने 'नवनीत'च्या एका अंकात या संदर्भातील काही खास लेख मी लिहवून प्रसिद्ध केले होते. त्यात एक लेख आर्ल्गटन (व्हर्जिनिया स्टेट) च्या माझ्या स्नेही डॉ. (सौ.) निर्मला लिमये एम् डी. (गायनॅक) यांचा होता. 'अमेरिकेत भारतीय गृहिणी' हे त्याचे शीर्षक. निर्मलाने हा लेख फार जाणकारीने लिहिलाय. त्यांच्याकडे राहून गेलेल्या भारतीय पाहुण्यांच्या संदर्भात लिहिताना तिने सौ. सुनीताबाई देशपांडे यांचे तोंडभरून कौतुक केले होते. (पी. एल्. आणि सुनीता त्यांच्याकडे चार दिवस पाहुणे म्हणून राहिले होते. 'नवनीत'चा अंक मिळताच पी. एल्. चे निर्मलाच्या लेखाचे कौतुक करणारे पत्र आले आणि त्याला ताजा कलमवजा पुस्ती जोडताना त्याने एक वाक्य आणखी लिहिले, 'मित्रा, निर्मलाच्या लेखामुळे सुनीतानं बहुत दिसानं आज लसुणयुक्त पिठलं करून खाऊ घातलं–'

असा हा पी. एल्.– हवाहवासा वाटणारा मित्र आणि ज्याच्या लेखनाची शतधा पारायणे केली तरी मन अतृप्तच राहावे असा थोर प्रतिभासंपन्न साहित्यिक.

लिहिण्याच्या भरात मी बराच वाहवत गेलोय. या भारुडातून तुमच्या हाती चार ओळी जरी लागल्या तरी तुमच्या आणि पी. एल्. च्या मिश्र ऋणातून अंशतः मुक्त झाल्याचे समाधान लाभेल.

•••

सन्मित्र सरवटे अर्थात् खाजगीतले वसंतराव

एक झकासपैकी अतिशयोक्त (परंतु किंचितसं सत्य) विधान करायचं झालं, तर मी म्हणेन की, 'नाक साफ ठेवायच्यादृष्टीनं मनगटापेक्षा हातरुमाल अधिक उपयुक्त'. अशी समज यायच्या आगेमागेच माझ्या मनात साहित्याचं आणि चित्रकलेचं प्रेम उमलून आलं होतं. त्यातही मनाचा ओढा त्यातल्या त्यात विडंबनाकडे आणि व्यंगचित्राकडे अधिक होता. त्या धूसर काळात मनावर ठसलेलं एक व्यंगचित्र आजही स्मरतं. चित्राचा विषय होता 'काव्यगायन', चित्रकार : द. ग. गोडसे आणि मासिक असावे प्र. श्री. कोल्हटकर संपादित 'संजीवनी' (चूकभूल द्यावी घ्यावी). ह्या चित्रानं मला एक दृष्टी दिली. पुढे व्यंगचित्र या नावाखाली तेव्हाच्या साप्ताहिकातून प्रसिद्ध होणारे भन्नाट अत्याचार डोळे आणि मन निमुट सहन करीत होते. (याला एक सुखद अपवाद म्हणजे डेव्हिड लोच्या रेषेशी नाते सांगणाऱ्यांची तथाकथित राजकीय वा सामाजिक परिस्थितीवर टीकाटिप्पणी करणारी व्यंगचित्रं) काळाचा माझ्या मनात गोंधळ असण्याची शक्यता आहे. पण हत्तंगडी, शि. द. फडणीस आणि प्रभाकर ठोकळ यांची हास्यचित्रंही मन अशीच सुखवीत होती.

आणि मग अचानक एक अद्‌भुत चमत्कार घडला. धनुष्याकृती भुवया, निळसर डोळे, सरल नासिका, गालावर गोड खळ्या आणि पाठीवर रुळणाऱ्या पिंगट सोनेरी केसांच्या जाडसर दोन वेण्यावाल्या तरुणीच्या प्रेमात प्रो. ना. सी. फडके यांचा नायक ज्या तत्परतेनं पडला असेल अगदी त्याच तत्परतेनं मी तिच्या प्रेमात पडलो. सोनार तार कशी खेचतो ते मी बाळपणी तासन्‌तास

अनिमिष नेत्रांनी पाहिलेलं आहे. तीच झळाळी आणि तोच लवचिकपणा घेऊन आलेली सरवटयांची केसासारखी बारीक पण पोलादासारखी जोमदार सहज सरळ ओघवती रेषा पाहून मन हरकून गेले आणि पाहत.च मी तिच्या प्रेमात पडलो. (के के. हेब्बर या थोर चित्रकारांचीही अशीच एक वैशिष्ट्यपूर्ण रेषा आहे. ती आहे गाणारी रेषा : Singing line !) सरळ रेषेतून तीर्यक आशय व्यक्त करणाऱ्या वसंत सरवटे यांची इथं तिथं प्रसिद्ध होणारी हास्यचित्रं मी पाहत होतो. चवीनं त्यांचा आस्वाद घेत होतो. त्यांच्या प्रत्यक्ष परिचयासाठी आसुसलो होतो. पण तेव्हा त्यांचा माझा साधा परिचयदेखील नव्हता. विजय तेंडुलकरांनी शब्दबद्ध केलेला तो आमचा 'खडा मारायचा झाला तर...!' फेम 'तुमानवाला' ('वीणा' : दिवाळी विशेषांक १९६३) प्रत्यक्ष मित्र म्हणून माझ्या जीवनात यायला काहीतरी छप्पन्न-सत्तावन्न साल उजाडावे लागले. आणि गंमत अशी की, त्यानंतरच्या उण्यापुऱ्या दोन दशकांच्या अतूट स्नेहसंबंधानंतर (अन् 'वीणा'साठी त्यांनी रेखलेल्या विविध स्वरूपांच्या अक्षरशः शेकडो अविस्मरणीय चित्रकृतींनंतरही) माझ्या डोळ्यांसमोर आजही प्रथम येते ती अगदी पहिल्यांदा आस्वादिलेली सरवटे यांची वैशिष्ट्यपूर्ण रेषा अन् मग स्मरू लागतात तिनं धारण केलेली, मन सुखावणारी, अंतर्मुख करणारी, गुदगुल्या करणारी आणि कधी कधी जीव अगदी गुदमरवून टाकणारी विविध रूपं ! अचेतनाला सचेतन करणारी आणि वस्तूला व्यक्तित्व प्राप्त करून सरवटे यांची ही रेषा– तिच्यापुढे कोणाच्याही शब्दांचे सामर्थ्य लुळे पडावे. निदान माझ्या लेखणीत तरी ते त्राण खचितच नाही.

तसं सरवटयांना मी पाहत होतो. म्हणजे इथं तिथं ते मला दिसायचे. कधी गिरगाव-पोर्तुगीज चर्चच्या परिसरात, कधी प्रार्थनासमाजाच्या कोपऱ्यावर, तर कधी केळेवाडीत– साहित्य संघाच्या प्रवेशद्वाराशी– पांढऱ्याशुभ्र ट्रावझर्स तसाच शर्ट, व्यवस्थित नेकटाय, केस भांगाच्या वळणाची कदर करीत

चापूनचोपून बसवलेले आणि हातात चामड्याची वादीवाली सदागरोदर पोर्टमेन्टो टाइप बॅग ! कविवर्य मर्ढेकरांना मी एकदाच ओझरतं पाहिलं आहे. सरवटचांच्या तेव्हाच्या वयात ते सरवटचांसारखे दिसत असले पाहिजेत असा उगाचच मला भास होई. मर्ढेकरांच्या छबीशी सरवटचांचं मला खूपच साम्य वाटायचं... अजूनही वाटतं. बाकी सरवटे म्हणजे वर्गातला पैकीच्या पैकी मार्क्स मिळवणारा स्कॉलर मुलगा असतो ना– जिमखान्यावर राहणारा, वडिलांच्या मोटारीतून शाळेत येणारा– तसे एकदम घरंदाज वाटत. त्यांच्याबरोबर आमच्या समान ओळखीचं कोणी असलं तर त्याच्या जोडीनं ते डोळ्यांच्या कडांतून माझ्याकडे लुकूलुकू बघत. चक्क खटचाळ हास्यदेखील भिरकावून देत आणि लगेच आपल्या हातून काहीतरी पातक घडून गेलंय अशा भावनेनं भयंकर गंभीर होत. एकदा-दोनदा तर 'काय, कसं काय ? सध्या काय ?' असा डायलॉगदेखील ते न अडखळता मला उद्देशून बोलले (पण तेवढचात कोणीतरी अज्ञात दिग्दर्शक 'कट्', 'कट्' असा किंचाळला असावा) अन् मग पुन्हा अपराधी मुद्रेनं हातातली ती लठ्ठ लेदर बॅग झुलवीत राहिले.

पुढे असाच एक दिवस रात्रीचा सेंट्रल सिनेमावरून चर्नीरोड स्टेशनकडे जात असताना वाटेत नाना काकतकर आणि शंकरराव कुलकर्णी या जोडगोळीनं मला थबकवलं आणि 'यांना सांगितलंत का !' असं अगदी खाजगी स्वरात एखाद्या गुप्त कटाची वाच्यता करावी अशा थाटात शंकररावनी काकतकरना विचारलं. (आणि संघाचा माणूस अशा प्रसंगी जसं स्मित करील तसं रहस्यमय स्मित काकतकरांनी केलं. ते अर्थातच मला उद्देशून पण शंकररावांकडे पाहत केले हे सांगणे नलगे. तात्पर्य म्हणजे ते त्यावेळी 'अक्षरसाहित्य' नावाची जी एक ग्रंथमालिका प्रसिद्ध करीत होते तीत माझा एखादा कथासंग्रह प्रसिद्ध करायचे त्यांनी योजिले होते. मी भलताच खूष ! (अहो, एवढचा प्रेमानं विचारतो कोण तुमच्या साहित्याला ?) त्या उत्साहात मी माझ्या निवडक

हलक्याफुलक्या (आजच्या भाषेत तुफान विनोदी आणि विलक्षण उपहासगर्भ– उदरविदारकसुद्धा !) कथांची कात्रणं घेऊन सरवटे यांना त्यांच्या असोसिएटेड सिमेंट कंपनीच्या आलिशान कार्यालयात जाऊन भेटलो कसला काही परिचय नसताना अगदी अगांतुकासारखा मी सरवटयांना भेटत होतो. त्यांनी माझ्या कथासंग्रहास मुखपृष्ठासाठी साजेसं चित्र द्यावं अशी मनात दाट इच्छा होती (पण आवडेल त्यासाठीच चित्र काढून द्यायची त्यांची प्रतिज्ञा असल्याचंही ऐकून होतो.) पण सरवटे हो म्हणतील याची खात्री नव्हती. सरवटयांनी सौम्य सज्जनपणानं माझं म्हणणं ऐकून घेतलं. वेसमेंटमधील कँटिनमध्ये नेऊन चहा वगैरे दिला. कात्रणं ठेवून घेतली आणि 'बघतो, पुढच्या शुक्रवारी या...' अशा शब्दात मला निरोप दिला.

ज्याची वाट पाहत होतो तो शुभ-शुक्रवार एकदाचा उजाडला. 'कधी येऊ भेटायला ?' असं फोनवरून सरवटयांना विचारलं. आणि संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर चर्चगेटला भेटायचं ठरलं. त्याकाळात सरवटे यांचा शुक्रवारचा कडकडीत उपास असायचा. (त्याचं तेज त्यांच्या चेहऱ्यावर विलसत होतं– माझी आपली समजूत की आपल्या कथा आवडल्यामुळे ते असे प्रसन्न वगैरे दिसताहेत ! जवळच्याच 'गुर्दा'त जाऊन फक्त चहा वगैरे घ्यायचे– (वगैरे नाही– फक्त चहाच !) एक निवांतसा कोपरा पकडून आम्ही बसलो. अशा हॉटेल्सचं एक बरं असतं– चहाचा सारा सरंजाम मांडून प्रत्यक्ष चहा येईपर्यंत वेटरमंडळी किमान प्रथम खूप वेळ आणि नंतर खूप बिल लावतात ! सरवटयांनी त्यांची गरोदर बॅग टेबलावर ठेवली. आतून एक ब्राऊन पेपरची लांबरुंद पिशवी आणि माझ्या कथांचं बाड काढलं. आणि पवित्रपणे हसत म्हणाले, 'बघा, कसं वाटतं कव्हर– आपल्याला तुमचं लिहिणं आवडतं. तुम्ही नियमित का नाही लिहीत ?' (हे एवढं ऐकल्यावर मी सुखानं प्राण सोडायची खरं तर तयारी करायला हवी होती. पण झालेल्या आनंदाच्या भरात ते राहून

गेलं ते राहूनच गेलं !) मी घाईघाईनं पिशवीतून कव्हर डिझाईन काढलं. संग्रहात पूर्वी 'हंस'मध्ये प्रसिद्ध झालेली एक 'कानफाटचा' म्हणून कथा होती तिला धरूनच सरवटचांनी मुखपृष्ठासाठी आधुनिक उमरखय्याम रंगवला होता. (चित्र पाहून अनुभवायचा विशेष– त्याचे शब्दांत वर्णन कसे करणार ?) माझा 'कानफाटचा' संग्रह विसरला जाईल (नव्हे, गेला आहेच) पण सरवटचांनी त्याच्यासाठी रेखाटलेलं मिस्किल मुखपृष्ठ विसरता येणं कठीण आहे. ह्या संग्रहाच्याच काळात एका दुपारी पार्ल्याला सरवटचांच्या घरी सरवटचांनी माझे एक महत्त्वाकांक्षी पोर्ट्रेट रेखले. (आमच्यासारख्यांच्या बाबतीत एक बरे : ब्लॅक अँड व्हाईटला पर्याय नाही !) यथावकाश त्याचा 'सि. कॉ.' ब्लॉक तयार होऊन आला. तो 'कानफाटचा'च्या जॅकेटवर जाऊ शकला नाही. म्हणून माझे 'वीणा'तले सहकारी श्री. श्रीकृष्ण घोटगे यांनी तो दिनकर साक्रीकरांच्या 'पृथ्वीच्या पाठीवर' या सदरात एकदा स्टॅनलीचा म्हणून, एकदा मोलोटोव्हचा म्हणून आणि एकदा तर चक्क मॉरिस शोम्बेचा म्हणूनही छापला. (बुल्गानिनला दाढी आणि रुश्चेव्हला टक्कल असल्यामुळे त्यांचा पुढे निरुपाय झाला असावा !)

बर्फ आता चांगलेच वितळले होते. रमेश मंत्री आणि सरवटे यांची कार्यालये एकाच्या एक लागून असावीत इतकी जवळ होती. मंत्रींची आणि माझ्या मैत्रीची पत्रिका अगदी पहिल्या भेटीतच कशी छत्तीसगुण जुळली. सरवटे तर त्यांचे कोल्हापूरपासूनचे (अमेरिकावाल्या प्रा. विठ्ठल वर्टीकरांसह) जानेजिगर दोस्त. सरवटे आणि मंत्री (किंवा मंत्री आणि सरवटे) माझ्या 'वीणा'साठी हातचं काही एक राखून न ठेवता अगदी सुरुवातीपासूनच भरभरून सहकार्य देत होते 'वीणा' हे त्यांनी आपलंच मानलं होतं. आमच्या आवडीनिवडी आणि स्वभावविशेष एकमेकांना पूरक आणि समंजसपणे सांभाळून घेणारे होते. (म्हणजे अजूनही आहेत.) मंत्री आणि सरवटे यांची रोज

सायंकाळची गिरगावात काही ना काही कामं निघत. कधी सरवट यांना 'मौजे'त वा 'मॅजेस्टिक'वाल्या केशवराव कोठावळे यांच्याकडे काही काम असायचं. मंत्रींनाही केशवराव कोठावळे यांना भेटणं असे. (शिवाय त्यांच्याच शब्दांत म्हणजे आणखी काही 'किरकोळ शिरकोळ' वा 'फुटकळ फुटकळ' कामं उरकणं असे.) अशा वेळी काँग्रेस हाउस समोरच्या 'वागळे अँड कंपनी'तल्या माझ्या मुख्य ठाण्यावर मंत्रींचा फोन येई: संपादक, तुम्ही आहात ना? मी आणि चित्रकार येतो आहोत. गिरगावात काही फुटकळ कामं आहेत. मग बरोबरच जाऊ आपण...'

यथाकाल गोरजमुहूर्त साधून ही जोडगोळी वागळे कंपनीत प्रविष्ट होई. सरवटे त्यातल्या त्यात बऱ्यापैकी खुर्ची पकडून प्रथम बूट काढून बाजूला ठेवीत. जरा वेळ आरामात पाय हलवीत. त्यांचा तो राष्ट्रीय कार्यक्रम मी चारसहा वेळा पाहिला आणि मग एक दिवस धीर करून विचारलं: 'वसंतराव, तुम्ही खलिल जिब्रान वगैरे वाचता वाटतं?' वसंतराव यावर काय धोबीपछाड टाकावी या विचारात असतानाच मी बोलून जातो, 'जिब्रानचं एक आशयपूर्ण वाक्य आहे: 'भूमातेला तुमच्या पावलांचा स्पर्श होऊ द्या. तुमच्या पावलांना मुक्त श्वासोच्छ्वास करू द्या...' तुमचं हे असं बूट काढून पावलं मोकळीढाकळी हलवताना पाहिलं की मला हे जिब्रानचं विधान सतत आठवतं.'

ही अलीकडची चारपाच वर्षं सोडली तर गेल्या वीस वर्षांत सुट्यांचे दिवस सोडता क्वचितच अशी एखादी सायंकाळ गेली असेल की जेव्हा मी, मंत्री आणि सरवटे असे आम्ही एकत्र भेटलो नसू. सरवटयांचं कार्यालय आताप्रमाणे शनिवारचं पूर्ण बंद नसे त्या काळात लंचसाठी अधूनमधून आम्ही ब्रूस स्ट्रीटमधल्या 'पर्शियन'मध्ये जात असू. तिथलं लंडनछाप फर्निचर, तिथले खाद्यपदार्थ आणि तिथलं एकंदर वातावरण ज्यावर मनापासून लोभ करावा असं असे. सरवटे खऱ्या अर्थानं खवय्ये आहेत.

त्यांच्या खाण्यापिण्यात एक खास प्रकारचा सॉफिस्टिकेटेड चोखंदळपणा आहे. त्यांना जेवतानाच काय परंतु साधा चहा घेताना पाहण्यातही एक मजेदार आनंद आहे. खरं सांगू का, मला राहून राहून वाटतं की वसंतरावांचं एकंदर व्यक्तिमत्त्व (आणि स्वभावप्रकृतीदेखील) ब्रिटिश सद्गृहस्थावर बेतलेली आहे. त्यांची शिस्त, त्यांचा कामाचा एकंदर उरक, अथक परिश्रम करीत राहण्यावरील त्यांचे प्रेम, दिला शब्द पाळण्यामागचे त्यांचे व्रती मन आणि मुख्य म्हणजे जवळचा मित्र असो वा आपल्याकडे येणारा कोणी का असो, त्याला शांतपणे समजावून घेण्याची त्यांच्यातली एक अभिजात जडणघडण हे सारं सारं मला शंभर टक्के ब्रिटिश वाटतं. ते पातळ फुळूक दार्जिलिंग चहा चवीनं पितील, 'पंच' मॅगेझीनची निष्ठेनं वर्गणी भरतील, अॅगाथा ख्रिस्ती, 'स्पाइक' मिलिगन, माल्कम, मग्रिज आणि पी. जी. वुडहाउस, वगैरे मंडळींना वारंवार प्रेमानं जवळ करतील. आता बाजारात भितीवरच्या सुबक विजेच्या घड्याळांना काही तोटा आहे का ? पण नाही. सरवटे ठाकुरद्वारच्या कुठल्याशा दुकानातून व्हिक्तुरिया राणीच्या काळातले लबकवाले टोले देणारे घड्याळ घरी आणून लावतील. आणि आमच्यासारख्यानं कुणी भुवया उंचावल्याच तर गंभीरपणे प्रतिपादन करतील : 'त्यात काय आहे, ह्या टोल्यांची घरातल्या लोकांना एक जाग आणि सोबत असते सदाची !' त्यांचा इंग्रज' अॅक्सेंट कटाक्षानं ऑक्सफर्ड शब्दकोशावरहुकूमचा... आणि इंग्रजी उच्चाराची शैली खास नगरी बाण्याची (नागरी नव्हे !). असं काही खटकणारं आमच्या तोंडून त्यांच्या कानी पडलं की त्यांचा चेहरा पाहण्यासारखा होतो. (फक्त ते 'धिस ब्लडी निग्गर !' हे शब्द संयमपूर्वक ओठावाहेर येऊ देत नाहीत इतकंच. बाकी भाव तोच डिट्टो जॉनबुल साहेबाचा !) वसंतराव एखादं पुस्तक तुम्हांला दाखवतील. त्याविषयीचा लोभ तुमच्या मनात ते पेरतील आणि तुम्ही ते वाचायला मागितलंत तर निग्रही मनानं नाकारतील. (लायब्ररीतनं आणलेलं वा दुसऱ्याचं, विशेषत: 'रंगायन ग्रूप'

पैकी एखाद्या कोणाचं ते पुस्तक असेल तर त्यांच्या नकाराला एक खास टोक आलेलं असतं. 'सत्यकथे'तल्या त्या 'जमले'ल्या कथेप्रमाणे !), मात्र मधूनच त्यांना काव्यात डुंबण्याची सणक येते आणि अशा वेळी पंडित राहुल सांस्कृत्यायनांनी तिबेटमधून याकवर लादून संस्कृत पोथ्या भारतात आणल्या तशी बोरिवली ते पार्ले अशी काव्यग्रंथांची वाहतूक करण्यासाठी ते तुम्हांला वेठीला धरतील !

वसंतराव वृत्तीनं मिशनरीही आहेत. म्हणजे असं की, मी एवढा कॉफीबाज आहे ना, तर मला त्यांनी चहाची दीक्षा द्यायचं ठरवलं. असा तसा नाही तर चायनीज ग्रीन टी ! दहा वर्षांमागे चर्चगेटला 'ॲम्बेसेडर होटल्'च्याच नजीक 'नगीन महाल' मध्ये 'कामलिंग' नामक एक चायनीज रेस्टॉरंट होतं. आम्ही दोघंच असलो की तिथं 'ग्रीन टी'चे घुटके चवीने घेत सायंकाळ सत्कारणी लावीत असू, (मंत्री तिसऱ्या प्रहरानंतर चहाला साधा स्पर्श करणार नाहीत, त्यांना मग रात्री धड झोप लागत नाही अशी त्यांची तक्रार असते !) मला यथाकाल या चहाची मझा 'समजो लागली'... आणि आपलं अवतारकार्य पूर्ण झालं या तृप्त आनंदानं वसंतरावांनी एक दिवस 'कामलिंग' मध्ये मला 'बायबल' प्रदान केलं, (फक्त या बायबलचं वर्णन 'होली टेस्टॅमेन्ट' वगैरे नसून 'This Week' मॅगेझीनच्या संपादकवर्गानं : राल्फ स्टीन, चार्ल्स डी राईस आणि विल्यम अ.य. निकोल्स वगैरेंनी संपादिलेला 'What's funny about that?' हा निवडक अमेरिकन व्यंगचित्रसंग्रह असं करायला हवं ! १० मार्च १९६५ रोजी आपल्या सहीशिक्क्यानिशी हा सुंदर ग्रंथ वसंतरावांनी मला भेट दिला. तो नेहमीच सहज नजरेला पडेल अशा पद्धतीनंच मी माझ्या बुककेसमध्ये ठेवलेला असतो. वसंतरावांच्या ऐवजी !).

इतक्या वर्षांच्या स्नेहसंबंधानंतर वसंतरावांच्या दोन गोष्टींबद्दल माझ्या मनात अपार कुतूहल कायम आहे. अगदी सुरुवातीच्या

काळात ते आपल्या चित्राखाली सहीच्या जागी व्हिसलरच्या 'नांगी असलेल्या फुलपाखरा' प्रमाणेच एक त्रिशूळ रेखीत. (कागदोपत्री कुठं 'शंकर' तर दडलेला नाही ?) आणि पावसाळ्यात लांबरुंद रेनकोट वा घसघशीत सोळा काड्यांची एखादी छत्री वापरण्याऐवजी ते इर्लेवजा (केवळ पार्ल्यात राहतात म्हणून ?) पॉलिथीनचा लांडा रेनकोट आणि त्यांच्या अंजू, मंजू वा सत्यजित या बछड्यांपैकी कोणाची तरी बाळछत्री का वापरतात ? (कलावंताचा विक्षिप्तपणा, दुसरं काय !)

वसंतरावांचे अधूनमधून खाण्यापिण्याचे सततचे काही ना काही प्रयोग चाललेले असतात. कधी सकाळीसकाळीच ते फक्त लिंबूपाणी घेतील. ऑफिसला निघताना (आणि ही वेळ सकाळी साडेआठ पावणेनऊची तरी असते) फक्त दोन बिस्किटं (ब्रेडशी त्यांचे उभे वैर आहे !) आणि कप-दीडकप फुळकवणी चहा ते ओरपतात. (बदल म्हणून त्यांची आई आजही त्यांना चिमुटभर मऊसर गुरगुटा तूप-मीठ-भातही भरवते.) मधल्या वेळेसाठी संजीवनी वहिनी त्यांना आपल्या हातरुमालाच्या आकाराच्या हलक्या-फुलक्या पोळ्या आणि चमचा-दोन चमचे काहीतरी तोंडी लावणे स्टेनलेसच्या प्रचंड पसरट डब्यात घालून देते– 'साश्रू नयना'ने वगैरे म्हणतात तसं– (म्हणजे वसंतरावांचाच तसा आग्रह असतो. 'साश्रू नयनां'चा नव्हे. या इवल्याशा आहाराचा. कारण सध्या ते प्राणपणाने डायट सांभाळीत असतात–खरं म्हणजे डायटशी झुंजत असतात.) ह्या अशा आहारानं आपल्याला प्रचंड उत्साह (आत्मोन्नती आणि उद्योग यांसह) वाटतोय असं दिवसभर ते आल्यागेल्यांकडे गर्जना करीत असतात. आणि जसजशी उन्हं उतरणीला लागतात तसतसा त्यांचा धीर गळू लागतो. त्यांचा चेहरा कसनुसा झालेला असतो. आणि ठरल्याप्रमाणे मी आणि मंत्री त्यांना चर्चगेटला भेटलो रे भेटलो की नरमांसभक्षक हॉटेंटॉट जमातीच्या नायकाप्रमाणे ते आमच्याकडे रोखून पाहायला लागतात. 'चला, प्रथम आपल्याला थोडा चहा घेतलाच पाहिजे !' असे किंवा

अशा अर्थाचे ते प्रकट चिंतन आम्हांला ऐकवतात. सुदैवानं 'गुर्दा', 'बॉम्बेली', 'टी सेंटर' वा गेला बाजार 'पुरोहित' (मंत्रींना मिक्स्ड भजी किंवा मिसळबिसळसारखं अन्य काही चावट चावट हवं असल्यास) हाकेच्या अंतरावरच असतात. 'गुर्दा' हा सरवटे यांचा ठरलेला चॉइस. मग दिन् दिन् करीत आमची फौज 'गुर्दा'त शिरते. सरवटयांचा चहा म्हणजे साधासुधा नसतो. अशावेळी त्यांना 'स्कॉटिश हाय टी' अभिप्रेत असतो. 'मित आहाराची ऐशी तैशी' अशा कलंदर कैफात ते प्लम केक्स् काय, क्रीम केक्स् काय, हॅम्बर्गर्स काय, चटनम समोसे काय–एकापाठोपाठ एक मागवीत राहतात आणि मग नसलेल्या मिशा रुमालानं पुसल्याचा आविर्भाव करीत 'गुर्र गुर्र' ऐवजी कृपावंत होऊन 'बरं वाटलं बुवा!' असा तृप्तोद्गार काढतात.

मंत्री सरवटयांना त त प प किंवा म्...म् करीत बोलणाऱ्या मराठी बिटनिक्सचे श्याम म्हणतात. (वाचा : 'कोंडाळे'/ ज्ञानेश्वर नाडकर्णी, 'वीणा' दिवाळी अंक : १९६१) या श्यामचे आम्हांला फार लाड पुरवावे लागतात. रामाने चंद्रासाठी धरला नसेल असा हट्ट आणि आकांत ते अंधेरी लोकलसाठी करायला लागतात (तिकडे मालाडला राहणारे मंत्री आणि बोरिवलीच्या अभयारण्याच्या आसपास राहणारे ठोमरे कधीच मूर्च्छित पडलेले असतात!) –पण वसंतरावांचा पायगुणही बेटा असा की प्लॅटफॉर्मला त्यांचा पदस्पर्श होताच धडाधड साऱ्या विरार अन् बोरिवली फास्ट ट्रेन्स कॅन्सल व्हायला लागतात; अशावेळी जगज्जेत्या सिकंदरच्या आविर्भावात सरवटे आम्हांला बखोटयाला धरून अंधेरी स्लोत कोंबतात. तेवढयावर त्यांचं समाधान होत नसतं. ते पुन्हा पार्ल्याला स्वतःबरोबर आम्हांला उतरायला लावतात. अशावेळी ते मुलाहून मूल झालेले असतात. रंगून नकलाबिकला करतात. पिंजऱ्यातल्या चिपांझीला मारावेत तसे चणेसुद्धा ते नेम धरून आम्हांला मारत राहतात. आम्ही घरी पोहोचतो तेव्हा 'आकाशवाणी' जागतिक बातम्यांचे अखेरचे

आचके देत असते. आमच्या (मनाने) तरुण, सुविद्य–आणि समंजस (देखील)–वायकांच्या आता ते कायमचे अंगवळणी पडल्यासारखे झाले आहे!

मत ही प्रकटपणे देण्याची गोष्ट नव्हे अशी वसंतरावांची ठाम धारणा आहे. तसं ते निर्भिडपणे मत देतातही पण त्यामुळे कोणी दुखावले जाणार नाही याचीही ते खुबीने दक्षता घेतात. मंत्री या बाबतीत अनेकवार त्यांची थट्टा करतात. वसंतराव त्यांच्या मुलांचे नाना असले, तरी मंत्रींच्या लेखी ते अशा वेळी अचानक 'तात्यासाहेब' झालेले असतात. मंत्रींना त्यांच्या (म्हणजे वसंतरावांच्या) मस्तकावर अशावेळी झिरमिळ्याची लालचुटुक पुणेरी पगडी दिसायला लागते. ते एक एक शेंगदाणा चवीनं तोंडात टाकताना दिसू लागतात.. आता साहित्यसम्राटांप्रमाणे वसंतरावांनाही शेंगाचे दाणे आवडतात पण खारावलेले काजू त्याहून अधिक प्रिय! (वसंतराव, काजू चाळीस रुपये किलो झालाय आता!) मंत्रींचे रागलोभ जसे तीव्र तसाच त्यांचा हजरजबाबीपणा तुफान आणि कल्पनाशक्ती विलक्षण भेदक असल्याचा आम्ही अनेकवार अनुभव घेतलाय. सरवटयांची खिल्ली उडवत मंत्री म्हणतील, 'आता आपल्या तात्यासाहेबांच्या समोर एखादा खुनाचा खटला आला, आणि खून निर्विवाद शाबीत झाला असला तरी निकालपत्रात ते म्हणतील–नाही, खून ही गोष्ट तशी म्हटली तर वाईटच... पण संशयिताच्या मस्तकावरचे ते भव्य टक्कल, त्याचे घारे डोळे आणि मुख्य म्हणजे त्यानं या कामासाठी वापरलेला खंजीर यांचाही थोडा सहानुभूतीनं विचार केला पाहिजे. असा नक्षीदार मुठीचा दुर्मिळ खंजीर खुनासाठी वापरण्यात संशयित खुनीनं जी अभिजात कलात्मकता व्यक्त केली आहे निदान तिच्यासाठी तरी त्याला कुणीही दहा खून माफ करावेत!' पण या थट्टेवरही वसंतराव आपलं मत व्यक्त करणार नाहीत आणि आमच्या हसण्यात आपण त्या गावचेच नाही इतक्या भावडेपणानं सामील होतील.

वसंतरावांची हास्यचित्रे, कथाचित्रे, ग्रंथांची वैशिष्ट्यपूर्ण वेष्टणे या साऱ्याविषयी कितीतरी लिहिण्यासारखे आहे. कारण आज अनेक वर्षांपासून ते सारे माझ्या आनंदाचा आणि कुतूहलपूर्ण विचाराचा विषय होऊन बसले आहे. मला श्याम जोशी, प्रभाकर ठोकळ आणि शि. द. फडणीस यांची हास्यचित्रे आवडतात. श्याम जोशींच्या हास्य चित्रांपेक्षा त्यांच्या खोडकर (आणि विलक्षण चतुर) चित्रकल्पनाच माझ्या मनात अधिक रेंगाळतात. ठोकळांची साहित्याची समज आणि साहित्यावरचे अपरंपार प्रेम त्यांच्या व्यंगचित्रांतून व्यक्त होत राहतं, तर फडणीस अचेतनात चैतन्य निर्माण करून उर्दू शायरीचा चमत्कृतीनं थक्क करणारा परिणाम साधतात. या दोघांच्या हास्यचित्रांचे नायक-नायिका एकाच शैलीतले आणि एकाच तोंडवळ्याचे– बदलतात ते फक्त हास्य-कारणामागचे घटना प्रसंग. सरवटे या दोघांहून भिन्न–फार भिन्न आहेत. त्यांनी आपल्या रेषेला जे परिमाण प्राप्त करून दिले ते केवळ मन आणि बुद्धी स्तिमित करून सोडणारे आहे. त्यांचे प्रत्येक चित्र, प्रत्येक हास्य वा टीकाविषय एक नवाच ताजेपणा घेऊन येतो. हास्यचित्रांच्या संदर्भात त्यांच्याइतका विचार आणि प्रयोग आपल्याकडे क्वचितच कोणी केला असेल असं मला मनापासून वाटतं. खिडक्या, जिने, खुर्च्या, इतकंच नव्हे तर आकडे आणि बाराखडचा यांना जे त्यांनी आपल्या रेषेतून व्यक्तिमत्त्व प्राप्त करून दिलंय त्याला चालू भाषेत सांगायचं तर 'जबाब' नाही. मला वाटतं, 'महाराष्ट्र टाइम्स'च्याच एका दिवाळी अंकात त्यांनी नरीमन पॉइंटवरच्या गगनभेदी इमारतींचे अरण्य रेखाटले होते. औद्योगिक संस्कृतीची ती विदारक शोकांतिका पाहताना मी आतल्या आत गुदमरतच होतो...कासावीस होत होतो. त्याच अंकात पु. ल. देशपांडे यांचाही आपल्या आजघडीच्या संस्कृतीचे वाभाडे काढणारा प्रकट चिंतनात्मक लेख आहे. पी. एल्.च्या विचारात आणि सरवटचांच्या त्या चित्रात काहीतरी एक अनामिक नाते असल्याचा मला सतत भास होतो आहे. दोघांच्या अभिव्यक्तीची माध्यमं भिन्न असली तरी दोघेही

एकच परिणाम घडवीत आहेत असं आजही मला वाटतं. काही दिवसांमागे आमच्या 'नवनीत' मध्ये एक छोटी लेखमाला मी आयोजित केली होती. विषय होता : 'मी जेव्हा थकतो, उबगतो, वैतागतो तेव्हा...' या लेखांचे स्वरूप आत्मकथनात्मकच होते आणि श्री. एस्. एम्. जोशी, दुर्गा भागवत, जयवंत दळवी, गो. नी. दांडेकर आणि वसंत सबनीस वगैरेंसारख्या मजविषयी आस्था असणाऱ्यांनीच त्यासाठी आवर्जून लेखन केलं होतं. त्यातल्याच कोणी एकानं तेव्हा मला विचारलं होतं– 'तुम्ही हा प्रश्न आम्हांला विचारता; तुम्ही स्वतः काय करता अशा वेळी ?' त्यावेळी जे सांगायचं राहून गेलं ते इथं सांगण्यावाचून मला गत्यंतरच दिसत नाही. सांगू ?

–अशा वेळी मी जेम्स हॅडली चेसचं मिळेल ते पुस्तक बगलेत मारून लोकलनं बोरिवली ते चर्चगेट अशा फेऱ्या करीत वेळ काढतो. (दंडवते, डब्यात आम्हांला सुखानं पाइप तरी ओढू द्या–) ताडदेव, ग्रँटरोड, गावदेवी, लॅमिंग्टन रोड, घोगा स्ट्रीट वा हुतात्मा चौकाच्या परिसरातील जुन्या पुस्तकांच्या दुकानातली मासिकं, पुस्तकं उलथीपालथी करीत त्यांचा वास नाकात साठवीत चुतिया चक्कर मारीत राहतो. घरी असलोच तर पाइप चोखीत... आवडीची टेप लावून सौम्य व्हिस्कीचे चवीनं घुटके घेत राहतो. पण हे सारे उपाय जेव्हा हरतात तेव्हा माझ्या ऑफिसात आणि घरीही चटकन हाती लागेल अशा बेतानं वसंत सरवटे यांच्या 'खडा मारायचा झाला तर...'ची एक एक प्रत ठेवलेली असते. ती काढून मी मजेत पाहत बसतो. सारे उपाय थकतात तेव्हा हा 'अक्सीर इलाज' लागू पडतोच पडतो... आणि राजश्री उमाकांत नीमराज ठोमरे यांचे टाळके पुन्हा ठिकाणावर येते !

थँक्यू, वसंतराव... थँक्यू !

•••

हसणारी रेषा

हंस–मोहिनीचे संपादक अनंत अंतरकर यांना कोणी जिवाभावाचे स्नेही आहेत किंवा नाही हे मला माहीत नाही परंतु त्यांच्याविषयी अंतर्यामी कृतज्ञता भाव बाळगणारे, साहित्याच्या आणि कलेच्या क्षेत्रात आज नामवंत म्हणून मान्यता पावलेले अनेकानेक चाहते आहेत ह्याची मला जरूर जाणीव आहे अंतरकर यांनी आपल्या अभिजात व्यवहारी रसिकवृत्तीनं साहित्याच्या आणि चित्रकलेच्या क्षेत्रात पहिलीवहिली पावलं टाकणाऱ्यांना सातत्यानं सहानुभूतीचे आणि प्रोत्साहनाचे पांगुळगाडे पुरविले आहेत. कधी पांगुळगाड्याला धरून तर कधी अंतरकराचे बोट धरून ही मंडळी लहानाची मोठी होत गेली... कालांतरानं आपल्या ईप्सित क्षेत्रात पाय घट्ट रोवून उभी राहिली.

अशा ह्या नामवंतांत हास्यचित्रकार शि. द. फडणीस हेही एक आहेत. मोहिनी मासिकाचे संपादक अंतरकर आहेत ह्यापेक्षा 'मोहिनी'वरील विनोदी चित्रं फडणीसांची असतात ह्याची जाण वाचकांत अधिक आहे. तेव्हा साहजिकच हंस–मोहिनी मासिके, किर्लोस्कर मासिके, अॅसगेक होजिअरी आणि टेक्स्टाईल ग्रूप आणि फडणीसांची मित्रमंडळी ह्यांच्या शुभेच्छा पाठीशी घेऊन फडणीसांच्या मूळ चित्रकृतींचे एक प्रदर्शन मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत फेब्रुवारीच्या २६, २७ आणि २८ तारखांस मोठ्या थाटामाटात भरावे हे मला फार औचित्यपूर्ण वाटते.

मराठीत विनोदी चित्रांची, व्यंगचित्रांची (राजकीय आणि सामाजिक) परंपरा फार जुनी आहे. मराठी वृत्तपत्र व्यवसाया-

इतकीच. पण इतकं मागे जरी गेलं नाही तरी खुद्द अंतरकरांच्या बाबतीत मी असं सांगू शकेन की, 'सत्यकथे'चे ते संपादक असताना १९४० च्या सुमारास सत्यकथेच्याच एका दिवाळी अंकावर चित्रकार दलालांचे एक हास्यस्फोटक रंगीत विनोदी चित्र प्रसिद्ध झाल्याचे मला नीट स्मरते.

तेव्हा, मासिकांच्या मुखपृष्ठावर अशा स्वरूपाची चित्रं यावीत ही अंतकरांची फारा दिवसांची कल्पना असली पाहिजे आणि ती प्रत्यक्षात उतरायला चित्रकार शि. द. फडणीसांचे त्यांना फार मोलाचे साहाय्य झाले असले पाहिजे यात शंकाच नाही. पोक म्हणून अधून मधून एखादे विनोदी चित्र मासिकाच्या मुखपृष्ठावर छापून आत्मतृप्तीच्या गौरवानं भारावून जाणं वेगळं आणि एक नव्हे तर वर्षाचे बारा महिने आणि बारा बारा महिन्यांची बारा बारा तेरा तेरा वर्षं हे सातत्य टिकवून धरणं ह्याचं श्रेय संपादकापेक्षा नवनवोन्मेषशाली प्रतिभेचे देणे लाभलेल्या चित्रकारालाच देणे योग्य होईल. ऐकणारा खूप तयार आहे पण गळ्यातून ऐकण्याजोगा स्वर तर उमटायला हवा !

बार-तेरा वर्षांपूर्वी फडणीस मुंबईच्या आर्ट स्कूलमध्ये शिकत असताना तेव्हाच्या प्रसिद्ध मासिकांतून अधूनमधून व्यंगचित्रं–व्यंगचित्रमालिका प्रसिद्धीसाठी पाठवीत असत. आज आपणात नसलेले पण आपल्या कलात्मक व्यंगचित्रांचा संपन्न ठेवा मागे ठेवून गेलेले चित्रकार हत्तंगडी यांचेही फडणीसांना त्या काळात बरेच वैचारिक मार्गदर्शन लाभले.

फडणीसांचे असेच एक विनोदी रेखाटन अंतरकरांना इतके आवडले की ते दोनरंगात छापण्याचे आणि तेही मोहिनीच्या मुखपृष्ठावर, असा आपला विचार त्यांनी त्यांचेकडे व्यक्त केला. फडणीसांनी ते विनोदी चित्र लगेच दोन रंगात तयार करून आणले...पण अंतरकरांच्या एकंदर स्वभावाची बूज राखण्यासाठी म्हणूनच की काय वर्षदीडवर्ष ते तसेच (जिथे कुठे अंतरकर अशा

चिजा ठेवत असतील तिथं) काळोख पीत पडून राहिले. मध्यंतरीच्या काळात अंतरकरांची काही एक मानसिक तयारी झालेली असावी आणि अखेर एक दिवस फडणीसांना ते म्हणाले, 'ते काही नाही. मोहिनीवर आता सरळ तीनरंगी विनोदी चित्रं द्यायची. यापुढे तुम्ही तसं एखादं चित्र घेऊन या...'

यथाकाल मोहिनीवर फडणीसांचे तीनरंगी विनोदी चित्र प्रसिद्ध झाले. यथाक्रम लोकांनी ह्या नव्या उपक्रमाला नाकं मुरडली. अंतरकरांच्या व्यावहारिक यशाची चिंता वाहणाऱ्यांनी त्यांना अंकाच्या खपावर 'परिणाम' होईल असा इशाराही दिला पण अंतरकर अचल राहिले. फडणीसांची विनोदी चित्रं मोहिनीवर सातत्यानं प्रसिद्ध होत राहिली. फडणीसांच्या ह्या चित्रांनी अंकाचे मुखपृष्ठ पाहून गालातल्या गालात हसायची वाचकांना सवय लावली.

अशी ही फडणीसांची हास्यचित्रं असतात तरी कशी ? मुख्य म्हणजे त्यांची चित्रकल्पना समजायला सोपी असते. सोपी असते याचं कारण ती बहुशः आपल्या नित्य जीवनात घडणारी आणि जनसामान्यांच्याही परिचयाची असते. फडणीसांच्या हसऱ्या रेषेला एक उमदा जोम आहे आणि डौलदार लय आहे. वास्तव चित्रांप्रमाणे ते निरनिराळ्या रंगांच्या मिश्रणांनी आपल्या चित्रांना विविध रंगछटा देण्याच्या फंदात कधीच पडत नाहीत. तांबडा, हिरवा आणि क्वचित पिवळा आणि निळ्याच्या विविध छटा हे त्यांचे आवडते रंग असावेत आणि तेही शक्य तो निर्भेळ वापरण्याकडे त्यांचा एकंदर कल दिसतो.

फडणीस जसे चित्राच्या पार्श्वभूमीला फारसे महत्त्व देताना दिसत नाहीत तसेच तपशीलांचे बारकावेही चित्रित करण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यांच्या विनोद-कारणाचे चित्र-विषय झालेली तरुण-तरुणी आज बारा वर्षे झाली एकाच एक अंगलटीनं, चेहऱ्यामोहऱ्यानं वावरताना दिसतात. परंतु वास्तव चित्रण

करणाऱ्यांवर , ठराविक ठशाचीच चित्रं क'ढतात !' असा जो एक आरोप केला जातो त्या आरोपाचे निदान फडणीसांना तरी भय नाही. कारण चॅप्लीनचा जसा 'ट्रॅम्प', चिं. वि जोशींचा 'चिमणराव', पु. ल. देशपांडे यांचा 'मी', ना. धों. ताम्हनकरांचा 'दाजी', अनंत काणेकरांचा 'गणू काका', वुडहौसचा 'जीव्हज', 'बर्टी वुस्टर' किंवा 'युकिरीज' ह्या पात्रांना जे एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे तेच वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व फडणीसांच्या ह्या नायकनायिकेच्या जोडगोळीला लाभलेले आहे. प्रभाकर ठोकळ या व्यंगचित्रकाराच्या हास्यचित्रातही आपणास हेच पाहवयास मिळते. व्यक्ती त्याच असतात चेहरामोहरा अंगलट सारं काही तेच; पण चित्र पाहताना वाटतं की ही मंडळी एका नव्या विनोदी परिस्थितीत सापडली आहेत. हे चित्रातले जे नवेपण आहे ते आकृतिबाह्य म्हणजे सिच्युएशन, मूड (परिस्थिती, भाव) ह्यांचे असते. आणि म्हणूनच त्यांचा ताजेपणा वाचकांच्या मनावर चटकन ठसतो. एकच व्यक्ती जीवनात अनेकानेक वेळा विनोदी परिस्थितीत सापडणे हे अशक्य थोडेच आहे ?

फडणीसांची चित्रं मोठी चतुर आणि बोलकी असतात. इतकी की अचेतनाला ते जेव्हा चैतन्यमय करून सोडतात तेव्हा त्यांच्या त्या हुकमी कल्पतीनं सारा कार्यभाग चुटकीसरशी साधला जातो. मध्यंतरी सरकारी पातळीवरून बुद्धवर्ष साजरे झाले. 'आकाशवाणी'नं तर बुद्ध गुणगाथनाच्या निर्बुद्धपणाचा कहर करून सोडला. फडणीसांनी ह्या बावतीतली आपली प्रतिक्रिया चित्राद्वारे कशी व्यक्त केली असेल ? दिवाणखान्यातल्या रेडिओवर ठेवलेला (शोभेचा) बुद्धाचा पुतळा चक्क दोन्ही कानात बोटं घालून 'हे बुद्ध-पुराण ऐकून ऐकून आता कान किटले बुवा. एआय् आरम् शरणम् गच्छामि !' अशी मुद्रा धारण करतो. फडणीसांच्या चित्रातल्या तरुणाच्या टायवरचं फुलपाखरू शेजारी उभ्या असलेल्या तरुणीने परिधान केलेल्या पातळावरील फुलांकडे झेप घेताना दिसते. हीच कल्पना बस स्टॉपवर उभ्या असलेल्या

तरुणीच्या पातळावरील मांजरांचे प्रिन्ट्स (ठसे) सचेतन होऊन शेजारच्या तरुणानं घातलेल्या बुशकोटवरील उंदरांच्या ठशांच्या दिशेनं धाव घेताना... वेगळा मुखवटा धारण करून आलेली दिसते. चित्र इथंच संपत नाही, ते संपतं ते त्या दोघांच्या मुद्रेवरील विस्मयाच्या नाजूक भावच्छटेनं !

फडणीसांचे निरीक्षण किती सूक्ष्म आहे याचे प्रत्यंतर देणारे एक चित्र लिहिण्याच्या ओघात सहज आठवले म्हणून सांगतो. पुण्याच्या लकडी पुलाच्या पायथ्याशी एक स्त्रीचा पुतळा आहे. तोच त्यांचा चित्रविषय झालेला आहे. पावसाळ्यात जवळून भरधाव जाणाऱ्या मोटारीनं आपल्या पातळावर चिखल उडेल ह्या (स्त्रीसुलभ) भयानं ह्या पुतळ्यातली स्त्री चक्क पातळ दोन्ही हातानं नीट वर सावरून घेताना बावरून काहीशा बचावाच्या पवित्र्यात उभी राहिलेली दिसते. हे चित्र पाहून वाचकानं गालातल्या गालात हसत, मनातल्या मनात स्वतःलाच टाळी न दिली तरच नवल. फडणीसांच्या काही काही विनोदी चित्रांना फार खोल अर्थ आहे. अशा वेळी हसवता हसवता ते झटकन् आमचा एक अश्रू आपल्या ओंजळीत दिमाखानं मिरवत नेतात.

'टेलरिंग फर्म' चं नुकतंच उद्घाटन झालं आहे पण कामच नाही अशा व्यथेत व्यग्र असलेले शिंपी दादा जेव्हा दुकानाच्या दर्शनी भागाला लावलेल्या केळीच्या खांबावरच्या फाटक्या पानानांच बसल्या बसल्या मशीनवर टीप मारू लागतात तेव्हा हसू आसूंची उदासरम्य माळ गुंफली जाते. थोरा मोठ्यांच्या बंगल्यात माळीकाम करणारा माळी... आपल्या तुपार स्नानाचा (शॉवर बाथ) पोक बादशाही खुपमस्तीत बागेतल्या पुतळ्याच्याच (आणि तो पुतळाही स्त्रीचाच !) हातात पाणी भरलेली झारी अडकवून देऊन गोपीचंदाच्या थाटात पुरा करताना पाहिला की हसता हसता गळ्यात अगाच एक आवंढा दाटून येतो.

व्यापारी मालाच्या जाहिरातीसाठी फडणीसांनी ज
विनोदी बोलकी चित्रं काढली आहेत त्यांतली '
होजिअरी' च्या स्ट्रेच नायलॉन पायमोज्यांच्या जाहिरातीसाठी
काढलेली चित्रं मला विशेष आवडली आहेत. पायमोज्यांच्या
आकारात गुडघे जमिनीवर टेकवून दोन्ही हातानं पंख्यानं वारा
घालणाऱ्या दोन जपानी सुंदरी (गेषा) रंगवून (आणि तेही
हिरव्या रंगात) ह्या पायमोज्यानं कसं गार आल्हादकारक आणि
आरामशीर वाटेल हेच जणू फडणीसांनी सूचित केलं आहे ह्या
पायमोज्यांच्या वापरानं तुम्हांला अधांतरी तरंगत चाललयासारखे
वाटेल हे गिऱ्हाइकाच्या मनावर ठसविण्यासाठी ते अरेबियन
नाइट मधील जादूच्या उडत्या गालीच्याच्या कल्पनेवरही
मात करतात.

चित्रकार फडणीसांनी पु. ल. देशपांडे ह्यांच्या 'अपूर्वाई', 'पूर्वरंग'
व रमेश मंत्री यांच्या 'एकहाती टाळी' आणि अन्य काही
लेखकांच्या ग्रंथांना विनोदी रेखाटणे दिली आहेत. प्रांजळपणे
सांगायचं तर त्यांची ही रेखाटनपद्धती माझ्या वैयक्तिक आवडी
निवडीशी जुळती-मिळती नाहीत. लेखकावर आपल्या चित्रांतून
मात केली पाहिजे हचा जागरुक भावनेतून ही रेखाटणे
उतरल्यासारखी वाटतात. आणि मुख्य म्हणजे त्यांत यांत्रिक
कारागिरीचाच भाग मला अधिक वाटतो. मला स्वतःला वसंत
सरवटे, बाळ ठाकूर यांच्या केसासारखी सूक्ष्म पण जोरकस लय
असलेल्या रेषेनं वेड लावलं आहे. त्यापुढे फडणीसांची अशा
रेखाटनांतली रेषा स्थूल, बटबटीत आणि ढोबळ वाटते. शिवाय
सरवटे आणि ठाकूर हचांची रेखाटनं प्रतिभेच्या स्पर्शानं अशी
काही पल्लवित झालेली भासतात की ते शब्दांपलीकडचं काही
पाहत आहेत, दाखवीत आहेत असा मर्मज्ञ रसिकाला साक्षात्कार
झाल्यावाचून राहणार नाही. (आणि अखेर शब्दांतून जे सुटले
आहे ते पकडण्यासाठीच तर ना चित्ररेषेचे माध्यम वापरायचे
असते !) क्लिष्टतेच्या आरोपांतून हे दोन्ही चित्रकार सुटलेले

तरुणीच्या पातळावरील मांजरांचे प्रिन्ट्स (ठसे) सचेतन होऊन शेजारच्या तरुणानं घातलेल्या बुशकोटवरील उंदरांच्या ठशांच्या दिशेनं धाव घेताना... वेगळा मुखवटा धारण करून आलेली दिसते. चित्र इथंच संपत नाही, ते संपतं ते त्या दोघांच्या मुद्रेवरील विस्मयाच्या नाजूक भावच्छटेनं !

फडणीसांचे निरीक्षण किती सूक्ष्म आहे याचे प्रत्यंतर देणारे एक चित्र लिहिण्याच्या ओघात सहज आठवले म्हणून सांगतो. पुण्याच्या लकडी पुलाच्या पायथ्याशी एक स्त्रीचा पुतळा आहे. तोच त्यांचा चित्रविषय झालेला आहे. पावसाळ्यात जवळून भरधाव जाणाऱ्या मोटारीनं आपल्या पातळावर चिखल उडेल ह्या (स्त्रीसुलभ) भयानं ह्या पुतळ्यातली स्त्री चक्क पातळ दोन्ही हातानं नीट वर सावरून घेताना बावरून काहीशा बचावाच्या पवित्र्यात उभी राहिलेली दिसते. हे चित्र पाहून वाचकानं गालातल्या गालात हसत, मनातल्या मनात स्वतःलाच टाळी न दिली तरच नवल. फडणीसांच्या काही काही विनोदी चित्रांना फार खोल अर्थ आहे. अशा वेळी हसवता हसवता ते झटकन् आमचा एक अश्रू आपल्या ओंजळीत दिमाखानं मिरवत नेतात.

'टेलरिंग फर्म' चं नुकतंच उद्घाटन झालं आहे पण कामच नाही अशा व्यथेत व्यग्र असलेले शिंपी दादा जेव्हा दुकानाच्या दर्शनी भागाला लावलेल्या केळीच्या खांबावरच्या फाटक्या पानानांच बसल्या बसल्या मशीनवर टीप मारू लागतात तेव्हा हसू आसूंची उदासरम्य माळ गुंफली जाते. थोरा मोठ्यांच्या बंगल्यात माळीकाम करणारा माळी... आपल्या तुपार स्नानाचा (शॉवर बाथ) पोक बादशाही खुषमस्तीत बागेतल्या पुतळ्याच्याच (आणि तो पुतळाही स्त्रीचाच !) हातात पाणी भरलेली झारी अडकवून देऊन गोपीचंदाच्या थाटात पुरा करताना पाहिला की हसता हसता गळ्यात असाच एक आवंढा दाटून येतो.

व्यापारी मालाच्या जाहिरातीसाठी फडणीसांनी जी काही विनोदी बोलकी चित्रं काढली आहेत त्यांतली 'अॅसगेक होजिअरी'च्या स्ट्रेच नायलॉन पायमोज्यांच्या जाहिरातीसाठी काढलेली चित्रं मला विशेष आवडली आहेत. पायमोज्यांच्या आकारात गुडघे जमिनीवर टेकवून दोन्ही हातानं पंख्यानं वारा घालणाऱ्या दोन जपानी सुंदरी (गेषा) रंगवून (आणि तेही हिरव्या रंगात) ह्या पायमोज्यानं कसं गार आल्हादकारक आणि आरामशीर वाटेल हेच जणू फडणीसांनी सूचित केलं आहे ह्या पायमोज्यांच्या वापरानं तुम्हांला अधांतरी तरंगत चालल्यासारखे वाटेल हे गिऱ्हाइकाच्या मनावर ठसविण्यासाठी ते अरेबियन नाइट मधील जादूच्या उडत्या गालीच्याच्या कल्पनेवरही मात करतात.

चित्रकार फडणीसांनी पु. ल. देशपांडे ह्यांच्या 'अपूर्वाई', 'पूर्वरंग' व रमेश मंत्री यांच्या 'एकहाती टाळी' आणि अन्य काही लेखकांच्या ग्रंथांना विनोदी रेखाटणे दिली आहेत. प्रांजळपणे सांगायचं तर त्यांची ही रेखाटनपद्धती माझ्या वैयक्तिक आवडी निवडीशी जुळती-मिळती नाहीत. लेखकावर आपल्या चित्रांतून मात केली पाहिजे हचा जागरुक भावनेतून ही रेखाटणे उतरल्यासारखी वाटतात. आणि मुख्य म्हणजे त्यांत यांत्रिक कारागिरीचाच भाग मला अधिक वाटतो. मला स्वतःला वसंत सरवटे, बाळ ठाकूर यांच्या केसासारखी सूक्ष्म पण जोरकस लय असलेल्या रेषेनं वेड लावलं आहे. त्यापुढे फडणीसांची अशा रेखाटनांतली रेषा स्थूल, बटबटीत आणि ढोबळ वाटते. शिवाय सरवटे आणि ठाकूर हचांची रेखाटनं प्रतिभेच्या स्पर्शानं अशी काही पल्लवित झालेली भासतात की ते शब्दांपलीकडचं काही पाहत आहेत, दाखवीत आहेत असा मर्मज्ञ रसिकाला साक्षात्कार झाल्यावाचून राहणार नाही. (आणि अखेर शब्दांतून जे सुटले आहे ते पकडण्यासाठीच तर ना चित्ररेषेचे माध्यम वापरायचे असते !) क्लिष्टतेच्या आरोपांतून हे दोन्ही चित्रकार सुटलेले

नाहीत. पण खरं सांगतो, मला स्वत:ला त्यांची रेखाटनं कधीच क्लिष्ट वाटलेली नाहीत. कदाचित असं असेल की पाइप, बिअर, चीज, मेथी आणि कार्ल्याची भाजी ह्यांची रसिकतेनं चव घेण्याची जाण मला वेळीच आली असेल. मर्यादित अर्थानं प्रत्येक कलाकृती आपला हेतू पूर्ण करीत असते त्या संदर्भात फडणीसांच्या चित्रांनी माझ्या मनावर जो एक परिणाम घडविला आहे त्याचे निखळ दर्शन घडविण्याचा इथे मी यथामती प्रयत्न करून पाहिला आहे इतकेच

एक गमतीची गोष्ट जाता जाता इथं सांगाविशी वाटते. परवा परवा एक गृहस्थ माझ्याकडे आले आणि राजकारणाशी संबंध नाही असा दावा करणाऱ्या एका सांस्कृतिक (म्हणविणाऱ्या) संघटनेच्या कार्याची माहिती सांगू लागले. ह्या संघटनेत बौद्धिकाच्या वेळी म्हणे विनोदाला कोणी हसायचं नसतं. चमकदार कल्पनेला टाळ्या वाजवून दाद द्यायची नसते. (कारण ते बौद्धिक गंभीर मुद्रेनेच ग्रहण करायचे असते.) असा मुळी ह्या संघटनेचा दंडकच आहे. आमचे द. मा. मिरासदार, वसंत सरवटे, शि. द. फडणीस कोवळ्या संस्कारक्षम वयात ह्या संघटनेच्या मांडवाखालून गेले असल्याचे ऐकत होतो. आणि हे तिघेही आज विनोदाच्या क्षेत्रात भीमपराक्रम गाजवून राहिले आहेत. फडणीसांची समक्ष भेट झाली अपता त्यांना मी सहज म्हटले, 'तुम्हां तिघांची विनोदनिर्मिती ही तेव्हाच्या त्या सांस्कृतिक-कम्-बौद्धिक कोंडमाऱ्याची तर प्रतिक्रिया नव्हे ?'

त्यावर फडणीस दिलखुलास हसले आणि म्हणाले, 'तुम्ही म्हणता त्यात बरेच तथ्य आहे. पण आम्ही वेळीच ती कोंडी फोडून बाहेर आलो ह्याचे आम्हांला काहीच का श्रेय नाही ?'

साऱ्या चौकटी मोडून उणेपुरे एक तप उभ्या महाराष्ट्राला हसत ठेवणाऱ्या चित्रकार फडणीसांचे ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने मन:पूर्वक अभिनंदन.

• • •

एणें दृग्‌यज्ञे तोषावें ।

नटवर्य नानासाहेब फाटक दि. ८ एप्रिल १९७४ रोजी निवर्तले. त्यांच्या निधनाच्या सुमारे दहा वर्षांपूर्वी 'आकाशवाणी-मुंबई' साठी घेतलेली त्यांची ही एक महत्त्वपूर्ण मुलाखत–स्वतःच्या संदर्भात रंगभूमीविषयी सारे काही परखडपणे सांगून टाकणारी...

ठोमरे : नानासाहेब, रंगभूमीवर नट ह्या नात्याने झालेले तुमचे पदार्पण हा एक योगायोग होता की काही एका आंतरिक ओढीमुळे की बुध्द्याच हा व्यवसाय पेशा म्हणून तुम्ही पत्करलात ?

फाटक : हे पहा ठोमरे, मी नाटकात शिरलो त्यावेळचा काळ असा होता की प्रतिष्ठित घराण्यातल्या मुलानं नाटकाचा धंदा पत्करावा हे एक सामाजिक पाप आहे, अशी जनतेची समजूत होती. नाट्यकलेला उत्तेजन द्यावे असे समाजातले विद्वान व पुढारी नेहमी म्हणत असत, पण प्रत्यक्ष कृती करणाऱ्याच्या वाटचाला समाजाची सहानुभूती मात्र नव्हती. अपघातानं वा योगायोगानं काही मी नाटकधंद्यात आलो नाही. माझे आजोबा नारायणराव फाटक हे मोठे नाट्यप्रेमी गृहस्थ होते. त्यांच्या संबंधीचा उल्लेख कै. देवल, कै. कोल्हटकर, कै. आगरकर यांच्या नाटकातील प्रास्ताविकात केलेला आढळून येतो. एक पिढी टाकून गुणाचे अंश वारसात उतरतात अशी समजूत आहे. त्याप्रमाणे माझ्या अंगात नाट्यगुण व नाट्यविषयाची आवड ही वयाच्या बाराव्या वर्षापासूनच उत्पन्न झाली होती. नाट्यसृष्टीत आपण मोठं व्हावं, नाव मिळवावं ह्याविषयी माझ्या मनात तेव्हापासूनच ओढ होती. कारण लहानपणी गणपतराव जोशी, महाराष्ट्र नाटक मंडळी

नाहीत. पण खरं सांगतो, मला स्वतःला त्यांची रेखाटनं कधीच क्लिष्ट वाटलेली नाहीत. कदाचित असं असेल की पाइप, बिअर, चीज, मेथी आणि काल्र्याची भाजी ह्यांची रसिकतेनं चव घेण्याची जाण मला वेळीच आली असेल. मर्यादित अर्थानं प्रत्येक कलाकृती आपला हेतू पूर्ण करीत असते त्या संदर्भात फडणीसांच्या चित्रांनी माझ्या मनावर जो एक परिणाम घडविला आहे त्याचे निखळ दर्शन घडविण्याचा इथे मी यथामती प्रयत्न करून पाहिला आहे इतकेच

एक गमतीची गोष्ट जाता जाता इथं सांगाविशी वाटते. परवा परवा एक गृहस्थ माझ्याकडे आले आणि राजकारणाशी संबंध नाही असा दावा करणाऱ्या एका सांस्कृतिक (म्हणविणाऱ्या) संघटनेच्या कार्याची माहिती सांगू लागले. ह्या संघटनेत बौद्धिकाच्या वेळी म्हणे विनोदाला कोणी हसायचं नसतं. चमकदार कल्पनेला टाळ्या वाजवून दाद द्यायची नसते. (कारण ते बौद्धिक गंभीर मुद्रेनेच ग्रहण करायचे असते.) असा मुळी ह्या संघटनेचा दंडकच आहे. आमचे द. मा. मिरासदार, वसंत सरवटे, शि. द. फडणीस कोवळ्या संस्कारक्षम वयात ह्या संघटनेच्या मांडवाखालून गेले असल्याचे ऐकत होतो. आणि हे तिघेही आज विनोदाच्या क्षेत्रात भीमपराक्रम गाजवून राहिले आहेत. फडणीसांची समक्ष भेट झाली अपता त्यांना मी सहज म्हटले, 'तुम्हां तिघांची विनोदनिर्मिती ही तेव्हाच्या त्या सांस्कृतिक-कम्-बौद्धिक कोंडमाऱ्याची तर प्रतिक्रिया नव्हे ?'

त्यावर फडणीस दिलखुलास हसले आणि म्हणाले, 'तुम्ही म्हणता त्यात बरेच तथ्य आहे. पण आम्ही वेळीच ती कोंडी फोडून बाहेर आलो ह्याचे आम्हांला काहीच का श्रेय नाही ?'

साऱ्या चौकटी मोडून उणेपुरे एक तप उभ्या महाराष्ट्राला हसत ठेवणाऱ्या चित्रकार फडणीसांचे ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने मनःपूर्वक अभिनंदन.

• • •

एणें दृग्यज्ञे तोषावें ।

नटवर्य नानासाहेब फाटक दि. ८ एप्रिल १९७४ रोजी निवर्तले. त्यांच्या निधनाच्या सुमारे दहा वर्षांपूर्वी 'आकाशवाणी-मुंबई' साठी घेतलेली त्यांची ही एक महत्त्वपूर्ण मुलाखत—स्वत:च्या संदर्भात रंगभूमीविषयी सारे काही परखडपणे सांगून टाकणारी...

ठोमरे : नानासाहेब, रंगभूमीवर नट ह्या नात्याने झालेले तुमचे पदार्पण हा एक योगायोग होता की काही एका आंतरिक ओढीमुळे की बुध्द्याच हा व्यवसाय पेशा म्हणून तुम्ही पत्करलात ?

फाटक : हे पहा ठोमरे, मी नाटकात शिरलो त्यावेळचा काळ असा होता की प्रतिष्ठित घराण्यातल्या मुलाने नाटकाचा धंदा पत्करावा हे एक सामाजिक पाप आहे, अशी जनतेची समजूत होती. नाट्यकलेला उत्तेजन द्यावे असे समाजातले विद्वान व पुढारी नेहमी म्हणत असत, पण प्रत्यक्ष कृती करणाऱ्यांच्या बाबतीला समाजाची सहानुभूती मात्र नव्हती. अपघाताने वा योगायोगाने काही मी नाटकधंद्यात आलो नाही. माझे आजोबा नारायणराव फाटक हे मोठे नाट्यप्रेमी गृहस्थ होते. त्यांच्या संबंधीचा उल्लेख कै. देवल, कै. कोल्हटकर, कै. आगरकर यांच्या नाटकांतील प्रास्ताविकात केलेला आढळून येतो. एक पिढी टाकून गुणाचे अंश वारसात उतरतात अशी समजूत आहे. त्याप्रमाणे माझ्या अंगात नाट्यगुण व नाट्यविषयाची आवड ही वयाच्या बाराव्या वर्षापासूनच उत्पन्न झाली होती. नाट्यसृष्टीत आपण मोठं व्हावं, नाव मिळवावं ह्याविषयी माझ्या मनात तेव्हापासूनच ओढ होती. कारण लहानपणी गणपतराव जोशी, महाराष्ट्र नाटक मंडळी

यांची नाटके माझ्या पाहण्यात आल्यामुळे मी प्रभावित झालो आणि ह्या कलेचा माझ्या मनाला ध्यास लागला. सुरक्षित जीवनाचा त्याग करून ह्या आवडत्या ध्येयासाठी मी हा पेशा पत्करला, ही एक प्रकारची अंधारात घेतलेली उडीच होती म्हणानात ठोमरे...

ठोमरे : ही तुमची अंधारातली उडी अखेर मराठी रंगभूमीच्या दृष्टीने भाग्याचीच ठरली आहे नानासाहेब, तरीही एक प्रश्न विचारावासा वाटतो. नट जन्मावा लागतो की शिकवून नट तयार करता येईल ?

फाटक : शिकवून येईल अशी ही विद्या नाही ठोमरे. मोनालिसा-सारखं चित्र काढायला शिकवता येईल; पण तिच्या हास्यातील जादू चितारायला चित्रकारात स्वयंभूत्व गुण असायला हवेत. नाटचशिक्षण ही एकलव्याची साधना आहे. काही दैवी उपजत असतं, काही अनुकरणानं अवलोकनानं साधायचं असतं; बरचसं स्वतःच्या अंगभूत कौशल्यानं व्यक्त करायचं असतं.

ठोमरे : नानासाहेब, ज्या तुमच्या नाटचगुणांनी रंगमंच उजळून टाकला जातो, त्यात तुमचे मर्दानी देहसौंदर्य आणि आवाजावरील असीम प्रभुत्व ह्या दोन गोष्टींचे स्थान मला तरी फार मोठे वाटत आले आहे. म्हणूनच विचारावेसे वाटते की, ज्या आवाजाच्या नियंत्रित चढउताराच्या जोरावर तुम्ही प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करीत आला आहा, त्याचे मर्म तरी काय ?

फाटक : ठोमरे, सुरेल निकोप आवाज असणं ही एक परमेश्वरी देणगी आहे. पण तो वापरावा कसा हे अभ्यासानं साध्य होण्या-सारखं आहे. भावनांची समज नटाला पूर्णांशानं आली म्हणजे त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडू लागतात, आणि संगीतातल्या स्वराप्रमाणे त्याचा प्रभाव जाणवू लागतो. स्वरांच्या विविध आंदोलनाद्वारे विविध भावना प्रकट करता येतात. ह्यासाठी नटाचे आपल्या आवाजातील स्वरावर नियंत्रण असणे महत्त्वाचे आहे.

ठोमरे : ह्याचं एखादं उदाहरण सांगाल ?

फाटक : कै. गणपतराव जोशांचंच उदाहरण आपल्याला घेता येईल. त्यांची शब्द उच्चारण्याची पद्धत अशी होती की, 'खोल' हा शब्द उच्चारल्याबरोबर खोली जाणवत असे. 'खडबडीत' हा शब्द उच्चारल्याबरोबर त्याचाही परिणाम असाच होई. ध्वनीला स्पर्शसंवेदना प्राप्त झाल्याचा प्रत्यय प्रेक्षकास येई हे अधिक स्पष्ट करायचं तर, 'पानीपतचा मुकाबला' ह्या नाटकातलं त्यांच्या तोंडचं लढाईला निघालेल्या मराठी सेनेचं वर्णन इथं दाखल्या-दाखल घेता येईल : 'अहाहा, काय ही आमची मराठ्यांची विजयी सेना...' ह्या वाक्यानं सुरू झालेलं त्यांचं हे भाषण ऐकताना साक्षात मराठी सेनाच आपल्या पुढ्यातून सरकत आहे, असा भास प्रेक्षकांस होई. आवाजाची अनुकूलता नसतानाही केशवराव दाते एकाच शब्दाच्या उच्चारात भूमिकेचे मर्म प्रेक्षकांपर्यंत पोहोचवीत असत, हे तर मी स्वतः अनुभवले आहे. नाट्यछटाकार दिवाकराच्या 'कारकून' ह्या नाटिकेत नायक शारीरिक दौर्बल्यामुळे नोकरीस अपात्र ठरतो, आणि सिव्हिल सर्जनचा उर्मट पट्टेवाला त्याला, 'चल चालता हो' असं म्हणतो तेव्हा, 'कुठे ?' असा एकच आर्त उद्‌गार दाते मोठ्या परिणाम-कारकरीत्या उच्चारीत असत. दात्यांना आवाजाची अनुकूलता नाही. पण ती उणीव त्यांनी अभिनय आणि स्पष्ट शब्दोच्चाराच्या जोरावर भरून काढली; पण ज्याच्याजवळ अभिनय आणि रूप दोन्हीही नव्हती त्या नानबा गोखल्यांनी केवळ आपल्या कंठगत स्वरमाधुर्याच्या जोरावर 'तोतयाचे बंड' ह्या नाटकातील नाना फडणवीसांची भूमिका अजरामर करून टाकली आहे. स्पष्ट शब्दोच्चार आणि स्वरांची भावनापूर्ण पण नियंत्रित आंदोलने ह्यांना मुद्राभिनयाची जोड मिळाली तर भूमिकेचे यश निश्चित समजावे.

ठोमरे : नानासाहेब, तुम्ही मुद्राभिनयाचा विषय काढलात हे बरच केलंत. नाहीतरी मी तुम्हांला त्याच्याविषयी विचारणारच

होतो. नाट्यप्रयोगांवरील वर्तमानपत्री टीकेत आपण नेहमी असं वाचतो की, 'अमक्या अमक्याचा अभिनय बटबटीत होता. अमक्या अमक्यानं मुद्रेवर सूक्ष्मातिसूक्ष्म भावनांचे मनोहारी दर्शन घडविले.' मला वाटते की नट आणि प्रेक्षक यांतील अंतर ध्यानी घेता हे सारे मुद्राभिनयाद्वारे प्रेक्षकापर्यंत पोहोचविणे मोठे कठीण काम असणार; तुमचा काय अनुभव आहे?

फाटक : रंगमंच आणि प्रेक्षकांची पहिली रांग ह्यामध्ये सुमारे पंधरावीस फुटांचे अंतर असते. अती सूक्ष्म अभिनय काही एका मर्यादेपर्यंत प्रेक्षकावर परिणाम करू शकतो; परंतु त्याचे महत्त्व मी नाकारीत नाही. चित्रपटासारख्या माध्यमात क्लोजअप्स्च्याद्वारे सूक्ष्म अभिनयाची खुमारी प्रेक्षकापर्यंत सुलभरीत्या पोहोचविता येणं शक्य होतं. विलायतेतील प्रेक्षकवर्ग 'ऑपेरा ग्लासेस'च्या मदतीने नटाच्या सूक्ष्म अभिनयाचे विनासायास रसग्रहण करू शकतो. ह्या स्वाभाविक मर्यादा पडल्यामुळे आमच्यासारख्या जुन्या नटांना केवळ नाडला म्हणून ढोबळ अभिनयाची कास धरावी लागे व जे सूक्ष्म अभिनयात हुकले ते आवाज आणि आंगिक अभिनयाने भरून काढावे लागे. एक मात्र खरे की, असा सूक्ष्म अभिनय सबंध प्रयोगभर सांभाळताना नटाच्या मनावर विलक्षण ताण पडला तरी भूमिकेच्या यशाच्या दृष्टीने तो फलदायी झाल्यावाचून राहत नाही. केशवराव दाते यांच्या आंधळ्याच्या शाळेतील मनोहरची भूमिका हे ह्याचे मूर्तिमंत उदाहरण होय. हॅम्लेट, झुंजारराव, राजेश्वर ह्या माझ्या शेक्सपिरियन भूमिकांतून अशा स्वरूपाचा सूक्ष्म अभिनय दर्शविण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न करीत आलो आहे हे तुम्हांलाही माहीत आहे.

ठोमरे : नानासाहेब, आपण एरव्ही व्यवहारात वागताना ज्या पद्धतीनं बोलतो त्या पद्धतीनं नाटकातील संवाद सहजपणे बोलण्याचा एक प्रयोग तुम्ही करीत होता– विशेषतः शिरवाडकरांच्या 'वैजयंती' नाटकाच्यावेळी हे मला जाणवलं. ह्या प्रयोगाचं यशापयश काय?

फाटक : प्रेक्षकांच्या दृष्टीने हा प्रयोग अयशस्वी ठरला ठोमरे. कारण मुळात 'वैजयंती' हे नाटकच काहीसे मेलोड्रॅमेटिक स्वरूपाचे आहे. असं सहज बोलणं सामाजिक नाटकात चालू शकेल... तरीही मला असं वाटतं की शब्दोच्चाराचं स्वरूप भूमिकेच्या गुणधर्मानुसार बदलत राहील.

ठोमरे : एक प्रश्न विचारू का ? थोडा अडचणीचा आहे म्हणून जरा संकोच वाटतो.

फाटक : खुशाल विचारा, तुमच्या-माझ्यात कसला आलाय संकोच ठोमरे ?

ठोमरे : ग्रेट– प्रश्न आहे तुमच्या एका जुन्या आणि सुपरिचित तक्रारीबाबत. नाटकमंडळीचे आपण मालक नसल्यामुळे वाट्याला आल्या त्या भूमिका आपल्याला कराव्या लागल्या. त्यांत आपल्याला कसलेही मत नव्हते की चॉइस नव्हता, ही तुमची तक्रार– कबूल ?

फाटक : कबूल.

ठोमरे : समजा, तुम्ही मालक असता कंपनीचे तर कोणत्या प्रकारच्या भूमिका तुम्ही स्वतःसाठी निवडल्या असत्या ?

फाटक : मराठी प्रेक्षकांना धीरोदात्त नायकाची भूमिका करणारा नट आवडतो, त्यामुळे अशाच स्वरूपाच्या भूमिका आपल्या वाट्याला याव्यात असे मला वाटे. परंतु दुर्दैवानं केरोपंत, गिरीधर, शंतनु, बाबा शिगवण अशाच खलनायकी वा म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या भूमिका माझ्या वाट्याला आल्या. केवळ कर्तव्यबुद्धीनं या नावडत्या भूमिका मी प्रयासानं उभ्या केल्या. त्या न भूतो न भविष्यति का गाजाव्यात हे मला स्वतःला तरी कोडेच आहे ठोमरे. पुढे थोडी-अधिक समज आल्यावर गडकऱ्यांचा वृंदावन, आणि शेक्सपीअरचे हॅम्लेट, ऑथेल्लो, मॅकबेथ ह्या भूमिकांतील मानसिक संघर्षातल्या सौंदर्यानं मी मोहित झालो व

अशा नटाच्या अभिनयाला आव्हान ठरणाऱ्या भूमिका आपल्या वाटचाला याव्यात असे मला सतत वाटू लागले.

ठोमरे : बरं मग तशा तुमच्यावर लादल्या गेलेल्या भूमिकांत अशा स्वरूपाची एखादी तरी भूमिका तुमच्या वाटचाला आली होती का ?

फाटक : आली होती; नाही कसं. कमतनूरकरांच्या, 'श्री' ह्या नाटकातील कुसुमाकराची भूमिका तुम्ही विचारता त्या प्रकारात मोडते. वास्तविक नाटकाच्या मुख्य कथासूत्राशी या भूमिकेचा काही संबंध नाही. पण माझ्या अभिनयगुणांच्या जोरावर नायकाच्या तोडीचे महत्त्व या भूमिकेला मी प्राप्त करून दिले असल्याचे खुद्द नाटककारानेच एका लेखात व्यक्त केले आहे. ही भूमिका बसविताना अभिनयदर्शनाच्या जोडीनेच प्रेक्षकांची मने आकृष्ट करतील अशा काही नाट्यपूर्ण चतुर हालचालींचा मी त्यात अवलंब केला होता. ह्या भूमिकेनं जसं मला तसंच प्रेक्षकांनाही अतीव समाधान दिलं. 'त्यागराज', ही भूमिकाही अशीच माझ्या आवडीची होती.

ठोमरे : नानासाहेब, तुम्ही आजवर अनेक भूमिका गाजवल्या पण तो ऐन उमेदीचा काळ जर काही चमत्कारानं तुमच्या हाती गवसला तर पुन्हा कोणती भूमिका साऱ्या ऐश्वर्यानं साकार करण्याची इच्छा तुम्ही बाळगाल ?

फाटक : ह्याचं निश्चित उत्तर देता येणं कठीण आहे ठोमरे. पण एक आहे, ज्या शेक्सपीअरीन भूमिकांची ओढ माझ्या मनाला आहे, त्यांची समज आयुष्यात मला फार उशिरा आली. ऐन जवानीतलं देहसौंदर्य आणि शरीरसामर्थ्य पुन्हा प्राप्त झालं तर ह्याच हॅम्लेट, ऑथेल्लो आणि मॅकबेथ ह्या भूमिका मी आनंदानं करीन, आणि आज जे दोष माझ्या प्रेक्षकांना जाणवतात ते जाणवू न देण्याचे समाधान मला मिळविता येईल. ह्या पाश्चात्य भूमिकांच्या मराठी रंगभूमीवरील दर्शनाबाबतही मला काही

प्रयोग करून पाहता येतील. मला नेहमी असं वाटतं की, रशियामध्ये 'शाकुंतल' नाटक जसं भारतीय वेषभूषा आणि नेपथ्य यांना धक्का न लावता सादर केलं जातं तसेच पाश्चात्य नाटकाचे प्रयोग एक भाषा वगळता तंतोतंत मुळाबरहुकूम व्हावेत, म्हणजे प्रेक्षकांच्या दृष्टीने सामाजिक, धार्मिक आणि नैतिक संकेताच्या दृष्टीनं काहीही व्यत्ययकारक ठरणार नाही.

ठोमरे : तुमचा हा मुद्दा मलाही महत्त्वाचा वाटतो. त्या दिशेने कोणीतरी प्रयोग करून पाहणं आता अगत्याचं आहे. नानासाहेब, 'स्वगत भाषण' हे जुन्या नाटकाचं आणि नटाचंही एक सामर्थ्य आहे, असं मी मानतो. नवनाट्यांचे पुरस्कर्ते स्वगत भाषण ही एक अनैसर्गिक अशी गोष्ट समजतात, तुमचं खरं मत सांगा.

फाटक : ह्या बाबतीत मतभिन्नता होऊ शकेल. परंतु मग मी असा प्रश्न विचारीन की 'रंगायन'नं आयनेस्कोच्या 'दि चेअर्स' चं 'खुर्च्या' हे भाषांतर गुदस्ता रंगभूमीवर आणलं, त्यातली पात्रं बोलतात तो काय संवाद आहे? ती 'स्वगतं'च आहेत. पश्चिमेकडून आलेलं हे लोण तेंडुलकरांनी आपल्या 'मी जिंकलो, मी हरलो'त पचविलेलं दिसतंय. स्वगताला असलेला नवनाट्य-वाल्यांचा विरोध मावळतीला लागलाय ही अभिनंदनीय अशी गोष्ट नव्हे काय? स्वगतामुळे जे प्रत्यक्ष संवादातून कम्युनिकेट करता येत नाही, व्यक्त करता येत नाही, सुचविता येत नाही, ते व्यक्त करता येतं, आणि नाटकाला गती लाभते. नटाचा आवाज, शब्दोच्चार, मुद्राभिनय ह्या सर्वांना स्वगतात केवढा तरी वाव असतो. नाट्याच्या यशस्वितेला सामर्थ्यसंपन्न स्वगताचा केवढा तरी हातभार लागतो!

ठोमरे : तुमची काही स्वगतं फार गाजलेली आहेत नानासाहेब. तुमचा चाहता प्रेक्षकवर्ग त्यांच्या आठवणीनं अजूनही रंगून जातो. पण तुम्हाला स्वतःला आनंद देणारं स्वगत कोणतं, ते सांगा शकाल?

फाटक : जरूर. 'राजमुकुट' नाटकातलं एक स्वगत आहे. 'ती आणखी काही दिवसांनी गेली असती तर बरं झालं असतं...' हे; झालंच तर, 'एकच प्याला'तलं सुधाकराच्या तोंडचं, 'दुर्दैवाचे दशावतार पाहण्याची शक्ती माझ्या अंगात आता राहिली नाही', हे. पण 'हॅम्लेट' नाटकातली स्वगतं ठोमरे, मला आवडतात ती एका विशिष्ट कारणासाठी. जीवनाचं क्षणभंगुरत्व ती मनावर बिंबवतात आणि माणसाला आपलं योग्य स्थान ओळखायला ती शिकवतात. आता हेच पहा, तिसऱ्या अंकात हॅम्लेट म्हणतो, 'एकच प्रश्न. जगावं की मरावं...' हे. पुढे पाचव्या अंकातील त्याचं ते स्वगत, 'ह्या कवटीत एक जीभ होती आणि ती गात असे...'

ठोमरे : नानासाहेब, आता एक अगदी शेवटचा प्रश्न... नट भूमिका करतो म्हणजे एक प्रकारचा परकाया प्रवेश करतो, भूमिकेशी एकरूप झाला म्हणजे तो स्वतःला विसरतो हे खरं काय ?

फाटक : ठोमरे, प्रश्न फार मार्मिक आहे तुमचा. भूमिका हे शर्यतीचे घोडे आणि नट हा स्वार असतो. भूमिकेवरील त्याची मांड पक्की असते. घोड्याच्या गतीशी तो एकरूप झालेला भासला तरी वेगाचे त्याला भान असते, आणि नियंत्रणाची शक्ती त्याच्या काबूत असते. विकारांनी आणि भावनांनी मनुष्याच्या शरीरावरचा आणि बुद्धीवरचा ताबा सुटतो असं नेहमी अनुभवास येतं. मग रंगभूमीवर या भावना व विकार नटाला खऱ्या स्वरूपात होऊ लागल्या तर नटाला भाषणं आठवून ती रंगभूमीवर बोलता तरी येतील काय ? माझीच एक आठवण तुम्हांला सांगतो. माझ्या प्रथम पत्नीच्या निधनानंतर–श्राद्ध इत्यादी और्ध्वदेहिक क्रियाकर्म करून परत आल्याबरोबर मला 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' ह्या नाटकात भूमिका करावी लागली. कथानकात नायकाच्या–म्हणजे विक्रांताच्या निष्पाप पत्नीला हाल हाल करून ठार मारविले असून ती वार्ता एक दूत येऊन, मोठ्या करुण स्वरात नायकाला इतर सर्व लोकांसमक्ष सांगत असतो असा एक प्रसंग आहे. माझ्या

अंतःकरणाची जखम अगदी ताजी असल्यानं ह्या प्रवेशातील उच्च बिंदू येताच मी भांबावून गेलो, आवाज बंद झाला, डोळ्याला पाण्याची धार लागली, आणि गतपत्नीची स्मृती जागी होऊन मी संज्ञाहीन स्थितीत रंगभूमीवर उभा होतो, पुढे काय भाषणं बोलावयाची आहेत, ती आठवेनात. बापूराव पेंढारकर, मृणालिनीच्या वेषात जवळच उभे होते त्यांनी माझी स्थिती ओळखली, आणि समयसूचकतेनं मधली भाषणं गाळून पदाला आरंभ केला. प्रवेश निभावून नेला.

आता हे मात्र कबूल करावयास हवे की आपली आवडती भूमिका, रसिक प्रेक्षकांनी भरलेल्या रंगमंदिरात, त्यांच्याकडून मिळणाऱ्या उत्तेजनाने मनापासून वठवीत असता नट एक प्रकारच्या समाधीत– 'ट्रान्स'मध्ये जाऊन स्वतःला मिनिट अर्ध मिनिट फार तर विसरून जाऊ शकतो, पण अखेर त्याचा तोच असतो.

ठोमरे : नानासाहेब, रंगमंचावरील तुमच्या अभिनयानं आजवर हजारो प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले असेल, परंतु तुमच्या आजच्या ह्या विचारदर्शनानं खचितच लाखो श्रोत्यांचे कान धन्य झाले असतील. नानासाहेब, मी तुमचे मनःपूर्वक आभार मानतो.

REFBK-0023462

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2020
23962
शिवाजी
13/3/20
शाखा (स्थळ प्रत)

उमाकांत ठोमरे यांच्या
खट्याळ लेखणीतून उतरलेल्या
निवडक चरित्र-आत्मचरित्रपर
आणि समर्थ व्यक्तिचित्रणात्मक
ललित लेखांचा हा संग्रह
काहीसा मिस्किल
आणि तितकाच खुपबुद्धार !